**पिंपरी चिंचवड महानगरपालिका,पिंपरी- ४११ ०१८**

**विशेष मा.महापालिका सभा**

**कार्यपत्रिका क्रमांक – ५६**

**सभावृत्तांत**

**दिनांक – २६.३.२०२१** **वेळ – दुपारी २.०० वाजता**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची विशेष मा.महापालिका सभा शुक्रवार दिनांक २६/३/२०२१ रोजी दुपारी २.०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात मा.उपसचिव महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील पत्र क्र.कोरोना-२०२०/प्र.क्र.७६/नवि-१४ दि.३ जुलै २०२० अन्वये ऑनलाईन पध्दतीने (व्हिडीओ कॉन्फरन्सिंग द्वारे) आयोजित करणेत आलेली आहे. सभेस खालील काही सन्मा.सदस्य प्रत्यक्ष सभागृहात तर काही सन्मा.सदस्य ऑनलाईन पध्दतीने (व्हिडीओ कॉन्फरन्सिंग द्वारे) उपस्थित होते.

१) मा.उषा उर्फ माई मनोहर ढोरे महापौर

२) मा.घुले नानी ऊर्फ हिराबाई गोवर्धन उपमहापौर

३) मा.कुंदन अंबादास गायकवाड

४) मा.स्वीनल कपिल म्हेत्रे

५) मा.साधना अंकुश मळेकर

६) मा.अश्विनी संतोष जाधव

७) मा.सारीका शिवाजी सस्ते

८) मा.राहुल गुलाब जाधव

९) मा.नितीन (आप्पा) प्रताप काळजे

१०) मा.बुर्डे सुवर्णा विकास

११) मा.तापकीर विनया प्रदीप (आबा)

१२) मा.डोळस विकास हरिश्चंद्र

१३) मा.सागर बाळासाहेब गवळी

१४) मा.गोफणे अनुराधा देविदास

१५) मा.बारसे प्रियांका प्रविण

१६) मा.अजित दामोदर गव्हाणे

१७) मा.बोइनवाड यशोदा प्रकाश

१८) मा.लांडगे सारिका संतोष

१९) मा.लांडगे रवि लक्ष्मण

२०) मा.लांडगे राजेंद्र किसनराव

२१) मा.संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे

२२) मा.प्रा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे

२३) मा.फुगे भिमाबाई पोपट

२४) मा.ॲड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे

२५) मा.सावळे सिमा रविंद्र

२६) मा.लोंढे नम्रता योगेश

२७) मा.मडिगेरी विलास हनुमंतराव

२८) मा.लांडे विक्रांत विलास

२९) मा.गीता सुशिल मंचरकर

३०) मा.राहुल हनुमंतराव भोसले

३१) मा.वैशाली ज्ञानदेव घोडेकर

३२) मा.समीर मोरेश्वर मासुळकर

३३) मा.अनुराधा गणपत गोरखे

३४) मा.केशव हनुमंत घोळवे

३५) मा.मंगला अशोक कदम

३६) मा.तुषार रघुनाथ हिंगे

३७) मा.अश्विनी भिमा बोबडे

३८) मा.योगीता ज्ञानेश्वर नागरगोजे

३९) मा.संजय बबन नेवाळे

४०) मा.एकनाथ रावसाहेब पवार

४१) मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे

४२) मा.संगिता (नानी) प्रभाकर ताम्हाणे

४३) मा.पंकज दत्तात्रय भालेकर

४४) मा.घोलप कमल अनिल

४५) मा.उत्तम प्रकाश केंदळे

४६) मा.पवळे सुमनताई मधुकर

४७) मा.चिखले सचिन तुकाराम

४८) मा.यादव मीनल विशाल

४९) मा.वैशाली जालिंदर काळभोर

५०) मा.प्रमोद कुटे

५१) मा.राजू मिसाळ

५२) मा.शैलजा अविनाश मोरे

५३) मा.अमित राजेंद्र गावडे

५४) मा.बाळासाहेब नामदेव ओव्हाळ

५५) मा.खानोलकर प्रज्ञा महेश

५६) मा.भोंडवे संगिता राजेंद्र

५७) मा.मोरेश्वर महादू भोंडवे

५८) मा.ढाके नामदेव जनार्दन

५९) मा.माधुरी कुलकर्णी उर्फ मोनाताई

६०) मा.करुणा शेखर चिंचवडे

६१) मा.चिंचवडे सचिन बाजीराव

६२) मा.भोईर सुरेश शिवाजी

६३) मा.अपर्णा निलेश डोके

६४) मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

६५) मा.गावडे राजेंद्र तानाजी

६६) मा.जयश्री वसंत गावडे

६७) मा.कोमल दिपक मेवानी

६८) मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे

६९) मा.सुलक्षणा राजू धर

७०) मा.शाम गणपतराव लांडे

७१) मा.सुजाता सुनिल पालांडे

७२) मा.कदम निकीता अर्जुन

७३) मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)

७४) मा.डब्बू आसवानी (हिरानंद)

७५) मा.नढे विनोद जयवंत

७६) मा.पाडाळे निता विलास

७७) मा.काळे उषा दिलीप

७८) मा.कोकणे संतोष अंकुश

७९) मा.बारणे अर्चना तानाजी

८०) मा.कैलास उर्फ बाबा भालचंद्र बारणे

८१) मा.बारणे झामाबाई बाळासाहेब

८२) मा.निलेश हिरामण बारणे

८३) मा.वाघमारे अश्विनी विक्रम

८४) मा.दर्शले रेखा राजेश

८५) मा.कलाटे राहुल तानाजी

८६) मा.कलाटे मयूर पांडुरंग

८७) मा.ममता विनायक गायकवाड

८८) मा.कामठे तुषार गजानन

८९) मा.चोंधे आरती सुरेश

९०) मा.कस्पटे संदिप अरुण

९१) मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन

९२) मा.सविता बाळकृष्ण खुळे

९३) मा.सुनिता हेमंत तापकीर

९४) मा.चंद्रकांत बारकु नखाते

९५) मा.बापु उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे

९६) मा.कुटे निर्मला संजय

९७) मा.विठ्ठल उर्फ नाना काटे

९८) मा.आंगोळकर सागर सुनिल

९९) मा.मुंढे उषा अंकुश

१००) मा.कदम शशिकांत गणपत

१०१) मा.लोखंडे चंदा राजू

१०२) मा.बनसोडे राजू विश्वनाथ

१०३) मा.आशा धायगुडे-शेंडगे

१०४) मा.काटे स्वाती (माई) चंद्रकांत

१०५) मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत

१०६) मा.राजापुरे माधवी राजेंद्र

१०७) मा.चौगुले सीमा दत्तात्रय

१०८) मा.नवनाथ दत्तू जगताप

१०९) मा.संतोष बबन कांबळे

११०) मा.सोनवणे शारदा हिरेन

१११) मा.हर्षल मच्छिंद्र ढोरे

११२) मा. संजय मल्हारराव वाबळे

११३) मा. भाऊसाहेब सोपानराव भोईर

११४) मा.नायर प्रेमकुमार शंकरन उर्फ बाबू

११५) मा.ॲड.मोरेश्वर ज्ञानेश्वर शेडगे

याशिवाय मा.राजेश पाटील-आयुक्त, मा.विकास ढाकणे-अतिरिक्त आयुक्त (१), मा.उल्हास जगताप-नगरसचिव तथा अतिरिक्त आयुक्त (३), मा.कुंभोजकर-मुख्य लेखापरिक्षक, मा.राजन पाटील- शहर अभियंता, मा.डॉ.रॉय-आरोग्य वैदयकीय अधिकारी, मा.नाळे-उपसंचालक (नगररचना), मा.कोळंबे-मुख्य लेखा व वित्त अधिकारी, मा.इंगळे, मा.चारठाणकर, मा.दुरगुडे, मा.इंदलकर, मा.झगडे, मा.लोणकर, मा.खोत- उपआयुक्त, मा.निकम, मा.भालकर, मा.सवणे- सह शहर अभियंता, मा.खाबडे-प्र.सह शहर अभियंता,

मा.खांडेकर, मा.देशमुख, मा.शिंदे, मा.बोदडे, मा.बहुरे-सहाय्यक आयुक्त, मा.गायकवाड-प्र.मुख्य उदयान अधिक्षक, मा.मुंढे- प्र.शिक्षणाधिकारी (माध्यमिक शिक्षण विभाग), मा.शिंदे-प्रशासन अधिकारी (प्राथमिक शिक्षण विभाग), मा.पोमण-मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी, मा.डॉ.वाबळे- अधिष्ठता वायसीएमएच, मा.चव्हाण, मा.कुलकर्णी, मा.जुंधारे, मा.गट्टूवार, मा.भोसले, मा.मोरे, मा.पाटील, मा.घुबे, मा.वाघुंडे, मा.टकले, मा.धुमाळ - कार्यकारी अभियंता, मा.डॉ.दगडे-पशुवैदयकीय अधिकारी, मा.देशमुख, मा.पानसरे, मा.तावडे-प्रशासन अधिकारी, मा.जरांडे- सुरक्षा अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

**मा.महापौर** – उपस्थित मा.नगरसेवक, मा.नगरसेविका, ऑनलाईन उपस्थित असलेले सर्व सदस्य, मा.आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे. मी आपणां सर्वांना सांगु इच्छिते की, सध्या कोरोनाचे पेशंट खुपच वाढलेले आहेत आणि आपण बजेटला मान्यता देण्याकरीता उपस्थित आहात ज्यांना कोणाला बोलायचे असेल तर त्यांना ५ मिनिटांचा अवधी देण्यात येईल.

नगरसचिव - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या स्थायी समितीने तयार केलेले सन २०२०-२१ चे सुधारित व सन २०२१-२२ चे मुळ अंदाजपत्रक अ व क तसेच केंद्रशासन पुरस्कृत योजनांसह महानगरपालिकेने नमुद केलेल्या प्रशासकीय सुधारणांचा विचार करुन शहरी गरिबांसाठीचे अंदाजपत्रक प विचारासाठी.

मा.महापौर यांनी विहीत केल्याप्रमाणे विशेष सभेतील कामकाजाचा क्रम सर्वसाधारणपणे पुढीलप्रमाणे असेल-अंदाजपत्रक " अ" व "क" तसेच "प" संबंधिचे मा.सभापती, स्थायी समिती यांचे निवेदन,

१) अंदाजपत्रक " अ" व "क" तसेच "प" यावर चर्चा,

२) चर्चा समाप्तीनंतर अंदाजपत्रक "अ" व "क" तसेच "प" यावरील ठराव मांडणे अनुमोदन देणे,

३) अंदाजपत्रकावरील ठरावास सुधारणा/फेरबदलच्या सूचना मांडल्या गेल्यास त्यांची वैधता- ग्राह्य-अग्राह्यता तपासण्याकरीता किमान पूर्ण २ दिवस सभा कामकाज तहकूब करणे -

४) एका सदस्यास एकच सुधारणा/फेरबदल सूचना मांडता येईल किंवा त्यांस अनुमोदन देता येईल. मांडण्यात येणारी सूचना कितीही मोठी असू शकेल.

५) अंदाजपत्रकातील खर्चाची तरतूद वाढवावयाची असेल किंवा नवीन तरतूद करावयाची असेल तर कोणत्या खर्चाची तरतूद तेवढ्या प्रमाणात कमी करावयाची किंवा कोणत्या जमेत वाढवावयाची हे फेरबदलाची सूचना ग्राह्य होण्यासाठी नमूद असणे आवश्यक राहील.

मा.सभापती स्थायी समिती यांना विनंती करतो की त्यांनी अंदाजपत्रका वरील निवेदन/मनोगत व्यक्त करावे.

(मा.ॲड.नितीन लांडगे, सभापती स्थायी समिती यांनी अंदाजपत्रका वरील
निवेदन/मनोगत व्यक्त केले.)

मा.मंगला कदम – मा.महापौर साहेब,मा.आयुक्त,सन्मा.सभागृह, या बजेटवर चर्चा करुन उपयोग होणार आहे का? कारण आज जे बजेट पुढं आलं आहे २० फेब्रुवारीच्या आत ही मिटींग ठेवली असती तर चर्चा करता आली असती. या विषयावर २,३,४ दिवस चर्चा चालली असती तरी चाललं असतं परंतु आपल्याकडे अशी पध्दत आहे की, बजेटवर चर्चा करुन काहीही उपयोग नाही. नगरसचिवांनी खुलासा करावा की,तुम्ही उपसूचना घेणार आहे का, यामध्ये काही बदल होणार आहे का त्यानंतर मी परत बोलणार आहे.

**मा.नामदेव ढाके -** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त,सन्मा.सभागृह, याठिकाणी मंगलाताईनी सांगितलं आहे , ख-या अर्थानं ही बजेटची सभा ती २० फेब्रुवारीच्या दरम्यान आयोजित करुन त्यावर चर्चा व्हायला पाहिजे. ताई,मला वाटतं आता सुध्दा आपण सांगितलं आहे की, स्थायी समितीकडनं आलेल्या बजेटवर आपल्याला चर्चा करायची आहे. आपण याठिकाणी उल्लेख केलाआहे की,उपसूचना घेणार आहात का? तसंही आपल्याकडे ३१ तारखेपर्यंत बिलं अदा केली जाणार आहेत. कालच मी विरोधी पक्षाच्या नेत्यांना सांगितलं होतं की, तुमच्याही सदस्यांच्या उपसूचना आलेल्या आहेत पण त्या कुठल्या आलेल्या आहेत ज्या कामांना प्रशासकीय मान्यता आहे त्या कामांच्या संदर्भातच उपसूचना आहेत आणि त्या विभागाने नवीन हेड निर्माण करुन काम समाविष्ठ करायचं असेल तर ते समाविष्ठ करत असताना त्याला टोकन तरतुद करायची असेल तर त्या त्या विभागानेच वाढ/घट करुन द्यायची अशा पध्दतीच्याच उपसूचना आपण घेणार आहोत. तरी अशा प्रकारच्या तुमच्या ज्या काही उपसूचना असतील तर त्या आम्ही

स्विकारु आणि या बजेटमध्ये घेऊ. कुठल्याही प्रकारची वाढ किंवा मागच्या कामाला वाढ द्यायची अशा प्रकारच्या उपसूचना स्विकारल्या जाणार नाहीत त्यामुळे मा.महापौर, सन्मा.मंगलाताईनी जो मुद्या उपस्थित केला आहे त्यासंदर्भात मी या सभागृहात सांगितलेलं आहे. आणि ज्यांना या बजेटवर चर्चा करायची आहे त्यांनी चर्चा करावी.

**मा.सचिन चिखले -** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त,सन्मा.सभागृह खरंतर २०२०-२१ चे महत्वपुर्ण अंदाजपत्रक स्थायी समितीचे अध्यक्ष मा.नितीनजी लांडगे यांनी सादर केलेलं आहे. सगळयात बजेटवर बोलण्याआधी एक नक्कीच मी आपल्याला सांगु इच्छितो की, कोरोनाचा प्रादुर्भाव एवढया मोठया प्रमाणात वाढत असताना सभागृहाचं मी पुन्हा एकदा लक्ष वेधु इच्छितो की, नागरीकांना दिलासा देण्यासाठी आपण लवकरात लवकर हॉस्पिटल्स निर्माण करणं गरजेचं आहे. मा.महापौर साहेब,आपण २/३ दिवसापुर्वी कोरोनाच्या संदर्भात मिटींग घेतली आणि त्याच्यामध्ये आपण आदेश दिले होते की,जम्बो कोविड सेंटर लवकरात लवकर चालू करावे. तर मी आपणांस नम्र विनंती करतो की, दिवस-रात्र एक करुन लवकरात लवकर एक जम्बो कोविड सेंटर आणि शहरातील खाजगी हॉस्पिटल्स चालू करावेत जेणेकरुन आपल्या शहरातील रुग्ण त्याठिकाणी जातील आणि त्यांना बेड उपलब्ध होतील. अशा सूचना आपण द्याव्यात कारण की, गेल्या २/३ दिवसापासून एवढया मोठया प्रमाणात संसर्ग वाढतोय, पेशंटची संख्या वाढत आहे. आणि या शहरामधील सर्वसामान्य रुग्णांना व्हेंटीलेटर बेड,आयसीयु बेड कुठेही मिळताना दिसत नाही. आयुक्त साहेब,आपण या गोष्टीची खबरदारी घ्यावी. आणि लवकरात लवकर खाली सूचना द्याव्यात. मा.महापौर साहेब, माझी एक शोकांतिका आहे. आज लांडगे साहेबांनी बजेट सादर केलं. शहरवासियांच्यासाठी खुप चांगले महत्वाचे निर्णय घेतले परंतु माझ्या प्रभागामध्ये निगडी,यमुनानगर,सेक्टर २२ असेल याठिकाणच्या कामांना निधी कमी देताना मला दिसत आहे. फ प्रभागाला आपण ११८ कोटी रु.चं बजेट दिलेलं आहे. त्याच्या मध्ये प्रभाग क्र. १ ला ४० कोटी रु.आपण दिलेले आहेत. प्रभाग क्र. ११ ला ४५ कोटी रु. दिले, प्रभाग क्र.१२ ला २६ कोटी रु. दिले, आणि प्रभाग क्र.६ ला फक्त ६ कोटी रु. दिलेले आहेत. आम्ही पण या शहरात राहतो या शहरातील, माझ्या प्रभागातील सर्व नागरीक टॅक्स, पाणीपट्टी, वीजबील भरतात मग माझ्या प्रभागावर अन्याय का? मोठया प्रमाणात २४ बाय ७ ची कामे झाली , अमृत योजनेची कामे झाली, आजही प्रभागातील स्थिती अशी आहे की, प्रभागातील रस्ते दुरुस्त नाहीत, मोठया प्रमाणात खड्डे पडलेले आहेत. त्याच प्रमाणे सेक्टर २२ चा जो परिसर आहे त्या भागामध्ये झोपडपट्टीचे प्रमाण जास्त आहे. काही भागामध्ये अजुन ड्रेनेज

लाईन टाकुन झालेल्या नाहीत. ड्रेनेजलाईनचं पाणी मोठया प्रमाणावर बाहेर येत आहे. आम्ही काही उपसूचना सत्तारुढ पक्षनेत्यांकडे दिलेल्या आहेत. काल रात्री ई-मेल सुध्दा केलेला आहे त्या आपण मान्य कराव्यात. गेली कित्येक वर्ष निगडी,तळवडे,रुपीनगर,सेक्टर २२, बिजलीनगर, प्राधिकरण असेल, संभाजीनगरचा भाग असेल एवढया मोठया परिसरातुन जर लोक विद्युत दाहिनीच्या अंत्यविधीसाठी येतात,त्याठिकाणी अंत्यविधीसाठी लाईन लागते. आणि त्याठिकाणी एक प्रेत जाळण्यासाठी ३/४ तास थांबावं लागतं. मागच्या वर्षी सांगितलं होतं की, जुनी विदयुत दाहिनी बदली करुन नवीन विदयुत दाहिनी देणेत आली आहे त्याबद्दल मी सभागृहाचं आणि आपलं अभिनंदन करतो. परंतु दुसरी जी विदयुत दाहिनी आहे ती मला वाटतं मधुकर पवळे असताना ती विदयुत दाहिनी बसविण्यात आलेली होती. तेंव्हा पासून आम्ही सांगत आहे की,ती पण विदयुतदाहिनी बदलून घ्या. जेणेकरुन प्रभाग व अन्य परिसरातील लोकांना त्याठिकाणी अंत्यविधी करता आला पाहिजे. मा.महापौर साहेब,आपण एकीकडे म्हणतो की, आपण बजेट सादर केलं आहे. परंतु दुसरीकडे जर का आपण विविध विभागाचं पाहिलं तर फ प्रभागामध्ये प्रभाग क्र. १ ला ३ कोटी १३ लाख, प्रभाग क्र. ११ ला २ कोटी ७५ लाख, प्रभाग क्र. १२ ला १ कोटी ६२ लाख, आणि प्रभाग क्र. १३ ला फक्त १ कोटी रु. एवढा मोठा अन्याय आम्ही सहन करणार नाही. वेळोवेळी सर्व नागरीकांनी महापालिकेला सहकार्य केलेलं आहे. त्यामुळे आम्ही ज्या उपसूचना मांडलेल्या आहेत त्या मंजुर करणेत याव्यात अशी विनंती करतो. सेक्टर २२ मधील रस्ते असतील, विविध क्रिंडागणे,बगीचे असतील, ही सर्व कामे येणा-या बजेटमध्ये घेणेत यावीत. याबाबतच्या उपसूचना आम्ही पक्षनेत्यांकडे दिलेल्या आहेत. त्या स्विकारण्यात याव्यात अन्यथा येणा-या काळामध्ये मोठया प्रमाणात आंदोलन छेडण्यात येईल. भरपूर बोलण्यासारखं काही आहे परंतु कोरोनाची परिस्थिती लक्षात घेवुन याठिकाणी थांबतो धन्यवाद, जयहिंद, जयमहाराष्ट्र.

**मा.पंकज भालेकर -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त, सन्मा.सभागृह, आताच याठिकाणी स्थायी समितीचे अध्यक्ष सन्मा.नितीनजी लांडगे यांनी याठिकाणी बजेट सादर केलंलं आहे. ख-या अर्थानं आज याठिकाणी मा. महापौरांचं आभार मानले पाहिजे की, गेली ४ वर्ष बजेटवर बोलण्याची आम्हांला संधी दिलेली नाही. आता मला याठिकाणी सांगायचं आहे की, आपले हे ८ प्रभाग आहेत प्रत्येक प्रभागाला आपण बजेट दिलेलं आहे. विशेष योजना असतील किंवा आपल्या प्रभागाचं बजेट असेल, हे बजेट आपण सर्व प्रभागांना समान वाटप केलेलं नाही. काही प्रभागांना ३०० कोटी रु. निधी दिलेला आहे, काही

प्रभागांना २५० कोटी रु. निधी दिलेलाआहे. आणि आमच्या फ प्रभागाला ११८ कोटी रु. दिलेलेआहेत. आणि याच्यामध्ये आमचा प्रभाग हा रेडझोन मध्ये असल्यामुळे सगळयात कमी बजेट दिलेलं आहे. आणि रेडझोन मध्ये प्रभाग असल्यामुळे आमच्या प्रभागात कुठलेही मोठे प्रोजेक्ट होत नाहीत त्यामुळे या प्रभागातील निधी इतर प्रभागामध्ये वर्ग करुन त्यांच्या लेवलवर कामे केली जातात. मला याठिकाणी सांगायचं आहे की, आमच्या भागात मोठे प्रोजेक्ट होत नसल्यामुळे आम्हांला असं कुठलंही वर्गीकरण करता येत नाही. सुरुवातीला जे बजेट मिळेल त्या बजेटमध्येच आम्हांला पुढचं संपुर्ण वर्ष काम करावं लागतयं. याठिकाणी आम्ही ज्या उपसूचना दिलेल्या आहेत त्या आपण स्विकाराव्यात अशी विनंती करतो. गेल्या ४ वर्षापासून आम्ही ओरडतोय आम्हांला बजेट द्या. आम्हाला वर्गीकरण करता येत नाही. कायम आम्हांला रेडझोनचं कारण सांगितलं जातयं म्हणुन मला सभागृहाला याठिकाणी सांगायचं आहे की,  तळवडेचा परिसर असेल,तळवडे- निगडी परिसराचा रेडझोन असेल, आणि शहराचा इतर रेडझोन असेल याच्यामध्ये खुप फरक आहे. आणि बाकीच्या रेडझोनच्या बाबतीत जो मोबदला आहे त्याच्या काही प्रोसेस यापुर्वीच केंद्र शासनाने केलेल्या आहेत. मी तुम्हांला २०१८ साली आपल्या मुख्यमंत्र्यांना पत्र पाठवलं आहे की,आपले किती कोटी रु. आलेले आहेत. आणि हे पत्र आपल्या बिल्डींग परमीशनमध्ये पाहिलेलं आहे. आम्ही या महापालिकेत १९९७ साली आलो आहे याला २४ वर्ष झाली आहेत त्याठिकाणी आय.टी.पार्क उभं राहिलेलं आहे. आमच्या इथं  बिल्डींग परमीशनच्या बिल्डींग पण झाल्या आहेत. पण २००२ मध्ये हा भाग रेडझोन मध्ये जाहीर केला. आणि जरी जाहीर केला असला तरी त्याची कुठलीही अंमलबजावणी नाही. त्याठिकाणी एमआयडीसीने आतापर्यंत प्लॅन मंजुर केलेले आहेत. ठिक आहे, त्याठिकाणी रेडझोन असलं तरी त्याठिकाणी व्हर्टीकल लेवलपर्यंत करु नका पण आमच्या प्रभागातील लोकांनी अर्धा/ एक गुंठा घेवुन घरे बांधलेली आहेत. त्या लोकांना आपण सुविधा देणं क्रमप्राप्त आहे. फक्त रेडझोनचं कारण सांगुन आमच्या भागात आतापर्यंत निधी थांबवण्यात आलेला आहे. पक्ष वगैरे बाजुला ठेवा पण नागरीकांची जी कामे आहेत ती झाली पाहिजेत. निधीची आडवा आडवी कशाला करताय, रेडझोन मध्ये बांधकामे होऊ शकत नाहीत अशी कारणे अधिकारी आम्हांला देतात. मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब, माझी आपल्याला विनंती आहे की, माझ्या प्रभागातील मी जी कामे सुचवली आहेत त्याच्यामध्ये कुठलेही रेडझोनचा नियम न लावता मार्गी लावावीत ही विनंती आहे. आपण पाहतोय आपल्या भागामधुन तळवडेतुन चाकण-तळेगांव जाणारा रस्ता त्याची नेहमी वाहतुक कोंडी कायम  होत असते. मी

पहिल्याच जी.बी.मध्ये भूसंपादनाला प्रस्ताव देवुन पर्यायी रस्ता मंजुर करुन घेतला होता. परंतु अजुनही त्या भूसंपादनासाठी घेतलेल्या रस्त्याचे पैसे दिलेले नाहीत ते पैसे का दिले नाहीत तर ही वाहतुक कोंडी कशी काय कमी करायची. एक तर हा भाग तुम्ही एमआयडीसी ला जोडून टाकला त्याठिकाणी आमच्या लोकांनी रस्ता क्रॉस करताना त्याठिकाणी अनेक अपघात झालेले आहेत त्याला जबाबदार कोण आहे. अशा ब-याचशा गोष्टी आहेत. मला याठिकाणी सांगायचं आहे की, आमच्या वॉर्डमध्ये खुप मोठया प्रमाणात इंडस्ट्रीज आहेत परंतु या इंड्रस्टीजमध्ये गेल्या २४ वर्षामध्ये कुठंही रस्ता केलेला नाही. का, तर आम्हांला जो निधी गेल्या ४ वर्षामध्ये मिळतो तो इतर ठिकाणच्या कामासाठी वर्ग केला जातो आहे. तळवडे करसंकलन विभागाला मागच्या २४ तारखेपर्यंत २० कोटी रु.टॅक्स जमा झाला आहे. मी महाविकास आघाडी सरकारचे आभार मानतो की, आपले उपमुख्यमंत्री मा.अजितदादा यांनी शास्तीकर सोडून टॅक्स घेण्याची परवानगी दिल्यामुळे नागरीकांनी आतापर्यंत जवळपास २५ कोटी रु.या तळवडे करसंकलन विभागामध्ये टॅक्स भरलेला आहे. मग त्याठिकाणी आपण सोयीसुविधा का देवु शकत नाही. त्याठिकाणी आपण पाण्याची लाईन टाकू शकत नाही,रस्ता देत नाही, लाईट देत नाही मग त्याठिकाणच्या नागरीकांकडनं फक्त टॅक्स घ्यायचा का? त्यांच्यावर अन्याय करुन त्यांच्याकडनं टॅक्स घ्यायचा का, तरी माझी आपणांस विनंती आहे की, आम्ही जी उपसूचना दिलेली आहे ती मंजुर करणेत यावी. तसेच तळवडे या परिसराच्या एका साईडला देहु आणि एका साईडला आळंदी आहे. याठिकाणी देहु-आळंदीचे वारकरी कार्तीकी वारीला याठिकाणी मोठया प्रमाणात येतात. आपल्या महापालिकेने त्याठिकाणी ३० मीटरचा रस्ता केलेला आहे. महानगरपालिकेची जी जागा आहे देहु-आळंदी रस्त्यावरती त्याठिकाणी एवढे वारकरी येतात त्याठिकाणी एखादे अध्यात्मिक शिल्प उभारावे,अध्यात्मिक समुह शिल्प आणि वारकरी शिल्प उभारावे अशी आपणांस विनंती आहे. तसेच माझ्या प्रभागात केबल भूमिगत करणेचा प्रश्न खुप मोठा आहे. भूमिगत केबलचं काम यापुर्वी महापालिका करत होती. परंतु आता नियम बदलला आहे. यामध्ये आमचं भूमिगत केबलचं काम हे ४० टक्के राहिलेलं आहे. आमच्याकडे मोठं,मोठे टॉवर गेलेले आहेत त्याचे भूमिगत करावे अशी बरेचवेळा मागणी केलेली आहे. त्याच्यासाठी सुध्दा निधी दिला जात नाही. त्यामुळे माझी आपणांस विनंती आहे की, विदयुत विभागासाठी जे मोठ,मोठे टॉवर आहेत त्याचे भूमिगत केबल टाकण्यासाठी निधी उपलब्ध करुन द्यावा. मला याठिकाणी सांगायचं आहे की, मा.अजितदादांच्या माध्यमातून या महापालिकेच्या इतिहासात पहिल्यांदा ५९ एकर जागा शासनाच्या माध्यमातून

आपल्या महापालिकेला मिळाली आहे. त्या जागेची किंमत जवळपास १२५ कोटी रुपयांची आहे. आयुक्तांनी त्याबाबत एक शब्द सुध्दा उच्चारला नाही. याठिकाणी अभिनंदनाचा ठराव सुध्दा मांडलेला नाही. राजकारण राहिलं बाजुला पण १२५ कोटी रुपयांची जागा शासन आपल्याला मोफत देत आहे. म्हणुन आम्हाला प्रेस कॉन्फरन्स घ्यावी लागली. आपण साधं शासनाचे आभार मानायला नको का? याठिकाणी मी सर्व सभासदांना विनंती करतो की, मी याठिकाणी शासनाच्या अभिनंदनाचा ठराव मांडतो. एवढी मोठी जागा आपल्या शहरात कुठेही नाही. तरी त्याठिकाणी आमच्या भागातील नागरीकांना उद्यान, चांगलं मैदान करुन देणेत यावी. आमच्या प्रभागात कुठलीच विकास कामे नाहीत त्यामुळे आपण हे एकत्रित करु शकतो. तरी आपण हा प्रश्न मार्गी लावावा अशी विनंती करतो. तसेच आपण स्मार्ट सिटीसाठी १०० कोटीची तरतुद केलेली आहे. पण स्मार्ट सिटीच्या नावाखाली जे रस्ते खोदलेले आहेत पण त्याच्या दुरुस्तीसाठी कुठे तरतुद ठेवलेली आहे. त्यांनी केबल टाकुन गेल्यानंतर रस्ता दुरुस्तीसाठी आम्हांला त्यांच्या पाठीमागं लागावं लागतयं नागरीकांच्या तक्रारी येतात त्यांच कोण ऐकत नाही. तरी स्मार्ट सिटीसाठी आपण रस्ते खोदाईसाठी तरतुद केलेली आहे पण त्याचबरोबर रस्ते दुरुस्तीसाठी प्रत्येक प्रभागामध्ये निधी उपलब्ध करुन देणेत यावा. आपले शहर हे स्मार्ट सिटीमध्ये समाविष्ठ असले पाहिजे. परंतु त्याच बरोबर आपला जो ई-कचरा निर्माण होत आहे त्याची कशी विल्हेवाट लावायची याचेही नियोजन करण्यात यावे. आमच्या प्रभागासाठी निधी उपलब्ध करुन देण्यात यावा यासाठी आम्ही सत्तारुढ पक्षनेत्यांकडे उपसूचना दिलेल्या आहेत त्या मंजुर करण्यात याव्यात आणि मी जो ठराव मांडला आहे राज्य शासनाने आपल्याला जी मोकळी जागा महापालिकेच्या ताब्यात दिलेली आहे त्यामुळे त्यांचे अभिनंदन करण्यात यावे.अशी विनंती करतो.

**मा.राजु बनसोडे -** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त,सन्मा.सभागृह आताच सन्मा.सदस्य पंकज भालेकर यांनी अभिनंदनाचा ठराव मांडला आहे त्याला मी अनुमोदन देतो.

**मा.संदीप वाघेरे** - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त,सन्मा.सभागृह माझ्या प्रभागातील कामासाठी हेड ओपन केलेलं आहे परंतु प्रत्येक कामासाठी रुपये १०००/- तरतुद ठेवलेली आहे. साधारणपणे आपल्या महापालिकेचे दरवर्षीचे ६००० कोटी रुपयाचे बजेट आहे. साधारपणपणे दरवर्षी ६ हजार कोटीचे कामे काढली तरी वर्षाला ३० हजार कोटी रुपयाचे कामे काढलेली आहेत. ही पिंपरी चिंचवड महापालिका ही पिंपरी पासून चालू झाली. १९७० साली या महापालिकेची स्थापना झाली त्यावेळेस

नगरपरिषदची,नगरपालिका झाली त्यानंतर १९८२ -८४ साली महापालिका स्थापन झाली. पहिल्या जी.बी.ला ज्यावेळेला मी बोललो होतो. पिंपळेसौदागर,पिंपळेगुरव आणि वाकड वास्तविक पहाता पिंपळेसौदागर आणि वाकड साठी स्मार्ट सिटीचं मतदान झालं होतं. आमच्या पिंपरीमध्ये स्मार्ट सिटीसाठी मतदान झालं ते कमी झालं होतं हे कोणालाच माहित नाही बरं का, भोसरी मतदार संघामध्ये १८ हजार मतदान झालं आमच्या पिंपरी मतदार संघामध्ये ३२ हजार मतदान झालं, प्राधिकरणात ३६ हजार मतदान झालं, वाकड मध्ये २८ हजार मतदान आणि पिंपळेसौदागर मध्ये २२ हजार मतदान झालं आणि हे दोन्ही क्लब केलं पोमण साहेबांनी वगैरे आणि स्मार्ट सिटी प्रोजेक्ट चिंचवड मतदार संघात नेला. सुरुवात पिंपरी चिंचवडपासून झाली पिंपरी चिंचवड महानगरपालिका होण्यासाठी पिंपरीचा खुप मोठा त्याग आहे. म्हणजे भोसरी,निगडी,आकुर्डी आणि चिंचवडचा पण आहे. यांच्या जागा त्या काळात एमआयडीसीने घेतल्या, यांच्या जागा डेअरी फार्मने घेतल्या आणि इथल्या स्थानिक भूमीपुत्रांवरती, गाववाल्यावरती ही महापालिका उभी राहिली. आणि ही उभी राहताना आमची पिंपरी ही कायम वंचित राहिली आहे. म्हणजे आमदारकीला पण आमचा काही भाग बोपखेल, भोसरीचा काही भाग जोडला आहे. तसेच सांगवीच एक हॉस्पिटल हे आमच्या पिंपरी मतदार संघात आणुन टाकलं आणि आमच्या पिंपरी मतदार संघाला वंचित केलं आहे. पिंपरीला एक चांगल नेतृत्व भेटलं म्हणजे काम आणायची आणि करु घ्यायची आणि मी गेल्या ४ वर्षापुर्वी भारतीय जनता पक्षाच्या माध्यमातुन निवडुन आलो आणि माझी या शहराबद्दल एक समर्पणाची भावना आहे की,हे शहर कसं सुधारलं पाहिजे कसं नाही याच गोष्टीसाठी मी गेली ४ वर्षापासून काम करतोय आणि याच पध्दतीने माझ्या प्रत्येक कामाला १००० रुपयाचे टोकन तरतुद केलेली आहे. आता पक्षनेत्यांनी सांगितलं आहे की,३१ मार्चपर्यंत जी कामे झालेली आहेत त्यांना पैसे देण्यात येतील. मा.महापौर साहेब,मला सांगायला असं दु:ख वाटतयं की, संघर्ष हा आमच्या पाचवीलाच पुंजलेला आहे. कारण पहिल्या जी.बी.ला नितीन काळजे हे महापौर होते त्यावेळेला मी माझ्या प्रभागातील १३ कामे दिली होती. त्यातील फक्त एकच काम मंजुर झालं होतं ते काम न होता पिंपरी –काळेवाडी रस्ता, काळेवाडीला रस्ता केला होता ते ७ कोटीचं काम होतं अडीच कोटी रु.वर्षाला तरतुद होती. बाकीचे सगळी १२ कामे नाकारली होती. का,तर पिंपरीगावातील प्रभाग क्र.२१ पिंपरी वाघेरे म्हणुन ही कोणाच्या बापाची एकटयाची महापालिका नाही. इथं ही महापालिका आमच्या पासून सुरुवात झाली असेल तर आणि आमच्यावरच अन्याय होत असेल तर मी मागच्यावेळी सुध्दा हेच बोललो

होतो की,आमच्या पिंपरीला महापालिकेमधनं वगळून टाका. आणि पक्षनेते आता मी तुम्हांला सांगतो मी जी काही उपसूचना देईन ती तुम्हांला घ्यावीच लागेल. आणि घेणार नसाल तर तसं मला सांगा ज्यावेळेस याठिकाणी भारतीय जनता पक्षाची सत्ता इथं आली नां त्यावेळेस जाहीरनाम्यामध्ये २७ कामाचं आश्वासन देण्यात आलं होतं. त्यातील काही कामं झाली,काही झाली नाही. आणि त्यातील पिंपरीमधील एकही काम झालेलं नाही. म्हणजे स्मार्ट सिटी असेल, वायफाय असेल आम्ही प्रत्येक वेळी मी माझ्या इथं भांडून कामं करुन घेतोय. आणि जर कामं करायचीच नसतील तर तसं तुम्ही क्लिअरकट सांगा की,आम्हांला पिंपरीमध्ये काम करायचीच नाहीत. मा.महापौर साहेब,तुम्ही वैयक्तीक निर्णय घ्या. मी कोणाच्याही वैयक्तीक बाबतीत बोलत नाही. म्हणजे राष्ट्रवादी असेल किंवा बीजेपी असेल, राष्ट्रवादीचं आणि बीजेपीचं साटंलोटं असेल मला माहित नाही. मी सर्वसामान्य नागरीक,पिंपरीचा लोकप्रतिनिधी म्हणुन बोलतोय. मा.महापौर साहेब, मी ज्या उपसूचना देतोय त्या आपण स्विकाराव्यात ही विनंती करतो आणि थांबतो. जयहिंद,जयमहाराष्ट्र.

**मा.निता पाडळे -** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त,सन्मा.सभागृह माई,आपले जे ७ हजार कोटी रुपयाचे बजेट आहे. त्याच्यामध्ये खुप चांगल्या,चांगल्या योजना आहेत. याच्याबद्दल आमचं काही दुमत नाही. मला माझ्या प्रभागाबद्दल थोडसं बोलायचं आहे. माई,बजेट तयार होताना मी गेली ४ वर्ष पहात आहे खुप चांगल्या प्रकारे बजेट होत आहे. पण गेल्या २ वर्षामध्ये माझ्या वॉर्डमध्ये एक रस्ता आहे. पिंपरी ब्रीज ते डी-मार्ट या रस्त्यासाठीच्या कामासाठी तरतुद मुद्याम कमी ठेवली जात आहे. आता सुध्दा त्या रस्त्याला तरतुद कमी ठेवली आहे. बजेट तयार होण्याआधी मी तुमच्याकडे सुध्दा पत्रं दिलं होतं या रस्त्याला तरतुद कमी आहे. आणि ज्यावेळेस टेंडरला टी.एस.साठी हार्डीकर साहेबांकडे फाईल गेली. त्यावेळेस त्यांनी फाईलवरती स्पष्ट लिहलं आहे की, यावर्षीची जी तरतुद आहे ती पुढच्या वर्षीच्या कामासाठी काय प्रोव्हीजन करणार ती पण चर्चा करा आणि निर्णय घ्या. टेंडरला फाईल गेल्यानंतर आयुक्त साहेबांनी हा रिमार्क दिला आहे. त्याच्यानंतर मी तुमच्याकडे एक पत्र दिलं, तुमच्यानंतर राजन पाटील साहेबांकडे गेले तर हे राजन पाटील साहेब हे पालिकेचे पाटील असल्यासारखे वागतात. त्यांनी याठिकाणी येऊन स्पष्टीकरण द्यावं की, तुमच्याकडे पाडाळे मॅडम आल्या होत्या त्यांनी तुम्हांला सांगितलं होतं की,या कामासाठी तरतुद कमी पडत आहे. ती तरतुद या बजेटमध्ये घ्या. त्यांना नगरसेवकांशी नीट बोलायला येत नसेल तर त्यांनी घरी रहावं नां मग ते आम्हांला अजिबात सहकार्य करीत नाहीत. राजन पाटील हे महिला सदस्यांना

तर अजिबात सहकार्य करत नाहीत. व्यवस्थित माहिती देत नाहीत,बोलत नाहीत त्यांना एक शब्द बोलायचं सुध्दा जड होतय तर माई,आपण याकडे लक्ष द्या. त्या रोडला अक्षरशा ड्रेनेजलाईन नाही. त्याठिकाणी स्ट्रॉम वॉटर लाईन आहे ती गेल्या १० वर्षापासून लोकांच्या ड्रेनेजलाईनचे पाणी या स्ट्रॉम वॉटरला जात आहे. त्याठिकाणी रोडच्या साईडला जी दुकाने,घरे आहेत त्यांच्या घरामधुन पावसाळयामध्ये पुर्ण मैला बाहेर येतोय. आम्ही ड्रेनेज विभागाला सांगत होतो की,अमृत योजनेमध्ये ड्रेनेजलाईन टाकुन घ्या. ते म्हणले की,अहो,त्या लाईनला कॉंक्रीटीकरण होणार आहे त्या कॉंक्रीटीकरणाच्या रोडच्या कामामध्ये ड्रेनेजलाईनचे काम धरलेलं असेल तिथं होईल त्यांनी सांगायचे स्थापत्यला होईल, स्थापत्यनी त्यांच्याकडे बोट दाखवायचं मग आम्ही जायचं कुठे या एका कामासाठी मी गेली २ वर्ष फॉलोप घेत आहे. पण त्या कामासाठी काही तरतुद देत नाहीत. दिड वर्षापुर्वी मी हार्डीकर साहेबांकडे गेले त्यांनी स्पष्टपणे सांगितले की, काळेवाडीतुन टॅक्स मिळत नाही त्यामुळे त्याठिकाणच्या कामांना तरतुद नाही. परंतु आज त्याच कामासाठी मला पुन्हा भांडावं लागत आहे ही शोकांतिका वाटत आहे. एक्झीक्युटिव्ह इंजिनियर, राजन पाटील यांना या कामाची माहिती आहे त्यांनी तरतुद वाढवायला पाहिजे होती. आणि मी हे बजेट तयार होण्यापुर्वी राजन पाटील साहेबांकडे गेले होते. त्यांना सांगुनही त्यांनी मुद्यामहुन तरतुद का केली नाही याचं स्पष्टीकरण त्यांनी द्यावं. दुसरं असं आहे की, आपण महिला बालकल्याणच्या खुप चांगल्या योजना आणतोय परंतु मला याठिकाणी सांगायचं आहे की,आपण महिला बालकल्याणचं जे बजेट खर्च करतोय त्याची जी नागरीकांमध्ये पब्लिसिटी व्हायला पाहिजे म्हणजे ब-याचशा महिलांना या बजेटची किंवा योजनांची माहिती नसते. आपले नगरसेवक त्यांना खुप चांगल्या प्रकारे माहिती देतात. परंतु मला असं वाटतयं की,या योजनांची माहिती पालिकेमार्फत दिली पाहिजे. प्रत्येक चौका चौकामध्ये फ्लेक्स लावुन या योजनांची माहिती दिली पाहिजे. तसेच आपण ज्या काही योजना या महिला बालकल्याण समिती मार्फत करतोय या योजनांची अंमलबजावणी खुप स्लो पध्दतीने होत असतात. त्याच्यामध्ये आपण १० वी,१२ वी च्या विद्यार्थ्यांचे जे फॉर्म भरुन घेतले यावर्षी आपल्याला कोरोनामुळे विद्यार्थ्यांना पैसे देण्यास उशिर झाला आहे. पण प्रत्येकवेळेस जे विद्यार्थी पात्र असतात ते प्रत्येक वेळेस आम्हाला विचारत असतात की,ताई आमचे पैसे जमा झाले का, कारण मार्च/एप्रिलला कोणाच्याही अकौंटला पैसे जात नाहीत. आणि पालकांना गरज असते की, कुठल्या तरी अँडमिशनला म्हणा किंवा एखादया खाजगी क्लासची फी त्यांना देता आली तर त्यांना खुप बरं वाटत. नागरवस्ती विभागामध्ये

जर का आपण गेलो तर त्याठिकाणी सांगतात की,मनुष्यबळ थोडसं कमी पडतयं तरी आयुक्तांना आपण तशा सूचना करुन तिथे मनुष्यबळ देवुन या योजनांची अंमलबजावणी फास्ट झाली तर आपल्या सर्व सदस्यांसाठी खुप चांगली गोष्ट आहे. कारण या योजनांपासूनच आपल्याला नागरीकांपर्यंत पोहोचता येतयं तर अशा पध्दतीने आपण नियोजन करावे अशी मी विनंती करते.

**मा.अपर्णा डोके** - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त,सन्मा.सभागृह खरंतर या पंचवार्षीक मधील ह्या शेवटच्या बजेटवर चर्चा करण्याची संधी दिली त्याबद्दल आभारी आहे. खरंतर या बजेटच्या निमित्ताने आपले जे सहकारी सदस्य आहेत त्यांना आपआपल्या प्रभागात काय अडचणी आहेत,काय समस्या आहेत हे या बजेटच्या माध्यमातुन आपल्याशी संवाद साधत आहेत. आज जर आपण या पिंपरी चिंचवड शहराची लोकसंख्या आहे ती ३० लाखाच्या आसपास आहे. या बजेटच्या माध्यमातून आपण या महापालिकेतर्फे शहरातील नागरीकांना आपण काय देणार आहोत त्यांच्या ज्या मुलभूत गरजा आहेत त्याच्यावर आपण किती काम करणार आहोत जेंव्हा एखादा अर्थसंकल्प येतो त्याचं खरं स्वरुप हे कृतीत उतरवण्यासाठी आपण सगळेच त्यास जबाबदार असु. यासाठी हे बजेट पास करुन त्याची शहरात प्रॅक्टीकल स्वरुपात शहरात वेगवेगळया ठिकाणी काम होईल. हे पहाणं पण तितकचं गरजेचं आहे. शहरातील नागरीकांच्या मुलभूत गरजा ज्या आहेत त्यामध्ये पाणी,ड्रेनेजलाईन,लाईट,आरोग्य याच्याकडे आपण प्राधान्याने लक्ष दिलं पाहिजे. कोरोनासारख्या महामारीमध्ये आपलं बरेचसं बजेट त्याच्यावर खर्ची झालेलं आहे आणि आता परत त्याच स्थितीमध्ये आलो आहोत. शहरातील कोरोनाची स्थिती बघितली तर बेड,लोकांची घबराट त्यामध्ये शहरातील जास्तीत जास्त लोकांना व्हॅक्सीन उपलब्ध करुन त्यांच लसीकरण पुर्ण करणं ही सगळयांचीच जबाबदारी राहील. १ एप्रिल नंतर आपण ४५ वर्षा पुढील नागरीकांना आपण लस उपलब्ध करुन देतच आहोत. नागरीकांची जी द्विधा मनस्थिती आहे लस घ्यावी की,नाही घ्यावी घेतल्यावर कसं होईल यासाठी आरोग्य विभागातर्फे समुपदेशन किंवा होर्डींग्जद्वारे नागरीकांचे समुपदेशन केलं पाहिजे. नागरवस्ती विभाग, क्रिडा विभाग, भूमिआणि जिंदगी विभाग तसेच वेगवेगळे प्रभाग कार्यालये, याच्यामध्ये स्थापत्य, पाणी, ड्रेनेज या सुविधा उपलब्ध करत असताना शहरामध्ये जी विकास कामे चालू आहेत त्यामध्ये सगळीकडे रस्ता खोदाईची कामे चालू आहेत. नागरीकांना असे वाटत आहे की,हा कोरोना या खोदकामाच्या धुळीमुळेच वाढत आहे. असा गैरसमज सुध्दा आहे. आमच्या प्रभागात पाहिलं तर एमएनजीएल, स्मार्ट सिटी वेगवेगळया प्रकारची कामे चालली आहेत परंतु ही कामे लगेच होत नाहीत. विकास

कामे करताना नागरीकांची गैरसोय ही कशी कमीत कमी करता येईल याच्याकडे आपण प्राधान्यानं लक्ष दिलं पाहिजे. जलपर्णी ही दरवर्षी नदीत वाढतच असते, दरवर्षी भटकी कुत्री आणि जनावरांचा त्रास होत असतो. याच्यावर कायमचा तोडगा निघण्यासाठी पण आपण काम केलं पाहिजे. जलपर्णीचा त्रास हा नदीजवळ राहणा-या नागरीकांनाच नाही तर शहरातील सर्व ठिकाणी डासांचा त्रास वाढलेला आहे. भटक्या कुत्र्यांच्या बाबतीत तर या सभागृहात किती तरी वेळा या सभागृहात चर्चा झाली आहे. पण त्याच्यावर काही निर्णय होत नाही. आणि ही समस्या सुध्दा सुटत नाही. महिला बालकल्याणसाठी ५० कोटीची तरतुद केली आहे. ही खरंतर कृतीत उतरली पाहिजे. यासाठी आपण फ्लेक्स लावले पाहिजेत. पेपरमधुन आपण जाहिरात दिली पाहिजे. या,या योजना महापालिकेतर्फे राबविण्यात येत आहेत. आपण लोकांपर्यंत पोहोचलचं नाही तर त्याची अंमलबजावणीच होणार नाही. अशा प्रकारे विविध योजनां महापालिकेतर्फे करत असतो तेंव्हा आपण त्या नागरीकांपर्यंत पोहोचलो पाहिजे. तरच हे बजेट खर्ची पडेल. नदी सुधार प्रकल्प खुप चांगला प्रकल्प आहे. खरंतर सगळया विभागाचं काम परिपुर्ण होण्यासाठी आर्थीक बरोबरच मनुष्यबळाची गरज असते. प्रत्येक विभागामध्ये मनुष्यबळ खुप कमी आहे. यासाठी नोकरभरती केली पाहिजे. चांगले अधिकारी आहेत परंतु त्यांच्याकडे अनेक चार्ज दिलेले आहेत त्यामुळे ते एकाही विभागाचं काम व्यवस्थितपणे पार पाडू शकत नाहीत. उदाहरणार्थ आपल्या महापालिकेचा भूमि आणि जिंदगी विभाग हा अत्यंत महत्वाचा विभाग आहे. तिथेही दोनच लिपिक काम करतात. त्या विभागाला आपण मनुष्यबळ देणं गरजेचं आहे. वैदयकीय विभाग पाहिलं तर आज सर्वसामान्य कुटूंबाला पॉलीसी शिवाय वैदयकीय खर्च कोणीही करु शकत नाही. आपण महापौर निधीतुन फक्त ५ हजार रुपयांची मदत करु शकतो. याच्याऐवजी आपण १० हजार,१५ हजार रुपयांपर्यंत मदत करता आली तर बघावे. शहरामध्ये डायबेटीज् , किडनी,असे असंख्य आजाराचे प्रमाण वाढलेलं आहे. त्याच्यासाठी महापालिकेचे जे वेगवेगळे हॉस्पिटल्स आहेत त्यांना स्पेशलाईज हॉस्पिटल करण्यात यावं. अशी मी आपणांस विनंती करते. पुर्वीचे जे प्रोजेक्ट आहेत उदाहरणार्थ वेताळनगरचा जो प्रोजेक्ट आहे त्याठिकाणी बस टर्मीनन्सचं पण नियोजन आहे. त्याठिकाणी २/३ बिल्डींगचे काम अपुर्ण राहिल्यामुळे त्याठिकाणच्या झोपडपट्टीचे आणि बस टर्मीनंन्सचे काम पुर्ण होत नाही. असे जे अर्धवट प्रोजेक्ट आहेत ते पुर्ण करण्याची त्यांना संधी दिली पाहिजे.आणि ते प्राधान्याने पुर्ण केले पाहिजे. जे जुने प्रोजेक्ट आहेत ते पुर्ण केले तरच विकास दिसणार आहे. शहरातील नागरीकांना मुलभूत गरजा देत असताना आपण निश्चितच प्राधान्याने या गोष्टीकडे लक्ष दिलं

पाहिजे. तसेच भविष्यकाळात पब्लिक ट्रान्सपोर्ट कशी चांगली करता येईल. याकडेही आपण प्राधान्याने लक्ष दिलं पाहिजे. जुने तालेरा हॉस्पिटल पाडून नवीन करण्यात आलेले आहे ते आता पुर्णत्वास आले आहे. शहराची वाढती लोकसंख्या व गरज लक्षात घेता किवळे,रावेत, चिंचवड परिसरात आहेत याठिकाणच्या नागरीकांना जर रक्ताची गरज लागली तर वायसीएमच मध्ये यावं लागतं तरी नवीन तालेरा रुग्णालयामध्ये रक्तपेढीची सुरुवात करणेत यावी. अशी मी आपणांस विनंती करते.धन्यवाद.

**मा.प्रमोद कुटे -** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त,सन्मा.सभागृह आज या बजेटच्या निमित्ताने आपण सगळेजण एकत्र आलो असताना या बजेटवर बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आभार व्यक्त करतो. एकंदरीत हे बजेटचं पुस्तक चाळत असताना याच्यामध्ये माणसांच जीवनमान उंचावण्यासाठी मला असं कुठंही कृत्य आढळलं नाही. एकंदरीत या बजेटचं पुस्तक पाहिलं तर शालेय शिक्षणाचा खर्च पाहिला तर दरवर्षी २२२ कोटी रुपये दरवर्षी खर्च केले जातात. एवढे पैसे खर्च करीत असताना गेल्या ५ वर्षाचा खर्च जवळपास १००० हजार कोटी रुपये खर्च झालेला आहे. एवढा खर्च केला असेल तर महानगरपालिकेच्या शाळेमध्ये किती पट संख्या वाढली आहे. ही पटसंख्या वाढलेली कुठेही दिसत नाही. आज आपण प्रायव्हेट शाळेमध्ये गेलो तर त्याठिकाणी अँडमिशन घेण्यासाठी ३ हजार,५ हजार फॉर्म्स येतात. आपण एवढया चांगल्या इमारती,पैसे देत असताना सुध्दा मुलांची संख्या वाढत नाही ही दुर्देवाची बाब आहे. पाणीपुरवठयाच्या बाबतीत बोलायचं झालं तर पाण्याचं रिसायकलींग व्हायला पाहिजे. शहरामध्ये पाण्याचा मोठा तुटवडा असताना आपल्या एसटीपी मधुन १६० ते १७० एमएलडी पाणी बाहेर जात आहे. त्याचं रिसायकलींग करुन त्याचा वापर करता येईल पण ते देखील आलेलं नाही. आज आपण शहरामध्ये पाण्याच्या कमतरतेमुळे दिवसाआड पाणीपुरवठा करतो आहे. आपण या बजेटचा अनावश्यक ठिकाणी या बजेटचा उपयोग करतो आहे. तर चांगल्या पाणीपुरवठयाची योजना करुन जे वेस्ट पाणी जातयं त्याचा रिसायकलींग करुन कसं वापरता येईल याचे नियोजन करणं गरजेचं आहे. या शहरामध्ये मोठमोठे गार्डन आहेत त्याठिकाणी या पाण्याचा वापर करता येईल. या शहरामध्ये बाहेरुन आलेल्या नागरीकांना पहाण्यासारखं काय आहे. या शहरामध्ये एक चांगलं अप्पुघर आहे, यापुर्वी या अप्पुघरामध्ये लांबुन,लांबुन लोक खेळायला येत होते. या बजेटमध्ये अप्पुघराचं नुतनीकरण करण्यासाठी काही तरी तरतुद करायला पाहिजे होती. ती देखील नाही. दुर्गादेवी उद्यान एवढी चांगली वास्तु आपल्या परिसरामध्ये आहे त्याचा वापर केला जात नाही हे दुर्देव आहे. आज माझ्यासारख्या तरुण कार्यकर्त्याला वाटतं की,आपल्या

परिसरामध्ये चांगल्या सुधारणा व्हाव्यात, चांगले पार्क तयार व्हावेत. अशा प्रकारचे व्हीजन या बजेटमध्ये दिसत नाही. आपण बिल्डींग परमीशन देताना सोलर वॉटर हिटरच्या पलीकडे आपण जात नाही. या शहरामध्ये दरवर्षी आपण जगदगुरु संत तुकाराम महाराजांचा पालखी सोहळा आयोजित करीत असतो आमच्या आकुर्डी येथे पालखी मुक्कामी असती आणि हा मुक्काम पिंपरी चिंचवड मध्ये फक्त एकाच ठिकाणी आकुर्डी येथे मुक्काम असतो. या पालखी सोहळयाच्या सुशोभिकरणासाठी गेल्या तीन वर्षापासून फक्त एक हजार रुपयाची तरतुद केली जात आहे. हे अत्यंत निंदनीय आहे. पालखी आल्यानंतर लाखो रुपये खर्च करुन मंडप टाकतो आपण त्याठिकाणी जातो, उत्साहात स्वागत करतो पण त्याच पालखी सोहळयाच्या ठिकाणी पालखी मुक्कामी असते त्याच्या सुशोभिकरणासाठी एक हजार रुपयांची तरतुद करता याचा मी माझ्या प्रभागाच्या वतीने निषेध व्यक्त करतो. आणि या बजेटचा निषेध करुन याठिकाणी थांबतो. जयहिंद,जयमहाराष्ट्र.

**मा.विनोद नढे -** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त,सन्मा.सभागृह गेली ४ वर्ष सातत्याने आमच्या काळेवाडीच्या प्रभागामध्ये बजेटच्या माध्यमातून अन्याय होत आहे. पाडाळेताईंनी याठिकाणी जी शोकांतिका मांडली आहे गेल्या ४ वर्षामध्ये काळेवाडीसाठी कुठलीही तरतुद केलेली नाही. याठिकाणी मी जाहीरपणे सांगतो की, केवळ काळेवाडी मध्ये राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे तीन नगरसेवक आणि इतर काही अपक्ष आहेत केवळ राष्ट्रवादीचे ३ नगरसेवक असल्यामुळे आपण आमच्यावर अन्याय करीत आहात असे मी याठिकाणी जाहीरपणे सांगतो. काळेवाडीच्या मेनरोडला २५ कोटीच त्याठिकाणी टेंडर आहे. आम्ही सातत्याने या कामासाठी पाठपुराव करत आहोत पण हार्डीकर साहेबांनी सांगितलं की,काळेवाडीचे लोक टॅक्स भरत नाहीत. त्यानंतर मी माहिती मागवली होती की,काळेवाडीची लोकं खरचं टॅक्स भरतात की नाही तर शहरातील इतर ठिकाणची लोकं जसं टॅक्स भरतात तशीच काळेवाडीमधील लोक सुध्दा टॅक्स भरतात. केवळ त्याठिकाणी पक्षीय दृष्टीकोन ठेवुन आमच्यावर अन्याय केला जात आहे. मागच्या टर्म मध्ये मी कॉंग्रेस मध्ये होतो. विरोधी पक्षनेता म्हणुन मी काम करत होतो आणि मंगलाताई त्यावेळेस सत्तारुढ पक्षनेत्या होत्या त्यावेळेस आमच्यावर असा कधी अन्याय झाला नाही. ताईंना आम्ही कुठल्याही कामाच्या संदर्भात सांगितलं तर त्यांनी कायम आम्हांला बजेटची व्यवस्था केलेली होती. काळेवाडीतील जे रस्ते खोदलेले आहेत ते दुरुस्त करण्यासाठी तरी आम्हांला बजेटची तरतुद करणेत यावी. अशी मी मा.महापौर आणि सत्तारुढ पक्षनेत्यांना विनंती करतो. धन्यवाद.

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त,सन्मा.सभागृह माई,मी मुद्यामहून नागरीकांचा उल्लेख करते की, हे बजेट नगरसेवकांसाठी नसून पीसीएमसी मध्ये राहणा-या नागरीकांसाठी असते. स्थायी समितीचे अध्यक्ष नितीन लांडगे यांनी बजेट सादर केलं आणि हे सादर करीत असताना ५५८८,५५२८ कोटी रुपये असे सगळे आकडे आहेत. या आकडयामधुन प्रत्येक प्रभागाला किती पैसे मिळाले आहेत प्रत्येकाची शोकांतिका हीच आहे. नढे साहेब,याठिकाणी पक्षाचा विषय नाही. कारण आमचाही तोच विषय आहे. जो कोणी बजेट ठरवलं जातयं ते कुठल्या पध्दतीने ठरवलं जातय याचा अंदाज देखील याठिकाणी लावता येत नाही. माझा प्रभाग क्र.२० बद्दल गेल्या ४ वर्षापासून बोलतेय ज्यावेळेला आम्ही दुस-या प्रभागामध्ये जातो त्यावेळेस लक्षात येतं की,तिथले रस्ते, तिथलं इन्फ्रास्ट्रक्चर या गोष्टी त्याठिकाणी होत आहेत ते आमच्या प्रभागामध्ये का होत नाही. प्रत्येक वेळेला आम्हांला सांगितलं जातयं की, वायसीएमएच ला आम्ही एवढे पैसे दिले,तेवढे दिले माझा मुळ प्रश्न असा आहे की, प्रभाग क्र.२० साठी आतापर्यंत कुठल्याही नवीन प्रोजेक्टसाठी बजेट दिलं आहे. मेन्टनंन्सचं बजेट कोणालाही मिळतयं २ कोटी,४ कोटी हा विषय नाहीच नागरीकांना ज्या मुलभूत गरजा देणं गरजेच आहे त्यामध्ये वॉटर,लाईट,रस्ते, ड्रेनेज या गरजा तर देणं आवश्यक आहे. पण हे देताना प्रत्येक प्रभागामध्ये नागरीकच रहातात प्रत्येक प्रभागामध्ये नागरीकांचे वेगवेगळ रहाणीमान असु शकतं परंतु त्यांच्या मुलभूत गरजा या बदलत नाहीत. किंवा त्या प्रभागातील नागरीकांशी वागायचं नाही असं कॉर्पोरेशन ठरवतं का? ह प्रभागाला ३८ कोटी रुपये दिलेले आहेत. ह प्रभागाचं १९२६ कोटी रुपयाचं बजेट आहे. त्यामध्ये जर माई,आम्ही आमचा विचार केला तर आम्हांला फक्त ४ ते ५ कोटी रुपये हे मेंन्टनंन्ससाठी दिलेले आहेत. विशेष योजनांसाठी काहीही दिलं गेलेलं नाही. मला वाटतं हा आमच्यावर अन्याय आहे. इथं पक्षीय राजकारण वगैरे नाही पण हा अन्याय आहे. प्रत्येक नगरसेवकाला आता असं वाटतयं की, ज्यावेळेला आम्ही २०२२ च्या निवडणुकीच्या वेळेस नागरीकांच्या समोर जाऊ त्यावेळेला आम्ही नवीन प्रोजेक्ट काय केला हे आम्हांला दाखवण्याची गरज आहे. का,आम्ही त्यांना सांगायचं का,लाईटची फिटींग करुन घेतली, पेव्हींग ब्लॉक बदलले हे सांगायचे का? दुसरं असं आहे की, या पुस्तकामध्ये बघितलं तर स्त्री संशाधन केंद्र करणार आहे असं काही तरी सांगितलं आहे. मला एक सांगा, आपण महिला बालकल्याण योजनेवरती ४० कोटी रुपयाचा खर्च करतो त्यामध्ये आपण आतापर्यंत किती महिलांना सक्षम केले आहे. हे महिला बालकल्याणच्या अधिका-यांनी तुम्हांला मिटींग घेवुन कधी तरी सांगितले आहे का? गेल्या तीन वर्षापासून आपण

महिला बचत गटाच्या सक्षमीकरणासाठी **महाविंगला** दिलं. तरी महाविंग बरोबर आपली मिटींग झाली का? की,आपण किती महिला बचत गट सक्षम केले म्हणुन, त्यात किती बचत गटांना लिंक केल्यानंतर ते लोक एवढंच सांगतील की, आज सुजाता पालांडेच्या महिला बचत गटांना दोन लाख रुपये दिले. ते दोन लाख रुपये दिल्यानंतर त्याचा काय उपयोग झाला, त्यांनी कुठला नवीन बीजनेश चालू केला का? त्याच उत्पादन काही आलं का, आज तुम्ही सांगताय की, स्त्री संशाधन केद्र चालू करतोय, संशाधन केंद्र चालू करताना त्यांच्या मध्ये आत्मविश्वास निर्माण करणं मग आतापर्यंत महिला बाल कल्याणचे अधिकारी काय करत होते. आपण महिला बालकल्याणमध्ये जो निधी देत होतो मग आतापर्यंत आपण त्यांचा आत्मविश्वास निर्माण न करण्याचं काम करत होतो. वेगवेगळया योजना वेगवेगळया नावाने आणुन त्याच बायफरगेशन करताय आणि डायव्हर्ट करण्याचं काम कशासाठी करायचं याठिकाणी प्रत्येक वेळेस आपण घनकचरा व्यवस्थापन,मैलाशुध्दीकरण केंद्र माई, बरेच वर्ष झाले आपले तेच विषय आपल्याकडे आहेत. बजेट करताना आपण कुठल्या पध्दतीने अभ्यास करुन काम करतोय आणि त्याच्यावर आगोदरच्या वर्षी किती अंमलबजावणी झाली आहे. आणि आता राहिलेली किती आहे. याचा सुध्दा अभ्यास याच्यामध्ये झाला पाहिजे. आपल्या शहराची लोकसंख्या जवळपास ३० लाखापर्यंत आहे आणि याच्यामध्ये ज्येष्ठ नागरीकांची लोकसंख्या जवळपास ५ लाखापर्यंत असेल आणि या ज्येष्ठ नागरीकांना बजेटमध्ये काय दिलेलं आहे. काहीच नाही,शुन्य, का? ज्येष्ठ नागरीक हा आपला नागरीक नाही त्यांचे काही देणं आपण लागु शकत नाही . त्यामुळे हे बजेट करताना खुप अभ्यास कमी झालेला आहे त्याचा अभ्यास झाला पाहिजे. बाकीच्यांच काय म्हणणं आहे हे माहिती नाही पण मी माझे स्वत:चं म्हणणं मांडू शकते. बजेट मांडताना अभ्यासपुर्ण बजेट मांडावं बजेट म्हणजे फक्त खर्चाच ताळमेळ नाही. बजेट हे पुर्ण पीसीएमसीचा श्वास असतो आणि हा श्वास कसा द्यायचा हे आपल्या हातामध्ये असतो. तर यापुढे विचार करताना सुध्दा याचा विचार व्हावा. आणि ज्यांना विशेष काही तरतुदी नसतील तर त्यांना त्या करुन द्याव्यात. एवढंच बोलते आणि थांबते.

**मा.सचिन चिंचवडे -** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त,सन्मा.सभागृह आमच्या सहका-यांनी सांगितले आहे की,बजेट करताना आमच्या प्रभागामध्ये तरतुद कमी केलेली आहे. आमच्याही प्रभागामध्ये तीच परिस्थिती आहे. आमचे पक्षनेते हे आमच्या प्रभागातील असतील तरी आमच्या प्रभागातील विकास कामासाठी आजही तरतुद पुरेशी नाही. ड्रेनेजच्या कामासाठी किंवा इतर किरकोळ कामासाठी प्रभागामध्ये तरतुद असते. सर्व

प्रभागातील कामं करण्यासाठी सर्वांना सारखी तरतुद देण्याचं काम आपल्या सभागृहाच्या माध्यमातून केलं जावं. अशी अपेक्षा सर्व नगरसेवकांची आपल्याकडनं असते. एखादया प्रभागातून टॅक्स कमी मिळतो याचा विचार न करता शहरातील जे नागरीक आहेत त्यांना मुलभूत सुविधा देताना तो कमी जास्त न करता सर्व ठिकाणी सारख्याच पुरवण्यात याव्यात. हीच अपेक्षा आपल्याकडनं शहरवासिय करीत असतात. आणि त्या अपेक्षा पुर्ण करण्याचं काम आपलं आहे. परंतु आज आम्ही नगरसेवक म्हणुन काम करीत असताना ज्या प्रभागात अडचणी येतात त्या अडचणी सोडवण्याच्या दृष्टीकोनातून आता मी मा.आयुक्तांकडे आठ दिवसापूर्वी गेलो होतो. आयुक्तांनी मला त्यावेळेस भेट देण्यासाठी थोडासा वेळ लागेल तुम्ही थांबा आणि नंतर भेटा असा निरोप दिला होता. माई,शहरामध्ये ज्या काही घडामोडी,चर्चा घडत असतात त्या चर्चा कुठल्याही प्रकारच्या असु द्यात त्या शहराच्या विकासाचंच काम आपल्या माध्यमातून केल्या जात आहेत. या गोष्टी करत असताना बंद खोलीमध्ये कुठलीही व्यक्ती येऊन प्रायव्हेट बोलणी करण्यासाठी नक्कीच हे ठिकाण नाही. ज्या गोष्टी घडतात त्या समोर घडल्या पाहिजेत. सभागृहात जे घडतयं ते कुठल्या बंद खोलीत घडत नाही. संपुर्ण शहर हे ऐकत असतयं त्याप्रमाणे आयुक्त साहेब,आपल्या केबीन मध्ये काय घडतयं जो माणुस गोष्टी लपवतोय किंवा ज्या गोष्टी लपवणं भाग पडतयं तर त्या नक्कीच चुकीच्या गोष्टी घडतात असं मला याठिकाणी सांगायचं आहे. आणि ज्या गोष्टी ट्रान्सफरंट असतात त्या गोष्टी उघडपणे माणुस कुठंही करु शकतो. याच पध्दतीने कुठलाही सर्वसामान्य नागरीक असु दे, पदाधिकारी असु दे सामान्य नागरीकांच्या समोर पदाधिका-यांना पण बोलण्यास अडचण आली नाही पाहिजे. आणि पदाधिका-यांना पण नागरीकांच्या समोर बोलायला अडचण आली नाही पाहिजे. अशा पध्दतीने आपला पुढचा कारभार असावा अशी अपेक्षा व्यक्त करतो. आणि मागच्या ऑनलाईन सभेला आयुक्त साहेब,आपण आमच्या शहराची लायकी काढली मा.महापौरांनी मोठया मनानी तो शब्द मिनिटसमधुन वगळण्यात यावा अशी विनंती केली. ही आमच्या शहराची संस्कृती आहे. आणि ही आपली संस्कृती आहे. आपण ग्रामीण भागातुन आलात म्हणुन तुमच्या तोंडातुन तो शब्द सुटला असं आमच्या ताईनीं त्यावेळेस सांगितलं परंतु मा.आयुक्त साहेब, मी आपणांस सांगु इच्छितो की, हार्डीकर साहेबांनी याठिकाणी ४ वर्ष काढली आहेत परंतु अशा कुठल्याही चार वर्षामध्ये असा शब्द त्यांच्या मुखातुन कधी बाहेर पडला नाही. तर आपण सुरुवातच चुकीच्या शब्दातून केलेली आहे. येथून पुढे तरी किमान आपल्याकडनं अशा चुकीच्या गोष्टी होऊ नयेत आणि त्या घडल्यानंतर दोन शब्द दिलगीरी व्यक्त करण्याचं सुध्दा आपल्याकडनं

आले नाहीत. याचेही खुप दु:ख वाटतयं,खेद वाटतो. परंतु आयुक्त साहेब,मी आपल्याला एवढं निश्चित  सांगू इच्छितो की, येथून पुढच्या काळात अशा काही चुका झाल्या तर आम्ही  शहरवासीय म्हणुन  खपवुन घेणार नाही त्याच उत्तर त्याच पध्दतीनं आपल्याला मिळेल. धन्यवाद.

**मा.नायर प्रेमकुमार शंकरन उर्फ बाबू** - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त,सन्मा.सभागृह  आज जे बजेट प्रस्तुत केलेलं आहे ते या २०१७-२२ या कालावधीतील शेवटचं बजेट आहे. मला या महापालिकेत एवढं वर्ष काम केल्यानंतर लक्षात येतं की, प्रत्येक बजेटवर आपण ८ ते १० तास चर्चा करीत असतो आणि सूचना मांडत असतो. आपण लोकांचे प्रश्न पोटतिडकीने याठिकाणी मांडत असतो प्रशासन याबाबतीत किती गांर्भीयाने घेते किंवा यापुढचं काम ते पुढे कसे नेतात हा प्रश्नचिंन्ह माझ्या समोर आहे. मी स्वत: कॉमर्स स्टुडंस आहे,बजेटचं काय  महत्व आहे हे मला समजतयं मी स्थायी समितीमध्ये पण काम केलं आहे. आणि आज पण मी प्रशासनाच्या बाबतीत बोलू इच्छितो की,जे बजेट आज सादर केलेले आहे त्यात बजेटची जी काही तरतुद आहे. ते प्रत्येक विभागनिहाय तुम्ही त्या अधिका-यांना जर का तुम्ही विचारलं तर त्या तरतुदीच्या बाबतीत त्यांना काही माहित पण नसेल   किंवा त्यांना डिटेल सांगता येणार नाही. किंवा कामाच्या बाबतीत माहित नसेल अशी परिस्थिती आहे. आणि केवळ हे एक फार्स झालेला आहे की,सभागृहामध्ये बजेटची मिटींग होते आणि त्यावर नागरीकांच्या वतीने नगरसेवक ८/१० चर्चा करतात. परंतु त्याची अंमलबजावणी मात्र   प्रशासन करत नाही. अशी वाईट परिस्थिती मी गेल्या अनेक वर्षापासून बघतोय. आपण बजेटची प्रोव्हीजन कशासाठी करतो. जी कामे बजेट मध्ये मंजुर केलेली आहेत त्याची अंमलबजावणी कशी होईल याचा प्रयत्न केला पाहिजे. गेल्या ५ वर्षापासून आम्ही सत्तेमध्ये आहोत. याच्या आगोदर जे कोणी  राष्ट्रवादी/कॉंग्रेस सत्तेमध्ये असेल त्यांच्याही लक्षात आले असेल की,ही परिस्थिती अनेक वर्षापासून आहे. मी पक्षनेत्यांना विनंती करणार आहे की,आज आपण बजेटवरती जी चर्चा करणार आहोत सदस्य जे काही सूचना मांडणार आहेत त्याची प्रशासनाकडनं अंमलबजाणी करुन घेण्याची जबाबदारी आपली आहे. कुठल्याही पक्षाचा नगरसेवक असेल तो ज्या काही सूचना मांडत असतील त्या शहराच्या हिताच्या दृष्टीने मांडत असतात त्याची अंमलबजावणी करणे गरजेचे आहे. या ५८०० कोटी रुपयाच्या बजेटमध्ये शिक्षण मंडळासाठी २२२ कोटी रुपयेचे बजेट आहे. परंतु त्याच्यामध्ये विशेष बाब अशी  आहे की, ८० टक्के बजेट हे प्रशासनाच्या खर्चासाठी आहे. शिक्षणासाठी किती मिळतात ५० कोटी रक्कम सुध्दा मिळत नाही. त्यातील ३० ते

३५ कोटी रुपये खरेदीसाठी खर्च होतात. २०१७ च्या बजेटमध्ये मी प्रस्ताव मांडला होता बजेटमध्ये जे सदस्य सूचना मांडतात त्याचे मिनिटस् परत रिपीट करा, आणि त्याची अंमलबजावणी कशी करणार याबाबतीत मी बोलू इच्छितो. आपल्या महापालिकेच्या शाळेमध्ये ५० ते ६० हजार मुले शिक्षण शिकत आहेत. मी २०१७ च्या बजेटच्या वेळेस सेमी इंग्लिशच्या संदर्भात बोललो होतो. त्याची अंमलबजावणी अजुनपर्यंत आपण करु शकलो नाही. आपण असाही प्रस्ताव मांडला होता की, त्यांनी दिलेले गार्डन्स किंवा युपीएससी,एमपीएससी साठी महापालिकेच्या शाळेत शिकत असलेल्या मुलांना असं आपण कुठलंही अँडीनंन्स करु शकेल का? आम्ही पासपोर्ट तयार करायचं जेणेकरुन तो विद्यार्थी आयएएस,किंवा आयपीएस यासारख्या चांगल्या पदावर जाऊ शकेल यासाठी गायडन्स करु शकेल का? मी फक्त महापालिकेच्या शाळेच्या बाबतीत सांगु शकतो. आपल्या महापालिकेच्या सर्व शिक्षकांना तुम्ही याठिकाणी बोलवा त्यांनी जर एखादं वाक्य जरी इंग्लिश मध्ये बोलता येत नाही आणि मी हे चॅलेंज करु शकतो. आपण एज्युकेशन लेवल कशा पध्दतीने वाढवणार आहे. येणारी जी पिढी आहे त्याला आपण बेसिक शिक्षण त्यांना देवु शकत नसेल तर त्याचा उपयोग काय होणार आहे. आयुक्त साहेब,तुम्हांला याठिकाणी येऊन दोन महिने झालेले आहेत आपण प्रत्येक शाळेमध्ये जाऊन त्याठिकाणी काय परिस्थिती काय आहे ते पण बघा. शिक्षणाचा दर्जा उंचावण्याची गरज आहे. आपल्याला भावी पिढी घडवण्याचं काम आपल्याकडे आहे. मी मागच्या वेळेस सुध्दा सांगितलं होतं की, महापालिकेच्या शाळेमध्ये अँडमिशनसाठी नागरीकांनी नगरसेवकांकडे आले पाहिजे. एवढं चांगल स्टेटस् शाळेचे ठेवलं पाहिजे. जेणेकरुन याठिकाणचे जे नागरीक आहेत ते महापालिकेच्या शाळेमध्ये पाठवतील. अशी आपण व्यवस्था करायला पाहिजे.पिंपरी चिंचवड शहर हे कामगार नगरी म्हणुन ओळखली जात आहे. क्रीडा समितीचे अध्यक्ष उत्तम केंदळे आहेत या महापालिकेला क्रीडा धोरण नाहीच ५ टक्के राज्य शासनाच्या निर्देशानुसार जी काही तरतुद केलेली आहे. त्याच्यामध्ये पण ७० ते ७५ टक्के प्रशासकीय खर्च आहे.अॅक्च्युएल क्रीडा विभागासाठी अजिबात खर्च होत नाही. हॉकी पॉलीग्रास मैदान जे निर्माण केलेलं आहे हे ८० टक्के लोकांना हे माहित नाही अशी परिस्थिती आहे. त्या मैदानाची काय परिस्थिती आहे ते बघा. याच्यासाठी ५ टक्केच्या हिशोबाने तुम्ही जी तरतुद केलेली आहे ते साधारण १० ते १५ कोटी रुपये सुध्दा उत्पन्न नाही. म्हणुन या शहराची क्रीडा नगरी म्हणुन जर ओळख निर्माण करायची असेल तर याच्यामध्ये प्रशासनाची सुध्दा जबाबदारी आहे. प्रशासनाचं एक व्हीजन असायला पाहिजे महापालिकेचे सर्व सदस्य आणि नागरीकांच्या वतीने जे

काही व्हीजन असतं ते व्हीजन प्रेझेंट करुन जर आपण दोघेजण एकत्रित येऊन काम केलं तरच ते होणार आहे. प्रशासनामध्ये पण तेवढं सिरिएसनेस असणे आवश्यक आहे. वायसीएमएच सारखं आपण एक मोठं हॉस्पिटल निर्माण केलं. मला वाटतं महाराष्ट्रामध्ये कुठेही वायसीएमएच सारखं मोठं हॉस्पिटल नाही. त्याठिकाणी आपण एवढया चांगल्या सुविधा त्याठिकाणी उपलब्ध करुन दिलेल्या आहेत. या शहराची लोकसंख्या ३० ते ३२ लाख होत आहे. प्रत्येक झोनवाईज जर का आपण हॉस्पिटल निर्माण नाही केलं तर आरोग्याचा फार मोठा प्रश्न आपल्यासमोर निर्माण होणार आहे. या बजेटच्या अंमलबजावणीच्या संदर्भात आपण प्रत्येक वेळेस आपण बघितलं तर प्रत्येक वेळेस स्थापत्यचं जे बजेट आहे ते ४२  टक्के दाखवत आहे. वैदयकीय,आरोग्य,शिक्षण,उदयान आणि पर्यावरण याच्यामध्ये टोटल बजेट प्रोव्हीजन ६ ते ७ टक्के आहे. आणि या शहराचा जर विकास आपल्याला घडवायचा असेल,या शहराला नवीन दिशा देण्याचं घडवायचं असेल तर मला वाटतं या सर्व ज्या गोष्टी आहेत प्रामुख्याने  शिक्षण, वैदयकीय,क्रीडा असेल या सर्व बाबतीत आपण चांगलं लक्ष घालून आपण हे बजेटमध्ये जे प्रोव्हीजन केलेलं आहे याची अंमलबजावणी करणं गरजेचं आहे. या शहरामध्ये आता मेट्रो येत आहे. केंद्र सरकारने जी जीएसटी निर्माण केलेलं आहे त्याच्यामधुन आपल्याला जकातीमधुन जेवढं उत्पन्न येत नव्हतं त्याच्यापेक्षा जास्त उत्पन्न १८०० ते १९०० कोटी रुपये  या जीएसटी मधुन येत आहे. महापालिकेने हा विचार करायला पाहिजे की, उत्पन्नाचे जे स्त्रोत आहेत ते वाढवणे गरजेचे आहे. त्यामध्ये जाहीरात किंवा बाकीच्या आपल्या जागा आहेत त्याच्यामध्ये आपण काय पॉलीशी निर्माण करु  शकतो का? आज एमआयडीसीच्या जागेवर आपण डेव्हलपमेंट केल्यानंतर एमआयडीसीने जे होर्डींग्ज आहेत त्याचे टेंडर्स काढून त्यांनी त्यांचे उत्पन्न वाढवलेलं आहे. आणि प्राधिकरण पण त्याच पध्दतीनं करत आहे.म्हणजे आपल्या हक्काचे जे उत्पन्न आहे ते पुर्ण एमआयडीसी घेत आहे त्याची आपण पुर्ण चौकशी करावी. आपण जे डेव्हलपमेंटवर खर्च करतो त्याचे उत्पन्न पण आपल्याला मिळालं पाहिजे. आणखी एक विषय आहे की,ओपन स्पेसच्या संदर्भात  प्रभाग क्र.१०  म्हाडाच्या मागच्या बाजुला आहे. याचा मी गेल्या ५ वर्षापासून याचा पाठपुरावा करत आहे. आपण कुठल्याही प्रायव्हेट बिल्डरला बिल्डींग कम्पलीशन देत असताना ओपन स्पेस ठेवल्याशिवाय त्याला बिल्डींग कम्पलींशन देत नाही. म्हाडा मध्ये असं झालं आहे की, प्रोजेक्ट पुर्ण कम्पलीट केलं आहे त्यावेळचे कोण अधिकारी होते ते माहित नाही पण मी त्यांना सांगत होतो की, तुम्ही त्यांना कम्पलीशन सर्टीफिकेट देवु नका म्हाडाने आतापर्यत ओपन स्पेसचा ताबा दिलेला नाही. गेल्या १५

वर्षापासून ३००० फ्लॅट होल्डर जे रहातात त्यांना जे काही कॉमन अँमीनिटीज देतात त्यामध्ये साधारण ७० हजार स्के.फुट ओपन स्पेस जे आहे ते म्हाडाने अजुन दिलेले नाही. तरी आपण त्यांना बिल्डींग कम्पलीशन देवुन मोकळं झालो आहे. मा.महापौर ताई आणि कमिशनर साहेबांना विनंती आहे की, यापुढे म्हाडाचे कुठलेही कम्पलीशन सर्टीफिकेट देताना जोपर्यंत म्हाडा ओपन स्पेस ताब्यात देत नाही तोपर्यंत त्यांना कम्पलीशन सर्टीफिकेट देवु नये. कारण याच्यामध्ये त्याठिकाणचे सर्वसामान्य जे नागरीक टॅक्स भरतात,ते म्हाडाशी वेळोवेळी संपर्क साधतात पण नागरीकांना त्यांच्या ताब्यात ओपन स्पेसचा ताबा देत नाही. त्यामुळे आपण ओपन स्पेस ताब्यात देण्याबाबत प्रयत्न करावे एवढंच बोलतो आणि थांबतो जयहिंद,जयमहाराष्ट्र.

**मा.स्वीनल म्हेत्रे -** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त,सन्मा.सभागृह आताच सुजाताताईंनी सांगितलं आहे की,बजेट हे नागरीकांसाठी असतं अगदी बरोबर आहे. आमच्या फ क्षेत्रीय कार्यालयातील नगरसेवकांनी सांगितलं की, प्रभाग क्र.१ ला एवढं बजेट आहे,प्रभाग क्र.१२ ला एवढं बजेट आहे. पण प्रभाग क्र.१ मध्ये बजेट देताना प्रोजेक्टवर बजेट दिलं जात आहे. तर या प्रोजेक्टवर गेल्या १५ वर्षापासून फक्त आरक्षित होतं फक्त भूमिपुजन झालेलं होतं. उदा.संतपीठ याचं फक्त भूमिपुजन झालं होतं. आरक्षण होतं पण भोसरी विधानसभेचे मा.आमदार महेशदादा लांडगे यांच्या नेतृत्वाखाली याठिकाणी संतपीठ साकारलं आहे. मी यांना सांगु इच्छिते की, संतपीठ हे फक्त प्रभाग क्र.१ साठी मर्यादित नाही संतपीठ हे आपल्या संपुर्ण महाराष्ट्राची शान आहे पिंपरी चिंचवड मध्ये आगळेवेगळे संतपीठ होत असतात त्याचप्रमाणे टाऊन हॉल झाला. हा प्रभाग क्र.१ साठी नाही तो संपुर्ण पिंपरी चिंचवड शहरवासियासाठी आहे. त्याचप्रमाणे भामा आसखेड ३०० एमएलडीचा प्रोजेक्ट हा केवळ मा.आमदार महेशदादा लांडगे यांच्या नेतृत्वाने प्रभाग क्र.१ मध्ये आला आहे. त्याच पाणी प्रभाग क्र.१ मधील नागरीकच पिणार आहेत का? पुर्ण शहर पाणी पिणार आहे. पुर्ण शहराला याच्यामधुन पाणी वाटप होणार आहे. त्याचप्रमाणे त्याठिकाणी वायसीएमएच प्रमाणे हॉस्पिटल होत आहे. कारण लोकांना तिकडे येण्या-जाण्यासाठी लांब पडत आहे. ग्रामीण भागातील लोकांसाठी हे हॉस्पिटल आहे. प्रभाग क्र.१ मधील बाकीच्या विकास कामांसाठी पण तरतुद आहे. सुजाताताई आणि मी दोघीजण उपसूचना द्यायला गेलो होतो. ज्यांच्याकडे पुरेशी तरतुद आहे ते उपसूचना देण्यासाठी आल्या नाहीत. आमच्या प्रभागामध्ये बजेट नाही म्हणुन आम्ही भांडायला गेलो होतो. जर असे असेल तर विधी समितीमधुनच ठराव झाला आहे १० कोटीचा वॉल कंपाऊंडसाठी आणि मग त्यांनी तो वॉर्ड मध्ये घ्यायचा हा विषय प्रभाग क्र.१ पुरतचा नाही पुर्ण

शहरवासियांसाठी आहे. त्याचप्रमाणे आता बजेटविषयी बोलायचं झालं तर सगळेच म्हणाले की,आपण नागरीकांना मुलभूत गरजा देतो. परंतु आपल्याकडे पाण्याचा प्रेशर खुप कमी आहे,लो प्रेशरनी पाणी येत आहे. एक दिवसाआड आपण पाणी देत आहोत ते ही पुरेसे नाही. आंदोलन करण्या इतपत मानसिक तयारी आमची झालेली आहे. आम्ही जरी सत्तेत असलो तरी आम्ही नागरीकांसाठी लढतो आहोत. ज्यावेळेस नागरीकांचे फोन येतात,व्हीडीओ टाकतात ते आम्ही अधिका-यांकडे फॉरवर्ड करतो आणि अधिकारी मात्र काही तरी कारण सांगतात. त्यांच्या सोईनुसार कारण सांगतात ते आम्ही नागरीकांना सांगु शकत नाही. माई,तुम्ही पाणीपुरवठयाच्या संदर्भात एक मिटींग घ्या आणि मिटींगला आम्हा सर्व सदस्यांना बोलवा सगळयांच्या जिव्हाळयाचा विषय आहे.मला याठिकाणी बोलण्याची संधी दिली त्याबद्दल धन्यवाद.

**मा.अंबरनाथ कांबळे -** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त,सन्मा.सभागृह आजच्या या बजेटच्या मिटींगच्या संदर्भात आमचे बरेचसे नगरसेवक काही सूचना करतात. गेल्या वर्षी कोरोनाच्या काळामध्ये आमच्या प्रभागामध्ये किंवा पिंपरी चिंचवड महापालिकेमध्ये कामे कमी झालेली आहेत. आणि आता आयुक्त पाटील साहेब येण्याच्या आगोदर हार्डीकर साहेब होते त्यावेळेस आमच्या प्रभागातील चारही नगरसेवक आयुक्तांकडे गेलो होतो. त्यांना सांगितलं आमचं हे काम आहे मग त्यांनी संबंधित इंजिनियर यांना सांगितलं की,तरतुद असेल तरच तुमचं काम काढा, आम्हांला या सभागृहात येऊन चार वर्ष झालेली आहेत आता आमचं हे शेवटचंच वर्ष राहिलेलं आहे. आता आमचे मित्र सचिन बोलले की,आयुक्त हे काळजी घेतात,हे तसं करा असे करा अशा अनेक गोष्टी आहेत. आता माझ्या प्रभागातील कामे काढलेली असतील आणि त्याला तरतुद नसेल तर आणि आम्ही आयुक्तांकडे गेलो आणि त्यांना सांगितल की,आम्हांला तरतुद उपलब्ध झाली नसल्यामुळे आमची कामे झालेली नाहीत. माई,आता आमचे सहा महिने राहीलेली आहेत आमच्या प्रभागातील कामांसाठी जी काही तरतुद पाहिजे ती उपलब्ध करुन देण्यात यावी. कारण नगरसेवक हा काही त्याच्या घरच्या कामासाठी सांगत नाही जनतेच्या प्रश्नांसाठी तरतुद करण्याची मागणी करतो. म्हणुन माई,जे,जे सदस्य कामांसाठी तरतुद करण्याची मागणी करतात त्यांना तरतुद उपलब्ध करुन द्या. मला याठिकाणी बोलायला संधी दिली त्याबद्दल धन्यवाद.

**मा.अजित गव्हाणे -** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त,सन्मा.सभागृह याठिकाणी यावर्षीचे बजेट स्थायी समितीचे अध्यक्ष नितीन लांडगे यांनी सभागृहात मांडलेलं आहे. यावर्षीच्या

बजेटवर आम्हांला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल प्रथमत: आभार. कारण मागच्या चार वर्षात आम्हांला बजेटवर बोलण्याची संधी मिळाली नाही. नामदेवराव हे बजेट खरंतर महत्वाचं असतं आपण प्रत्येक जण याठिकाणी नगरसेवक म्हणुन निवडुन येतो आणि कुठल्याही नगरसेवकाची अपेक्षा अशी असते की, माझ्या प्रभागातील ज्या नागरीकांनी माझ्यावर विश्वास ठेवला त्या नागरीकांना मी आश्वासन दिलं आहे की, ते माझ्याकडनं पुर्ण झालं पाहिजे अशा प्रकारची अपेक्षा प्रत्येक नगरसेवकाला असते. मग तो कुठल्याही पक्षाचा असो. बजेट तयार करताना सर्व नगरसेवकांना आधीच विश्वासात घेतलं पाहिजे.मा.महापौर साहेब,आपल्याला यापुर्वीचा सभागृहाचा अनुभव आहे. पुर्वी राष्ट्रवादीची सत्ता होती,त्याच्या पुर्वी काँग्रेसची सत्ता होती. आता भाजपची सत्ता आहे. पुर्वी जेंव्हा बजेट मांडत होतो त्यावेळेस सर्व नगरसेवकांचा विचार व्हायचा मग तो कुठल्याही पक्षाचा असो. आणि त्याला त्याच्या प्रभागात त्याला जे अपेक्षित तरतुद आहे ती त्याठिकाणच्या नागरीकांच्या दृष्टीकोनातून दिली जायची. परंतु मागच्या चार वर्षाचा कालखंड पाहिला तर याच्यामध्ये कुठं तरी सुधारणा झालेली आहे. तुमची सत्ता असताना सुध्दा तुमच्या नगरसेवकांनी अशा प्रकारची भूमिका मांडलेली आहे. खरं म्हणजे हे असं व्हायला नाही पाहिजे कारण मतदार जो आहे तो आपल्या शहरातील आहे. मागच्या वेळेसच्या आयुक्तांनी स्थायी समितीमध्ये बजेट मांडले त्यावेळेस चेअरमन संतोष लोंढे होते. आयुक्तांचं बजेट स्थायी समितीने अभ्यास करण्यासाठी ठेवलं आणि त्यानंतर त्यांनी उपसूचना दिल्या त्या उपसूचनेसह हे बजेट आज आपल्यासमोर आलेलं आहे. जवळपास ५५८६.३५ + २.८३ कोटी शिल्लक म्हणजे एकुण रुपये ५५८८ .७८ कोटीचं बजेट नितीन लांडगे यांनी आपल्यासमोर सादर केलं आहे. याबजेट मध्ये आयुक्त साहेब,आपण १५० कोटी रुपये भूसंपादनासाठी ठेवले होते. त्यातील १०४ कोटी रुपये स्थायी समितीने इतर कामांसाठी वर्ग केलेले आहेत. तर भूसंपादनासाठी आता फक्त ४६ कोटी रुपये शिल्लक आहेत. याचा मी उल्लेख का करीत आहे तर पुर्वी भूसंपादनासाठी कमी तरतुद राहिली तरी चालायचे पण आज आपल्याकडे टीडीआरच्या मोबदल्यात आपल्याला जागा मिळणार नाही. ही परिस्थिती निर्माण झाली आहे. त्याच्यामुळे आपल्याला भूसंपादनासाठी अधिक तरतुद लागणार आहे. आता तो नियम बदलतो की नाही हा भाग नंतरचा आहे. परंतु स्थायी समितीने उपसूचना देवुन जे बजेट सभागृहात पाठवले आहे. हे जर का असे केले तर आपल्याला भूसंपादनासाठी कुठल्या प्रकारचे पैसे राहणार नाहीत. या बजेटमध्ये केंद्र शासनाच्या आणि राज्य शासनाच्या पुरस्कृत ज्या योजना आहेत याच्यासहीत जवळपास ७११२ कोटी रुपयाचं बजेट आहे.हे आतापर्यंतच्या

महापालिकेच्या इतिहासातील सर्वात मोठं बजेट आहे. आणि हे बजेट खर्ची करताना सर्वांपुढे एक चॅलेंज असणार आहे. आपण जे वेगवेगळया विभागांकडनं अपेक्षित उत्पन्न धरलेलं आहे यामध्ये करसंकलन विभागाकडनं यावर्षी जवळपास ९५० कोटी रुपयांच उत्पन्न धरलेलं आहे. आणि मागील २०१८-१९,१९-२० चे अंदाजपत्रक पाहिलं तर करसंकलन विभागामध्ये १८-१९ मध्ये ४६५ कोटी रुपये उत्पन्न मिळेल असा अंदाज होता तर त्याच्यामध्ये प्रत्यक्षात आपल्याला ३७२ कोटी ८७ लाख रुपये जमा करता आले. याच्यामध्ये आपण मायनस ९३ कोटी रुपये होतो. तसेच १९-२० ला आपण अपेक्षित उत्पन्न धरलं ४८२ कोटी रुपये प्रत्यक्षात मिळाले ४०० कोटी ९४ लाख रुपये म्हणजे जवळपास ८० कोटी रुपये उत्पन्न हे मायनस झाले.आणि २०२०-२१ साली आपण अपेक्षित उत्पन्न धरलं आहे ७५० कोटी रुपयाचं आणि सुधारित पण आपण ७५० कोटी रुपये धरलेलं आहे. हे आपल्याला १०० टक्के येणार नाही. अशी परिस्थिती असताना आपण करसंकलन विभागाकडनं ९५० कोटी रुपये उत्पन्न मिळेल असं गृहीत धरलेलं आहे. म्हणजे इतकी तफावत या बजेटमध्ये आहे. बजेटमध्ये करसंकलनचं जे उत्पन्न दिलेले आहे ते खुप हायस्ट दिलेलं आहे. आणि खरोखर हे अपेक्षित उत्पन्न या विभागाकडनं आपल्याला मिळणार आहे का? हा मुळ प्रश्न आहे. त्यानंतर बांधकाम परवानगी विभाग या विभागाकडनं गेल्या तीन वर्षामध्ये अपेक्षापेक्षा जास्त उत्पन्न मिळालं आहे. १८-१९ ला ३५० कोटी रुपये अपेक्षित उत्पन्न धरलं होतं त्याठिकाणी आपल्याला ४३१ कोटी रुपयाचे उत्पन्न मिळालं आहे. त्याच्या पुढच्या वर्षी ३५० कोटी अपेक्षित धरलं होतं त्याठिकाणी ५८६ कोटी रुपये मिळाले. आणि २०२०-२१ ला आपण ६६९ कोटी रुपये अपेक्षित उत्पन्न धरलं होतं त्याठिकाणी सुधारित मध्ये आपण ४२४ कोटी रुपये धरले होते. याचं कारण असं होतं की, कोरोनाच्या कालावधीमध्ये आपल्याला बांधकाम परवानगी विभागाकडनं एवढं अपेक्षित उत्पन्न मिळणार नाही. तुम्ही जरी ४२४ कोटी रुपयाचे उत्पन्न धरलं असलं तरी आतापर्यंत २०० ते २५० कोटी रुपये आतापर्यंत आपल्याला मिळाले आहेत. यावर्षी बांधकाम परवानगी विभागाकडनं जे अपेक्षित उत्पन्न धरलेलं आहे ते ५२० कोटी रुपये पकडलेलं आहे. यानिमीत्ताने मी आपल्याला एक निदर्शनास आणुन देवु इच्छितो की, या बांधकाम परवानगी विभागाकडनं आपल्याला नेमकं किती उत्पन्न मिळणार आहे हे आपण कुठल्याही प्रकारची गॅरंटी देवु शकत नाही. कदाचित जास्तही उत्पन्न मिळू शकेल. परंतु आजची परिस्थिती अशी आहे की, हे उत्पन्न हवेत आहे. कारण जेंव्हा बजेट तयार झालं त्यावेळेला त्याच्यामध्ये फार मोठया प्रमाणात चेंजेस बिल्डींग परमीशन मध्ये ज्यावेळेस लोक प्लॅन मंजुरीसाठी

येणार आहेत त्याच्यामध्ये मोठया प्रमाणात चेंजेस त्याही ठिकाणी होणार आहेत. खरंतर आपण पाणीपुरवठा,पाणीपट्टी व इतर या डिपार्टमेंटकडनं आपण २०१८-१९ ला ६९ कोटी ६० लाख रुपये अपेक्षित उत्पन्न धरलं होतं प्रत्यक्षात मिळाले रुपये ४० कोटी ३३ लाख,२०१९-२० ला आपण रुपये ६७ कोटी ३५ लाख अपेक्षित उत्पन्न धरलं होते प्रत्यक्षात मिळाले ४५ कोटी ४४ लाख रुपये आयुक्त साहेब,याठिकाणी प्रिटींग मिस्टेक झालेली आहे. याठिकाणी २२२ कोटी रुपये पाणीपट्टी धरली आहे. आणि २६४ कोटी हे उलटं झालं आहे. मुळात बजेटच्या पुस्तकात खालची ओळ वर आली आणि वरची ओळ खाली आली आहे. आपण पाणीपट्टीतुन ७५ कोटी ८० लाख रुपये अपेक्षित घरलेले होते. आणि सुधारित आपण रुपये ११४ कोटी रुपये केलेले आहेत. या पाणीपट्टीच्या संदर्भात पाहिले तरआपण सगळया ठिकाणी हायर पाणीपट्टी वसुल धरलं तर प्रत्यक्षात आपल्याला प्रत्येक ठिकाणी लॉस आलेला आहे. पहिल्या वर्षी पाणीपट्टी मध्ये ३० कोटी मायनस मध्ये होतो दुस-या वर्षी २२ कोटी मायनस होतो आणि आता सुधारित जे धरलेलं आहे ते ही चुकीचं धरलेलं आहे. आणि यावर्षी आपण त्या डिपार्टमेंटकडनं त्याठिकाणी पाणीपट्टी पकडलेलं आहे रुपये ९४.८२ कोटी आपण जे सगळे आकडे धरलेले आहेत ते हायस्ट पकडलेले आहेत. आता याच्यामध्ये जीएसटीचा पण विषय आहे. पिंपरी चिंचवड शहर हे कामगार नगरी आहे याठिकाणी यापुर्वी जकातीचं उत्पन्न फार मोठया प्रमाणात होत होतं. नंतरच्या काळात एलबीटी आलं आणि आता जीएसटी आलं आणि जीएसटीचे पैसे हे राज्य शासनाकडे दिले जातात आणि त्यांच्याकडन जशी बिलं येतात प्रमाणित मिळतात त्याच्यामध्ये प्लस होतात. परंतु हे सगळे होत असताना आपल्याकडे ज्या ठेवी आहेत या ठेवीच्या संदर्भात सुध्दा आपण कायम हायस्ट राहिलेलो आहे. आणि या ठेवी ठेवत असताना मागच्या काळात आपण एक मोठी चुक या महापालिकेच्या संबंधित डिपार्टमेंटकडनं झाली.आपण नॅशनल बॅंकेमध्ये ठेवी ठेवल्या पाहिजेत असे शासनाचे आदेश असताना आपल्या महापालिकेच्या मोठया प्रकल्पाच्या ठेवी आपण त्या येस बॅंकेत ठेवल्या आणि ती बॅंक अडचणीत आली आमच्या पक्षाचे अध्यक्ष संजोग वाघेरे यांनी त्यासंदर्भात महापालिकेला तसं पत्र दिलं होतं की, महापालिकेने ज्या ठेवी येस बॅंकेत ठेवलेल्या आहेत त्या बेकायदेशिर ठेवलेल्या आहेत. त्या नॅशनल बॅंकेत ठेवल्या पाहिजेत. आणि ती बॅंक अडचणीत आलेली आहे. आणि या बॅंकतून ठेवी ताबडतोब काढून घ्या अशा प्रकारचं पत्र त्यांनी दिलं होतं त्या पत्राकडं आपल्या डिपार्टमेंटनी दुर्लक्ष केलं आणि नंतरच्या काळात आयुक्त साहेब,तुम्हांलाही माहिती असेल ती बॅंक अडचणीत आली आणि आपल्या ठेवी अडचणी आल्या परंतु नंतर

सुदैवाने ते पैसे आपल्याला परत मिळाले परंतु येथून पुढच्या काळामध्ये अशी चुक होऊ नये. आपल्या ज्या ठेवी आहेत त्या नॅशनल बँकेतच ठेवल्या गेल्या पाहिजेत. येथून पुढे याची खबरदारी महापालिकेच्या प्रशासनाने घेतली पाहिजे. अशा प्रकारची अपेक्षा याठिकाणी व्यक्त करतो. मा.महापौर साहेब,याठिकाणी बजेटचा फुगवटा झालेला आहे. आपण जे अपेक्षित उत्पन्न धरलेलं आहे ते वसुल होणार नाही. याचा परिणाम काय होणार आहे पुढच्या काळामध्ये आपण जे मोठे टेंडर काढणार आहोत,त्याचे इस्टिमेट काढणार आहोत आणि हे करत असताना आपण कुठं तरी कामामध्ये अडकणार आहोत. आणि तसं जर तुम्हांला होऊ द्यायचं नसेल तर आयुक्त साहेब,तुम्हांला याच्या खोलामध्ये जावं लागणार आहे. जी कामं शहराच्या दृष्टीने खरोखर हिताची आहेत काही कामे अशी निघाली आहेत की,त्या कामाची आताच गरज पण नाही. आणि त्या कामाला बजेट ठेवलं गेलेलं आहे. किंवा त्याचं जे टेंडर काढल आहे. ते खुप जास्तीचं आहे एवढे पैसे आपण इतर ठिकाणी वापरले असते तर त्या भागातील नगरसेवकाच्या अपेक्षा पुर्ण झाल्या असत्या. परंतु अशा पध्दतीनं कामकाज होताना दिसत नाही. खरंतर अनेकांनी बरेच मुद्दे मांडलेले आहेत. राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाने निवडणुकीच्या वेळेस जाहीरनामा प्रसिध्द केला होता आणि त्या जाहीरनाम्याप्रमाणे आम्ही ही कामे करु तसंच तुमच्याही पक्षाच्या वतीने जाहीरनामा तयार केला होता त्यामधील कामे मी तुमच्या लक्षात आणुन देवु इच्छितो की, या जाहीरनाम्याप्रमाणे तुम्ही कामे केली तर याचा फायदा तुम्हांला होणारच आहे नाही कामे झाली तर आम्ही विरोधक आहोत आम्ही बोलणारचं आहोत. तुम्ही जाहीरनाम्यामध्ये सर्वांसाठी आरोग्य सेवा मेडीकल क्लेम रुपये ३ लाखापर्यंत करु अशा प्रकारचं तुमची भूमिका होती.आम्ही पण आणि प्रमोद कुटे यांनी सुध्दा या सभागृहात दोन वेळा हा विषय मांडला होता. आयुक्त साहेब आज आपण या संकटाला सामोरे जात आहे. कोरोनाचं फार मोठं संकट आपल्यावर आलेलं आहे. आणि या काळामध्ये सुदैवाने मागच्या वर्षी आपण हॉस्पिटलची मोठया प्रमाणात निर्मीती केली होती. त्याच्यामुळे त्याचा आपल्याला फायदा झाला परंतु हे करत असताना आपल्या सगळयांच्या लक्षात येत आहे की, शहरातील प्रत्येक नागरीकांना त्यांच ट्रिटमेंट घेणं फार अवघड जात आहे. आणि या परिस्थितीमध्ये जर का आपण असा विभाग केला तर मला वाटतं आपल्या शहरातील नागरीकांना म्हणजे असे अनेक पेशंट येत आहेत की, आपण त्यांना महापौर निधीतुन त्यांना मदत करण्याचा प्रयत्न करत आहोत परंतु ती मदत आताच्या दृष्टीने तुटपुंजी आहे. मा.महापौर साहेब,तुम्ही पेपरला बातमी वाचली असेल की,आमच्या भोसरीमध्ये सौरभ शिंदे नावाचा मुलगा आहे आणि त्याला ९ महिन्याचं

बाळ आहे आणि त्या बाळाला अतिशय दुर्धर असा आजार आहे त्या बाळाला इंजेक्शन देण्यासाठी अमेरिकेहून आणायचं आहे आणि ते इंजेक्शन २५ कोटी रुपयाचे आहे. आणि आज त्या कुटूंबाची अशी परिस्थिती नाही की,ते २५ कोटी रुपये खर्च करु शकतात. त्यांनी आतापर्यंत फक्त अडीच कोटी रुपये जमा केलेले आहेत. डॉक्टरांनी त्यांना सांगितलं आहे की,हे दोन महिन्यात तुम्ही हे पैसे जमा करा मग केंद्रामध्ये आदरणीय पवार साहेब असतील,खासदार कोल्हे साहेब असतील किंवा तुमच्याही पक्षाचे नेते असतील लक्ष्मण भाऊ,भोसरीचे आमदार महेशदादा, विलास लांडे या सर्वांनी मदत करण्याची भूमिका घेतलेली आहे परंतु आज ते ही मदत जमा करण्यास यशस्वी होत नाहीत कारण पैसे खुप जास्त लागत आहेत त्याच्यामुळे आपण सर्वांनी त्या मुलीला मदत करावी अशी अपेक्षा आहे. या मुलीचा उल्लेख करण्याचं कारण आहे की,आज त्या मुलीच्या वडिलांकडे वैदयकीय उपचारासाठी पैसे नाहीत,मेडीकल क्लेम नाही तरी मा.महापौर साहेब,तुम्ही आणि आम्ही पण असे काही आश्वासन दिलं तर या शहराच्या विकासाच्या दृष्टीकोनातून फार मोठं काम केलं असेल, हे शहर कामगारांच आहे त्याच्यामुळे आपण याचा सकारात्मक विचार करावा. बजेटमध्ये अशा प्रकारची तरतुद आता नाही. विशेष बाब म्हणुन जर आपण या बजेट मध्ये काही तरतुद केली तर मला वाटतं हे खुप चांगल काम होईल. त्याचप्रमाणे तुम्ही शाळांच्या संदर्भात तुम्ही एक आम्हांला आश्वासन दिलं होतं की, इस्त्राईलच्या धर्तीवर आम्ही याठिकाणी शाळांना सुविधा पुरविण्यात येईल. याच्या मागे तुमची भूमिका चांगली होती की,आपल्या परिसरातील शाळा चांगल्या डेव्हलप व्हाव्यात प्रमोद कुटे आणि बाबु नायर यांनी या शाळांच्या संदर्भात अतिशय सविस्तर अशा गोष्टी मांडलेल्या आहेत. या शाळांची पटसंख्या कमी झालेली आहे. आपल्या सगळया मराठी माध्यमांच्या शाळा होत्या त्यामध्ये भोसरी आणि कासारवाडी याठिकाणी इंग्रजी माध्यमाच्या शाळा सुरु केल्या आहेत. त्याठिकाणी आपल्याला चांगल्या प्रकारचा प्रतिसाद मिळतो आहे. सेमी इंग्लिश स्कुल आपण त्याठिकाणी चालू केल्या आहेत. मा.आयुक्त साहेब,महापालिकेच्या सर्व शाळा सेमी इंग्लिश आणि इंग्रजी केल्या तर लोकांचा जो प्रायव्हेट शाळेकडे जाण्याचा ओघ आहे तो कमी होईल.अनेक शाळांची अशी परिस्थिती नाही परंतु ते आपल्या मुलांना इंग्लिश मेडीयमच्या शाळेत टाकतात. कोठुन तरी कर्ज काढुन मुलांच शिक्षण पुर्ण करतात. आणि तुम्ही जे जाहीरनाम्यामध्ये आश्वासन दिलं होतं ते पुर्ण होईल अशी आशा मी व्यक्त करतो त्यानंतर रस्त्याचं सुयोग्य नियोजन करुन महत्वाचे चौक सिग्न्ल फ्री करायचे आहेत. पिंपरी चिंचवड शहराची जी ओळख आहे ती मागील २०/२५ वर्षाच्या

काळामध्ये मोरे सर, अजितदादांच्या नेतृत्वाखाली आणि आता तुमच्या सर्वाच्या नेतृत्वाखाली या शहराचा विकास होत आहे. पिंपरी चिंचवड शहर हे अत्यंत प्रगत शहर आहे. आणि आपल्या शहराकडे फास्टेस्ट गोईंग शहर म्हणुन पाहिले जात आहे. या शहराला आपण ज्या सुविधा देण्याचा प्रयत्न करतो आहे.त्याच्यामध्ये अधिकचा भर आपल्याला त्यामध्ये द्यावा लागणार आहे. आणि तसे तुम्ही पण तुमच्या जाहीरनाम्यामध्ये सांगितलं होतं की, शहरामध्ये सर्व ठिकाणी पुरेसा पाणीपुरवठा करुन हे शहर टँकरमुक्त करणार अशा प्रकारची तुम्ही घोषणा केली होती. पाण्याच्या संदर्भात तुम्ही अपयशी ठरलेले आहात.माई,२०१४ च्या आसपास मा.अजितदादांनी त्याठिकाणी भामा आसखेड आणि आंद्रा धरणाचं पाणी मंजुर केलं. १६७ अधिक १०० असे एकुण २६७ एमएलडी पाणी हे त्यावेळेस मंजुर झालेलं आहे. आणि पुणे महापालिकेला सुध्दा त्याचवेळी आपल्याला पाणी मंजुर झालं. पुणे महापालिकेचं काम पुर्ण झालेलं आहे. पुणे महापालिकेला २०० एमएलडी पाणी मिळत आहे. आपलं पाणी आजही आपल्यापर्यंत पोहोचलेलं नाही. म्हणजे एकाच वेळी मंजुरी मिळालेली आहे परंतु पुणे महापालिकेचं पाणी त्यांच्या नळाला आलं आहे. आणि आपलं पाणी अजुन धरणातच आहे. तुम्ही आता जे काही करताय त्याबद्दल आमचा विरोध नाही उशिरा का होईना करायला घेतलं आहे. त्याला आम्ही १०० टक्के मदत करु राज्य सरकार आमचं आहे आम्ही नागरीकांसाठी १०० टक्के तुम्हांला मदत करु. परंतु हे पाणी आणण्यासाठी कुठंतरी तुम्ही कमी पडलो आहोत हे मान्य करा. आपण भामा आसखेड किंवा आंद्र धरणातुन पाणी आणत नाही अँकच्युएल आपण तळवडेतुन पाणी उचलण्याचा प्रयत्न केला त्याठिकाणी सुरुवातीला रेडझोन असल्यामुळे जागा बदलावी लागली त्यानंतर आपण चिखलीची जागा केली. ती जागा आपल्या ताब्यात नव्हती त्यानंतर जागा ताब्यात घेण्यासाठी प्रयत्न केले नंतर जागा ताब्यात आली पण कुठंतरी राजकीय मदत प्रशासनाला झाली असती तर हे काम लवकर झालं असतं. आता तुमच्या म्हणण्यानुसार सप्टेंबर २१ पर्यंत हे पाणी शहराला मिळेल असं वाटतयं ते नक्कीच पुर्ण व्हावं अशी अपेक्षा आहे. या शहराची लोकसंख्या जवळपास ३० लाखाच्या आसपास गेलेली आहे. आणि या लोकसंख्येला जर आपल्याला पाणी पुरवायच असेल तर आपल्या शहरातील नागरीकांना पुरेसा पाणीपुरवठा करायचा असेल तर वेगवेगळं संशोधन केलं पाहिजे.मागच्या जनरल बॉडीमध्ये तुम्ही एक चांगला विषय आणला होता. त्या विषयामध्ये आपण जे काही पाणी ट्रिट करणार होतो आणि ते पाणी पुन्हा एमआयडीसी किंवा इतर काही सोसायटयांना, गार्डन्स किंवा महापालिकेचे जे मोठमोठे प्रकल्प आहेत

त्याठिकाणी आपण हे पाणी उपलब्ध करुन देण्याची भूमिका घेतलेली आहे. फक्त त्यावेळेस जे सांगण्यात आलं की,तुम्ही जे फंडस सभागृहासमोर आणलं होतं ते थोडसं अर्धवट होतं. त्याच्यामध्ये तुम्ही अजुन डिटेल्स मध्ये आणलं असतं तर बरं झालं असतं. होतं काय,विषय घाईघाईत मंजुर करतो परंतु प्रत्यक्षात काम करायला सुरुवात करतो त्यावेळेस डिले होतो. डिले का होतो तर, टेक्नीकलच्या बाबतीत आपले अधिकारी खोलात गेलेले नसतात. मगाशी बाबु नायरनीं उल्लेख केला की,सत्ता भेटत असते,मागच्या काळात आमची होती,आता तुमची आहे, उदया आणखीन कोणाची असेल, पण अधिकारी त्याठिकाणी कायम असतात. काम करणारे अधिकारी असतील तर नक्कीच चांगले कामे होतात . पण या महापालिकेत असे पण काही अधिकारी आहेत की, ते कामचुकार आहेत त्याचा निकष फक्त एकाच ठिकाणी असतो आपल्याला यातून काय मिळेल. त्यामुळे आयुक्त साहेब,येथुन पुढे अशा अधिका-यांवर सुध्दा तुम्हांला नजर ठेवावी लागणार आहे. आणि जे प्रामाणिकपणे काम करणारे अधिकारी आहेत त्यांना प्रोत्साहन पण दयावे लागणार आहे. मागच्या काळामध्ये हार्डीकर साहेबांकडनं चुका पण झालेल्या आहेत. काही अधिका-यांच्या बाबतीत घटना घडल्या आहेत हार्डीकर साहेबांनी त्यांच्या मागं खंबीरपणे उभं रहायला पाहिजे होतं. आयुक्त साहेब,तुम्हांला एवढया मोठया प्रमाणात बजेट खर्ची करायच आहे ते याच स्टाफच्या मदतीनं खर्ची करायच आहे. त्यांना मोटीव्हेट कसं करता येईल हे ही काम तुम्हांला करावं लागणार आहे. आणि आता सगळयात मोठं चॅलेंज असं आहे की,आपल्याकडं युनिफाईडकडुन जागा मिळल आपल्या शहराची व्हर्टीकल डेव्हलपमेंट होणार आहे. आपण व्हर्टीकल डेव्हलपमेंटला शिफ्ट होत आहोत. त्यावेळेस या शहराची लोकसंख्या एवढी राहणार आहे आणि ही परिस्थिती बदलणार आहे. आणि त्या दृष्टीकोनातून आपण ज्या काही पाण्याच्या लाईन्स,ड्रेनेजलाईन्स टाकल्या आहेत,अंडरग्राऊंड केबल्स टाकल्या आहेत, स्ट्रॉम वॉटर च्या लाईन टाकल्या आहेत या अपु-या पडणार आहेत त्याच्यामुळे याच्यावर पुन्हा फेरविचार करावा लागणार आहे. कारण आपण शहराचा विकास करताना लोकसंख्येचा विचार करुन करणार आहोत. आयुक्त साहेब,आपल्याला पुढील ५० /१०० वर्षाचा विचार करुन आपल्याला या सुविधा बदलाव्या लागणार आहेत. तुम्हांला टप्प्याटप्याने पुढं जावं लागणार आहे. त्यानंतर तुम्ही मिळकराच्या बाबतीत सांगितलं आहे की,आम्ही कारपेटवरती मिळकत कर आकारणी करु परंतु तसं काही झालेलं नाही. मी म्हणतो ते नको,पण जेंव्हा आम्ही मागच्या काळामध्ये मिळकतराच्या बाबतीत भूमिका घेतली होती की,शास्तीकर वगळुन आपण टॅक्स घेत होतो त्यानंतर निवडणुक झाल्यानंतर हार्डीकर

साहेबांनी काय केलं शास्तीकर आणि मिळकत कर एकाच वेळी भरण्याची त्यांनी डिमांड केली. आणि त्याच्यामध्ये अनेक लोकांवरती अन्याय झाला अनेक लोकांना त्यांना त्यांचा टॅक्स भरता येत नाही. मागच्या वर्षी आपण भूमिका घेतली होती की,आपण लोकांना लिहून दिलं आहे की, तुम्ही टॅक्स भरा,शास्तीचा टॅक्स आम्ही बाजुला ठेवु प्रत्यक्षात लोकांनी जेंव्हा टॅक्स भरला तेंव्हा असं लक्षात आलं की, जी रक्कम भरली ती शास्तीतुन वजा केली. त्यामुळे नागरीकांची महापालिकेकडनं फसवणुक झालेली आहे. अनेक लोकांनी त्या अपेक्षेने पैसे भरले की,आम्हाला शास्तीकर माफ करतील म्हणुन आम्ही टॅक्स भरला. त्यावेळेस आम्ही हार्डीकर साहेबांना सांगितलं की,तुम्ही शास्तीकर बाजुला ठेवुन मुळ टॅक्स घ्या. त्याप्रमाणे आपण यावेळेस मुळ टॅक्स घेतला आहे. त्याची मुदत आता संपत आहे. माझी आपल्याला विनंती आहे की,ही मुदत आपण वाढवली पाहिजे. नागरीकांचा शास्तीकर कसा माफ करणार आहोत यासाठी आम्ही आणि तुम्ही पण प्रयत्न करु यात. त्यानंतर आपण पंतप्रधान आवास योजना मार्फत झोपडपट्टी पुनर्वसन आणि आर्थीक दुर्बलासाठी घरे बांधणे अशा प्रकारची भूमिका आपण घेतलेली आहे. हे केंद्र शासनाचं धोरण होतं पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत शहरातील जे काही गरीब लोक आहेत त्यांना त्याठिकाणी घरे बांधुन द्यावीत. मागच्या काळात सुध्दा आपण झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पाअंतर्गत झोपडपट्टी धारकांना मदत करण्याचा प्रयत्न केला आहे. घरकुलच्या निमित्ताने देखील लोकांना आपण घर देण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच आपण पंतप्रधान आवास योजनेअंतर्गतची तीन टेंडर काढलेली आहेत. त्याची लॉटरी पण निघाली आहे. आयुक्त साहेब,प्रत्यक्षात या घरांची डिमांड खुप जास्त आहे. आणि आपल्याकडे घरे कमी आहेत मला माहित नाही महापालिका कितपत पुरेशी पडेल. परंतु आपल्याला अधिकच काम त्यामध्ये करावं लागणार आहे. दुसरी गोष्ट आपल्याला हे शहर झोपडपट्टी मुक्त करायचं आहे. झोपडपट्टीधारकांना एक चांगल घर देण्याची भूमिका राज्य शासन आणि केंद्र शासनाची आणि महापालिकेची पण आहे. आणि त्यानिमित्ताने राज्य शासन आणि केंद्र शासनाची धोरणं बदलली आहे. त्या काळामध्ये आपल्या झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प खाजगी डेव्हलपर करत नव्हते.परंतु पुण्यामध्ये होत होते. आयुक्त साहेब, तुम्ही आल्या,आल्या तुमच्यासमोर तो विषय आला टीडीआर जर आपण बाजुला ठेवुन हे केलं तर मला वाटतं कुठंतरी हे डेव्हलपमेंट थांबेल.आणि आपला जो हेतु आहे स्लम डेव्हलपमेंट कुठंतरी बाजुला पडेल. त्यामुळे तुम्ही याही संदर्भात राज्य शासनाकडे भूमिका मांडलेली आहे. त्यादृष्टीकोनातून तुम्हांला येथून पुढच्या काळामध्ये प्रयत्न करावे लागणार आहेत. बजेटच्या दृष्टीकोनातून अशा अनेक गोष्टी या शहराच्या

दृष्टीकोनातून करण्याचा मानस आहे. या शहराची जी काही डेव्हलपमेंट झालेली आहे त्या डेव्हलपमेंटचा जर का विचार केला तर या शहरातील पिंपरी, चिंचवड,भोसरी,आणि आकुर्डी ही मुळची गावं नंतर काळेवाडी,रहाटणी,थेरगांव ही गावं त्याच्यामध्ये आल्यानंतर पिंपळेगुरव,पिंपळेसौदागर,पिंपळेनिलख ही सगळी गावे महापालिकेमध्ये आली त्यानंतर ग्रामीण भाग मोशी,चिखली,डुडुळगांव,रावेत या सर्वाची मिळुन ही महापालिका झाली आहे. महापालिका होत असताना पुर्वीची जी गावठाणं होती त्याठिकाणी त्या डेव्हलपमेंटला निधी होता. पुर्वी अर्बन डेव्हलपमेंट कायद्यांमुळं त्याठिकाणी काही चुकीची डेव्हलपमेंट झालेली आहे. आणि त्याला बकाल स्वरुप प्राप्त झालं. परंतु नवीन डेव्हलपमेंट होत असताना त्याठिकाणी पिंपळेगुरव,पिंपळेसौदागर,वाकड असेल याठिकाणी डीपी रस्ते झाल्यामुळे त्याठिकाणी डेव्हलपमेंट खुप चांगली झाली आहे. आणि ती चांगली होत असताना त्याठिकाणच्या प्रॉपर्टीचा,जागेचा,फ्लॅटचा,दुकानाचा रेट पाहिला तर आणि त्या भागातील तुलनेत इतर भागाचा रेट पाहिला तर तुम्हांला त्याच्यामध्ये फार मोठया प्रमाणात तफावत दिसेल. सुरुवातीला जेंव्हा मी तुम्हांला भेटलो त्यावेळेस ज्याठिकाणी अनडेव्हलपमेंट त्याठिकाणी इक्वल डेव्हलपमेंट करायची आहे. आयुक्त साहेब,या शहराची इक्वल डेव्हलपमेंट कशी होईल यादृष्टीने आपल्याला प्रयत्न करावे लागणार आहेत. त्यामुळे स्मार्ट सिटीचा जो विषय आहे त्याच्यामध्ये सुरुवातीला पिंपरीला घेतलेलं नव्हतं. नंतर आम्ही पवार साहेबांना भेटलो त्यावेळेस त्यांनी सांगितलं की,आज तरी तुम्हांला स्मार्ट सिटीमध्ये घेता येणार नाही. खरं म्हणजे तुमच्यावर अन्याय झाला आहे तुम्हांला स्मार्ट सिटीमध्ये घ्यायला पाहिजे होतं. परंतु घेतलं गेलं नाही परंतु पुढच्या काळामध्ये नक्की आम्ही घेऊ पण त्यानंतर एक,दिड वर्षानी नवी मुंबईला जेंव्हा त्याच्यामधुन बॅकआऊट केलं त्यावेळेस आपल्या पिंपरी चिंचवड शहराला स्मार्ट सिटीमध्ये घेतलं गेलं. स्मार्ट सिटीमध्ये घेतल्यानंतर स्मार्ट सिटीमध्ये जी डेव्हलपमेंट होणं अपेक्षित होतं निवड करताना पिंपळेसौदागर आणि पिंपळेगुरव या गावाची निवड झाली. स्मार्ट सिटीसाठीची मागणीसाठी संबंधित डिपार्टमेंट सांगतात की,ऑनलाईन मागणी कुठल्या गावची जास्त आहे. आम्ही ऑनलाईन मागणी घेतो हिंजवडी परिसरातील लोक त्याठिकाणी मोठया प्रमाणात रहातात. आणि त्यांनी तशी ऑनलाईन मागणी केली त्यामुळे त्यांची स्मार्ट सिटीसाठी निवड झाली.खरं म्हणजे अनडेव्लपमेंट भागाची स्मार्ट सिटीसाठी निवड होणे आवश्यक आहे. मोठया प्रमाणात आपण स्मार्ट सिटीसाठी आपण १११९ कोटी रुपयचा खर्च करणार होतो. हाच खर्च अशा ठिकाणी व्हायला पाहिजे की,ज्याठिकाणी डेव्हलपमेंट नाही. जर त्याचे काही

वेगवेगळे पॅकेजेस केले त्या भागातील एरिया डेव्हलपमेंटसाठी ठराविक डेव्हलपमेंटसाठी पॅकेज केलं. नंतर आपण टेक महिंद्राला पॅकेज दिलं अशा वेगवेगळया प्रकारची आपण चार पॅकेज काढली. हे करीत असताना पुण्याने सुध्दा तीच चुक केली आहे. औंध बाणेरची स्मार्ट सिटीसाठी निवड केली. त्यामुळे आयुक्त साहेब,तुम्ही स्मार्ट सिटीच्या बाबतीत खोलात गेलं पाहिजे. स्मार्ट सिटीच्या कामाचे आजपर्यंत फक्त ४४६ कोटी रुपये खर्च झालेले आहेत आणि टेंडर मात्र जवळपास सगळी निघाली आहेत. आणि त्या १११९ कोटी रुपयावरुन जवळपास १५०० कोटी रुपयेपर्यंत खर्च गेला आहे. आणि स्मार्ट सिटीची जी कामे चालू आहेत त्याच्या खोलात आपण जावं. काल आमचे पक्षनेते आणि आम्ही तुमच्याकडे अपेक्षेने आलो होतो पक्षनेत्यांनी तुम्हांला सांगितलं आहे की,स्मार्ट सिटीचं काम कशा प्रकारे चालू आहे. आमच्या भागात रस्त्याची खोदाई केलेली आहे,तुमच्याही भागात केलेली असेल,परंतु आपल्या स्थापत्य विभागाच्या अधिका-यांनाही माहिती नसतं,कुठल्या नगरसेवकांना माहिती नसतं डायरेक्ट येतात खोदाई करतात यामध्ये कोणाचं चुकतयं काय नाही याच्याशी कोणाचं काही घेणं-देणं नाही. कुठल्याही प्रकारे लक्ष दिलं जात नाही. आणि त्याठिकाणी खोदाई केल्यानंतर त्यांच्या मध्ये जी काही फायनल कोट करुन देण्याची जी काही जबाबदारी ही टेंडरमध्ये त्यांच्याकडे आहे. आणि ती जबाबदारी ते पुर्ण करत नाहीत. आम्ही काय करतो,स्थापत्यच्या अधिका-यांना फोन करतो. आणि नागरीकांचे आम्हांला फोन येतात,नागरीक त्या खड्डयामध्ये पडतात त्याठिकाणी तुम्ही ते काम करा, म्हणजे एका बाजुला आपण ते खड्डे बुजवण्याचे पैसे त्यांना देतो परत स्थापत्य कडनं पण त्या कामाचे टेंडरमधुन पैसे देतो. म्हणजे आपला खर्च हा डब्बल होतो. सिमाताईनी त्याच्या संदर्भात चांगली भूमिका घेतलेली आहे. दुसरा मुद्या आहे की,मेट्रोला आपण मोठया प्रमाणात निधी देतो. त्याच्या मागची भूमिका अशी होती की,आपलं शहर हे वाढतयं आणि त्याच्यामध्ये आपण पब्लिक ट्रान्सपोर्ट सक्षम करण्याची भूमिका आपण घेतली होती. पब्लिक ट्रान्सपोर्ट सुरु होण्याच्या आधी पीसीएमटी आणि पीएमटी असे दोन वेगळया संस्था होत्या. त्या आपण एकत्र केल्या आहेत. दोन्ही संस्थांच्या बसेस एकाच रुटवर धावत होत्या. त्यानंतर दोन्ही संस्थांची मिळून पीएमपीएमएल संस्था स्थापन झाली. या संस्थेच्या स्थापनेमुळे आपली अशी अपेक्षा होती की,या शहराची वाहतुक व्यवस्था चांगली व्हावी. परंतु प्रत्यक्षात त्याच्यामध्ये ही आम्ही कुठंतरी कमी पडलो आहे. वाहतुक व्यवस्था कुठंच फायद्यात चालत नाही याबाबत दुमत नाही. पण मेट्रोवर आपण किती खर्च करणार आहोत आणि मेट्रोचा प्रत्यक्षात किती लोकांना फायदा होणार आहे. आणि गेली कित्येक वर्षापासून

काम चालू आहे. या कामामुळे पुणे आणि आपल्या शहरातील नागरीकांना याचा किती त्रास होतो. एक तर या कामाचा स्पीड खुपच स्लो आहे. मेट्रो सुरु झाल्यानंतर त्याचा किती लोक उपयोग करुन घेणार आहेत हा ही महत्वाचा विषय आहे. मला वाटतंआपण हे पैसे पीएमपीएमलवर खर्च केले असते तर पीएमपीएमएल सक्षम झाली असती. दोन्ही शहरातील नागरीकांना त्याचा निश्चित फायदा झाला असता. ठिक आहे,झालं ते झालं येथून पुढे तुम्हांला मेट्रोचं काम पुर्ण करावं लागेल. त्याठिकाणी जे काम चालू आहे ते योग्य पध्दतीने चालू आहे का, याच्याही आपल्याला खोलात जावं लागणार आहे. आणि आपली जी पब्लिक ट्रान्सपोर्ट संस्था आहे ती येथून पुढच्या काळात आपल्याला सक्षम करावी लागणार आहे. त्याच बरोबर क्रीडा विभाग,महिला बालकल्याण विभाग तसेच अंध,अपंग लोकांसाठी जो विभाग वेगळं काम करतं त्या विभागामध्ये आपल्या अधिका-यांची उदासिनता आहे. मागासवर्गीय कल्याणकारी योजनेसाठी बजेटच्या एकुण ५ टक्के खर्च करायचे असतात. तो खर्च होतो का,आणि तो योग्य होतो का हे ही पहाण्याची गरज आहे. आणि हा खर्च योग्य प्रकारे होत नाही हे आपण अनेक वर्षापासून पहातो आहे. दुसरा महत्त्वाचा मुद्या याबजेटच्या निमित्ताने निदर्शनास आणुन देवु इच्छितो की, प्रत्यक्षात भांडवली खर्च आणि महसुली खर्च आणि इतर जे खर्च होतात माझ्या माहितीप्रमाणे ३५ टक्केच्या पुढे महसुली खर्च झाला पाहिजे परंतु मागील चार/पाच वर्षापुर्वीच्या बजेटचा खर्च पाहिला तर भांडवली खर्चापेक्षा महसुली खर्च जास्त झालेला आहे. आणि त्यामुळे आपल्याला भांडवली खर्च करता आली नाहीत. यावर्षीचा खर्च आपण समजु शकतो की,यावर्षी कोरोना आला होता त्यामुळे महसुली खर्च आपला वाढलेला आहे. आयुक्त साहेब,तुम्हांला येथून पुढच्या काळामध्ये तुम्हांला लक्ष द्यावं लागेल. पगाराच्या व्यतिरिक्त आपण जो कन्सलटंटच्या वरती जो खर्च करतो त्या खर्चावरती तुम्हांला कुठं तरी आळा घालावा लागणार आहे. आयुक्त साहेब,आमच्या प्रभागातील जी छोटी,छोटी कामं आहेत ती कामे व्हावीत निवडणुकीचं हे शेवटचं वर्ष आहे. ते अत्यंत महत्वाचं आहे. त्यामुळे नगरसेवक हा कुठल्याही पक्षाचा असेल तर त्याचा विचार न करता जसं येथून मागच्या काळात आपण सर्व नगरसेवकांना योग्य न्याय देण्याचा प्रयत्न केला तसाच न्याय आपण येथून मागच्या काळात दिला पाहिजे. दुसरं म्हणजे आमच्या इंद्रायणीनगर भागामध्ये विदयुत विभागाच्या कारभारामुळं एक घटना घडली आहे. आणि त्याच्याही आधी मागच्या वर्षीच्या काळामध्ये अशीच एक घटना घडली होती. आपण मागच्या काळामध्ये आपण विदयुतची सगळी कामे ही अंडरग्राउंड केलेली आहेत. त्यानंतर आपण अशी भूमिका घेतली की,येथून पुढे

अंडरग्राऊंडची कामे करणार नाही एमएसईबी करणार आहे. परंतु सदरची कामे एमएसईबीकडुन होताना दिसत नाही. मा.महापौर साहेब,प्रत्येक प्रभागामध्ये एमएसईबीच्या अनुषंगाने जी छोटी,छोटी कामं आहेत ती आपल्या महापालिकेच्या माध्यमातुन केली तर आपल्या शहरातील नागरीकांना त्याचा फायदा होईल. आपण आम्हांला या पाच वर्षामध्ये या बजेटच्या विषयावर पहिल्यांदा बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आभारी आहे.

**मा.आशा धायगुडे-शेंडगे -** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह खरंतर मा.महापौर साहेब,आपलं मनापासून कौतुक केलं पाहिजे. नागरीकांच्या जीवाची एकीकडे काळजी असताना देखील आज आपण या सभागृहात बजेटवर बोलण्याची संधी दिली आहे. त्यामुळे तुम्ही सांगितलं आहे की, आपले म्हणणं थोडक्यात मांडा आणि एकच विषय परत,परत रिपीट करु नका त्या अनुषंगाने सुध्दा आम्ही बोलण्याचा प्रयत्न करीत आहोत. मा.महापौर साहेब,याबजेटमध्ये तुमच्याकडे नेमके किती पैसे जमा होणार आहेत आणि ते कसे खर्च करणार आहात याच्यामध्ये नुसते आकडे वाचण्यात मला या सभागृहाचा अजिबात वेळ घ्यायचा नाही. परंतु आमचे अजितभाऊ म्हणाले की,हे फुगवलेलं बजेट आहे. प्रथम मी त्यांचा शब्द खोडून काढते. कारण आपण याठिकाणी एक,एक आकडा न घेता दरवर्षी आपण २०१८-१९ ची जमा बाजु दाखवलेली रक्कम आणि प्रत्यक्षात जमा झालेली रक्कम याच्यामध्ये ९७ कोटी रुपयाचा फरक दिसतो. प्रत्येक बजेटमध्ये आपल्याला काही ना काही तरी फरक दिसतो. १९-२० मध्ये ७७ कोटी रुपयाचा फरक दिसतो आहे. आणि आता २०-२१ यामध्ये अजुन शेवटच्या रक्कमा अजुन यायच्या आहेत. आणि अजुन २५ टक्के रक्कम जमा होणार आहे असे अपेक्षित धरलेली आहे. त्याच्या उलट जर आपण खर्च पाहिला तर पहिल्या वर्षी १२९९ कोटी रुपये खर्चामध्ये शिल्ल्क राहिलेली आहे. आणि आपल्याला अपेक्षित होतं की, ३९६५ कोटी रुपये शिल्लक राहतील. आणि आता इथं दिसत आहे की,२६६७ कोटी रुपये खर्च झाला आहे. पुढच्या वर्षी १४०० कोटी रुपये शिल्लक राहिले. आणि मागच्या वर्षी आपल्याला ५९८ कोटी रुपये शिल्लक राहतील अशी अपेक्षा होती. मा.आयुक्त साहेब,आम्ही सभागृहातील सर्वजण आपल्याला विनंती करतो की, या सभागृहातील सर्वजण पोटतिडकीने विषय मांडतात. कारण आमचं तुमच्या सारखं नाही तुम्ही एकदा युपीएससी,एमपीएससी परिक्षा पास होऊन आले की, तुमची रिटायरमेंटची डेट फायनल आहे. तसं आमचं नाही. आमची परिक्षा दर तासाला असते आणि आमच्या कामाचा रिपोर्ट आम्हांला नागरीकांना दाखवायचा आहे. या शहरासाठी आणि प्रभागासाठी माझा

काय वाटा आहे हे सांगण्याचा आम्हांला प्रयत्न करावा लागतो. आणि आमच्या रिपोर्टनुसार आम्ही पुढच्या वेळेस निवडुन येणार की नाही हे त्यामध्ये असतं. पुढच्या वर्षी आम्हां सगळयांना परिक्षा द्यायची आहे. परिक्षा उत्तीर्ण व्हायची आहे आणि या सभागृहात येणार की नाही हे नागरीक ठरवणार आहेत. त्यामुळे आम्ही याठिकाणी जे काही बोलतो ते नागरीकांच काय म्हणणं आहे ते आम्ही याठिकाणी मांडण्याचा प्रयत्न करत असतो. आयुक्त साहेब,आपली जमा रक्कम झाली असेल तर खर्च योग्य झाला नाही याला जबाबदार कोण आहे. आपल्याकडे जर जमा रक्कम झाली असेल तर आपल्याकडे शिल्लक १२०० कोटी रुपये,१५०० कोटी रुपये कशासाठी रहाते. याला कोण अधिकारी जबाबदार आहे. सन्मा.आयुक्त साहेब,आपण याठिकाणी नवीन आहात परंतु या सभागृहात कोणी २ टर्म काढलेले आहेत,कोणी ५ टर्म काढलेले सभासद आहेत परंतु नवीन नगरसेवकांना आपल्या प्रभागातील कामे कशी काढायची,आपल्याकडील बजेट कसे खर्ची करायचे याची माहिती नसते. आणि मग आमचा अधिकारी बदलून जातो आणि मग अशा अधिका-याला काय शिक्षा दिली जाते. आम्ही याठिकाणी पोटतिडकीने सांगत असतो की,आमच्या प्रभागातील कामाचे टेंडर काढा, कामे ही करुन द्या अशी मागणी करतो. आयुक्त साहेब,आम्ही तुमच्या दालनामध्ये आलो होतो आणि आम्ही तुम्हांला सांगितलं की, माझ्या स्मार्ट सिटीचा स्मार्ट अधिकारी त्यांना स्मार्ट सिटीसाठी घ्या नां, कशासाठी आपण त्यांना प्रभागात घेतो. म्हणजे दोन शहर अभियंता एकाच शहरामध्ये कधी पाहिलेले नाहीत. एकीकडे सहा प्रभाग राजन पाटील साहेब बघतात आणि आमचे २ प्रभाग भालकर साहेब बघतात. आयुक्त साहेब,आम्ही जे काम सांगतो त्याची अंमलबजावणी झाली पाहिजे. एखादया अधिका-याला आम्ही फोन केला आणि त्यांना तो फोन घ्यायचा नसेल आणि ते मिटींगमध्ये आहे असे सांगायचे असेल तर त्यांना आमच्या शहरातून परत पाठवून द्या. आमचे अधिकारी सुध्दा हे स्मार्ट सिटीचा चांगला कारभार पाहतील व्हाईटनर न लावता. मी तुम्हांला सांगितले होते की,एक टेंडर जुलै मध्ये निघालं आजपर्यंत त्या कामाचं वर्कऑर्डर दिली की नाही हे माहित नसेल आणि तुम्हांला परत त्याच्याबाबतीत काही सांगत नसतील तर त्यांचा नेमका हेतू काय आहे. हे असं का करतात हे आम्हांला कळत नाही. त्याच बरोबर आपण या बजेटमध्ये माहिती व तंत्रज्ञान विभाग,पाणीपुरवठा,घनकचरा असेल यासाठी आपण चांगली तरतुद केलेली दिसते. निश्चितपणे आपण या सगळयांना सामोरे जात असताना आपण चांगले काम करु शकू अशी खात्री मी याठिकाणी बाळगते. परंतु सन्मा.महापौर साहेब, सत्ता कोणाचीही असु द्या या शहराचा विकास आणि धुरा कशी चांगली चालेल ज्या नागरीकांमुळे आपले

शहर चालतं त्या नागरीकांना आपण काय देवु शकतो याचाच विचार आपले नगरसेवक करत असतात. कोणी काहीही म्हणु द्या इलेक्शन जवळ आलेलं आहे. आमच्या शहरातील करदात्या नागरीकांना चांगल्या सुविधा दिल्या पाहिजेत. या शहरामध्ये ज्यांना जे जमलं त्यांनी ते केलं. ज्या शहरामध्ये पिंपरीचा जो भाग आहे या शहराला उभं करताना पिंपरीचं खुप मोठं योगदान आहे. ज्यावेळेस या शहरात बाहेरच्या राज्यातून नागरीक रहायला आले त्यावेळेस पिंपरी हे शहराचे मध्यवर्ती भाग आहे. त्यांनी इथं येऊन रहाण्याचा प्रयत्न केला त्यामुळे आमच्या भागामध्ये जास्तीत जास्त स्लम एरिया आहे,चाळी आहेत या सगळयांचा विकास करण्याच्या दृष्टीकोनातून आपण समसमान विकास हे धोरण आपण का अवलंबत नाही. जर एखादया भागामध्ये स्मार्ट सिटी होत असेल तर त्या भागामध्ये विकास कामासाठी पालिकेने खर्च कमी केला पाहिजे. हे सांगण्यासाठी कोणत्या नगरसेवकाची गरज आहे असे मला वाटत नाही. या ठिकाणी अत्यंत हुशार आणि बुध्दीमान असे अधिकारी आहेत. आणि मग तुम्हांला कळायला पाहिजे की,इथं १०० कोटी रुपये,२०० कोटी रुपये डायरेक्ट स्मार्ट सिटीला देणार आहेत. तर यांच्याकडच्या बाकीच्या कामांना आपण किती प्राधान्य दिले पाहिजे. या शहरातील एकाच भागातील नागरीक कर देतात म्हणुन हे शहर चालतं का असं अजिबात नाही. इथं प्रत्येकजण आपआपला खारीचा वाटा उचलतो आणि त्यामधुन मोठी रक्कम जमा होते आणि त्या जमा रक्कमेतुन खर्च योग्य पध्दतीने करणं ही आपली नैतिक जबाबदारी आहे. आज याठिकाणी ५५८८ कोटी रुपयेचं बजेट स्थायी समितीचे अध्यक्ष अत्यंत कमी बोलणारे पण मला असं वाटतं की,ते अत्यंत चांगल्या प्रकारे काम करतील अशी आशा व्यक्त करते आणि त्यांना शुभेच्छा देते. परंतु ५५८८.७८ कोटी रुपयाचे बजेट याठिकाणी मांडलेले आहे आणि केंद्र शासन आणि राज्य शासनाचे १५२३ कोटी रुपये असे एकुण ७११२ कोटी रुपयाचे बजेट या सभागृहात मांडलेलं आहे. या बजेटची रक्कम खर्ची करताना योग्य नियोजन आखणं गरजेचं आहे. ज्या,ज्याठिकाणी तरतुद करणे आवश्यक वाटलं त्याठिकाणी तुम्ही तरतुदी केलेल्या आहेत. त्यामध्ये जो नगरसेवक नागरीकांना रस्ता,लाईट,पाणी,ड्रेनेज या सुविधादेवु शकतो तो नगरसेवक पुढच्या टर्म मध्ये १०० टक्के या सभागृहात येऊ शकतो. आमच्या भागातील नागरीक जेंव्हा आम्हांला फोन करुन सांगतात पाणी द्या तेंव्हा मी त्यांना दोनच मिनिटं द्या असं ज्यावेळेस मी सांगते त्यावेळेस मी संबंधित अधिका-यांना फोन करुन नंतर तुम्हांला सांगते असे म्हणले तरी त्यांचे समाधान होते.आम्ही नगरसेवक दररोज २०० ते २५० कॉल उचलतो आणि त्या कॉलला उत्तर देताना आम्हांला कोणतीही चिडचिड करुन चालत नाही. आणि

त्यांच्या शंकेचे निरसन करणं आणि त्यांच समाधान करणं ही आमची नैतिक जबाबदारी आहे. या बजेट मध्ये पाणीपट्टीमधुन एकुण १.७० टक्के रक्कम जमाहोते. आणि त्याच्यावर आपण ७.८८ टक्क्के खर्च करतो. मा.महापौर साहेब,आपण आयुक्त साहेबांशी चर्चा करा की,आपण पाणीपट्टीतुन पावणे दोन टक्के वसुली होत असेल आणि ७.८८ टक्के खर्च करत असाल तर आपण नागरीकाना पाणी हे पुर्णपणे मोफत दिलं पाहिजे. आणि हे पाणी मोफत दिलं तर नागरीकांनाही त्यांच्यावर आवर घालण्याची आपल्याला संधी राहील. आता नागरीक असंही म्हणतात की,आम्ही पाणी बील भरतोय,दंडही भरतोय आणि आम्हांला पाणी देत नाही. तरी याचा आपण निश्चितपणे विचार केला पाहिजे. मा.महापौर साहेब,आपल्या स्मार्ट सिटीचे अधिकारी स्मार्ट काम करतात आम्हांला सांगितलं गेलं की,आमच्याकडे मिटर आहे तुमच्या वॉर्डामध्ये बसवुन देतो मी म्हणलं हरकत नाही मी त्यांना म्हणलं या मीटरमध्ये वेगळं काय आहे हे सांगा तर त्यांनी सांगितलं की,आम्हांला या मिटरमधनं आम्हाला रिंग मिळणार आहे पण हे आता पण होतच आहे. आता या मीटरमधुन तुम्हांला पाणी किती एमएलडी आलं किती नाही याच्यामधनं सगळं डिटेलींग कळणार आहे. त्यामुळे मी त्यांना म्हणले की,हे मीटर घ्या आणि नळाला लावा त्यातुन हवा जात असेल तर त्यावेळेस जर मीटर फिरलं नाही तर माझ्या वॉर्डात मीटर लावा. त्यानंतर ते माझ्या वॉर्डात फिरकलेच नाहीत. आम्ही ज्यावेळेस नागरीकांचे काम करतो,त्यांच्या गरजा आम्ही जाणुन घेतो आणि इथं आमच्या अधिका-यांना कुणाला तरी सेटल करायचं आहे. कोणाचं तरी मिटर घ्यायचे आहेत आणि म्हणुन ते मिटर बसवत असतील तर आम्ही तसे होऊ देणार नाही. कारण त्या मिटरचे पैसे त्या बिल्डींग मधील नागरीकांनी भरले नाही तरी त्याच पैशातुन त्या मिटरचे पैसे त्यांना अदा करावे लागणार आहेत. हे अधिकारी आम्हांला न विचारता आमच्या नागरीकांपर्यंत पोहचतात आणि मग एवढे जर आपले अधिकारी स्मार्ट असतील तर आपला खर्च पुर्ण का करत नाहीत. मागच्या वर्षी कोरोना असल्यामुळे वॉर्डातील कोणतीही विकास कामे झालेली नाहीत कुठलीही निविदा प्रक्रिया राबविलेली नव्हती. त्यावेळेस ही काळाची गरज होती. त्यावेळेस सर्व नगरसेवकांनी सपोर्ट केला.आज याठिकाणी पर्यावरण विभागासाठी आतापर्यंत ३१.५५ कोटी रुपयाची तरतुद असायची यावर्षी साधारणत ८३.७४ कोटीची तरतुद जवळपास आपण पावणे तीन कोटी रुपये म्हणजे जवळपास तरतुद घालवलेली आहे. खरंच खुप चांगली गोष्ट आहे. २१ व्या शतकात जात असताना या शहराची गरज काय आहे हे तुम्ही ओळखली आणि तुम्ही याठिकाणी भरीव तरतुद केलेली आहे. हे करत असताना एक गोष्ट सांगाविशी वाटत

आहे की, ज्यावेळेस मी या सभागृहात निवडुन आले त्यावेळेस मी ऐकलं होतं त्यावेळेस संजय कुलकर्णी यांची केसं काळी होती आता पांढरी झालेली आहेत. आणि आता त्यांची केस गळुन टक्कल होत आहे. परंतु माझ्या शहराच्या नदी सुधार प्रकल्प आजही याच पुस्तकातुन वाचायला मिळत आहे. मग यापुर्वी सत्ता राष्ट्रवादीची होती,आता भाजपची आली तरी आमचा अधिकारी तिथेच आहे. आणि आमच्या शहरातील नदीचं गटर होत आहे. आणि माझ्या शहराला मी काहीच देवु शकत नाही. मा.आयुक्त साहेब,२०१७ ला आपल्यासमोर डीपीआर मांडला गेला होता. त्याच पुढं काय झालं, काहीच नाही आम्हांला कोणत्याही पक्षाला धरुन बोलण्याची अजिबात इच्छा नाही. कारण मला या शहरातील फक्त नागरीकच दिसतात. २०१२ ला पण तेच आणि २०१७ ला पण तेच आणि आज आम्ही २०२२ च्या उंबरठयावर उभा आहोत. येत्या काही महिन्यामध्ये आम्हाला निवडणुकीला सामोरे जायचं आहे. हे आम्ही या सभागृहामध्ये अनेकवेळा बोललो आहे. पण सगळया गोष्टी कागदावरच आहेत या नदीसुधार प्रकल्पासाठी जी काही रक्कम सांगायची आहे ती सांगा पण नदीसुधार प्रकल्प सुरळीत करा, या शहरामध्ये खुप कंपन्या आहेत यांच्याशी आम्ही चर्चा केली त्यांना सांगितले की,सीएसआर च्या मधुन तुम्ही आम्हांला काय मदत करु शकता या शहरात अनेक मोठ मोठे बिल्डर्स आहेत हे सर्वजण आपल्या नदीचा विकास करण्यास इच्छुक आहेत. आपल्या महापालिकेचा एकही पैसा खर्च न करता त्यांना नदीचा विकास करण्यास द्या. मा.महापौर साहेब,आपण जो डीपीआर दाखवला आहे त्याची अंमलबजावणी का केली नाही. २०१२ पासून फायनल डीपीआर आला त्याला मंजुरी देणार आहात की,दिली अशा सगळया गप्पा आम्ही मागच्या अनेक वर्षापासून ऐकत आहोत. २०१२ ला ज्यावेळेस मी या सभागृहात आले त्यावेळेस मी भाषणात सांगितले होते की,२००९ ला पण या शहरातील मिटर बदलले होते. आणि मिटर काढताना सांगितलं की,सर्वांना समान पाणी बिल येणार आहे. हे कशासाठी करता आहात. सर्व नगरसेवकांनी नागरीकांचा विकास करण्यासाठी सर्व नगरसेवकांनी सांगितलं आणि आम्ही एका पॉझीटीव्ह अँग्लनी गेलोतर आपण निश्चितच चांगल्या प्रकारे काम करु शकतो. कोणत्याही प्रभागात गेलो तर त्याठिकाणची मेजरमेंट बुक पहा त्याच्यामध्ये मागच्या वर्षी डांबरीकरण केलं तर यावर्षी सुध्दा डांबरीकरण केलेलं आहे मागच्या वर्षी ब्लॉक लावले तर यावर्षी सुध्दा ब्लॉक लावले आहेत.डांबर वर आले म्हणुन ब्लॉक लावले आणि ब्लॉक वरती आले म्हणुन पुन्हा डांबरीकरण केले आणि आता परत ब्लॉक टाकायचं काम करत आहेत. किती वर्ष हा खेळ करायचा एकदा डांबर टाकल्यानंतर ४/४ वर्ष परत काम निघाल नाही पाहिजे. कुठं कसं आणि कशा

पध्दतीने पाणी मुरतं याची शहानिशा केली पाहिजे. २०१७ ला मी आयुक्त साहेबांना सांगितलं की,माझ्या प्रभागामध्ये मी डांबरावर डांबर मी टाकुच देणार नाही असा शब्द दिला होता आणि आजपर्यंत मी तो शब्द पाळतेय. मा.महापौर साहेब,तुम्हांला याचा अंदाज असेल की,ज्यांची जुनी घरे आहेत त्यांच्या घरामध्ये पाणी शिरतयं त्यांची घरे खाली आहेत आणि आपली ड्रेनेजलाईन वरती आहे. माझ्या प्रभागात एक चांगला बंगलाआहे त्यांनी सांगितलं की,ताई पावसाळयात आता आमच्या घरामध्ये पाणी बॅक मारतयं मग मी त्यांना सांगितलं मी काय करायचं तर ते म्हणाले तुम्ही पाईपलाईन टाकुन द्या. मग मी त्यांना सांगितलं की,एखादयाचं वैयक्तीक काम मला करता येणार नाही. मग ते म्हणले की,ताई आमचं वैयक्तीक काम नक्की करु नका, आमची पण अशी अपेक्षा नाही आणि तशी आम्ही मागणी पण करणार नाही. परंतु तुमच्या महानगरपालिकेने बाहेरचा जो पाईप होता तो पाईप वर घेतला त्यामुळे तिथं लेवल झाली नाही तर पाईपमधील पाणी बॅक मारतयं मग मी काय करायचं म्हणलं ते म्हणाले पालिकेकडे खुप पैसे आहेत त्यामुळे दर २/४ वर्षानी लाईन टाकताय, मग मी नेमकं काय केलं पाहिजे. आयुक्त साहेब,आपण लाईन टाकताना का विचार करत नाही आपण लाईन कुठं टाकतोय कुठं नाही या सगळयांचा विचार करायला नको का, मा.महापौर साहेब,स्थायी समिती मध्ये आता आम्ही नसल्यामुळे अशा विषयावर आम्हाला चर्चा करता येत नाही. परंतु काही गोष्टी प्रकर्षाने मांडण्यासाठी मी बोलते आहे. त्यानंतर मेट्रो, आता आमचे अजित भाऊ म्हणाले की,मेट्रोचं काम संथगतीने चालू आहे. खरंतर मेट्रोचे काम निश्चितच चांगले चालू आहे. त्यांनाआपण सगळया प्रकारे जागा उपलब्ध करुन देण्याचं काम करतोय. परंतु आपल्या सभागृहातील अनेक नगरसेवकांनी मा.महापौर साहेबांकडे मागणी केली आहे की, आम्ही सुध्दा पिंपरी चिंचवडकर आहोत आमची पण इमेज आहे,प्रतिमा आहे. आमच्या शहरातील नागरीक या मेट्रोचा त्रास आनंदाने सहन करत आहेत याचे कारण भविष्यात काही तरी चांगल घडणार आहे, या आशेवरती या मेट्रोला पुर्णपणे सपोर्ट आपल्याकडनं केल जात असताना सुध्दा त्याचा पाठपुरावा होत नाही. या सभागृहात घोषणा होते मी याठिकाणी कोणत्याही नेत्याचं नाव घेण्याचं टाळत आहे. मा.महापौर साहेब, हे पुणे नाही पण पुण्याच्या बरोबर आमची पिंपरी चिंचवड तितक्याच ताकतीची आहे,प्रतिमा आहे, ओळख आहे मग अशा पिंपरी चिंचवडला नांव आज आम्ही पाच वर्ष झालं पण या शहराचं नांव पुणे व पिंपरी चिंचवड आम्हांला करता आलं नाही. ही शोकांतिका आहे. मा.महापौर साहेब,शिक्षण मंडळाचं जे बजेट आहे ते २२२ कोटी रुपयाचं आहे. खरंतर आयुक्त साहेब,आपण अनेक देश फिरला

असाल त्यात अनेक देशामध्ये सगळयात आर्थीक दृष्टीने सक्षम असणा-या नागरीकांची मुलं सुध्दा पब्लिक स्कुल मध्येच जातात. इथं खाजगीकरणाचा बाजार या महाराष्ट्रात अनेक वर्षापासून आहे तो कुठेच नाही. फक्त आपल्या राज्यामध्ये हे सगळं बघायला मिळतयं मग बाकीच्या देशांना त्यांना वाटतयं की,त्यांची नवीन पिढी चांगली सुजाण झाली पाहिजे, चांगले संस्कार झाले पाहिजे असे वाटत असताना पुर्ण देशाचा विचार न करता माझ्या शहरामध्ये अद्याप चांगल्या शाळा का झाल्या नाहीत. शिक्षण मंडळाचं बजेट आलं की,जेंव्हा आम्ही सगळेजण तुटून पडतो. परंतु त्या बजेट मध्ये बजेट तरतुद किती दिली त्यापेक्षा त्या बजेटची अंमलबजावणी किती होती माझ्या मुलांच्या ज्ञानामध्ये,त्यांच्या संस्कृतीमध्ये आपण किती मोठया प्रमाणाची भर टाकतो हे करणं खुप महत्वाचं आहे.कासारवाडीमधील पहिली शाळा आकांक्षा फौंडेशनच्या माध्यमातून दोन शाळा २०१७ ला ती शाळा चालू केल्या होत्या एक भोसरी आणि दुसरी कासारवाडी याठिकाणी चालू केल्या होत्या. आयुक्त साहेब,तीच शाळा,तीच जागा,तेच शहर तिथलीच लोकवस्तीतील मुलं तिथं अत्यंत कडक निर्बंध तिथे काही मुलांना अँडमिशन मिळत नाहीत नागरीक आम्हांला फोन करतात आशाताई बघा नां काही वशिला लागतो का, आणि आम्हांला सांगावं लागतय की, तिथं वशिल्याने वगैरे काम काही होत नाही. जे लक्की ड्रॉ मध्ये नांव नोंदवले आहेत त्यांचाच त्याठिकाणी नंबर लागतो. विषय असा आहे की,त्या शाळेत प्रवेश घेण्यासाठी माझ्या शहरवासियांची मागणी आहे. आणि इथे आपल्याकडे ७० ते ८० हजार पगार असणारे शिक्षक आणि तिथे मानधनावर काम करणारे शिक्षक असतील तर त्यांच्यामध्ये आणि यांच्यामध्ये काय तफावत आहे. याची शहानिशा करण्याचा आपण कधी प्रयत्न करतो का? जर आपल्या शाळेतील मुलांना गणवेश,दप्तर,बुट,पाण्याची बॉटल एवढं सगळे फुकट मिळणार असेल तर ज्याठिकाणी हजारो,लाखो रुपये फी घेतली जाते त्या शाळेमध्ये माझ्या मुलांना प्राधान्य देते,माझ्या शहरातील नागरीक देतात याचं कारण आपण शोधलं पाहिजे. असं जर का आपण केलं नाही तर काय होणार आहे पुन्हा ये रे माझ्या मागल्या पुढच्या वर्षी सभागृहात पुन्हा तीच भाषणं आणि हेच चालू राहणार आहे. तुम्ही ठरवा नां आपलं शहर बदलायचं आहे. फक्त बजेट मधल्या रक्कमा बदलण्याने काहीच होत नाही. याठिकाणी काम करणा-या अधिका-यांची मानसिकता बदलण्याची गरज आहे. काही एक/दोन तेल लावलेले पैलवान हाताला लागत नाहीत आणि काही जण प्रामाणिकपणे काम करतात. काही प्रामाणिकपणे काम करणा-या अधिका-यांच्या जीवावरच ही महापालिका चालत आहे. त्यामुळे तुम्ही काही लिपीकांना बोलवा आणि त्यांना टायपिंग मशिन घेऊन त्यांना

सांगा की, तुमच्या टायपींगचा स्पीड दाखवा. एखादा परिच्छेद त्यांना टायपिंग करण्यास सांगा. याच्यामध्ये तुम्हांला १० टक्के सुध्दा रिझल्ट आला तरी तुम्हांला चॅलेज आहे. आज माझ्या शाळेमध्ये एक लिपीक आहे आणि त्यांची अशी अवस्थाआहे की, त्याचं प्रमोशन झालं लिपीक झाले ते म्हणतात की,ताई मला आता नको,मला परत तिकडेच पाठवा मला हे काम जमत नाही. का, तर आपण त्या कर्मचा-यांची कधी शहानिशाच करत नाही. आणि जे काम करतच नाही त्यांनी काहीच काम करायचं नाही का, आयुक्त साहेब,आपण अनेक गोष्टीचे आऊटसोर्सींग करतो आहे. डॉक्टर,परिचारीका आणि नर्सेसचं पण आपण आऊटसोर्सींग करणार आहात. हे करण्यास अजिबात दुमत नाही. तुम्ही याठिकाणी आल्या,आल्या त्या बाहेरच्या डॉक्टरांना सामोरे जावं लागलं आणि तुम्हांला वाटलं की,या नागरीकांना आपल्याकडनं काय न्याय देता येईल का,यादृष्टीने तुमचं हे पाऊल चांगल आहे. त्यामुळे तुमचं निश्चितपणे कौतुक केलं पाहिजे. परंतु ते कौतुक करताना मा.महापौर साहेब,तुम्ही उदयान,आरोग्य एवढचं नाही तर साफसफाई करणारे कर्मचारी असतील त्यांच सुध्दा आऊटसोर्सींग करता आयुक्त साहेब,या कामगारांना मिनिमम अँक्ट वेजेस प्रमाणे पगार मिळतात का, साहेब,मला जर का माझ्या कामाचा पगार /मोबदला चांगला मिळाला तर मी निश्चितपणे चांगल काम करेन परंतु माझ्या कामाचा मोबदला जर मला मिळत नसेल तर निश्चितपणे मी पण कामाची टाळाटाळ केल्याशिवाय राहणार नाही. मग त्यांचा जो काही ऍक्टनुसार पगार असेल तो त्यांना दिला जातो का, या कामगारांचे एटीएम कार्ड हे माझ्याकडेच असतात आयुक्त साहेब,तुम्हांला अनेक एनजीओ संस्था तुम्हांला सांगतात परंतु माझ्या या शरीराला सवय लागली आहे. अनेक वर्षा पासूनची परंपरा आहे. आणि त्या शोषिकाला शोषल्यामुळे शहरातील कचरा तुम्ही पाहिलात तर आपल्याला फार काही चांगल बघायला मिळत नाही. आज आपण शहरातील कचरा पाहिला तर ओला कचरा आणि सुका कचरा हा वेगवेगळा सुध्दा केला जात नाही. कच-याच्या गाडीमध्ये खाली दिड फुटाची गॅप आहे. म्हणजे खालचं जे काही पाणी असेल ,ओलावा असेल तो व्यवस्थित सुक्या कच-यामध्ये गेला पाहिजे. आणि त्या सुक्या कच-याची पण विल्हेवाट सुध्दा लावली पाहिजे. आणि याची आपण काळजी घेतली पाहिजे. आयुक्त साहेब,असे अनेक मुद्दे आहेत त्या ठेकेदाराचे आपण बिल देतो पण त्यांच्या कामाची खातरजमा करणारे आमचे अधिकारी कुठे असतात हे तुम्ही या सभागृहाला सांगायचे आहे. तसेच आयुक्त साहेब,आपण पर्यावरणासाठी अत्यंत चांगली तरतुद करुन ठेवली आहे परंतु आपल्या पर्यावरणाचा नदी सुधारचा जो डीपीआर आहे. तिथं खुप मोठ,मोठे प्रोजेक्ट आणताय खुप चांगली

गोष्ट आहे. आमची गावं ही सगळी नदीच्या कडेला बसलेली आहेत. आख्खं नदीपात्र गच्च भरलेलं आहे. म्हणुन मी मगाशी म्हणलं आहे की, नदीचं गटार होत चालली आहे. याच्यामध्ये भराव टाकला जातो कोण टाकतो तर मी बिल्डर आहे माझी बिल्डींग पाडली त्याचा कचरा नदीत टाकला जातोय. आपल्या पालिकेचे अनेक ठेकेदार आहेत त्यांच्याकडनं घ्या ना बिलं त्यांनी नदीमध्ये कचरा आणुन टाकला म्हणुन एकही ठेकेदाराकडनं अशी रक्कम वसुल केलेली नाही. मग आमचे अधिकारी काय करतात. आम्ही अनेक वेळेस पाहिलेलं आहे की, त्या नदीमध्ये भर टाकलेला दिसत आहे पण तुमच्या अधिका-यांना हे दिसत नाही का? ते म्हणतात की, अमक्याची गाडी आहे मग आम्ही काय करु असे म्हणतात. या सगळया बाबींचा आपण काम करताना विचार करणे गरजेचं आहे. दुसरा विषय आहे की,जलपर्णी आरोग्य विभागाने काय काम करायचे झाडू मारायचा का, कचरा काढायचा,कच-याच्या गाडया कशा आहेत ते बघायचं त्यांच्या सगळया गोष्टीची शहानिशा करायची,त्यांच्या गाडया किती खराब आहेत ते बघायचं,किती गाडया ब्रेकडाऊन आहेत ते बघायचं या सगळया गोष्टीची असताना सगळयात मोठी समस्या एकीकडे कोरोना आहे कोरोनाचा प्रादुर्भाव आणि दुसरीकडे या मच्छरामुळे डेंग्यु सारखा आजार होत आहेत. माझ्या वॉर्डातील नागरीकांचा जो ग्रुप आहे त्याच्यावरती अनेक नागरीकांच्या प्रतिक्रिया आहेत. ताई, काही तरी करा आणि आम्हांला वाचवा आणि या डासांपासून आम्हाला वाचवा अशा प्रकारच्या प्रतिक्रिया असणं स्वाभाविक आहे.

**मा.महापौर** – आशाताई ही बजेटची मिटींग आहे आपण बजेटवरच बोला.

**मा.आशा धायगुडे-शेंडगे –** मा.महापौर साहेब, मी बजेटवरतीच बोलते पर्यावरणावर आपण ८४ कोटी रुपयांची तरतुद करताय त्याचं कौतुक करते पण त्याचा रिझल्ट कधी देणार आहात. आपल्या गाडयांच सीएनजी करण्यासाठी किती गाडयांच वर्कआऊट केलं आहे. याची शहानिशा कोणी आपण नगरसेवकांनी करायची का, गाडयांचे फोटो काढुन तुम्हांला टाकायचे का, मा.महापौर साहेब,आम्ही बजेटवरच बोलत आहोत परंतु बजेट मध्ये ज्या त्रुटी आहेत त्या आपल्या निदर्शनास आणुन देण्याचा आम्ही प्रयत्न करतो आहोत. आमचे पक्षनेते,मा.महापौर, स्थायी समितीचे अध्यक्ष यांनी चांगले बजेट मांडलेले आहे. पण त्याच्यामध्ये ज्या आम्ही त्रुटी दाखवलेल्या आहेत त्या त्रुटी दुरुस्त केल्या तर तुम्हांला निश्चितपणे चांगल्या प्रकारे काम करता येईल. आणि आम्ही पुन्हा एकदा अपेक्षा करु की,आम्ही सगळे नगरसेवक चांगले काम करतो परंतु ही जी कामे

आहेत मैलाशुध्दीकरण केंद्राला आपण एकदा व्हीजीट करा, मग तुम्हांला कळेल त्याठिकाणी काय घडतयं त्या कामाचं प्रॉपर टेंडर काढणार आहात, ज्यांना हे काम मिळणार आहे त्या संबंधित ठेकेदारांकडुन काम करुन घेणं ही आपली नैतिक जबाबदारी आहे. जसं मगाशी सांगितलं की, साई हाईट नावाच्या कंपनीलाच जलपर्णी काढण्याचंच काम मिळालं आहे. आयुक्त साहेब,डिसेंबर महिन्यात वर्कऑर्डर दिली डिसेंबर,जानेवारी,फेब्रुवारी आता मार्च महिना संपत आला आहे तर ही ६ व्या महिन्यापर्यंतच वर्कऑर्डर आहे. आयुक्त साहेब,त्यांनी आतापर्यंत काहीच काम केलं नाही तर आपले संबंधित अधिकारी काय करत होते. याचं उत्तर आपण या सभागृहाला देणं लागतो. त्यामुळे आम्ही ज्या ज्या बाबी सांगतो त्याचा आपण सखोल अभ्यास केला पाहिजे, विचार केला पाहिजे. कामाचे टेंडर निघाले पाहिजेत परंतु ती कामे ठेकेदाराकडन करुन घेण्याची नैतिक जबाबदारी ही आपली आहे. मा.महापौर साहेब,याबजेटमध्ये भूसंपादनासाठी १५० कोटी रुपयांची तरतुद आहे. त्याच बरोबर ३१ मार्चपर्यंत साधारणता दिडशे / दोनशे कोटी रुपये पुन्हा लागणार आहेत त्यामुळे ३०० कोटी रुपये हे आपल्या बजेट मध्ये शिल्लक राहणार आहेत. आणि ही तरतुद शिल्लक राहत असताना आमच्या नगरसेवकांच्या ज्या काही शंका होत्या की,आमच्या प्रभागामध्ये नळ,गटर,रस्ता हे करणे आवश्यक असते आणि यासाठी मोठा निधी सगळया प्रभागामध्ये समसम विचार करुन कुठे आवश्यकता आहे,कुठे कमी पडणार आहे याचा सारासार विचार करुन आपण त्याठिकाणी निधी उपलब्ध करुन द्यावा. आणि जे बजेट सादर केलं आहे त्याची अंमलबजावणी केली तर आपल्याला निश्चितपणे त्याचा रिझल्ट चांगल्या प्रकारे मिळणार आहे. धन्यवाद.

**मा.सचिन चिंचवडे -** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह आज आपण या अंदाजपत्रकाचा आढावा घेत आहोत. आणि हे अंदाजपत्रक आपल्याला यशस्वी करण्यासाठी ज्या महत्वाच्या गोष्टीची गरज पडते ती म्हणजे ठेकेदार, ठेकेदाराशिवाय हे अंदाजपत्रक पुर्णपणे होऊच शकत नाही.आणि हे अंदाजपत्रक सादर करीत असताना काही गोष्टी मी आपल्या निदर्शनास आणुन देवु इच्छितो आता १५/२० मिनिटापुर्वी एक पत्र माझ्या हातात पडलं आहे. मागच्या काही कालावधीमध्ये बोगस एफडीआर हे प्रकरण आपल्या संपुर्ण शहराला माहिती आहे. आयुक्त साहेब,तुम्ही त्यावेळेस याठिकाणी नव्हता त्यामुळे त्या गोष्टी तुम्हांला कदाचित माहिती नसतील परंतु या महापालिकेची फसवणुक करुन हे ठेकेदार आजही या महापालिकेत राजरोसपणे फिरत आहेत. ज्या,ज्या ठेकेदारांना ब्लॅकलिस्ट केलं गेलं ज्यांच्यावरती ठपका पडला होता ते ठेकेदार आजही या

महापालिकेमध्ये उजळमाथ्याने कामे घेवुन कामे करीत आहेत. आपण या चुकीच्या गोष्टींना आळा घालावा. त्यांची चौकशी करुन व ज्या,ज्या ठेकेदारांना ब्लॅकलिस्ट मध्ये टाकण्यात आलं होतं त्यातील किती ठेकेदार या महापालिकेमध्ये कामे घेवुन काम करत आहेत याची माहिती घ्यावी. अशी मी याठिकाणी विनंती करतो. तसेच आता ताईंनी सांगितलं आहे की,जलपर्णीचा विषय सांगितला आहे. आयुक्त साहेब,मागील तीन वर्षापासूनचा खर्च अनुक्रमे ४० लाख रुपये,५० लाख रुपये,६० लाख रुपये असा होता. आणि मागील वर्षी अचानक २ कोटी २० लाख रुपये पर्यंत गेला आहे. म्हणजे जवळपास हा खर्च तिप्पट गेला आहे. असे असले तरी आज या शहरामध्ये मच्छरांची जी परिस्थिती आहे. याबाबतीत सगळेजण बोलले आहेत. आणि ही समस्या सर्व नागरीकांना भेडसावत आहे आणि विशेष करुन कोरोनासारख्या महामारीच्या काळामध्ये कोरोना वाढण्यास नक्कीच हातभार लागतो आहे. या गोष्टीकडे पण आपण गांर्भीयाने पाहिले पाहिजे. आणि योग्य ती माहिती घेवुन कारवाई केली पाहिजे. मार्च महिना असल्यामुळे लोक बिलं काढण्याच्या मागे लागलेली आहेत पण कामं किती झालेली आहेत या गोष्टीची कुठलीच माहिती न घेता अधिकारी सुध्दा मार्च अखेर आहे म्हणुन बिलं निघाली पाहिजेत यासाठी मदत करतात आयुक्त ८/१५ दिवस उशिर होऊ द्या पण ज्या ज्या ठेकेदारांची अशी चुकीची कामे चालली आहेत त्यांची बिलं जरा उशिरा द्या. त्यांची चौकशी झाल्याशिवाय त्यांना बिलं देवु नका एवढीच मी याठिकाणी विनंती करतो आणि थांबतो.

**मा.अभिषेक बारणे -** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह आज या बजेटच्या मिटींगमध्ये मा.आयुक्त साहेबांनी स्थायी समितीमध्ये जे बजेट मांडले होते त्याच्यामध्ये स्थायी समितीने अभ्यास करुन आम्ही ज्या उपसूचना दिल्या होत्या त्यातील काही उपसूचना ग्राह्य झाल्या काही ग्राह्य झाल्या नाहीत. आज आमचे बरेचसे सदस्य उपसूचना देतील आणि या उपसूचनेबद्दल किंवा शहराच्या एकुण परिस्थितीबद्दल आयुक्त साहेब,हे खरंतर आम्ही तुमच्या समोर मांडतो आहे. आणि हे मांडल्यानंतर या सर्व दिलेल्या उपसूचना या तुम्ही परत ग्राह्य करणार आहात की नाही हे देखील तितकच महत्वाचं आहे. या बजेट बद्यल बोललं तर आमच्या भागामध्ये एक ४०० बेडचं हॉस्पिटल आहे. हे हॉस्पिटल आता पुर्णत्वास आलेलं आहे. आणि हे हॉस्पिटल लवकरात लवकर कसं चालू होईल यासाठी आपण प्रयत्न केले पाहिजे. थेरगांव,आकुर्डी,जिजामाता,भोसरी हॉस्पिटल असेल या शहरातील नागरीकांना आरोग्याचा जो प्रश्न भेडसावत आहे. त्या प्रश्नावरती कसं नियोजन करता येईल त्यासाठी आयुक्त साहेब,आपण लिड घेवुन प्रयत्न केला पाहिजे. भारतीय जनता पार्टी गेल्या साडेचार

वर्षापासून सत्तेत आल्यानंतर ही हॉस्पिटल पुर्णत्वास आणलेली आहे. आता याच्याबद्दल काय,काय नियोजन केल पाहिजे. मगाशी अजितभाऊंनी सांगितलं की,शहरातील सर्व टॅक्सधारकांना आपण विम्याची योजना केली पाहिजे. आयुक्त साहेब,आपले हे जे इन्फ्रास्ट्रक्चर आहेत आपण वायसीएमएच सांभाळल्यानंतर आपला किती खर्च होतो याचा विचार करुन हे जे ७ हॉस्पिटल्स तयार आहेत ते पीपीई तत्वावर केले तर त्याच्यापासून आपल्याला काही उत्पन्न येऊ शकतं का, आणि या उत्पन्नातून आपल्या नागरीकांसाठी विमा कवच करु शकतो का, याच्यासाठी तुम्ही नियोजन केलं पाहिजे. आज आपल्याला ज्या ठिकाणाहून पैसे येणं असतं जसं आपल्याला बांधकाम परवानगीमधुन दरवर्षी पैसे येत होते. त्या नियमामध्ये राज्य शासनाने नियम लागु केला आहे. त्याच्यामुळे आपल्याला जो प्रिमीयम भरावा लागत होता तो त्यांना भरावा लागत आहे. बिल्डर्सला भरावा लागतो त्याच्यामुळे ते उत्पन्न लगेच आपल्या हातात येत नाही. ते न आल्यामुळे आपले उत्पन्नावर निश्चित परिणाम होणार आहे. उत्पन्न हे कुठुन मिळु शकते याचा पण आपण विचार केला पाहिजे. आपण शिक्षण मंडळासाठी जसं बजेट ठेवतो या शहरातील विद्यार्थ्यांची संख्या ४० ते ५० हजार आहे. याच्यामध्ये एका विद्यार्थ्यांचा खर्च काढला तर ४० ते ५० हजार रुपये होतो. याबजेटच्या कॅलक्युलेशननुसार एवढयाच खर्चामध्ये बाहेर एखादया सेमी इंग्लिश स्कुल मध्ये प्रायव्हेट शाळेमध्ये सुध्दा आपल्याला अँडमिशन मिळवून देता येतो. मग त्याच्याऐवजी नवीन प्रयोग तुम्हांला काय करता येऊ शकतो की,आज आपल्या शहरामध्ये ५० ते १०० शाळा आहेत या शाळेचे इन्फ्रास्ट्रक्चर काढलं तर एका शाळेची किंमत काढली तर १० ते २० कोटी रुपयाची एक शाळाआहे. म्हणजे २००० कोटी रुपयांच्या या वास्तु आहेत. आणि त्याच्यामध्ये जागेची किंमत सुध्दा जास्तच आहे. आज आपल्या शहरामध्ये चांगल्या,चांगल्या सीबीएसई माध्यमाच्या शाळा आहेत. या शाळांना आपण काही प्रपोजल देवु शकतो का, आमच्या शहरातील ४० ते ५० हजार विद्यार्थ्यांना तुम्ही प्रवेश देवु शकता का, आणि त्या बदल्यात एवढी प्रॉपर्टी तुम्हालाच चालवण्यास देवु आज एखादया शाळेचं उदाहरण द्यायचं झालं तर आपल्या महापालिकेच्या शाळेमध्ये हजार मुलांची कॅपॅसिटी असते परंतु त्या शाळेमध्ये १०० ते १५० पटसंख्या आहे. म्हणजे अजुन ९०० मुलं कुठं तरी शिकु शकतात. जर आपण एखादया चांगल्या संस्थेबरोबर अँग्रीमेंट केलं आणि त्यांना जर का आपण एखादी शाळा चालवण्यास दिली आणि आपली ४०० ते ५०० मुलं फ्री ऑफ कॉस्ट मध्ये शिकवली तर आपला जो होणारा खर्च आहे तो कुठं तरी कमी होईल. आम्ही या शहराचा विकास होण्याच्या दृष्टीने नवीन,नवीन प्रयोग ३/४

वर्षामध्ये केलेलेच आहेत. आज परमनंन्ट सोल्युशन काही भागामध्ये आपण काढलेले आहेत. आज जर तुम्ही रस्त्यांचा विचार केला तर अमृत योजनेला जे बजेट दिलं होतं त्याच्यामध्ये आम्ही ब-याचशा ठिकाणी २०/२५ वर्ष ड्रेनेजलाईन केलेली नसल्यामुळे त्याठिकाणी ड्रेनेजलाईन केल्यामुळे नागरीकांच्या समस्या सुटलेल्या आहेत. त्याच्यानंतर त्याठिकाणी खोदकाम झालेलं आहे. शहरातील नागरीकांना निश्चितपणे वाटत आहे की,शहरामध्ये ब-याच ठिकाणी खोदकाम झालेलं आहे. परंतु हे खोदकाम परमनंन्ट सोल्युशनसाठी खोदकाम केलेलं होतं यासाठी खोदकाम केलं आहे. त्याठिकाणी ड्रेनेजलाईन, पाण्याची लाईन, आणि आता त्याठिकाणी कॉंक्रीटचे रस्ते होत आहेत. आज कॉंक्रीटचे रस्ते होत असताना अजुनही काही ठिकाणी कॉंक्रीटचे रस्ते होत असताना आम्ही तुम्हांला उपसूचना दिलेल्या आहेत. किंवा काही कामांना आम्ही तरतुद दिलेली आहे. पुर्वी काही कामे काढली होती ती कमी तरतुद असताना काढली होती. आता ती तरतुद कमी असल्यामुळे ती काम संथगतीने चालू आहेत. ती कामं कशी फास्ट चालू होतील यासाठी तुम्ही प्रयत्न केले पाहिजेत. आज काही ठिकाणी कॉंक्रीटची कामे चालू आहेत काही ठिकाणी बॅरीकेटस् प्रोटेक्शन धुळ उडण्याचं प्रमाण जे आहे हे एका ठेकेदाराचं काम नाही की,त्या ठेकेदाराने त्याठिकाणी व्यवस्थित प्रोटेक्शन केलं पाहिजे. डायव्हरशन केलं पाहिजे,रस्ते केले पाहिजे. आणि हे प्रशासनाच्या अधिका-याने ठेकेदाराकडुन करुन घेतले पाहिजे. आणि प्रशासनाच्या अधिका-याने हे करुन घेत असताना ते टेंडर बनवताना त्याला आपण प्रिक्वॉशनचे पैसे देतो का, याचा देखील विचार केला पाहिजे. नाही तर, प्रशासन फक्त त्या ठेकेदाराला आदेश केला तर तो ठेकेदार काम करणार नाही. आज आम्हांला ख-या अर्थाने सांगायला आनंद होत आहे की,रस्त्याचा प्रश्न असेल, ड्रेनेजलाईनचा प्रश्न असेल,हॉस्पिटलचा प्रश्न असेल, हा ब-यापैकी मिटवण्याचा प्रयत्न गेल्या ४ वर्षामध्ये केलेला आहे. आज बीआरटीएस विभागाची जी तरतुद आहे त्याच्यामध्ये सायकल ट्रॅक, फुटपाथ,हॉकर्स झोन याच नियोजन आपण अर्बन डेव्हलपमेंट मध्ये केलेलं आहे. आणि हे कसं त्याठिकाणी व्यवस्थित होईल,हे कसं लवकरात लवकर अंमलात येईल याच्यामध्ये आपण लक्ष दिलं पाहिजे. आपल्या शहराचे जे हॉकर्सचं जे धोरण आहे हे निश्चित करुन त्याठिकाणी हॉकर्स झोन मधुन तुम्हांला एक उत्पन्नाचं स्त्रोत निर्माण होईल. आता आपण पार्कींग पॉलीसी तयार केलेली आहे त्याच्यापासून सुध्दा आपल्याला उत्पन्न मिळू शकतं. या सर्व गोष्टी ज्या आहेत त्या करत असताना आयुक्त साहेब भारतीय जनता पार्टीच्या पक्षाने बरेचसे विषय अजेंडयावर घेतलेले होते. आम्ही त्याचा फॉलोप घेतला त्याच बरोबर तुमच्या बजेटमध्ये ब-याचशा

गोष्टी आल्या नसतील त्या गोष्टी आम्ही उपसूचना दिलेल्या आहेत त्या ग्राह्य कराव्यात आणि येणा-या काळामध्ये आम्ही जे प्रोजेक्ट करतोय ते यशस्वी करण्यासाठी त्याच्यावर आपण प्रॉपर काम करावे अशी विनंती करतो आणि थांबतो.जयहिंद,जयमहाराष्ट्र.

**मा.वैशाली घोडेकर -** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह आज याठिकाणी मी पण महापौरांचे धन्यवाद मानते कारण ४ वर्षामध्ये तुम्ही पहिल्यांदा या बजेटवर बोलण्याची संधी दिली. हे पाचवं बजेट आहे. गेल्या ४ बजेटला या सभागृहामध्ये बिल्कुल चर्चा झाली नाही. प्रशासनाने जे बजेट मांडलं तेच पुढं चालू राहिलं. मी हे बजेट बघत असताना मी याठिकाणी जमेची बाजु बघितली तर सर्वात जास्त जमा कोठुन येत असेल तर ती जीएसटी मधुन येत असते. व्यापारी वर्ग हा जीएसटी केंद्राकडे देतो तेथून आपल्या राज्याकडे येतो आणि तेथुन आपल्याकडे येतो परंतु मी याठिकाणी सांगेन की, व्यापारी जो जीएसटी भरतो त्याचा विचार या बजेट मध्ये कुठे केला आहे का, ब-याच वेळा आम्ही म्हणतो की,व्यापा-याला काय हवं असतं तर व्यापा-याला इन्फ्रास्ट्रक्चर हवं असतं,त्याला पाणी,रस्ते आणि महत्वाचं म्हणजे त्याला सिक्युरिटी हवी असते. व्यापारी म्हणजे फक्त एमआयडीसी नाही तर आमच्या वॉर्डामध्ये जे दुकानदार आहेत ते पण जीएसटी भरतात,टॅक्स भरतात तो एक व्यापारी म्हणुनच गणला पाहिजे. तर त्यांच्या सिक्युरिटीजसाठी आम्ही ब-याच वेळा मागणी केली होती. जे,जे मेन ठिकाणं आहेत त्याठिकाणी सीसीटीव्ही बसविण्यात यावे अशी आम्ही ब-याच वेळा मागणी केलेली आहे. आताच मला कळालं की,स्मार्ट सिटीमध्ये सीसीटीव्ही बसवले आहेत. इथं असणा-या किती नगरसेवकांना माहिती आहे की, त्यांच्या वॉर्डात सीसीटीव्ही कुठं बसवले आहेत. यामध्ये मोजकेच नगरसेवक सोडले तर कोणालाच माहिती नाही. आमच्या वॉर्डामध्ये व्यापा-यांचा जो स्पॉट आहेत त्याठिकाणी चो-यामा-या होत असतात, एमआयडीसी मधुन रात्री जेंव्हा कामगार घरी येतो त्यावेळेस त्याला लुटलं जातयं याची जबाबदारी कोण घेणार आहे. महापालिकेने अशा ठिकाणी सीसीटीव्ही बसविण्याची तजवीज केली पाहिजे. महापालिका म्हणते आम्ही स्मार्ट सिटीकडे सीसीटीव्ही बसविण्याचे काम दिलं आहे. स्मार्ट सिटीने एमआयडीसी मध्ये एकही कॅमेरा बसविलेला नाही. आमच्या वॉर्डामध्ये ज्याठिकाणी व्यापा-यांची दुकाने जास्त आहेत त्याठिकाणी सीसीटीव्ही बसवलेले नाहीत. मी पोमण साहेबांना विचारलं तर ते म्हणतात माझ्याकडे हे नाही. मग तुम्ही जर स्मार्ट सिटीसाठी १०० कोटी रुपये ठेवलेले असतील तर हा खर्च कुठे करता. केबल टाकणं,आणि

काढणं एवढंच स्मार्ट सिटीचं काम आहे का, आयुक्त साहेब,मी आपल्याला एवढीच विनंती करेन की, व्यापा-यांना देखील सुरक्षितता वाटावी. म्हणुन शक्यतो ज्या वॉर्डामध्ये सेन्सेटीव्ही एरिया आहे, ज्याठिकाणी एमआयडीसी एरिया झोपडपट्टयांनी व्यापलेला आहे,ज्याठिकाणी व्यापारी वर्ग झोपडपट्टयांनी व्यापलेला आहे त्याठिकाणी सीसीटीव्ही ची तजवीज महापालिकेने केली पाहिजे आणि त्यासंबंधीचा विचार या बजेट मध्ये केला गेला नाही. आमचं हे शेवटचं बजेट आहे. आम्हांला जेवढं बोलायचं आहे तेवढं आम्ही बोलणार. स्थायी समितीने प्रत्येक प्रभागाला बजेट देण्याचा प्रयत्न केला आहे काही प्रभागांना कमी मिळालं आहे तर काही प्रभागांना जास्त मिळालं आहे. परंतु तुम्ही विशेष योजनेअंतर्गत योजनांसाठी तुम्ही १२३२ कोटी रुपये ठेवलेले आहेत. विशेष योजनेअंतर्गतच्या ज्या योजना तुम्ही दाखवलेल्या आहेत त्या खरचं मार्गी लागणार आहेत का, का? नुसता आकडा फुगवलेला आहे. आता अण्णासाहेब मगर स्टेडीयम हे गेली चार वर्ष विशेष योजनेमध्ये घेत आहात. अण्णासाहेब मगर यांच्या नावांमुळे पिंपरी चिंचवड शहर हे ओळखलं जातं. अण्णासाहेब मगर स्टेडियम हे पिंपरी चिंचवड महापालिकेची ही पहिली मालमत्ता म्हणुन ओळखली जायची हे नांव आताच्या काळामध्ये हे नांव पुर्णपणे तळागाळाला मिळालेलं आहे. आयुक्त साहेब, आपण जर हे स्टेडियम जाउन बघितलं तर आपल्या सर्वांना याची लाज वाटेल अशी परिस्थिती त्या स्टेडियमची झालेली आहे. गेल्या चार वर्षापासून बजेट मध्ये तरतुद केली जात आहे पण त्यामध्ये एकही काम आतापर्यंत झालेलं नाही. आणि केलेलं नाही. त्यामुळे मी मगाशी म्हणले की, याबजेटमध्ये जी कामे वाढवलेली आहेत ती खरचं होणार आहेत का? का,फक्त तुम्ही बजेट फुगवलेलं आहे. नुसतं तुम्ही या कामाला १०० कोटी रुपये देतो,त्या कामाला १५० कोटी रुपये देतो अशी आकडेवारी दिलेली असते पण कामाच्या नावानं शुन्य आहे. तुमच्या प्रगतीपुस्तकाचा स्कोर जर बघितला तर शुन्य आहे. याचं उदाहरण म्हणलं तर अण्णासाहेब मगर स्टेडियमच आहे. आयुक्त साहेब, तुम्ही शहरी गरीब योजनेसाठी (बीएसयुपी) याच्यासाठी किती तरतुद ठेवली आहे. १२०० कोटी रुपये ठेवले आहेत. मला आश्चर्य वाटलं आणि बजेटच्या १४४ पानांवर जाऊन बघितलं तर नक्की १२०० कोटी रुपये काय आहेत. शहरातील गरीबांसाठी तुम्ही काय करताय हे जर तुम्ही बघितलं तर प्राथमिक दुय्यम शिक्षण,झोनिपु स्थापत्य, आरोग्य,दवाखाने,ईडब्ल्युएस,मागासवर्गीय कल्याणकारी योजना,स्मशानभुमी इ.कामे त्याठिकाणी केली जातात. आयुक्त साहेब,हे शहर स्मार्ट सिटीमध्ये आलेलं आहे. स्मार्ट सिटीमध्ये तुम्ही एवढा खर्च करताय आणि याठिकाणी तुम्ही बीएसयुपी साठी १२००

कोटी रुपये खर्च करताय, मग बीएसयुपी आणि झोनिपु ही फक्त झोपडपट्टयांमध्ये कॉक्रीटीकरण करणं,ड्रेनेज साफ करणं एवढयावरचं आहे का, कायम हेच काम करत बसणार आहे का, आताच आपण पंतप्रधान आवास योजना आणली, मला सगळया सभागृहाला विचारायचं आहे की, पंतप्रधान आवास योजनेमध्ये एकही झोपडपट्टीतील माणुस गेला आहे का, मग ती योजना तुम्ही झोपडपट्टीसाठी कशी म्हणाल, पंतप्रधान आवास योजनेमध्ये नागरीकांना ८ ते ८.५० लाख रुपये मध्ये घरे दिली आहेत. दुसरी घरकुल योजना आपण पावणे चार लाख रुपया मध्ये लोकांना घरे दिली आहेत. अजितदादांनी ही घरे सामान्य लोकांसाठी दिलेली आहेत. त्याठिकाणी एकही झोपडपट्टीतील माणुस गेला नाही किंवा झोपडपट्टीचं निर्मुलन झालं नाही. ख-या अर्थानं ज्या पाच झोपडपट्टयांच निर्मुलन झालं ते अजितदादांनी केलं कारण त्यावेळेस जेएनएनयुआरएमचा मोठया प्रमाणात फंड आला. शहरातील ब्रीज,रस्ते, इन्फ्रास्ट्रक्चर दिसत आहे ते केवळ जेएनएनयुआरएमच्या फंडमुळे दिसत आहे. या पाच वर्षामध्ये महापालिकेला केंद्राचा एकही पैसा आलेला नाही. तुम्ही फ्क्त रेग्युटया ओढायची कामं केलेली आहेत. एकही झोपडपट्टीचं निर्मुलन केलं नाही, ब्रीज बांधला नाही,रस्ता केला नाही. फक्त वॉर्डामध्ये डांबरावर डांबर टाकणं,फुटपाथ उखडणं,फुटपाथवर फुटपाथ परत टाकणं, ड्रेनेजलाईन काढणं,ड्रेनेजलाईन टाकणं याच्या व्यतिरिक्त गेल्या चार वर्षामध्ये काहीही काम झालेलं नाही. महापालिकेला उत्प्न्न मिळेल असं एकही प्रोजेक्ट तुम्ही केलेलं नाही. बांधकाम विभागामुळेच आपल्याला थोडया फार प्रमाणात उत्पन्न मिळत आहे. मी अभिषेक बारणेचं कौतुक करेन की, त्यांनी अतिशय चांगला पर्याय त्यांनी निवडला आहे. त्यांनी शिक्षणाच्या बाबतीत त्यांनी चांगल्या सूचना केलेल्या आहेत आपल्या एवढया मोठया प्रॉपटर्या आहेत, आणि जर का आपल्या परिसरातील विद्यार्थी चांगल्या शाळेत घेत असतील आणि त्यांना फ्री मध्ये शिक्षण देणार असतील तर आपण आपल्या प्रॉपटर्या त्यांना देण्यास काहीच हरकत नाही. आम्ही देखील याबाबतीत सपोर्ट करु, शिक्षण मंडळाच्या बजेटवरचा खर्च पाहिला तर त्यातुन आऊटपुट शुन्य आहे. फक्त भ्रष्टाचार,भ्रष्टाचार आताच तुम्ही विद्यार्थ्यांना कपडे,वह्या,दप्तर वाटप केलं आहे ते काम मागच्याच माणसाला डायरेक्ट दिलं आहे. यातही भ्रष्टाचार झालेला आहे. त्यामुळे अभिषेकनी जो पर्याय दिलेला आहे त्याचा आपण नक्कीच विचार करावा. तसेच आपल्या या स्मार्ट सिटीच्या शहरामध्ये ७४ झोपडपट्टया आहेत. स्मार्ट सिटी म्हणजे आम्हांला अशी कल्पना होती की, जे काही गोरगरीब लोक आहेत,सामान्य लोक आहेत त्यांना या स्मार्ट सिटीचा उपयोग होईल. पण आम्हांला असं वाटलं नाही की,जी लोक

ऑलरेडी स्मार्ट आहेत त्याच ठिकाणी तुम्ही केबल टाकाल,केबल काढाल,त्याच ठिकाणी सीसीटीव्ही,त्याच ठिकाणी लाईटचे पोल. त्याच ठिकाणी डक बनवाल असं आम्हांला कधीच वाटलं नाही. आयुक्त साहेब,या स्मार्ट सिटीमध्ये या शहरातील किमान दोन झोपडपट्टयांच तरी निर्मुलन केलं असतं तरी ही स्मार्ट सिटी सक्सेस झाली असती. आयुक्त साहेब,आपल्या झोपडपट्टयांचे निर्मुलन करताना आपल्या महापालिकेचा एकही पैसा खर्च करावा लागणार नाही. तुम्ही जर या झोपडपट्टयांचे वर्कआऊट करुन तुम्ही फंडीग जर आणलं तर महापालिकेचा एकही पैसा खर्च करण्याची आवश्यकता नाही. आणि आपल्या या ७४ झोपडपट्टया पुर्नवसित होतील. आयुक्त साहेब,माझ्या वॉर्डामध्ये सगळयात जास्त झोपडपट्टया आहेत त्यादृष्टीने मी विचार करीत आहे. ज्यावेळेस मी माझ्या वॉर्डातुन बाहेर पडते,माझा गेस्ट ज्यावेळेस माझ्या वॉर्डात एन्ट्री करतो त्यावेळेस त्याला त्याच्या तोंडावर झोपडपट्टी दिसते,बाहेर पडतो त्यावेळेसही त्याला झोपडपट्टी दिसते. काही चांगल्या एरियातुन तो बाहेर पडतो तरी त्याला झोपडपट्टी दिसते. तर हे कुठं तरी थांबले पाहिजे. यादृष्टीने आपण कुठे तरी सेन्सेटीव्ह दृष्टीने विचार करावा. आज सगळयात जास्त कोविड सेंटर मध्ये लोक येतात ती या झोपडपट्टीतील आणि चाळीतील लोक आहेत. या लोकांना विलगीकरणाची सोय नाही. आयुक्त साहेब,आपण जे १२०० कोटी रुपये ठेवलेले आहेत त्यातील ४०० कोटी रुपये या झोपडपट्टयांच्या पुर्नवसनासाठी ठेवले असते तर त्यामध्ये दोन झोपडपट्टयांचे पुनर्वसन झाले असते. तरी आपण याचा विचार करावा एवढंच मी या बजेटच्या निमिताने सांगेन. तसेच आपण अमृत योजनेसाठी ६३ कोटी रुपये ठेवले आहेत. या योजनेमध्ये आपण २४ तास पाणी येणार म्हणत आहात. पाणी हा विषय आमच्या महिलांच्या आणि सर्व नगरसेवकांचा अतिशय पोटतिडकीचा विषय आहे. आज आपण म्हणताय की,दिवसाआड पाणी देवुन आपण पाण्याचं नियोजन करतोय, मी सर्व नगरसेवकांना सांगते की,ज्यावेळेस आमच्या अजितदादाकडं पाण्याचं नियोजन होतं त्यावेळेस तुम्ही सर्वांनी आत्मपरिक्षण करावं. त्यावेळेला भामा आसखेडचंही पाणी नव्हत,आंद्र धरणाचंही पाणी नव्हतं तरी सुध्दा त्यावेळेला दररोज दोन वेळेला पाणी मिळत होतं. आणि आज तुम्ही दिवसाआड लोकांना पाणी देत आहात. आणि काही ठिकाणी लाईट गेली तर टाकीत पाणी पडत नाही. त्यावेळेस तो चार दिवस बिना पाण्याचा राहतो त्यामुळे त्याला टँकरने पाणी द्यावे लागते. आणि तुमचा जो अजेंडा आहे त्यामध्ये म्हणले आहे की, शहर हे टँकरमुक्त करणार आहे. कसं करणार आहात तुम्ही टँकरमुक्त शहर, टँकरमुक्त शहर करण्यासाठी तुम्ही पाण्याची काय तजवीज केलेली आहे. पाण्याचं जे इन्क्म येत आहे ते सोडून देवु

पण लोकांना फुकट आणि व्यवस्थित पाणी देवु. आमचा या गोष्टीला तुम्हांला पाठींबा राहील. आशाताई तुम्ही तरी हा विषय घ्या आणि या शहरामध्ये हे करा अशी मी पोटतिडकीने विनंती करते. तहानलेल्यांना पाणी कसं मिळेल, याचा जर या बजेटमध्ये आपण विचार केला असता तर खरंच आम्ही या बजेटचं कौतुक केलं असतं. पण आपण कौतुक करण्यासारखं या बजेटमध्ये काहीच केलं नाही. फक्त आम्ही मेट्रो साठी तुमच्याबरोबर आहोत कारण मेट्रोचं आपण चांगल्या प्रकारे नियोजन केलं आहे. परंतु मेट्रोच्या कामामध्ये खुप दिरंगाई चालली आहे ती लवकरात लवकर पुर्ण करुन घेणेत यावी. आयुक्त साहेब,आपण पंतप्रधान आवास योजनेसाठी आपण ४९ कोटी रुपये ठेवलेले आहेत. या योजनेवर आपण जाऊन कधी व्हीजीट केली आहे का? आम्ही शहर सुधारणा समिती मार्फत या योजनेच्या व्हीजीट साठी गेलो होतो. रावेतची जी पंतप्रधान आवास योजनेची जी स्किम आहे त्याची जी प्लींथ आहे त्यासाठी खड्डे सुध्दा खोदलेले नाहीत तरी त्याला आपण साडेचार ते सहा कोटी रुपये दिलेले आहेत हे कशासाठी दिलेले आहेत. त्याला हे पैसे का दिले हे कोणच विचारत नाही. आमच्या या बजेटमधुन ४९ कोटी रुपये हे काम पुर्ण झाल्यावर देतो का, वाटायला देतो. हे आपण अधिका-यांना विचारलं पाहिजे. रावेतला जे पंतप्रधान आवास योजनेचे काम करणार आहोत त्याच्यावर स्टे आहे. तरी सुध्दा त्यांना पैसे का दिले आहेत. मा.महापौर साहेब,आपण सुध्दा या पंतप्रधान आवास योजनेच्या कामामध्ये लक्ष घातलं पाहिजे. च-होली मध्ये सुध्दा पंतप्रधान आवास योजनेचे काम चालू आहे त्याठिकाणचं काम सुध्दा अत्यंत संथ गतीने काम चालू आहे. तुम्ही तर लक्की ड्रॉ पण ओपन केला आहात. लोकांना तुम्ही कशा पध्दतीने घरे देणार आहात. तुम्ही लक्की ड्रॉ मधील लोकांची यादी पण तयार केली आहे पण लोकांना घरे कशी देणार आहात. आणि कामापेक्षा जास्त पेमेंट त्यांना दिलेलं आहे. जर तुम्ही त्यांना पेमेंट दिल आहे तर त्यांच काम का झाल नाही. माई,हे बजेट लोकांच्यासाठी असलं पाहिजे. अधिका-यांसाठी नाही, लोकांना काय पाहिजे आरोग्य, रस्ता,पाणी,लाईट या ज्या मुलभूत गरजा आहेत त्या कोणत्याही पुर्ण होत नाहीत. तसेच कोविडचे पेशंट आकडा गेल्या तीन दिवसापासून १८०० पेशंट येत आहेत. ज्यावेळेस बजेट तयार करण्याचं काम चालू होतं त्यावेळेसही पेशंटची संख्या वाढत होती. परंतु आपण वैदयकीय विभागाला आपण १०१ कोटी रुपये आणि आरोग्याला १०७ कोटी रुपये ठेवलेले आहेत. आयुक्त साहेब,आपण हे कसं हॅण्डल करणार आहात. या शहराचं आरोग्य कशा पध्दतीने राखणार आहात. अवास्तव योजनेला आपण १२०० कोटी रुपये ठेवलेले आहेत. ज्या योजना गरजेच्या नाहीत त्यांना अवास्तव तरतुद केलेली आहे.

शहरात पुढे अनेक मोठे प्रोजेक्ट येतील ते खरोखरचं करणं गरजेचं आहेत का,याचा निर्णय घेण्याचं काम तुमचं आहे. कारण आम्ही तुम्हांला याठिकाणी विश्वस्त म्हणुन बघतोय. तुम्ही  याठिकाणी निर्णय घेतला पाहिजे की,हे काम केलं पाहिजे की नाही तसेच याठिकाणी जे अर्धवट पडलेले प्रकल्प आहेत त्याकडेही आपण लक्ष दिलं पाहिजे. जे गोरगरीबांचे अर्धवट प्रकल्प पडलेले आहेत ते पुर्ण करण्याचा प्रयत्न करावा आणि त्यांना घरे कशी लवकरात लवकर  मिळतील, पंतप्रधान आवास योजनेअंतर्गतची घरे लोकांना कशी चांगली मिळतील,या ठिकाणी स्मार्ट सिटी कशी बनेल याचा प्रयत्न करावा. ज्या कामांची आताच आवश्यकता नाही परंतु त्यासाठी जी तरतुद केली आहे ती आवश्यक कामांसाठी वर्गीकरण करुन या शहराचा विकास झाला पाहिजे एवढंच मी याठिकाणी सांगेन आणि थांबेन धन्यवाद.

**मा.मंगला  कदम -** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह  मा.महापौर या सभागृहाची परिस्थिती जर बघितली तर आणि प्रभागातील  बजेटचा जर आपण विचार केला तर बजेटच्या पहिल्या पानावर आयुक्तांचे निवेदन आणि दुस-या पानावर प्रभागातील बजेटची आकडेवारी दिलेली आहे. माई,ज्यावेळेस तुम्ही स्टँडींग  मध्ये होता त्यावेळेस तुम्हांलाही माहिती आहे की, आपण जे बजेट तयार करतो ते कशा पध्दतीन नागरीकांना किंवा प्रभागामध्ये वाटलं पाहिजे. हे त्या पध्दतीनं बजेट वाटलं  गेलं आहे का,प्रभागाच्या बजेट मध्ये जी तफावत आहे  ती योग्य नाही.यापुर्वी आपण सर्व प्रभागांना १५/१५ कोटी रुपये देत होतो. ठिक आहे,एरियावाईज,कि.मी.वाईज वाढवायचं असेल तर तशी टिप त्याठिकाणी  टाकायला  पाहिजे. या प्रभागातील एवढा,एवढा एरिया वाढल्यामुळे बजेटची तरतुद वाढवलेली आहे. आणि सर्व नगरसेवकांच्या मनामध्ये किंतुपरत्वे आले पाहिजे असं मला वाटतं. परंतु बजेटचं पहिलचं पान ज्यावेळेस आपण  बघतो त्यावेळेला नगरसेवकांची निराशा होते. आणि त्यांना वाटते की,याबजेटच्या तरतुदीमुळे आमच्या प्रभागामध्ये काहीच कामे होणार नाहीत. एका प्रभागामध्ये चार/चार नगरसेवक आहेत तर हे बजेट कसं होणार आहे. हे शेवटचं वर्ष होतं मग हे बजेट डोळे झाकुन केलं की काय असाच प्रश्न निर्माण होतो. कारण शेवटच्या वर्षामध्ये नगरसेवकांना असं वाटतयं की,  या बजेटला सुध्दा कोरोनानी ग्रासलेलं आहे. पहिल्याच पानामध्ये ज्या प्रभागामध्ये इतकी तफावत दिली आहे. त्यामुळे हे बजेट माणुसकीला धरुन दिलेलं नाही असं मला याठिकाणी सांगावसं वाटतयं. माई,आपल्यावेळेस हेच बजेट ७०० ते ८०० कोटी रुपयेचं असलं तरी आपण आनंदी होतो. आणि आज ५५०० कोटी रुपयेचं बजेट आहे तरी सुध्दा आमचे नगरसेवक समाधानी नाहीत. वॉर्डामध्ये कामचं होत नाहीत सगळयांची ओरड

आहे कशासाठी ही ओरड यायला पाहिजे. शिल्लक १५०० कोटी रुपये कशाला राहिले पाहिजे. येणारं उत्पन्न आणि होणारा खर्च याचा जर का ताळमेळ घातला आणि आपल्याला जर काही अँडीशनल पाहिजे असेल तर आपण तशी तरतुद केली गेली पाहिजे. आपण बघितलं पाहिजे की,आपण उत्पन्नाचे स्त्रोत कसे राबवले पाहिजेत. आणि आपण हे कधी करणार आहात. आम्हांला असं वाटलं होतं की,गेल्या तीन वर्षामध्ये कुठे तरी काही तरी होईल. यापुर्वी मुंबई-पुणे रोडवरुन ज्यावेळेस गाडी जायची त्यावेळेस दापोडी ओलांडली की त्यांना वाटायचं आपण पुण्यामध्ये आलो आहे.पण आता गेल्या चार वर्षापासून या शहराची काय परिस्थिती झाली आहे. मेट्रोच्या विकासाचं काम चालू आहे विकासाची कामं चालू आहेत. नियोजनाप्रमाणे विकास झाला पाहिजे. माई, तुम्हांला माहिती आहे की,जंगली महाराज रस्ता १०० वर्षापुर्वी केलेला रस्ता आहे. पुन्हा त्या रस्त्याचे काम करावं लागत नाही. पण आपल्याकडील अधिका-यांची मानसिकता तशी आहे का? आपले अधिकारी फक्त फॉरेन ट्रिप करतात आणि येतात आपल्या अधिका-यांनी फॉरेनला गेल्यानंतर त्याठिकाणचं एक तरी कामाचं इम्पलीमेंट केलेलं आहे का? अधिकारी कुठेही टुरला गेलं तरी कळत नाही आणि नगरसेवक गेले तर लगेच चर्चा सुरु होते. अधिकारी अभ्यास दौ-यासाठी फॉरेनला जाऊन आल्यानंतर त्यांनी मा.महापौरांच्या उपस्थिती मध्ये पत्रकार परिषद घेवुन सांगितले आहे का,आम्ही या कामाच्या अभ्यास दौ-यासाठी परदेश केला होता त्यासाठी एवढा खर्च झालेला आहे तिकडे आम्ही हे बघुन आलो आहोत आणि त्याची अंमलबजाणी याठिकाणी आम्ही करणार आहोत. आपले अधिकारी तसा कधीच प्रयत्न करत नाहीत. बजेटमध्ये पीएमपीएमला २३८ कोटी रुपये दिलेले आहेत. आयुक्त साहेब,आपण त्यांना एवढे पैसे दिल्यानंतरही आमच्या कर्मचा-यांना डयुटी दिली जात नाही, त्याला रुजू करुन घेत नाहीत. आमचा कंडक्टर जर त्याठिकाणी गेला तर त्याला गाडी वगैरे काय देत नाहीत. इतका दुजाभाव चालू आहे. मागच्या वेळेस आम्ही व्हीआयआरएस लावलेले होते त्याच्यामध्ये आमचे कर्मचारी किती राहिलेले आहेत. आमचे कर्मचारी सुध्दा त्याठिकाणी राहिलेले नाहीत. तरी सुध्दा आमच्यावर २५० कोटी रुपये,३०० कोटी रुपये,४०० कोटी रुपयेचा बोजा आहे. दरवेळेला आकडे बदलतात,जनरल बॉडीमध्ये यांना पैसे मंजुर केले जातात. आताच्या बजेटमध्ये २३८ कोटी रुपये तरतुद ठेवली आहे. एवढा खर्च करुन सुध्दा आपल्याकडे तेवढी व्यवस्था आपल्याकडे आहे का? वाहतुक व्यवस्था ही या शहराची रक्तवाहिनी आहे असे आपण समजतो. ट्रान्सपोर्ट व्यवस्था जर चांगली असेल तर त्याला कोणी पण विरोध करणार नाही. आज आपण मेट्रोला कोणीही विरोध केला

नाही. हीच मेट्रो आपण निगडीपर्यंत करावी असे सांगितले आहे. हे आपण का म्हणतो तर ही आपली रक्तवाहिनी आहे. ही रक्तवाहिनी बंद होता कामा नये,या जर चांगल्या चालल्या तर शहरामध्ये नागरीकांचा कल वाढत असतो. आणि या शहरामध्ये नागरीक येण्यासाठी त्यांच्या मनाची ओढ वाढते. माई,गेल्या तीन वर्षापासून बिल्डींग परमीशनचे जे उत्पन्न होतं ते तीन वर्षापुर्वी किती होते,दोन वर्षापुर्वी किती होते आणि आज आपण चारशे कोटी रुपयांवरच परत आलो आहे. पुढच्या वर्षी आपण ३०० कोटी रुपयांवरच येऊ. म्हणजे याचा अर्थ काय झाला, चार वर्षापुर्वीचा पिंपरी चिंचवडचा भाग नागरीकांना आवडणारा होता. या भागामध्ये नागरीकांना यावस वाटत होतं आता काय परिस्थिती आहे. मग ती काय कोरोनामुळे झाली का, नाही या शहरामध्ये पाणी नाही,स्वच्छता नाही, या शहराची बकाल अवस्था बघुन बिल्डर लोक जरा थांबले आहेत जर का आमच्या स्कीम बांधुन जशाच्या तशा राहिल्या तर काय करायचं आणि म्हणुन तुमचा जो उत्पन्नाचा जो उतरता आलेख लागला आहे तो तपासून पाहिला पाहिजे. आपल्याला काय अडचणी येत आहेत,कशामुळे आपल्याला पाणी कमी पडत आहे. पुण्यामध्ये आपल्यापेक्षा जास्त लोकसंख्या आहे तरी त्याठिकाणी दोन वेळेला पाणी दिलं जातयं आमच्याकडे एक काळ असा होता की,धरणामध्ये २० ते २५ टीएमसी पाणी असताना सुध्दा आम्ही नागरीकांना दोन वेळा पाणी दिलेलं आहे. त्यावेळची लोकसंख्या आणि आताच्या लोकसंख्येमध्ये फार तफावत नाही. एक ५ ते ७ लाख लोकसंख्येचा फरक असेल. आता तर आपल्याकडे अशी परिस्थिती झाली आहे की,आपल्याकडे १२ महिने पाऊस पडतो की काय मागच्या महिन्यापासून ऊन्हाळा सुरु झाला आहे. पुढच्या एक ते दिड महिन्यानंतर परत पावसाळा सुरु होणार आहे. मग आहे ते पाणी कशासाठी साठवायचं नागरीकांना का द्यायचं नाही. आणि म्हणुन काही वर्षापुर्वी पिंपरी चिंचवड शहर हे आवडतं म्हणुन होतं ते आता नाआवडतेकडे वाटचाल सुरु झालेली आहे. परवाच्या दिवशी पण एक हद्दीबाहेर पाणी देण्याचा विषय होता. आता आपल्यालाच पाणी पुरत नाही तुम्ही त्यांना सांगावे की,आम्हांलाच पाणी पुरत नसल्यामुळे आम्ही एमआयडीसीकडनं पाणी घेतो तसं तुम्ही पण एमआयडीसी कडे पाण्याची मागणी करावी. आपण काय करतो आपल्या नागरीकांना पाणी नाही मिळालं तरी चालेल,आपला नागरीक उपाशी राहीला तरी चालेल नेहमी आपण दुस-याचा विचार करतो मी म्हणत नाही शेजारधर्म पाळू नये पण शेजारधर्म पाळताना आपल्याकडे पाणी आहे का हे देखील तपासून पाहिलं पाहिजे. आणि त्यांना त्या पध्दतीनेही समजुन सांगितलं पाहिजे. काही ठिकाणचं तर असं म्हणणं आहे की,आम्ही ड्रेनेजचं पाणी नदीत सोडलेलं आहे. असं

दाखवून आम्हांला त्या बाजुच्या लोकांना पाणी द्यावं लागत आहे. आपल्याकडे नदी सुधार याच्यावरती किती खर्च झाला असेल, मगाशी मी सांगितल आणि मागील चार वर्षामध्ये मिटींगमध्ये मी बोलले होते. आयुक्त साहेब,नदीकडील ज्या चार/पाच कंपन्या आहेत त्यांना तुम्ही चहापाण्याला बोलवा आणि त्यांना विचारा की,एक कि.मी.नदीचा परिसर नदी सुधार कोण करतयं त्यांनी त्यांच्या कंपनीची जाहिरात करावी, हा आम्ही मागे दिलेला प्रस्ताव होता. या पिंपरी चिंचवड शहरामध्ये मोठमोठया कंपन्याचे मालक आहेत. त्यांना बोलवुन त्यांना रावेतचे प्रोजेक्टचे स्क्रीन दाखवा आणि त्यांना सांगा असे,असे घाणेरडे पाणी नदीमध्ये सोडले जात आहे. ब-याचशा कंपन्याचे मालक तुम्हांला नदी सुधार करु नका असे म्हणणार नाही. आपल्या शहरातील अनेक कंपन्या आहेत की,त्या सीएसआर चा फंड दुसरीकडे वापरतात. पण आपण जर त्यांच मतपरिवर्तन केलं,त्यांना समजुन सांगितलं तर ते आपल्याला मदत करतील पण आपलं प्रपोजलचं जात नाही. मागच्या वेळेस कमिशनर साहेबांनी सांगितलं होतं की,बर्ड व्हॅलीच्या समोरचा एक मोकळा प्लॉट आहे. टाटा बरोबर आमची एक मिटींग झाली इंडस्ट्रीयल एक्झिबिशन सेंटर करणार आहोत आपण पाच कंपन्याना सांगितलं तुम्ही हे एवढं करा, आम्ही त्यांना बोलावलं,आयुक्त साहेब,त्यांनी ती खाण भरली ब-याच ठिकाणचा राडारोडा आणुन ती खाण भरली आहे. म्हणजे काय केलं त्या खाणीतील पाणी इनबॅलन्स केलं कुठं तरी म्हणजे पाण्याची पातळी वाढवली आणि इकडे तर बर्ड व्हॅलीचा शो करायचा आहे. बर्ड व्हॅलीचं भूमीपुजन केलं, सगळं केलं, फक्त कारंजी कशी बसवायची असा प्रश्न होता तर आमच्या अधिका-याचं उत्तर इतकं सुंदर आहे की, उभं राहून बघायचं शो मी या संदर्भात कमिशनर साहेबांना पत्र दिलेलं आहे त्यांना सांगितलं की,पहिल्यांदा बसण्याची सोय करा नंतर लेझर शो बसवा नाही तर लेझर शो बसवणार नंतर चार वर्षात चोरीला जाणार,आणि पुन्हा तेवढंच टेंडर काढायचं कारण मी तर माझ्यावेळेस बसवलं होतं मी तर अधिका-यांना दाखवलं होतं. आणि आता तर मी १ कोटी रुपयाचं टेंडर काढलं आहे. याद्दष्टीकोनातून आपण बघितलं पाहिजे. हा एक विषय झाला की,आपण हे का करत नाही. आयुक्त साहेब,पोपटराव पवार यांची निलेगांवची ग्रामपंचायत जर बघितलं तर त्यांच्या ग्रामपंचायत मध्ये आजपर्यंत निवडणुक झाली नव्हती. नागरीकांना दुसरं काय पाहिजे,नागरीकांना हेच पाहिजे आमच्या महापालिकेत सर्व सुविधा असल्या पाहिजेत, आणि म्हणुन काही तरी चांगलं केलं पाहिजे. या बजेटमध्ये वनीकरण करण्याचं टार्गेट आहे यावर्षी ५० हजार झाडे लावण्याचं कार्यक्रम आहे. इथं आकडेवारी देताना एक झाड किती रुपयाला आहे ते गुणिले ५०

हजार झाडे आणि कोणाकडनं घ्यायची आणि कोणा कोणाला द्यायची आपली जी गार्डन आहेत ती एक,एक गार्डन वेगवेगळया धर्तीवरची बनवावी. आज मुलांना कुठलं फळ कोणत्या झाडाला येतय हे कळत नाही. हा प्रस्ताव मी मागे पण उदयान विभागाला दिला होता. जांभळाची झाडे लावा, आंब्याची झाडं लावा या झाडासाठी तुम्हांला काही खर्च करावा लागणार नाही. आपण खर्च आणि जमा याचा ताळमेळ कुठं तरी बसवला गेला पाहिजे. आणि म्हणुन या गोष्टी आपण केल्या गेल्या पाहिजेत. लेझर शो उभं राहून बघायला माणसं कशी जातील. एका जागेवर २० मिनिटं उभं राहणं शक्य आहे का, नाही,मग तुम्ही त्याच्यावर पर्यायी व्यवस्था केली पाहिजे. नाही तर तुमचा प्रोजेक्ट खड्डयातच गेला. मग हा प्रोजेक्ट कोणासाठी केला नाही तर आम्हांला परत पत्रकार परिषद घ्यावी लागेल. तसेच महिला बालकल्याणचं यावर्षीचं बजेट खुप चांगलं आहे आम्ही महाराष्ट्रभर फिरलो आहे पण पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या महिला बाल कल्याण सारखं बजेट कुठेच नाही. आपल्याकडे फक्त नियोजनचा अभाव आहे. आपल्याला जर सगळया गोष्टी अँक्युरेट करायच्या म्हणलं तर या शहराला काही सुध्दा कमी पडणार नाही. आपलं शहर हे आवडणारं शहर मध्ये नंबर वन येईल. एवढया सगळया गोष्टी आहेत सगळया सुविधा आहेत. महिला बालकल्याणच्या सक्षमीकरणासाठी ज्यावेळेस तुम्ही संस्थेला सांगितलं ती मला एकदाच भेटली परत तिला म्हणलं या परत एकदा आमच्याकडे बचत गट तुम्ही सक्षमीकरण करणार आहेत ते सक्षमीकरण होतात का हे तुम्ही बघितलं गेलं पाहिजे. काहीही होत नाही,फक्त टेंडर काढलं जात आहे ती बाई मला फक्त महिला बालकल्याण समितीमध्ये एकदाच भेटली महिला बालकल्याण समितीच्या चेअरमननी सुध्दा अगदी मनापासून काम केलं आहे की,या शहरातील महिलांसाठी मी काय देवु शकते. त्यांच्या मनामध्ये ही भावना आली की,ज्या महिलेचा पतीचा कोविडमुळे मृत्यु झाला आहे त्या महिलेला १० हजार रुपयाच्या ऐवजी ५० हजार रुपये द्यावेत. त्यांच्या मनात जी इच्छा आहे ती त्यांनी व्यक्त केली आहे. आमच्या चेअरमननी प्रयत्न केलेला आहे की,त्या बाईला पैसे मिळाले पाहिजेत. तिच्यावर अचानक या कोरोनामुळं संकट आले आहे. म्हणुन तिला काही तरी हातभार लागला पाहिजे. महिला बालकल्याणच्या शेवटच्या पॅरेग्राफमध्ये असं लिहिलं आहे की,विद्यमान सदस्यांचे जीवनमान सुधारावे. याचा अर्थ मला कळला नाही, विद्यमान सदस्य म्हणजे कोणते विद्यमान सदस्य यांचे जीवन सुधारणे यासाठी त्यांच्या व्यवसायाला अर्थसहाय्य उपलब्ध करुन देणे. आयुक्त साहेब,मी संपुर्ण शहरामध्ये १५ ठिकाणी असे कार्यक्रम घेतले होते. त्याच्यामधनं आम्ही ६० लोकांची कर्ज प्रकरणं पण

केली आहेत. या मार्च अखेर या लोकांची कर्ज प्रकरणं मंजुर पण होतील. त्या लोकांना चेक देण्याचा सुध्दा कार्यक्रम मी घेणार आहे. प्रत्येक नगरसेवकांना तुम्ही विचारा प्रत्येक ठिकाणी ३०० ते ३५० महिला होत्या,पुरुष होते,मुलं होती. म्हणजे तुम्ही मला सांगा १५ ठिकाणचे किती लोकं होतील. कमीत कमी ४००० हजार ते ४५०० महिलांनी माझ्या या कार्यक्रमामध्ये सहभाग घेतला होता. आणि सगळयाकडे आम्ही तो  फ्री केला. आणि याच्यामधुन आमच्या ५० महिला या उद्योजक होणार आहेत. या कर्ज वाटपासाठी आम्ही तुम्हाला पण बोलावणार  आहोत. म्हणजे अशा  पध्दतीने महिलांच   सक्षमीकरण झालं पाहिजे. महिलांना असे विषय द्या की,त्या त्यांच्या स्वत: च्या  पायावर उभ्या राहिल्या पाहिजेत. या शहरात असं कोण  काम करत असेल तर त्यांना सांगा की,हे काम अशा पदतीने झाले पाहिजे. आपण महिला बालकल्याणवर कोटयावधी रुपये खर्च करतो पण त्याची पब्लिसिटीच होत नाही. एका तासात मी १५ ठिकाणी कार्यक्रम घेतले होते. चारठणकर साहेब खुप चांगल्या पध्दतीने काम करतात त्यांनी इतर डिपार्टमेंट मध्ये जाऊन आलेले आहेत. त्यांना व्हीजन आहे त्यांनी चांगल्या पध्दतीने नियोजन केलं पाहिजे. बचत गटाचं अनुदान हे  एकदा दिलं की,मग पुन्हा १० वर्षानीच देतो त्याऐवजी मध्यंतरी ५ वर्षानी एकदा द्या, परत ७ वर्षानी द्या म्हणजे बायका या बचत गट बंद करणार नाहीत. आणि म्हणुन अशा पध्दतीने काही तरी नियोजन केलं पाहिजे. आणि असंच सक्षमीकरणासाठी काम केलं पाहिजे. तसेच कामगार प्रशिक्षण यासाठी २५ लाख रुपये तरतुद आहे. कर्मचारी विमा १ लाख रुपये,आपत्ती व्यवस्थापन ७० लाख रुपये तरतुद केलेली आहे.कामगारांना चांगल्या प्रतीचं प्रशिक्षण द्या त्यांना चांगल्या ठिकाणी प्रशिक्षणासाठी पाठवा.  आपले अधिकारी हे  फिरायला जातात मग आपले कामगार का जाऊ शकत नाही. जगामध्ये काय चाललं आहे हे आपल्या कामगारांनी बघितलं पाहिजे. त्यामुळे आपल्याला व्हीजन मिळतयं आणि म्हणुन आपले लोक बाहेर गेले पाहिजेत. आपत्ती व्यवस्थापनासाठी फक्त ७० लाख  रुपये दिलेले आहेत आज कोरोनाचा काळ आहे याव्यतिरिक्त या शहरामध्ये काहीही घडु शकते मग या आपत्ती व्यवस्थापनाला एवढे पैसे पुरणार आहेत  का, नको त्याठिकाणी बजेटची तरतुद करता आणि चांगल्या ठिकाणी तरतुद करत नाही. गेल्या चार वर्षामध्ये बजेटच्या मिटींगमध्ये कुठल्याच विषयावर आम्हांला चर्चा करता आली नाही. शिक्षण मंडळाचा बजेट २२२ कोटी रुपयेचं असेल तर मगाशी काही    सन्मा.सदस्यांनी सांगितलं आहे की, आपण बाहेरच्या संस्थांना पाच शाळा दिलेल्या होत्या कारण आमच्या शिक्षकांची मानसिकता नाही,दुस-यांनी कोणी तरी येऊन  बघणं आमची गुणवत्ता वाढली नाही तरी चालेल पण आमच्याकडे दुस-यांनी

कोणी बघितल नाही पाहिजे. आम्हांला पगार मिळतोय नां, पाटया टाकतोय नां, आम्हांला काय थेट  पध्दतीने पैसे मिळतेत नां, विद्यार्थ्यांना वह्या,पुस्तकं सगळं थेट पध्दतीनं मिळणार आहेत. हे थेट पध्दतीने खरेदी करण्याची काय घाई होती. विद्यार्थ्यांना उद्या कपडे मिळणार आहेत म्हणुन समजलं की,आमचे सगळे विद्यार्थी उद्या शाळेमध्ये हजर राहणार  ड्रेस घेणार आणि उद्यापासून हे विद्यार्थी  शाळेत येणार की नाही याची गॅरंटी नाही. आयुक्त साहेब,तुम्ही या विद्यार्थ्यांना टप्याटप्याने दोन कोटी रुपयाचे  स्मार्ट फोन दिले असते नां तर सभागृहाला याचा आनंद झाला असता कारण आयुक्त साहेब,हे आधुनिकतेकडे गेले आहेत म्हणुन तुमचंही कौतुक झालं असतं. या स्मार्ट सिटीमध्ये आम्ही स्मार्ट होण्याचा प्रयत्न करतोय तर आम्ही काय केलं गडबडीने आम्ही लगेच दिलं तर कोण कोर्टात गेलं, खरंतर ती फाईल अजुन कोणाच्या हातात नाही. आता लागतील सगळे नगरसेवक त्यांच्या मागे कुठली फाईल आहे,ठेकेदार कोण आहे, सगळा तपास सुरु होईल. दोन कोटीची ऑर्डर त्यालाच का दिली,कशी दिली याच्यापेक्षा आपण जर आधुनिकतेकडे गेलो असतो आणि आपल्या मुलांना स्मार्ट फोन दिले असते तर बरे झाले असते. ही पिढी पिंपरी चिंचवडची भावी पिढी आहे. त्यांच्यासाठी खर्च केला तर  कुठे बिघडले. आता शाळा कुठपर्यंत चालेल याची गॅरंटी नाही. आम्ही हे देतोय त्याला कुठल्याही नगरसेवकानी विरोध करायचा नाही. आपण नेहमी म्हणत असतो की,बजेट,बजेट  काय असतं हो साहेब या बजेटबाबत लोकांना काय वाटतयं. मुलांसाठी चांगल्या शाळा पाहिजेत, क्रीडांगण पाहिजेत. एकही गार्डन चांगल नाही, शाळा चांगली नाही, गार्डन चांगले नाही  आणि असेल तर मला दाखवा आणि सांगा की,हे गार्डन एकदम छान कंडीशन मध्ये आहे. क्रीडांगण हे मुलांना स्केटींगला घेवुन जावेत यासाठी चांगल्या कंडीशनमध्ये आहे. एक तरी क्रीडांगण चांगलं आहे का ते दाखवा. आयुक्त साहेब,प्रभागामध्ये मागच्यावेळेस जी दोन,दोन कोटीची तरतुद केली होती त्याच्यामध्ये एकही काम झालेलं नाही. आयुक्त साहेब, परवा जसं तुम्ही गेलात तसं परत एकदा येऊन जावा. आणि तुम्ही बघा मागचं टेंडर किती कोटी रुपयाचं होतं दोन कोटी रुपयाचं टेंडर होतं आणि त्याच्या आगोदरचं गार्डनचा फोटो काढून बघा आणि दोन कोटी रुपयाचंटेंडर काढल्यानंतरच्या कामाचा फोटो बघुन घ्या. आमच्याकडे जॉगींग ट्रॅक हा मातीचा  होता. त्यावेळेस लोकं किती आनंदान चालायची आता करोडो रुपये घातले आहेत तरी त्याठिकाणी हा ट्रॅक भकास झालेला आहे.  आयुक्त साहेब,तुम्ही त्याठिकाणी गेला होता ना त्याठिकाणी पोलीस भरतीसाठी मुलं प्रॅक्टीस करायची. आणि आता तिथं मुलांना चालायला नाही,व्यायामाला नाही ना कशालाच नाही. तुम्ही त्या गार्डनमध्ये जाऊन

फिरुन बघा, एवढे करोडो रुपये घातले त्याठिकाणी का,तर मंगलाताईनी त्यांचा वॉर्ड हा मॉडेल वॉर्ड आहे म्हणुन माझ्या वॉर्ड मध्ये हे सगळं पाहिजे. आम्ही केलं तर आम्ही पुर्तता करुन दाखवली गेल्या पाच वर्षमध्ये माझ्या संभाजीनगर वॉर्डमध्ये काहीच केलं नाही. नका करु,मी ५/६ महिन्यांनी नागरीकांकडे जाणार आणि सांगणार या लोकांची मानसिकता बदला या लोकांनी आमच्या वॉर्डातील कामाचे काढलेलं टेंडर कॅन्सल करणार आणि माझ्या वॉर्डातील कामं या लोकांनी होऊ दिली नाहीत. पुर्वी काढलेल्या दिड,दोन कोटीच्या कामाचे टेंडर पण त्याठिकाणी काहीच कामं झालेली दिसत नाहीत. मग हे पैसे गेले कुठं या बजेमध्ये सगळया मोठमोठया रक्कमा टाकलेल्या आहेत. सिटी सेंटरसाठी कन्सलटन्सीची फी २५ लाख रुपये दिलेले आहेत. बाकी बजेटला काहीच तरतुद वगैरे नाही. सिटी सेंटर हा या शहराच्या मानाचा तुरा असणारा प्रकल्प आहे. ठिक आहे, आमच्या काळात झाला नाही त्यावेळेस मानसिकता नसेल किंवा काही तरी झालं असेल, परंतु उद्या कोणाच्याही कारकीर्दीत होऊ दे,परंतु त्याची कन्सटन्सी फी ही २५ लाख रुपये दिलेली आहे. बजेटमधील आकडेवारी पाठ करण्यासाठी किती वेळ लागतो. आमचे पैसे हे फक्त कंन्सलटन्सीसाठी चालले आहेत. आयुक्त साहेब,तुम्ही सहज जरी बघितल तर नागरीकांना तुम्ही जर चार ओळीचं पत्र दिलं असतं ना, आख्खं पिंपरी चिंचवड शहर डोळयासमोर आणा, आम्ही आणायचं साहेब, थेरगांवला हॉस्पिटल झालचं पाहिजे,चिखलीला हॉस्पिटल झालंच पाहिजे, सांगवीच्या हॉस्पिटलचं रिनिव्ह चांगल झालचं पाहिजे. वायसीएमएचला काही कमी पडतं का ते बघा,अजुन हॉस्पिटलसाठी आरक्षणं कुठं आहेत ते बघा, हे या शहराच्या दृष्टीकोनातून झालचं पाहिजे. शहरामध्ये किती उद्यानं आहेत, नागरीकांना एक चार ओळीच पत्र काढा, एवढं मोठं बजेटचं पुस्तक सुध्दा काढण्याची गरज नाही. कारण आपल्याकडे शाळेमध्ये बाई लावायला सुध्दा पैसे नाहीत. इतकी कॉर्पोरेशची अवस्था वाईट झाली आहे. नाही तिथं सगळं करायला पैसे आहेत. यापुर्वी नागरीक बजेटच्या मिटींगमध्ये सहभागी व्हायचे,या बजेटमध्ये नागरीकांचा सहभाग आहे का, काही नाही,नागरीकांना शुन्य किंमत आहे. आमच्या ज्या दैनंदिनी डाय-या येत होत्या त्यातील २/४ डाय-या आम्ही त्या संस्थांना देतो आणि त्यांना म्हणतो की, तुम्हांला जर का काही अडचण आली तर तुम्ही या कॉर्पोरेशनच्या अधिका-यांना फोन करा. पण डायरी बंद झाली पाहिजे,पेपरलेस काम झालं पाहिजे. कसला पेपरलेस,फक्त भ्रष्टाचार जिथं नको तिथं हत्ती घालवले आहेत आणि डायरीला मात्र शेपुट ओढत राहिले. डाय-या दिल्या नाही पाहिजे,नागरीकांना दिल्या नाही पाहिजे. एखादयाल समजलं आणि नागरीकांनी अधिका-यांना फोन केला तर काय?

आपण नागरीकांकडनं टॅक्स घेतो,तिकडे ज्येष्ठ नागरीकांना तिकडे घरी बसुन पगार मिळतो. तुम्ही पुर्ण अर्थसंकल्प राबवा नां, कारण आपण त्यादिवशी बोलल्याप्रमाणे आपली इमेज खुप चांगली आहे. आशिया खंडामध्ये आपण टॉपवर आहोत. मग आपण ज्येष्ठ नागरीकांना काही तरी देवु शकत नाही का, आज शहरामधील ज्येष्ठ नागरीकांना कुठल्या हॉस्पिटलमध्ये जायचं हा प्रश्न आहे. मग अशा नागरीकांना विमा द्या नां मागच्या पंचवार्षीक योजनेमध्ये माझं अस म्हणणं होतं की,या शहराला पाणी फुकट द्या, ठिक आहे आमच्या काही लोकांना पटलं नसेल, परंतु त्या पाण्यावरचा खर्च फक्त ठेकेदार पोसण्यासाठी आहे. आशाताई आज जशा बोलल्या तसेच मी त्यावेळेस बोलले होते. पाणी बिल याचे रिडींग घेणे,बिलं देणं आणि वसुली याच्यावरच पैसे खर्च होतात. त्याच्यापेक्षा दिल्लीचे मुख्यमंत्री केजरीवाल यांनी जसे नियोजन केलं होतं त्यामध्ये पहिल्या टप्प्यामध्ये लोकांना एवढे लिटर पाणी फ्री, द्या तसं पाणी फ्री, आणि मग त्यांना तुम्ही म्हणु शकता की,आम्ही तुम्हांला एवढं पाणी फ्री देतोय, एवढं आजचं पाणी वापरा,उद्या तुम्हांला पाणी मिळणार नाही. मग ते समजुन घेतील, नाही,आम्हाला एवढयाच पाण्यामध्ये भागवायचं आहे. आयुक्त साहेब,शहराच्या दृष्टीकोनातून हे बजेट अजिबात झालेलं नाही. पिंपरी भाजी मार्केट आणि मोशी भाजी मार्केट हे आता कसं तरी चालू आहे. एवढया मोठया शहरात रस्त्यावर भाज्या विकतात. चांगल्या भाजीमंडई करा नां, लोकांच्या घराजवळ भाजी मिळाली पाहिजे. या शहराची लोकसंख्या ३० लाख आहे तर दोन भाजी मंडई कशा पुरतील. आणि मंडईच करायची असेल तर कुठं तरी एका कोप-यात करायची आणि मग ती मंडई पडून रहाते. म्हणुन आपले अधिकारी हे फॉरेनला फिरायला जातात नां, काही लोक संध्याकाळी स्टॉलवर जेवणारी आहेत. आणि त्याठिकाणी सकाळी गेलो तर त्याठिकाणी तुम्हांला कचरा सुध्दा दिसणार नाही. सगळया नागरीकांची फाईव्ह स्टार मध्ये जाऊन खाता येईल अशी परिस्थिती नाही. ठिकठिकाणी हॉकर्स झोन करा नां, ज्याठिकाणी जागा रिकाम्या आहेत त्या ठिकाणी करुन भाडे घ्या. नाही तर दुसरीच वसुली करतात मग आपल्या कॉर्पोरेशननीच भाडं घेतलं तर काय बिघडलं शहरामध्ये हॉकर्स झोनसाठी चांगल्या,चांगल्या जागा निवडा आणि कॉर्पोरेशननी सुंदर पध्दतीचा फुड बाजार तयार करावा आणि त्याठिकाणी कोणाची मक्तेदारी म्हणुन करु नका,प्रत्येकाला सांगा तुला फक्त ५ महिन्याकरीता देणार आहे त्याच्यानंतर याठिकाणी दुसरा माणुस येणार आहे. करु द्या नां,फुड बाजारसारख्या योजना या शहरात झाल्या पाहिजेत. लोकांना हे असं रेडी पटकन खायला मिळायला पाहिजे. मुंबई मध्ये रस्त्यावरची चपाती भाजी सुध्दा खुप सुंदर असते. मग आपल्या पिंपरी चिंचवडच्या

कामगार नगरी मध्ये का मिळणार नाही.का नसावं,केलं पाहिजे. शहरातील नागरीकांना येता-जाता चांगले स्वच्छ टॉयलेट मिळाले पाहिजेत. तुमचं बजेट हे नागरीकांच्यासाठी नाहीच, महिलांसाठी सुध्दा चांगल्या स्किम केल्या पाहिजेत. मगाशी ज्येष्ठ नागरीकांसाठी काही तरी केलं पाहिजे असे सांगितल आहे.फॉरेनमध्ये जे लोक नौकरी करतात त्यांच्याकडनं ज्येष्ठ नागरीकांसाठी काही तरी पैसे घेतात. आपण चांगल्या उपाययोजना राबविल्या तर नागरीकांसाठी आपण चांगले सुरक्षा कवच राबवु शकतो. आयुक्त साहेब, टॅक्सच्या पावत्या काढुन बघा प्रत्येक नागरीकांना २०० रुपयेचा विमा काढला तर त्यांना किती लाख रुपयांचा विमा मिळणार हे विचारुन बघा. आयुक्त साहेब,या कोरोनाचं बर्डन आपल्या महापालिकेवर सुध्दा आलं नसतं. आणि कोरोनाचा आपल्याला त्रास सुध्दा झाला नसता. पण हे दिलं पाहिजे नां, नाही तर मग द्या १ ऑक्टोबर आलं की, ज्येष्ठ नागरीकांना टीव्ही द्या,खुर्च्या द्या अशी आमची मैत्रीण बोलली आहे. अहो,कोरोनाचं व्हॅक्सीन प्रत्येक ज्येष्ठ नागरीकांच्या निर्मुलन केंद्रावर जाऊ द्या. प्रत्येकाकडे ३००/३०० सभासद आहेत. त्यांना तुम्ही सांगा,तुमच्या केंद्राकडे आमची लोक येणार आहेत लसीकरणाचा कार्यक्रम आहे आणि तुम्हांला जागेवर व्हॅक्सीन मिळणारआहे. आपल्या शहरातील ज्येष्ठ नागरीकांसाठी हे केलं पाहिजे. कमीत कमी ११० ज्येष्ठ नागरीक संघ रजिस्टर आहेत. आणि हे कार्यरत आहेत. ज्येष्ठ नागरीकांचा उपयोग या शहरासाठी करुन घेतला पाहिजे. ते रिटायर्ड माणसं आहेत,त्यांच्याकडे खुप चांगल्या,चांगल्या आयडीया आहेत. या लोकांना पुर्वीचे कमिशनर साहेब बजेटमध्ये घेत होते. तुमच्या काही योजना असतील तर त्या सांगा, आपण हे कधी केलं का, काहीच केलं नाही. परवा आपण रिसायकल करुन पाण्याचा पुर्नवापर करणार आहोत. प्रत्येक नवीन बिल्डींग ज्या आहेत तुम्ही म्हणलात मी बघणार आहे आमच्या वॉर्डात जे केलं आहे ते चालू करुन बघा, ते केलं तर सगळं पाणी केमिकलयुक्तचं पाणी येणार आहे. आज आमचे कमिशनर साहेब, येणार आहेत म्हणल्यानंतर सगळं काही चकचकीत,चकचकीत होतं. आणि याच्यानंतर १५ दिवसांनी तिथं गुपचुप जा मग बघायला पाहिजे आपण की,तिथे नेमकी काय परिस्थिती आहे. रिसायकल पाण्याच्या ट्रिटसाठी किती खर्च येणार आहे आणि तो खर्च नागरीकांना परवडणार आहे का? आणि मग या प्लँन्टचा एवढा मोठा केलेला खर्च आपल्याला परवडणार आहे का हे बघितलं पाहिजे. आपल्याकडे आरोग्य वैदयकीय अधिकारी डॉ.नागकुमार होते त्यांनी काही कंपन्यांना सिल ठोकलेला माणुस होता. ते म्हणतात ना,जो सर्वांना आवडतो तो देवांना पण आवडतो. त्या माणसाच्या खिशात ४/४ मोबाईल असायचे बिनधास्त कंपन्यामध्ये जाऊन सिल ठोकायचे. कुठलीही

परिस्थिती आली तरी ते बिनधास्त काम करायचे. आजच्या परिस्थितीमध्ये कुठल्या कंपनीला सिल लागले आहे. आता त्यादिवशी नदीपात्रामध्ये ड्रेनेजचं पाणी जात होते हे आपल्या किती अधिका-यांनी जाऊन पाहिलेलं आहे. याच्यामध्ये आपण रेनवॉटर हार्वेस्टींग का करत नाही. चार ठिकाणी पाणी मुरवायचं आणि तिथलचं पाणी घ्यायचं. प्रत्येक सोसायटीला रेनवॉटर  हार्वेस्टींग कंम्पलसरी करावं. आणि तिथलचं पाणी त्यांनी तिथं वापरावं. तुम्ही ट्रिट केलेलं पाणी वापरलं जाईल किंवा नाही याची गॅरंटी नाही. पण रेनवॉटर हार्वेस्टींग केलं तर लोक १००  टक्के पाणी वापरणार. राजस्थान मध्ये एका माणसाने त्याच्या घरावरील पत्र्याचं पाणी त्यांनी घरातील टाकीमध्ये सोडलं होतं. आणि तेच पाणी तो माणुस वर्षभर पिण्यासाठी सुध्दा वापरतो. आणि ते गावातील लोकांना सुध्दा पिण्यासाठी पाणी देतात. तुम्ही तो प्रकल्प करु नका या मताची मी नाही. पण हा प्रकल्प यशस्वी होणार असेल तरच करा, अजितदादांनी आम्हाला  असं कधी शिकवलं नाही की,तुम्ही काम करु नका, यमुनानगर मध्ये सुरुवातील एक वर्षभर २४ तास पाणी चालू होतं.सुलभाताई तिथं  नगरसेविका होत्या. उलट दादा म्हणायचे आपण त्या पक्षाच्या वॉर्डामध्ये चांगल काम करुन दाखवायचे त्यामुळे नागरीकांच परिवर्तन होईल. आणि पहिल्यांदा आम्ही शिवसेनेच्या नगरसेविका  सुलभाताईंच्या  वॉर्डामध्ये २४ बाय ७ पाण्याचा  प्रकल्प राबविला होता.  आणि म्हणुन आपण चांगल्या पध्दतीने काम करायला  शिकलं पाहिजे. माझ्या एका महिला भगिनींनी सांगितलं आहे की,वेताळनगरचा प्रोजेक्ट हा प्रोजेक्ट अर्धवट केला आहे. आणि त्याठिकाणी झोपडपट्टी राहीली  ती राहीलीच  आणि ज्या कारणासाठी चिंचवडचा मेन श्वास मोकळा करायचा होता त्यासाठी आम्ही वेताळनगरच्या झोपडपट्टीचा प्रकल्प एसआरए मध्ये सुरु केला. परंतु त्या मधला सर्कल तसाच राहिला आहे.बस टर्मीनंन्स तर तसंच राहिलं. ठिक आहे,जागा कॉर्पोरेशनला पाहिजे पण किती वर्ष वापरावी. अजंठानगरचा अमृतामाई मठ प्रकल्प १५ वर्ष झाला आहे. बाबा धुमाळ यांचा प्लॉटही त्याच्यामध्ये गेला आहे. बाबा धुमाळ यांना पार्कींगसाठी प्लॉट मिळाला होता त्यांनी तो अजेंठानगर  ट्रान्झीट कॅम्पला दिला होता. आणि त्याठिकाणी अजुनही ट्रान्झीट कॅम्प आहे. दत्ता काका म्हणायचे साने चौकात जा, तिथं सगळे भाजीवाले आणि  फ्रुटवालेच आहेत लोकांनी चालायचे कसे, कुठल्याही चौकातून जायला आज रस्ता नाही. सगळया टप-यांनी हे शहर बकाल केलेलं आहे. संध्याकाळच्या वेळेला तुम्ही  फिरुन बघा, आपल्याकडे एक अधिकारी होते या सभागृहात असाच कुत्र्याचा विषय निघाला त्या अधिका-याला मी  म्हणलं की, मला मॉडेल वॉर्ड खुप आवडत आणि त्यांना सांगितलं की,आमच्या मॉडर्न वॉर्डमध्येच तुम्ही  कुत्र्यांवर काम

करा,  मी त्यांना म्हणलं मी कुत्र्यांची २० फोटो तुम्हांला देते ती कुत्री कशी सापडत नाहीत ते बघु  मग ते माझ्याकडे आले आणि म्हणाले तुम्ही सभागृहात बोलल्या मला आवडलं मी म्हटलं तुम्ही या,आम्हांला कुणाला दुखवायचं नाही. आम्हांला कुठल्याही कुत्र्याला दुखवायचं नाही, पण ऑपरेशन केलेल्या कुत्र्यांच्या गळयामध्ये एक रंगीत पट्टा असला पाहिजे. हे करण्यासाठी आमच्या अधिका-यांनी बिल्कुल तसदी घेतली गेलेली नाही. पण त्यांनी पाच कोटी रुपयाचं बिल काढण्यासाठी त्यांनी एवढी मोठी उडी मारली होती. कारण या कामामध्ये त्यांना काय मिळणार होतं. या कुत्र्याच्या गळयात बेल्ट बांधायचं म्हणजे स्वत:च्याच गळयात पट्टा बांधुन घ्यावा लागला असता. मी त्यांना म्हणल होतं माझ्याकडची २० मुलं तुम्हांला द्यायला तयार आहे. एनजीओस माझ्याकडे येऊन भेटल्या त्यासुध्दा म्हणल्या काही होणार नाही. आणि काय झालं, काल  टीव्हीवर पाहिलं एका मुलाच्या मागे चार कुत्री लागली होती. ही घटना पिंपरी चिंचवडमधील नव्हती पण अशा घटना या शहरामध्ये घडलेल्या आहेत. तुम्ही रेशिओ काढा कुत्र्याने चावलेली मुलं वायसीएमएच मध्ये किती गेलेली आहेत. कुत्रं चावल्यानंतर इंजेक्शन तरी मिळते का, आणि मग ही जबाबदारी मेनका गांधी यांनी जरी घेतली असली तरी जो कायदा आहे त्या कायद्याच्या चौकटीमध्ये बसुन आपल्याला काय करता येईल हे आपण बघितलं पाहिजे. या शहरामध्ये  नागरीकांना नेऊन दाखवावा असा एक सुध्दा असा प्रोजेक्ट नाही. माई,या सभागृहात माझ्या वेळेस सकाळी ११.००वा.सुरु झालेली मिटींग रात्री १२.०० वा.मी उठलेली होती. ज्यांना या बजेटवर बोलायचं आहे त्यांना बोलू द्या पण मी कशासाठी थांबणार,मला जे बोलायचं आहे ते मी बोलणार  या शहरामध्ये मोकाट कुत्री किती असतील समजा एक हजार असतील तर त्यांना आपल्याकडे बेल्ट नाहीत का, त्यांना बेल्ट घ्यायला किती पैसे लागतील. आम्ही खर्च करण्यासाठी तयार आहोत. पण याच्यामध्ये पण भ्रष्टाचार ऑपरेशन झालेली कुत्री आणि बिगर ऑपरेशन झालेली कुत्री तीच घेवुन जायची आणि तीच परत आणुन सोडायची. आणि ही कुत्री रात्रभर बोंबलत असतात. आमच्या हद्यीत तु कसा काय आला म्हणुन आमच्या भागातील सगळी कुत्री त्याच्या मागे लागतात. आणि ही सत्य परिस्थिती आहे. नागरीकांना बजेटची  माहिती देण्यासाठी छोटं पुस्तक काढलं असत तरी नागरीक खुश झाले असते. आणि त्यांना वाटलं असतं की,आमच्यासाठी हे खास बजेट बनवलं आहे.  आणि म्हणुन हे बजेट म्हणजे मागचं सगळं कॉपी पेस्ट केलेलं बजेट आहे. आणि म्हणुन असल्या अक्कल शुन्य बजेटचं काय करायचं हे बघितलं पाहिजे. लोकांनी कर रुपाने पैसे भरलेले आहेत त्यांच्यासाठी आपण करतोय. नागरीकांना तुम्ही यावर्षी रस्ता,लाईट,पाणी हे सगळं द्या

म्हणजे तुम्हांला हे सगळे नागरीक डोक्यावर घेतील. नागरीकांमध्ये तुम्ही जा,तिथं लोकअदालत चालू करा, नागरीकांना काय पाहिजे हे त्यांना विचारा, तसेच दिव्यांगासाठी जी तरतुद केलेली आहे खरंच या कोरोनाच्या काळात दिव्यांग मुलांना त्यांच्या पालकांना घरात सांभाळावी लागली आहेत. परंतु त्यांचे येणारे जे पैसे आहेत ते त्या मुलांना आणि पालकांना आधार मिळाला आहे. आपल्या योजना खुप चांगल्या आहेत त्या लोकांपर्यंत पोहचल्या पाहिजेत. कोरोनाच्या काळात आपण त्या,त्या योजना आपण ऑनलाईन डिक्लेअर करत जातो. ऑनलाईन करण्यास काय हरकत आहे. त्या त्यावेळेला मुलांना पैसे मिळाले तर त्या,त्या वर्षामध्ये मुलांना अँडमिशनसाठी पैसे मिळाले तर एखादया गरीब बापाच्या डोक्यावरचं ओझं हलकं होतं. आणि त्यांना वाटतं पहिला टप्पा फी चा गेला आहे. त्यांनाआपण असेही ऑनलाईनच देणार आहोत. मग उशिर कशासाठी करायचा. आपल्या अधिका-यांना बोलवुन सांगा, पिंपरी चिंचवड मधला विद्यार्थी आहे नां त्यांना द्या. आपल्याकडच्या योजना कशा असतात ते सांगते विधवा योजना याच्यासाठी काही तरी क्रायटेरीया लावतात त्या बाईचे मिस्टर गेलेले आहेत नां, तिने तुमच्याकडे अनुदान मागितले आहे नां, तिला द्या., तिचं नांव जे आहे तेच तुम्ही करा, बाकीचे सगळे फाटे फोडत बसता. हा,तिने आपल्याकडे यापुर्वी पैसे घेतले नाहीत नां याची १०० टक्के खात्री करा, आम्ही असंही म्हणणार नाही की,तिनं पहिल्यांदा अनुदान घेतलं आहे,दुस-यांदाही द्या तिला अनुदान देवु नका, पण जिनं घेतलंच नाही त्या बाईला १० हजार रुपये दिले तर काही तरी भाजीपाला आणुन विकुन व्यवसाय करते. आयुक्त साहेब,कोरोनाच्या काळात आपल्याला परत सगळे सेंटर चालू करावे लागतील. या सभागृहात मी आजपर्यंत या स्पर्श सेंटरच्या बाबतीत बोलले नाही. नांव घेवुन तर मी बिल्कुल बोलले नाही. कोणाचे तरी नांव घेवुन डोक्याला एवढा त्रास करुन घेण्यापेक्षा तुम्ही ठरवा नां,पुण्याने पैसे कसे दिले नाहीत, सेंटरच चालू झाले नाही तर पैसे देणार नाहीत. प्रायव्हेटवाले फोन करुन कोविड सेंटर चालू करण्यासाठी परमिशन मागत आहेत. त्यांना परमिशन देवुन टाका नां, चिखलीमधील प्रायव्हेट हॉस्पिटल आहे मी आज सकाळीच आकुर्डीतील साळुंके सरांना फोन लावला होता तर त्यांनी म्हणले की, आजच त्यांचा अर्ज आला आहे आणि आज आम्ही त्याठिकाणी व्हीजीटला जाणार आहे. हॉस्पिटल चेक करतो आणि त्यांना परमिशन देतो. प्रायव्हेट हॉस्पिटलचा कोविड सेंटर चालू करण्याचा अर्ज आला तर त्याच दिवशी चेक करण्यासाठी आपला माणुस जाऊ द्या. आणि त्यांना परमिशन देवुन टाका. मागे काय झालं ते माहित नाही पण आता त्याच्यामध्ये बदल करा नाही तर मागच्या सारखीच परिस्थिती निर्माण होणार म्हणुन

त्याच्यामध्ये बदल करुन त्या ठेकेदाराला चालवायला द्या. आयुक्त साहेब,तुम्ही पिंपरी चिंचवड मध्ये मनापासून काम करा तुम्हांला हे शहर नक्कीच आवडेल आणि या शहरातील नागरीकांचे विषय समजुन घ्या. आणि अशा दृष्टीकोनातून बजेटचा जर आपण वापर केला तर चांगले होईल. काही,काही ठिकाणी बजेटमध्ये कामासाठी तरतुदच केलेली नाही. आयुक्त साहेब,मागची जी कामे चालू आहेत त्याच्यावर तुम्ही बारकाईने लक्ष द्या. या महापालिकेची तुम्हांला मी एक ख्याती सांगते यापुर्वी कमिशनर जर बाहेरुन आले तर अतिरिक्त आयुक्त हे महापालिकेचे असायचे ताळमेळ तुम्ही व्यवस्थित ठेवा. सगळेच जर बाहेरचे आणले तर हा सगळा प्रॉब्लेम निर्माण होतो. त्यामुळे अधिका-यांची सांगड घाला आणि त्या दृष्टीकोनातून आपलं पिंपरी चिंचवड सुंदर व्हावं अशीच मनापासूनची इच्छा आहे. माई,तुम्ही मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आभारी आहे असेच चार वर्ष बजेटवर चर्चा करण्याची संधी दिली असती तर कोणाची तक्रार आली नसती. असो,झालं गेलं गंगेला मिळालं आज तरी तुम्ही आम्हांला बोलण्याची संधी दिली. सभागृहात चर्चा झाली पाहिजे आणि या चर्चेतुनच चांगलं निर्माण होतं. आयुक्त साहेब,या महापालिकेचे अधिकारी खुप हुशार आहेत म्हणुन त्यांना काम द्या. आणि हे शुन्य असलेलं बजेट आहे. सगळयाच गोष्टीला कंन्सलटंट आहे. ड्रेनेजची लाईन टाकायची असेल तर त्याला कंन्सलटंट आपले इंजिनियर कशासाठी भरायचे,एवढया प्रभागात त्यांना कशासाठी ठेवायचे त्यांच्यावर काही तरी जबाबदारी टाका, त्यांना सांगा काम करायला मग बघा हे शहर किती सुंदर दिसेल. माई,धन्यवाद.

**मा.तुषार हिंगे –** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह आजचं बजेट बघुन मला हेच म्हणावं वाटतयं की,छत्रपती संभाजी महाराज की,जय आजच्या बजेटमध्ये संभाजी महाराजांचा पुतळा जो भारतातला सर्वात मोठा आपल्या पिंपरी चिंचवड शहरामध्ये होत आहे. त्याबद्दल मा.आमदार महेशदादा लांडगे,मा.लक्ष्मणभाऊ जगताप असतील यांचे आभार मानतो आणि सर्व सभागृहाने याला विरोध न करता संभाजी महाराजांचा पुतळा हा शहराचा नावलौकिक करणारा ठरेल असं मी यावेळेस सांगु इच्छितो. त्याच पध्दतीने मी आयुक्त साहेब,मी आपल्याला सांगु इच्छितो की, क्रीडा समितीचे अध्यक्ष उत्तम केंदळे यांनी ज्या पध्दतीने क्रीडा स्थापत्य कशा प्रकारे पुर्ण होईल यासाठी प्रयत्न केला आहे. त्यामुळे आज आपण क्रीडा स्थापत्य स्थापन करुन हे वेगळं बजेट क्रीडाला मिळालं त्यामुळे मी खरंच आयुक्तांचे आभार मानतो. आयुक्त साहेब,मी आपल्याला सांगु इच्छितो की, आपल्या या शहरात २७ क्रीडांगणे आहेत आणि ही क्रीडांगणे जर का आपण पीपीपी तत्वावर केली तर नक्कीच ब-याच संस्था पुढे

येतील जेणेकरुन आपल्या महापालिकेवर आर्थीक भार न पडता हे क्रीडांगणे डेव्हलप होतील. आणि या शहरातील खेळाडु नक्कीच चांगले तयार होतील असं मला वाटतं त्याचप्रमाणे आपण क्रीडांगणासाठी ७ कोटी रुपयांच बजेट ठेवले आहे. माझी आपल्याला एकच विनंती आहे की,या शहरातील कुठलं तरी एकच क्रीडांगण घेवुन ते पुर्णपणे डेव्हलप केलं तर त्याचे पैसे मार्गी लागतील. कारण २७ क्रीडांगणासाठी ७ कोटी रुपये ठेवले आहेत त्यामध्ये काहीच कामं पुर्ण होणार नाहीत. त्याच पध्दतीने एचएम क्रीडांगण असेल ते पण आपल्याला पीपीपी तत्वावर कशा पध्दतीने करता येईल याचा पण आपण प्रयत्न करावा. त्याचप्रमाणे आपल्या शहरात ब-याच कंपन्या आहेत त्यांचे जे सीएसआर फंडस् असतील,काही इंजिनियर्स असतील,काही सामाजिक संस्था असतील या आपल्या पिंपरी चिंचवड महापालिके बरोबर काम करण्यास तयार आहेत. तर त्यांची सांगड घालुन पुढे जाण्याचा आपण प्रयत्न करावा. त्याच पध्दतीने मी महेशदादांचे विशेष आभार मानतो की,च-होली सारखी जी गावे वंचित होती जी कधीच डेव्हलपमेंट झालेली नव्हती त्यांना चांगल्या प्रकारे बजेट देवुन किंवा बाकीच्या काही गोष्टी असतील त्याठिकाणी बिल्डींग जास्त तयार होत असुन त्याचा आपल्याला पण फायदा होत आहे. आतापर्यंत स्थायी समितीचे जेवढे चेअरमन झाले त्यांनी बजेटमध्ये तरतुद करुन जी गावे वंचित होती त्यांना बजेट देवुन त्याठिकाणचा विकास घडवुन आणलेला आहे त्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो. त्याचप्रमाणे यापुर्वी आपण जी गावे महापालिकेमध्ये घेतली होती त्यांच डेव्हलपमेंट न केल्यामुळे आपल्या हद्दीत येत नव्हती पण आता जी तुम्ही डेव्हलपमेंट करताय त्यामुळे बरीचशी गावे आपल्या हद्दीत येतील अशी मी आशा व्यक्त करतो. त्याचप्रमाणे पाणीपुरवठयाचा प्रश्न आपल्या या शहरामध्ये भेडसावत आहे. यासाठी आपण १०० एमएलडीचा प्लँन्ट आपण चिखलीमध्ये करतोय त्यामुळे पाण्याचा जो प्रश्न आहे तो थोडया फार प्रमाणात सुटेल अशी आशा व्यक्त करतो. त्याचप्रमाणे प्रभाग क्र.१० मधील मी भाग्यवान नगरसेवक आहे आज पिंपरी चिंचवड शहरातील पिकनिक स्पॉट हा प्रभाग क्र.१० मध्ये होईल अशी मी आशा व्यक्त करतो. त्याचप्रमाणे सर्पोद्यान आहे,तारांगण आहे, त्याचप्रमाणे या शहरासाठी सिटी सेंटरसाठी आपल्याला काय करता येईल याचे नियोजन कराल अशी आशा व्यक्त करतो. त्याचप्रमाणे मा.आयुक्त साहेबांना सांगु इच्छितो की, शहरामध्ये कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न गंभीर होत चालला आहे त्यासाठी आपल्या पोलिस चौक्या ज्या आहेत त्याच्यासाठी विशेष व्यवस्था करणेत यावी. पोलिस स्टेशन आहेत पण पोलिस चौक्या नाहीत. तरी आपण पोलिस आयुक्तांशी चर्चा करुन आपल्याला पोलिस चौक्या कशा करता येतील त्या

करावयात अशी मी आशा व्यक्त करतो आणि आताचे जे बजेट आहे ते खरोखरच खुप चांगल्या पध्दतीने मांडलेलं आहे. जयहिंद, जयमहाराष्ट्र.

**मा.शैलजा मोरे** - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह मी आज मंगलाताईकडुन बरेच काही शिकले आहे. आणि मला काय बोलायचं होतं ते मला कळलं नाही. माझा प्रभाग क्र.१५ मधील कामाच्या संदर्भामध्ये मी असमाधानी आहे. खरं म्हणजे विरोधी पक्षनेता राजु आहे त्याला तीन वेळेचा अनुभव आहे. त्यांनी आम्हांला विचारात घेवुन त्यांनी आम्हांला प्रभागात असं करायला पाहिजे,तसं करायला पाहिजे असं सांगायला पाहिजे. आपण याठिकाणी शहराच्या भल्यासाठी बोलणार आहे पण मी माझ्या प्रभाग क्रमांक १५ विषयी मी अजिबात समाधानी नाही. चार वर्षामध्ये आम्ही एक ठरवलं की, चार वर्षामध्ये कोणतेही रस्ते परत परत उखडुन नवीन रस्ते करुन ते १०० वर्षासाठी व्हायला पाहिजेत. त्यासाठी आम्ही चौघे नगरसेवक आहोत. मोकाट कुत्र्यांच्या बाबतीत आम्ही नाराज आहोत. आम्ही डॉक्टरांकडे गेलो होतो ते म्हणाले आम्ही ऑपरेशन केलेलं आहे. जर ऑपरेशन केलेलं असेल तर उत्पत्ती कशी होते. ती उत्पत्ती होत असेल तर कुठे तरी ऑपरेशनमध्ये कुठे तरी घोळ केलेला आहे. मंगलाताई म्हणल्याप्रमाणे ऑपरेशन झालेल्या कुत्र्यांच्या गळयामध्ये पट्टे बांधा आणि तुमच्याकडे पट्टे नसतील तर आम्ही तुम्हांला पट्टे पुरवतो हे पण आम्ही म्हटलं होतं. आयुक्त साहेब,आशाताईंनी म्हणल्याप्रमाणे तुम्हांला एकदाच एक्झाम द्यावी लागते पण आम्हांला दर पाच वर्षांनी एक्झाम द्यावी लागत आहे. आणि ते आमच्या कामाच्या जोरावर आलेले असतात. त्यामुळे माझी आपल्याला विनंती राहील की, ज्येष्ठ नागरीकांची आपण २ ऑक्टोबरलाच आठवण करतो, आणि ते आम्हांला म्हणतात की, आम्हांला पेन्शन कधी देणार आहे,कधी देणार आहे अशी विनंती करतात. मी आणि एकनाथ यांनी जेष्ठ नागरीकांना पेन्शन देण्याचा विषय मांडला होता आणि तो मंजुरही झाला होता. आणि ही पेन्शन ज्यांच्याकडे पांढरे आणि केसरी रेशनकार्ड आहे त्यांना दिली पाहिजे. ज्यांना शासनाची एक लाख दिड लाख रुपये पेन्शन आहे त्यांना द्या म्हणत नाही. ज्यांच्याकडे पांढरे आणि केसरी रंगाचे जे रेशनकार्ड आहे त्यांची आर्थीक परिस्थिती खुप बिकट आहे. आता आमच्या प्रभागात लसीकरण केंद्र सुरु आहे त्याठिकाणी दोन ज्येष्ठ नागरीक लस घेण्यासाठी आले होते. त्यांनी सांगितले की,माझे जेवण झालेले नाही त्यामुळे मी लस घेवु नाही. असे म्हणल्यानंतर मी त्यांच्या जेवणाची लगेच सोय केली आणि त्यांना लस दिली. त्यामुळे जेष्ठांच्या पेन्शनचा विषय हा झालाच पाहिजे. आणि ज्येष्ठ नागरीकांचं महिन्यातुन एक व्हीजन भरवलच पाहिजे कारण त्यांच्याकडे खुप चांगले

व्हीजन आहेत. मी आपल्या इंजिनियरनां सांगितलं की, तुम्हांला पाण्याचे लिकेज काढायचं असेल तर तुम्हांला १० दिवस लागत असतील तर त्यांना सांगितलं तुम्ही घरी बसा मी माझा इंजिनियर आणते आणि लिकेजचं काम करुन घेते. ज्येष्ठ नागरीकांमध्ये कोणी इंजिनियर आहे,कोणी डॉक्टर आहेत,कोणी मेकॅनिक आहेत यांच्याकडनं काम करुन घ्या नां बाहेरचे माणसं आणुन त्यांना तुम्ही ५०/५० लाख रुपये पेमेंट देता. तेच पैसे या ज्येष्ठांना दिले तर त्यांना आर्थीक मदत तरी होईल एवढं मी म्हणेन सोल्जर आहेत, ते रिटायर्ड आहेत, यांच्याकडे छान,छान व्हीजन आहेत त्यामुळे तुम्हांला बाकीचे जे मागवावे लागतात ते मागवावे लागण्याची गरज पडणार नाही. आणि मी माझ्या प्रभागातील कामाच्या बाबतीत अजिबात समाधानी नाही. आयुक्त साहेब,तुम्ही अप्पुघरला येणार आहात नां, प्रविण लडकतशी मी बोलले आहे आपण दिवसाआड पाणी का देतोय, तर प्रविण लडकत मला म्हणाले की,हे २० वर्षापासून चाललेलं आहे. मी त्यांना म्हणलं हा विषय मला पटलेला नाही. ते मला म्हणाले मला दोन तास द्या मी याच्यावर अभ्यास करतो. मी त्यांना म्हणलं तुम्ही कितीही अभ्यास करा पण मी एक गृहिणी आहे मला एवढंच माहिती आहे की,मी टँकर मागवणार नाही आणि मी एवढंच म्हणेण की,तुम्ही सगळेजण पाणी जपुन वापरा, जर आपल्याकडे काही कार्यक्रम असेल तर आपण त्यांना टँकर देतो. हा नियम मी माझ्या घरामध्ये पाळते. इथे आपण म्हणता की, आम्ही तुम्हांला इतकं, इतकं मि.लि. प्रेशरनी पाणी देतो ते प्रेशरनी येऊ की, ना येऊ १० तास पाणी येतयं ना बस्स झालं हे नियम जर आपल्याला लागु आहेत तर खरोखरचं त्यांना पाणी देणं चुकीचं आहे. आणि मी विनंती करते की, आमचं हे शेवटचं वर्ष आहे आम्ही प्रभागामध्ये रस्ते करु शकत नाही, डांबरीकरण करु शकत नाही,ब्लॉक लावु शकत नाही. पण बाकीच्या प्रभागामध्ये मोठया प्रमाणात चांगले कामे होत आहेत सगळया गल्याची गल्या रंगीन ब्लॉक बसवित आहेत. आणि आम्ही मात्र साधे सिमेंटचे ब्लॉक लावु शकत नाही. आणि यासाठी सुध्दा आम्हांला अधिका-यांना विनंती करावी लागत आहे. ही आमची शोकांतिका आहे. आमचे जे ज्येष्ठ नागरीक आहेत त्यांना पेन्शन सुरु करणेत यावी. एवढंच मी सांगते जयहिंद, जयमहाराष्ट्र.

**मा.विलास मडिगेरी-** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. ऑनलाईन उपस्थित असलेले सर्व नगरसेवक नगरसेविका. सन २०२१-२२ या सालासाठीचे स्थायी समितीचे अध्यक्ष ॲड.नितीनजी लांडगे यांनी बजेट याठिकाणी सभागृहासमोर सादर केल. या २०२१-२२ च्या आर्थीक वर्षासाठी र.रु. ५५८८.७८ आरंभीच्या शिल्लकेसह उत्पन्न अपेक्षीत आहे त्यात प्रत्येक्ष खर्च र.रु.५५८६.३५ होइल अस गृहीत धरुन मार्च २०२२

अखेर २.४३ कोटी इतकी शिल्लक राहील अशाप्रकारच बजेट याठिकाणी स्थायी समितीच्या अध्यक्षानी सादर केलेल आहे. अतीशय चांगल बजेट याठिकाणी सादर केलेलं आहे. कोरोनाच्या महामारीमुळे उत्पन्नामध्ये अनेकप्रकारची घट निर्माण झाली आहे. या बजेटमधल्या पाच ते सहा गोष्टीचा उल्लेख मी याठिकाणी करु इच्छितो. खर म्हणजे महीलांच्या विविध योजनेसाठी अतीशय चांगल ५३ कोटी ३७ लाखाच बजेट याठिकाणी सादर केलेलं आहे. अनेक लोकांनी त्यासंदर्भामध्ये चांगल्या सूचना सुध्दा मांडलेल्या आहेत. अपंग कल्याणकारी साठी ३८ कोटी ५६ लाख आहेत. खर म्हणजे पाणीपुरवठयासाठी चांगला निधी याठिकाणी उपलब्ध केलेला आहे. अलीकडच्या काळात पाणीपुरवठयासाठी खुप तक्रारी याठिकाणी प्राप्त आहेत. आमच्या भारतीय जनता पार्टीच्या नगरसेवकांच्या सुध्दा पाणीपुरवठयाच्या संदर्भात अनेक तक्रारी आहेत, पाणी प्रश्न सोडवण्यासाठी २५० कोटीचा निधी याठिकाणी तरतूद केलेली आहे. मगाशी अनेक लोकांनी पीएमपीएमएलच्या संदर्भात तक्रारी केल्या आयुक्त साहेब आणि महापौर मॅडम आपण या पीएमपीएमएलच्या डायरेक्टर बॉडीमध्ये आहात. या पिंपरी चिंचवड शहरातील जो आमचा कामगार वर्ग आहे त्या लोकांना चांगल्याप्रकारची वागणूक चांगल्या प्रकारची संधी देण्यासाठी आपण त्याठिकाणी प्रयत्न करावा. स्थायी समितीच्या अध्यक्षना सुध्दा विनंती आहे की ज्या त्यावेळेला आपणही त्यामध्ये संचालक असणार आहेत, ज्या त्या महीन्याला आपण प्रत्येकवेळेस निधी देत असतो त्या काळात पीएमपीएमएलच्या संबंधित अधिका-यांची मिटींग घेवून त्या त्या वेळी या शहराला चांगल्या प्रकारच्या सुविधा मिळतील, चांगल्या प्रकारच्या बसेस मिळतील या प्रकारची काळजी दक्षता घ्यावी आशाप्रकारची विनंती आहे. याठिकाणी महासेतूसाठी ७० कोटी आहे चांगल्याप्रकारचा निधी याठिकाणी दिलेला आहे. स्मार्ट सिटीच काम करत असताना शहरामध्ये अनेक ठिकाणी खोदाई होत आहे. अनेक नगरसेवकांनी बजेटवर बोलताना खोदाई संर्भातल्या तक्रारी याठिकाणी केलेल्या आहेत ते खरं आहे, स्मार्ट सिटीसाठी खोदत असताना संबंधित ठिकाणच्या स्थापत्य विभागाच्या कोणत्याही ईंजिनीअरला स्मार्ट सिटीकडून कल्पना दिली जात नाही, संबंधित नगरसेवकांना सुध्दा त्याची कल्पना दिली जात नाही आणि कशाप्रकारे खोदलतरी ते रिस्टोरेशन त्या संबंधित ठेकेदाराकड असल्याने ते रिस्टोरेशनच काम सुध्दा व्यवस्थितरीत्या त्याठिकाणी केल जात नाही. त्याठिकाणी रिस्टोरेशन जरी केलतरी ते डांबर दोन चार महीन्यानी निघून जातं. मी मा.आयुक्त साहेबांना याठिकाणी सांगू इच्छितो की २०१९ साली आपण या स्थायी समितीच्या माध्यमातून रस्ताखोदाईच धोरण आपण सर्वसाधारण सभेमध्ये सर्वांच्या वतीने आपण

मंजूर केल होतं. ब-याच प्रकारच्या त्यात सूचना देवून ते अंतीम याठिकाणी करुन दिल होतं परंतू २०१९ पासून आजपर्यंत त्या रस्ताखोदाईच्या धोरणाची अंमलजावणी केली नाही. त्यावेळेला शहर अभियंता अंबादास चव्हाण होते आता राजन पाटील शहर अभियंता आहेत आपण जातीने याकडे लक्ष देवून यापुढच्या काळामध्ये रस्ता खोदाईसाठी अतीशय चांगल धोरण याठिकाणी या महासभेनी मंजूर केलेल आहे त्याची अंमलबजावणी केलीतर ज्या काही सर्वांच्या तक्रारी आहेत त्या सोडवण्यासाठी आपल्याला मदत होईल असं वाटत. पंतप्रधान आवास योजनासाठी याठिकाणी तरतूद केलेली आहे मला वाटत पुढच्या काळामध्ये आदरनीय लोकप्रिय मा.पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांनी २०२२-२४ पर्यंत काही घोषणा केल्या आहेत सर्वानाच घर देण्याच्या त्या घोषणा आहेत त्या माध्यमातून २०२१ साल हे आता सुरु झालेल आहे त्यासाठी केलेली ४९ कोटीची तरतूद कमी पडेल असं वाटत तरी प्रशासनाने आयुक्त साहेबांनी त्यासंदर्भात योग्य ती काळजी घेवून पुढच्या काळामध्ये त्या गोष्टींचा विचार करावा. मनपाच्या विवीध भांडवली कामासाठी ४०० कोटीचे कर्जरोखे सुध्दा उभारण्याच याठिकाणी केलेल आहे. बीएसयूपीसाठी १२१४ कोटी आहेत त्याचप्रमाणे विशेष योजनेसाठी १२३२.३४ कोटीचा निधी केलेला आहे. मला अवर्जुन प्रशासनाला सांगावस वाटत की घोडेकर ताईनी सांगीतल एवढया मोठया निधीची तरतूद का केली अशाप्रकारचा प्रश्न याठिकाणी अनेक सदस्यांनी केला. खर म्हणजे या विशेष योजनेच्या ज्या तरतूद केल्या जातात, खर म्हणजे हे काम एप्रिलच्या सुरवातीपासूनच कन्सलटंट नेमून त्याच इस्टीमेट लवकर तयार करुन निवीदा प्रक्रीया आपण लवकर केलीतर ही सर्व रक्कम ३१ मार्च पुर्वी खर्च पडण्यामध्ये उपयोग होतो. भारतीय जनता पार्टीची सत्ता चार वर्ष असेल तर हया सर्व विशेष योजनेचे सर्व काम करण्याचे दिवाळी किंवा डिसेंबरच्या नंतर प्रसिध्दी होवून जानेवारीमध्ये हे स्थायी समितीसमोर मंजूरीसाठी येतात त्यानंतर दोनच महीने आर्थिक वर्षचे राहते म्हणून स्थापत्य विभागाकडून जवळपास हजारो कोटीची अखर्चीत रक्कम राहते म्हणून त्या रकमेचा फुगवटा काहीवेळा दिसत असेल त्यामुळे विशेष योजनेचे जे जे प्रकल्प आपण सूचवले आहेत ते लवकरात लवकर अंमलबजावणी करुन जर पुढच्या काळात पब्लिश केलेतर ते शहरातील नागरीकांच्या उपयोगाला येतील. अजीतभाऊनी खुप चांगली चर्चा या बजेटच्या संदर्भामध्ये केली काही चांगल्या सूचना सुध्दा त्यांनी केल्या. यस बँकेच्या संदर्भामध्ये काही सूचना याठिकाणी मांडल्या, खर म्हणज यस बँकेमध्ये ज्या ठेवी ठेवल्या होत्या त्याचे जवळपास एक हजार एकशे पंधरा कोटी तीस लाख एकसष्ठ हजार एकशे पंच्चावन इतकी ठेवी यस बँकेमध्ये ठेवली होती व त्या माध्यमातून त्या बँकेकडून

आपल्याला व्याजापोटी चौ-याऐंशी कोटी अठ्ठयाहत्तर लाख नव्वद हजार चारशे सत्त्याहत्तर कोटी रक्कमेच व्याज याठिकाणी मिळाल. तसे एकूण बाराशे कोटी नऊ लाख एक्कावन हजार सहाशे बत्तीस कोटी इतकी एकूण रक्कम आपल्याला मिळाली. ती बँक अडचणीत आली होती योगायोगाने ती रक्कम आपल्याला परत भेटली. सन २०२१३-१४ पासून ते २०२१ पर्यंत बँकेच्या एफडीच्या माध्यमातून महापालिकेच उत्पन्न जर पाहीलतर २०१३ ते १७ मार्च २०२१ पर्यंत आपल्याला बँकेच्या एफडीच्या माध्यमातून आपल्याला व्याज मिळाल आहे ते २८१ कोटी ८८ लाख ६५ हजार ९७४ रु. भारतीय जनता पार्टीला २०१७ साली बहुमताने जनतेनी निवडून दिलं. १/४/२०१७ पासून खर म्हणजे एफडीची मुदत कालच संपलेली आहे. २५ मे २०२१ पर्यंत जर आपण व्याजाची रक्कम पाहीलीतर ६०१ कोटी ६९ लाख १६ हजार ५७४ रु. इतक्या मोठया व्याजाच्या स्वरुपात महापालिकेला फायदा झालेला आहे. शासनाने जीआर काढलेला आहे येणा-या काळामध्ये कुठल्याही प्रकारे प्रायव्हेट बँकेमध्ये एफडी करु नये अशाप्रकारचे शासनानेच आदेश काढले आहेत. त्यामुळे पुढच्या काळामध्ये प्रशासनाला सुध्दा कुठल्याही प्रकारच प्रायव्हेट बँकेमध्ये ठेवता येणार नाही. याठिकाणी अनेक विभाग उत्पन्नाचे आहेत. मी २०१९-२० या सालासाठी स्थायी समितीचा सभापती झालो होतो सर्व प्रशासनाच्या अधिका-यांच्या सहकार्याने, आयुक्ताच्या सहकार्याने अतीशय चांगला बजेटचा खर्च केला तसेच उत्पन्न सुध्दा वाढवण्याचे प्रयत्न केले माझ्या बरोबर असलेले त्याकाळातले सर्व स्थायी समितीचे सदस्य यांनी सुध्दा खुप चांगल्या प्रकारच सहकार्य केलं. त्यामध्ये मी काही आकडे सांगू इच्छितो. करसंकलनाचा विचार केलातर २०१७-१८ ला ३२७ कोटी ८३ लाख रुपयाच उत्पन्न करसंकलनाला मिळाल होतं. २०१८-१९ ला ३७२ कोटी ८७ लाख रुपयेच उत्पन्न मिळाल होतं. माझ्या कारकीर्दीमध्ये २०१९-२० ला ४०५ कोटी ६ लाख रुपयाच उत्पन्न मिळाल होत. २०२०-२१ ला अपेक्षीत जे आहे ते बजेटमध्ये ७५० कोटीच अपेक्षीत होतं. खर म्हणजे ९५० कोटी आपल्याला मिळणार असं गृहीत सुधारीत मध्ये आपण धरलेल आहे ७५० कोटी धरलय. परंतु आज रोजीचा करसंकलनाचा आकडा जर पाहीलातर ५२४ कोटी रु. करसंकलनमध्ये जमा झालेले आहेत. यामध्ये ९५० कोटी २०२१-२२ ला आपण धरलेले आहेत. करसंकलनमध्ये योग्य ते नियोजन करुन व्यवस्थीत मिटींग करुन खर म्हणजे ते टार्गेट ऍचिव्ह होईल अशा संदर्भात आपण काळजी घ्यावी असं मला वाटत. पाणीपट्‌टी २०१७-१८ ला ३१ कोटी, १८-१९ ला ३७ कोटी, २०१९-२० ला ४२.४ कोटी, २०२०-२१ ला ७२ कोटी ८० लाख रुपये बजेटमध्ये धरल होते पण सुधारीतमध्ये ११० कोटी ४१ लाख रुपयाच रक्कम आहे या संदर्भामध्ये सुध्दा प्रशासनाने पुढच्या काळामध्ये

जो ९० कोटीच लक्ष २०२१-२२ ला ठेवलय त्यासंदर्भात आपण योग्य तो संबंधित विभागाची वेळोवेळी मिटींग घेवून उत्पन्न वाढीच्या संदर्भामध्ये विचार करावा. याच्यामध्ये ४७ विभाग येतात त्यामध्ये भूमि जिंदगी विभागाच जे उत्पन्न आहे ते खुप कमी प्रमाणा मध्ये आहे ते खर म्हणजे वाढण्याची गरज आहे. त्याच बरोबर आकाशचिन्ह व परवाना विभागाची वर्षाची जितकी रक्कम आपल्याला मिळते ते सुध्दा दुप्पट, तीप्पट होणं अपेक्षीत आहे. भूमी आणि जिंदगीच सन २०१७-१८ ला १ कोटी ९७ लाख ६३८६३ रु.उत्पन्न मिळालेल आहे, सन २०१८-१९ ला ३ कोटी ५१ लाख २१४४६ रु. उत्पन्न मिळालेल आहे. सन २०१९-२० ला तत्कालीन आयुक्त हार्डीकर साहेबांच्या माध्यमातून आकाशचिन्ह परवान्याचे सहा.आयुक्त यांच्या माध्यमातून जे अनेक फ्लेक्स बोर्ड अनधिकृतच्या माध्यमातून कोटयावधी रुपये महापालिकेचे बुडलेले आहेत अशा खुप लोकांच्या तक्रारी होत्या, अनेकप्रकारच्या निवीदा काढल्या माझ्या कार्यकाळात ३ कोटी ६० लाख ७४३४७ रु. उत्पन्न मिळालेल आहे. सन २०२०-२१ ला ५ कोटी ३८ लाख ६४ हजार रु. उत्पन्न मिळालेल आहे. आपल्या महापालिकेचे सात आठ विभाग उत्पन्न वाढीचे आहेत, आयुक्त साहेब अनेकप्रकारच्या मिटींगा घेत असतात, माझ्या कारकीर्दीमध्ये स्थायी समितीच्या सदस्यांच्या, सर्वांच्या सहकार्याने उत्पन्नवाढीसाठीच्या मिटींगा घेतल्या होत्या आणि त्या विभागाच्या अधिकारी, कर्मचा-यांचा स्थायी समितीमध्ये सत्कार करुन त्यांचे आभार मानायचे प्रयत्न केले होते त्यामुळ त्या माध्यमातून सगळे अधिकारी प्रेरीत होवून चांगल्या प्रकारच कामकाज याठिकाणी केले. आकाशचिन्ह परवाना विभागाचे जर आपण सन २०१७-१८ चे उत्पन्न पाहीलेतर तुटपुंजी रक्कम आहे ती ३ कोटी ३२ लाख ९०३१७ रु. उत्पन्न मिळालेल आहे. सन २०१८-१९ ला ३ कोटी ८६ लाख ८९४५७ रु. उत्पन्न मिळालेल आहे. सन २०१९-२० ला ५ कोटी ४ लाख १३५९४ रु. उत्पन्न मिळालेल आहे. त्या वर्षी आम्ही निवीदा काढून बरेच केल्यामुळे सन २०२०-२१ ला १९ कोटी ५७ लाख ५९६०० रु. उत्पन्न मिळालेल आहे. मी ज्या पध्दतीने त्या विभागाचा अभ्यास केला १९ कोटीपेक्षा जवळपास ४० ते ५० कोटी आकाशचिन्ह व परवाना विभागातून उत्पन्न मिळाल पाहीजे. अजून २० ते २५ कोटीच उत्पन्न आपल्या महापालिकेच वाढू शकत. आयुक्त साहेब आपण या विभागाच्या अधिका-यांच्या मिटींगा केल्यातर हे २० ते २५ कोटीच उत्पन्न आपल्याला वर्षभरामध्ये आपल्याला वाढवता येईल. त्याच बरोबर करसंकलनाच्या माध्यमातून सन २०१६ साली लोकआदालत घेण्याचा शासनाचा निर्णय झाला. त्याच बरोबर २०१८ साली फक्त एकदाच लोक अदालत झाली. त्यामध्ये ४ कोटी ४ लाख ९५ हजार ५९२ रु. उत्पन्न मिळाल.

मी चेअरमन ६ मार्च २०१९ ला झालो त्यानंतर लगेचच लोक अदालत घेतली होती त्याच्यामध्ये ३ लाख ५३ हजार ५०० रु. चा निधी त्यामध्ये मिळाला. त्याच्यानंतर पाच लोक अदालत याठिकाणी घेतल्या. १३/६/२०१९ ला लोक अदालत घेतली त्यामध्ये २७ कोटी ९६ लाख ४४७८२ रु. इतका मोठा निधी या लोक अदालतच्या माध्यमातून प्राप्त झाला. दुसरी लोक अदालत १४/९/२०१९ ला आपण घेतली त्यात ८ कोटी ७२ लाख ३२ हजार २२९ रुपयाची रक्कम जमा झाली. तीसरी लोक अदालत १४/१२/२०१९ ला घेतली त्यामध्ये ११ कोटी ५९ लाख ४४१६ रु. इतका मोठा निधी महापालिकेला प्राप्त झाला. ८ फेब्रूवारी २०२० रोजी शेवटच्या वीस दिवसात एक लोक अदालत घेतली त्याच्यामध्ये २६ लाख ६५ हजार रुपये जमा झाले. पाच लोक अदालत मधुन एकूण रक्कम ४८ कोटी ५८ लाख २९२७ रु. इतकी मोठी रक्कम आपल्या महापालिकेला करसंकलनमधुन लोक अदालतीच्या माध्यमातून मिळालेली आहे. मगाशी अजितभाऊनी सांगीतल पाणीपुरवठयाच्या संदर्भामध्ये भामा-आसखेड असेल, आंद्र असेल याठिकाणची मंजुरी २०१४ साली मिळाली होती परंतु २०१२-१३ साली या दोन्ही प्रोजेक्टसाठी शासनाने आरक्षण १०० आणि १६७ एमएलडीचे मंजूरी दिली होती. परंतु तीन वर्षामध्ये संबंति कामासाठीचा करारनामा न केल्यामुळे ती तीन वर्षासाठी दिलेली मंजुरी लॅप्स झाली त्यानंतर २०१७-१८ साली भारतीय जनता पार्टीची सत्ता याठिकाणी आल्यानंतर शहराचे आमचे मार्गदर्शक आमदार लक्ष्मणभाऊ जगताप आणि भारतीय जनता पार्टीचे शहराध्यक्ष आणि लोकप्रिय आमदार महेशदादा लांडगे यांच्या माध्यमातून तत्कालीन मुख्यमंत्री मा.देवेंद्रजी फडणवीस यांच सरकार युतीच्या सरकारच्या माध्यमातून २०१८ साली पुन्हा १०० एमएलडी आणि १६७ एमएलडी हे दोन्ही आरक्षण पुन्हा मंजूर केले. त्यानंतर आपण पाहीलतर १९९१ साली शहराची लोकसंख्या जी याठिकाणी होती ती ५ लाख ७० हजार लोकसंख्या होती त्यावेळेला आपल्या शहरामध्ये एकच फिल्ट्रेशनचा प्लॉन्ट होता त्याची कपॅसिटी ११४ एमएलडी होती त्यानंतर २००१ साली लोकसंख्या १० लाख होती त्यामुळे सेक्टर २३ ला आपला जो फिल्ट्रेशनचा प्लान्ट आहे दोन प्लॉन्ट होते त्या माध्यमातून शहरात शासनाची जी आपल्याला पाणी उचलण्याची मन्यता होती ती २२८ एमएलडीची मान्यता होती आपण २३० ते २४० एमएलडी या शहरासाठी पाणी उचलून फिल्ट्रेशन करुन देत होतो. त्यानंतर २०११ साली आपल्या शहराची लोकसंख्या पाहीलीतर ती १७ लाख ३० हजार लोकसंख्या होती. त्यावेळी सेक्टर २३ चे टोटल चार प्लॉन्ट आपले वर्कींगला होते. आपल्याला ४२८ एमएलडी पाणी उचलण्याची शासनाची मंजूरी होती. २०१८ सालापासून आपण ४६० एमएलडी पाणी उचलत होतो. २०२१ साली

जर आपण पाहीलतर आज सुध्दा ४२८ एमएलडीची मंजूरी शासनाची आहे आणि जवळपास आपण ५०० एमएलडी घेवून या शहराला पाणीपुरवठा देतो. एक दिवसाआड शहराला आपण पाणीपुरवठा देतो तर २०११ ची लोकसंख्या पाहीलीतर १७.३० हजार होती आजची लोकसंख्या आपण पाहीलीतर ती २८ ते ३० लाख लोकसंख्या आहे. आपल्याला पुढच्या काळात शहराला रोज व्यवस्थीत प्रेशरनी पाणी दयायच आपण याठिकाणी ठरवलतर आपल्याला हे भामा-आसखेड आणि आंद्र धरणाच पाणी आणण अत्यंत गरजेच आहे. आयुक्त साहेबांनी सुध्दा त्यासंदर्भामध्ये लक्ष घालून हा प्रोजेक्ट लवकरात लवकर कस आणता येईल या संदर्भामध्ये प्रशासनाने सुध्दा प्रयत्न करावेत, त्यासाठी सर्व सभागृह मदत करेल असा मला याठिकाणी विश्वास वाटतो. त्याच बरोबर आंद्र आणि भामा-आसखेड साठी मंजूरी मिळाल्यानंतर या दोन तीन स्थायी समितीच्या कार्यकाळामध्ये डब्ल्यूटीपी असेल, पाईपलाईन असेल, जॉकवेल असेल, पंप असेल अशाप्रकारची जवळपास ३०० ते ४०० कोटीची काम याठिकाणी आपाण काढलेली आहेत. येणा-या काळामध्ये अजून २०० एमएलडीचा डब्ल्यूटीपी त्याला लागणारा पंप, जॅकवेल हे आपल्यला पुढच्या काळामध्ये सुध्दा करायच आहे. १६० कोटीची पाईपलाईनच्या कामाची वर्कऑर्डर दिलेली आहे. त्या कामकाजाला सुरवात होईल तस लवकरात लवकर या शहराला पाणी येइल यासाठी आपल्या सर्वांना मिळून काम करायच आहे. आंद्र आणि भामा-आसखेडच पाणी आण्ण्यासाठी आपल्याला उशिर लागला असं वाटत होत म्हणून आपला जो से.२३ चा प्लान्ट आहे त्याला जी कपॅसिटी आहे ती ५०० एमएलडी फिल्ट्रेशन करु शकतो अशा संदर्भातली फक्त कपॅसिटी आपल्याकडे असल्याने आपल्या त्यावेळेला तत्कालीन आयुक्त हार्डीकर साहेबांशी टेक्निकल गोष्टीची चर्चा करुन २४X७ चा कन्सलटंट आहे त्याला त्याठिकाणी नेवून अरग्यूमेंट करण्याच त्याठिकाणी ठरवल त्याच जवळपास ३६ कोटीच टेंडर मागच्या तत्कालीन स्थायी समितीचे अध्यक्ष संतोषजी आण्णा लोंढे यांनी ३६ कोटीच टेंडर मंजूर केल त्याची वर्कऑर्डर प्रोसेसमध्ये असेल. १०० एमएलडीची क्षमता वाढवण्याची कपॅसिटीच जे ३६ कोटीच काम याठिकाणी काढल ते काम नोव्हेंबर, डिसेंबरच्या अगोदर करता आलतर शहराला सुध्दा १०० एमएलडी फिल्ट्रेशन प्लॉन्ट कपॅसिटी वाढवून आपल्याला मिळू शकतो अशा संदर्भामध्ये तो प्रयत्न आपण करावा.  त्याचबरोबर उत्पन्न वाढीचे जे पाच सहा विभाग आहेत त्याच बरोबर आपल्या महापालिकेत लेखापरीक्षण विभाग आहे, खर म्हणजे अकृतीबंध शासनाची मान्यता मिळून आपल्याकडे प्राप्त झालेल आहे त्याची अंमलबजावणी चालू करायला आपण सुरवात केलेली आहे. लेखापरीक्षणामध्ये जर पाहीलतर अनेक वर्षापासूनचे

लेखापरीक्षण पेन्डींग आहेत म्हणून त्या विभागाला अकृतीबंध प्रमाणे योग्य तो स्टाफ जर दिलातर त्या लेखापरीक्षण मधुन सुध्दा कोटयावधी रुपयाची वसूली महापालिकेला होवू शकते त्या वसूलीमध्ये अनेक अधिकारी, कर्मचारी सेवानिवृत्त होवून गेलेले आहेत त्यांचे अक्षेप अजून तसेच पेन्डीग आहेत कागद पुर्ण केलेले नाहीत असे कितीतरी शेकडो कोटी रुपये आपल्याला वसुलपात्रमध्ये महापालिकेला इन्कम मिळू शकतं तरी त्या संदर्भात योग्य तो स्टाफ आपण वाढवून दिलातर इन्कम वाढू शकते. मगाशी मी सांगीतल्याप्रमाणे रस्ताखोदाईच धोरणाची जर आपण अमलबजावणी केलीतर, रस्ताखोदाईमध्ये अनेकप्रकारच्या चो-यामा-या शहरामध्ये होतात त्याला प्रतीबंद लागून त्यामध्ये सुध्दा कोटयावधी रुपयाचे इन्कम मिळू शकते. त्याच बरोबर हे बजेट करत असताना ईंजिनीअर लोकांची थोडीशी त्रुटी मी सांगू इच्छितो मी बारकाईने लक्ष देवून त्याचा अभ्यास केला होता. आपण बजेट करत असताना सर्व पक्षाचे सन्मा.नगरसेवक असतील, पदाधिकारी असतील प्रत्येकाला वाटते माझ्या वॉर्डामध्ये चांगल्याप्रकारचा निधी मिळावा माझ्या कार्यकाळामध्ये चांगल्याप्रकारचे विकास काम व्हावेत अशाप्रकारची प्रत्येक नगरसेवकाची इच्छा असते. अनेकांनी सांगीतल की आपल्याला पाच वर्षानी परीक्षा दयावी लागते, अधिका-यांना परीक्षा दयावी लागत नाही हे खर आहे, म्हणून काम करत असताना आपल्या प्रभागाला चांगला निधी मिळाला चांगला विकास जर त्याठिकाणी झालातर लोकप्रतिनीधी म्हणून पुन्हा निवडून येण्यामध्ये प्रत्येक नगरसेवकाला त्या त्या भागामध्ये, त्या त्या प्रभागामध्ये त्या त्या पक्षामध्ये येण्यासाठी त्यांना मदत होवू शकते म्हणून तरतूद करत असताना खर म्हणजे अनेक अनावश्यक असे हेड याठिकाणी ओपन केले जातात, अनावश्यक तरतूद याठिकाणी दिली जाते परंतु शेवटपर्यंत त्या हेडच टेंडर काढल जात नाही त्या तरतूदीचा ऊपयोग केला जात नाही. नंतर डिसेंबर, जानेवारीचा कार्यकाळ असतो, स्थायी समितीचे शेवटचे दोन महीने राहीलेले असतात म्हणून पाहीजे त्या ठेकेदाराला ती तरतूद वर्ग करण्याची प्रक्रीया होत असते. त्यामुळे त्या संदर्भामध्ये आयुक्त साहेबांना माझी विनंती आहे की आपण अशा अनावश्यक तरतूद जी हेड ओपन केलेत, अनावश्यक तरतूदी ज्या केल्यात त्या संदर्भात थोडस शोधकार्य कराव असं मला वाटत. हे बजेट अतीशय चांगल सादर केलेल आहे, खुप वेळ झालेला आहे त्यामुळ मी या बजेटच मनापासून प्रशासनाच आणि सन्मा.सभापतींच आणि स्थायी समितीच मनापासून अभिनंदन करतो या बजेटच मी याठिकाणी स्वागत करतो आणि थांबतो, जयहिंद जय महाराष्ट्र.

मा.विकास डोळस - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. ऑनलाईन उपस्थित असलेले सर्व नगरसेवक नगरसेविका. आज आपल्या समोर सन २०२१-२२ चे मुळ अंदाजपत्रक स्थायी समितीचे चेअरमन मा.नितीनजी लांडगे यांनी सादर केलेल आहे. अंदाजे ५५८८ कोटीच हे बजेट आहे. बजेट मधील महत्वाचे जे उपक्रम आहेत त्याच्यासाठी तरतूद केली ते उपक्रम म्हणजे पिंपरी वाघेरे येथे शिवाजी महाराजांचा पुतळा उभारणे, बो-हाडेवाडी येथे १४० फुट उंचीचा संभाजी महाराजांचा पुतळा उभारणे, पुणे-नाशिक रस्ता भूसंपादन करणे, चिखली येथे हॉस्पिटल बांधणे. आमचा जो दिघी-बोपखेल प्रभागाचा महत्वाचा आणि ज्वलंत प्रश्न होता बोपखेलचा ब्रीज बांधणे. पांजरपोळ चौक ते आळंदी रस्ता विकसीत करणे त्यामुळे ऐअरपोर्टला जी कनेक्टीव्हीटी आहे त्यासाठीचा वेळ वाचणार आहे त्यासाठी तरतूद ठेवलेली आहे आणि मोशी येथे बहुउद्देशीय स्टेडीयम बांधणे असे बरेचसे चांगले चांगले प्रोजेक्ट या बजेटमध्ये आहेत, ब-याचशा सदस्यांनी आपली मत मांडली आहेत आणि ही लोकशाही आहे त्याच्यामुळे प्रत्येकाला चांगल किंवा वाईट मत मांडण्याचा अधिकार आहे आणि जरी एखादयाच मत मला पटत नसेलतरी त्या मताचा आदर करणं म्हणजे ही लोकशाही आहे. पाणीपुरवठा विभागाबद्दल आता ब-याचशा सदस्यांनी आपली मत व्यक्त केली, आपल्या ज्येष्ठ नगरसेविका मंगलाताईनीही मत व्यक्त केल त्याच्यामध्ये थोडस सांगायच आहे की त्यांनी पुणे महानगरपालिका आणि पिंपरी चिंचवड महानगरपालिका कम्प्यारीजन केलं. पाणी विषयाशी मी नेहमी बोलतो आणि माझ्या भागात नेहमी पाण्याची तक्रार असते पण पुणे महानगरपालिका आणि पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच जेव्हा कम्प्यारीजन करतो तेव्हा त्याच्यामध्ये बरीचशी तफावत आहे. आपल्या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेला सद्दयस्थितीत फक्त एकच सोर्स आहे तो म्हणजे पवना धरणाचा आणि पुणे महानगरपालिकेशी कम्प्यारीजन केलतर पुणे महानगरपालिकेला वरसगाव, टेमघर, खडकवासला, पानशेत आणि आता भामा-आसखेड अशा चार स्त्रोतातून पाणी मिळतं. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची लोकसंख्या २८ ते ३० लाखाच्या घरात आहे, पुणे महानगरपालिकेची लोकसंख्या ही ५० लाखाच्या घरात आहे आणि आपण जे पाणी युज करतो ते एमआयडीसीच पाणी धरुन ५३० एमएलडी दररोज युज करतो, पुणे शहराच जर बोलायच झालतर दररोज १६०० एमएलडी पाणी युज करतात त्याच्यामुळ हे कम्प्यारीजन होवू शकत नाही. त्या त्यावेळी तत्कालीन जे सत्ताधारी होते त्यांनी भविष्याचा वेध घेवून पर्यायी स्त्रोताची जर व्यवस्था केली असतीतर आज जो शहराचा पाण्याचा प्रश्न ज्वलंत आहे तो झाला नसता पण मी आमदार महेशदादा लांडगे आणि आमदार लक्ष्मणभाऊच

खरच मनापासून अभिनंदन करतो की त्यांच्यामुळे आपल्याला जो कोठा आहे तो परत मंजुर झालेला आहे. आंद्र धरणातून १०० एमएलडी आणि भामा-आसखेड धरणातून १६७ एमएलडी आणि चिखली येथे १०० एमएलडी क्षमतेच जलशुध्दीकरण केंद्राच काम चालू आहे. पर्यायी स्त्रोतातून पाणीपुरवठा योजना राबवण्याच्या कामास १८३ कोटी तरतूद ठेवलेली आहे आणि रावेत अशुध्द जलउपसा केंद्र व से.क्र.२३ येथील जलशुध्दीकरण केंद्रानी क्षमता वाढवण्यासाठी २३ कोटीची तरतूद ठेवलेली आहे. त्यामुळे पाणी प्रश्नावरती आपण निश्चितपणे या काळात चांगल काम केलेल आहे. आपल्या बजेटमध्ये विवीध वर्गासाठी, विवीध घटकांसाठी विवीध योजना राबवल्या जातात मग नागरवस्ती विभाग असेल ते राबवते त्याच्यामध्ये मागासवर्गीय कल्याणकारी योजना असतील, दिव्यांग कल्याणकारी योजना असतील, इतरही कल्याणकारी याजना आहेत. एवढ मोठ बजेट असून ते खर्ची होत नाही आपण जर नीट आकडेवारी बघीतलीतर त्याच्या खोलात जातो का. या चार वर्षात मी नश्चितपणे मांडल आहे पण त्या पध्दीने त्या घटकापर्यंत त्या योजना पोहच नाहीत, आपण त्याची ॲडव्होटाईज टीव्हीवर केली पाहीजे, वर्तमानपत्रामध्ये केली पाहीजे, होर्डींग्ज लावा, जस आपण पाण्याच बील पोहचवतो, लाईटच बील पोहचवतो त्याप्रमाणे माहीती दया. महीलांच्या सक्षमीकरणासाठी आपण वेगवेगळया योजना राबवतो. मला कोणत्या एखादया विशिष्ठ ठेकेदाराबद्दल बोलायच नाही पण पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्य आपण महीलांना प्रशिक्षण देण्यासाठी एक संस्था नेमलेली आहे पण जेव्हा आपण महीला सक्षमीकरणाच्या गोष्टी करतो, महीलाना प्रशिक्षण आपण देतो. आज नगररचना विभागास भूसंपादनासाठी १५० कोटीची तरतूद आहे. आयुक्त साहेब मला तुम्हांला नगररचना विभागाबद्दल अवर्जुन सांगायच आहे नगररचना हा असा विभाग आहे की ते फक्त ठराविकच काम करतात आमचा दिघी प्रभाग असा होता की तीथ एकही आरक्षण ताब्यात आल नव्हते., माझी स्मशानभूमी संपादीत नव्हती. निवडून आल्यानंतर पहील्यांदाच मला शहर सुधारणामध्ये संधी मिळाली आणि पहील्या किंवा दुस-या मिटींगला मी भूसंपादनाचे विषय शहर सुधारणा मार्फत आपल्या जीबीला आणले. आतापर्यंत एकही आरक्षण भूसंपादन झालेल नाही. नगररचनेच्या अधिका-यांच लक्ष हे फक्त मलईवाल्या फाईलकड असतं त्याच्यामुळ त्या विभागाकड आपण जरुर लक्ष दया. ही पण काम आवश्यक आहेत पण भूसंपादन झाल नाहीतर विकास होणार नाही, आपल्याला तीथ प्रोजेक्ट राबवता येणार नाही. खेदान सांगाव लागत मी वारंवार उल्लेख केला नगररचना विभाग हा दलालांचा आड्डा आहे. मगाशी ताईनी उल्लेख केला की झोपडपट्टी निर्मुलन एसआरएकडन म्हणजे साध्या

घरातून चांगल्या घरामध्ये आणलं. पण झोपडपट्टी निर्मुलन कड आपण वेगळया अँगलन बघीतलना आज जर पालीकेच्या शाळेत कोणती मुल येत असतीलतर ती झोपडपट्टीमधील कामगारांचीच मुल येतात. जी सधन कुटूंबातील मुल आहेत ती अजिबात पालीकेच्या शाळेत येत नाहीत. मग आपल्या पालिकेच्या कर्मच-यांचा मुलगा पालिकेच्या शाळेत शिकतो असं अजिबात होणार नाही. जर आपण आपली शिक्षण व्यवस्था बळकट केली आणि दिल्लीच्या धरतीवर जर आपल्या शाळा चांगल्या केल्यातर आणि त्या मुलाला भविष्य घडवण्यासाठी जर तयार केलतर भविष्यात या झोपडपट्टया राहणार नाहीत हे व्हिजन आपल्याकड असल पाहीजे. मगाशी ऊहापोह झाला, बजेट असल्यानंतर प्रत्येकाला वाटत की माझ्या प्रभागात बजेट पाहीजे, मला बजेट कमी आलं, सत्ताधा-यांनी ते म्हणल, विरोधी पक्षाच्या नगरसेवकांनीही ते म्हणल पंकजनी म्हणल की माझ्या प्रभागामध्ये बजेट नाही, आमच्या ज्येष्ठ नगरसेवीका आहेत त्यांनी प्रांजळपणे कबुल केल की आमच्या प्रभागात बजेट कमी आहे. पण वेळ असते ती फार बलवान असते. विकास कामासाठी ज्यांना वॉकआऊट कराव लागल होत त्यांनी दुस-या टर्मला महापौर होवून १५०० कोटीचा निधी घेवून च-होलीचा कायापालट त्यांनी आमदार महेशदादाच्या माध्यमातून केला. पाच वर्षात जर काय केल असेल असं जर सभागृहात कुणी विचार असेलतर समाविष्ठ गावाला विचारा मी स्वतःला खरच भाग्यशाली समजतो की आमच्या भागाला महेशदादा सारखा आमदार मिळाला. ज्या दिवशी महेशदादा लांडगे भोसरी मतदारसंघाचे आमदार झाले त्याच दिवशी समाविष्ठ गावाच्या विकासाची मुहूर्त रोवली गेली आणि शिक्कमोर्तब २०१७ पासून चालू झाल. पहील्यावेळेलाच नितीन आप्पाला पद मिळाल जस आपण म्हणतो दापोडीवरुन आल्यानंतर आपण पिंपरी चिंचवडमध्ये आलो आल्याचा भास होतो, दिघीला या तीथून आल्यानंतर निश्चित पिंपरी चिंचवड मध्ये आल्यासारखा भास होईल. आज च-होलीमध्ये जर गेलतर च-होलीचे रस्ते बघा. खरोखर बाकीचे जे वॉर्ड आहेत त्यांची डेव्हलपमेंट आहे आणि निश्चितपणे समाविष्ठ गावचा एक नागरीक म्हणून मला त्याचा अभिमान आहे. समाविष्ठ गावाना जर सन्मान कोणत्या काळात भेटला असेलतर भारतीय जनता पार्टीच्या काळात या पाच वर्षात भेटला असेल कारण की दोन महापौर, उपमहापौर आहेत, स्टॅण्डींग चेअरमन, कितीतरी समित्यांचे सभापती पद हे समाविष्ठ गावामध्ये या काळात दिल गेलेल आहे. नाहीतर समाविष्ठ गावातले नगरसेवक पण इथ विकास कामासाठी भांडलेले आहेत. त्यानंतर राहूल जाधव यांच्या माध्यमातून चिखली येथील काम बघा मग आपल्या लक्षात येईल की समाविष्ठ गाव पण पिंपरी चिंचवडचा भाग होता त्यांना आपण विकासापासून वंचित

ठेवलय. त्याच्यामुळ पाच वर्षात भारतीय जनता पार्टीने काय केल काय नाही केल याच्यापेक्षा याच्या अगोदर आपण समाविष्ठ गावाना विकासापासून का वंचित ठेवल ह्रा प्रश्न तत्कालीन सत्ताधा-यांनी स्वत:ला विचारल पाहीजे. बजेटच मी मनापासून स्वागत करतो त्याचवेळी आयुक्तांना माझी नम्रपुर्वक एक मागणी पण आहे की सत्ताधारी सदस्य असतील किंवा विरोधीपक्षाचे असतील शेवटच वर्ष आहे पायाभूत सुविधासाठी तरतूद कमी पडत असेलतर रोड असतील किंवा ड्रेनेज लाईन असतील तर ती तरतूद उपलब्ध करुन दयावी. माई, बोलण्याची संधी दिली त्याबद्दल मनापासून आभारी आहे, धन्यवाद.

मा.हर्षल ढोरे - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. ऑनलाईन उपस्थित असलेले सर्व नगरसेवक नगरसेविका. आज या ठिकाणी आपले चेअरमन नितीनभाऊ लांडगे यांनी २०२१-२२ च बजेट सादर केल त्याबद्दल आपल अभिनंदन. त्याचबरोर मा.महापौर असतील, आयुक्त साहेब असतील त्या बरोबर पक्षनेते असतील तुमचही सर्वांच अभिनंदन आहे बजेट हे स्वागर्ह आहे, या बजेटमध्ये चांगला विषय घेतलेला आहे ते आमचे मित्र तुषार हिंगे यांनी सांगितल की संभाजीमहाराजांचा पुतळा आपण याठिकाणी उभारणार आहोत तर त्या पुतळयासाठी पक्षनेते असतील, विरोधी पक्षनेते असतील, गट नेते असतील, महापौर असतील, आयुक्त् साहेब असतील आपण ह्रा पुतळा पुर्णत्वास नेण्यासाठी जी काही गरज लागेल, इतर सर्व सभागृहातील नगरसेवक, नगरसेक्कि असतील यांनी सगळयांनी ह्रा पुतळा पुर्णत्वास नेण्यासाठी जे काही सहकार्य लागेल ते कराव अशीही माझी तुम्हांला विनंती राहील. पाणीपुरवठयासाठी जवळ जवळ २५० कोटीच बजेट आज इथ मांडलेल आहे. माई तुम्ही पाण्यासाठी कायमच धडाडीने आपल्या शहरासाठी भांडत आलेला आहात आणि मला खात्री आहे की या बजेट नंतर आपण चांगल्याप्रकारे पाणी अपल्या पिंपरी चिंचवड शहराला पुरवण्यात यशस्वी होवू अशी मी तुमच्याकडन शंभर टक्के खात्री बाळगतो. त्याचप्रमाणे शिक्षणमंडळासाठी आपण २२२ कोटीचा निधी आपण आणलेला आहे. मला खंत वाटते की एवढ चांगल भेटत असताना आपल्या मनपाच्या शाळा बघतालतर खरोखरच शाळांची अवस्था खुप भयानक आहे. माझे मित्र अभिषेक बारणे यांनीही सांगीतल की या शाळा जर प्रायव्हेट चांगल्या संस्थाला मग ती कोणतीही संस्था असू देत त्यांना जर चालवायला दिलीतर आपल्या स्वत:ची मुलही आपण त्यामध्ये भरती करु, ॲडमीशनला लाईन लागेल अशाप्रकारच काम आपण तीथ करु शकतो, या तुमच्या काळात या गोष्टी आपण नक्कीच करु शकतो, बजेट खुप चांगल्याप्रकारे आहे पण शिक्षणमंडळामध्ये खुप गलथान कारभार चालतात. ज्या गोष्टी झाल्या नाही पाहीजे त्या होतात त्याच्यामुळे हे बजेट चांगल असताना चांगल

कस होईल याच्याकड आयुक्त साहेब आपण प्रामुख्याने लक्ष दिल पाहीजे. पर्यावरण, जलपर्णी काढण्यासाठी आपण चांगली तरतूद करतो आणि जेव्हा मी २०१७ ला नगरसेवक झालो त्यावेळेस मला आठवतय की त्यावेळेस ४८ लाखाची वर्कऑर्डर जलपर्णी काढण्यासाठी हार्डीकर साहेबांनी दिली होती. माई आपण त्यावेळेस होता आणि आयुक्त साहेबांना निमंत्रीत केल की तुम्ही या. आपण एवढे ४८ लाख रुपये जलपर्णीसाठी खर्च करतो आणि आयुक्त साहेब स्वतः आल्यानंतर ते पाचच मिनीटात आपल्या समोरुन ते निघून गेले कारण मच्छरच एवढे होते की भयानक परिस्थिती होती. त्यानंतर त्यांनी त्याच गांभीर्यपणा ओळखला आणि त्यांनी सगळया अधिका-यांना बोलवून त्याच्यावरती लगेच कारवाई केली. त्याच्यानंतर २०१८-१९ आणि २०२० ला माई असतील, संतोष कांबळे असतील प्रभाग क्र. २९ मधले, ३२ मधले, ३१ मधले सर्व नगरसेवक उपस्थित आहेत त्यांना माहीती आहे की त्यावेळेस अजीबात मच्छरांचा त्रास झाला नाही. परंतु आता जे आपण बजेट मांडलेल आहे या बजेटमध्ये मागच्या याच्यात ९६ लाखाच टेंडर काढल फक्त जलपर्णी काढण्यासाठी, ती जलपर्णी काढण्यासाठी जे टेंडर काढल, माईनी स्वतः पाहणी केली, आम्ही सगळयानी पाहणी केली प्र.क्र. २९, ३१, ३२ मधील सगळया नगरसेवकांनी याठिकाणी पाहणी केली. टेंडरची एवढी अमौटं देवून सुध्दा जर एवढ मच्छर होत असतीलतर याच सभागृहामध्ये मी बोललो होता की तुम्ही पुर्व नियोजन करा तरी पण आपण जलपर्णी हाटवण्यात यशस्वी ठरलेलो नाही. त्या ठेकेदाराला आम्ही बोलवून घेतल त्याला आम्ही चार दिवसाची मुदत दिली तरी पण तो पाला काढण्यात यशस्वी नाही झाला. काल आमची सर्व नगरसेवकांची मिटींग झाल्याच्या नंतर रॉय सरांना प्रश्न विचारला तो ठेकेदार कुठे आहेतर तो ठेकेदार मुंबईला बसलाय. नंतर आम्ही जे पाला काढतात त्या कर्मचा-यांना विचारल्यानंतर परिस्थिती अशी लक्षात आली आयुक्त साहेब काची म्हणून ज्यांना तो पाला काढण्याच टेंडर दिलय त्यांना डिसेंबरनंतर तीन महीन्याचा त्या ठेकेदारानी अजूनही पगार दिलेला नाही. तो माणुस अक्षरशः आज रडकूंडीला आला होता, सहा.आरोग्य निरीक्षक भोसले साहेब आहेत त्यांना विचारलतर ते म्हणतात की कामतर चालू आहे आम्ही त्याला माणस वाढवायला लावली, तो म्हणला माणस वाढवू शकत नाही कारण आक्षरशः माझ्या बायकोच गंठण गहाण ठेवलय अस तो म्हणतो, माझ्याकडे जेवढे होते तेवढे दिले मग संबंधित ठेकेदार बील देवू शकत नाहीतर काय उपयोग आहे. पर्यावरण विभाग काय करतय, आपण आरोग्य विभागाकड ही जबाबदारी दिलीच नाही पाहीजे. पर्यावरण विभाग काय फक्त टेंडर काढण्यासाठी आहे का. पर्यावरण विभाग म्हणजेच जलपर्णी आहे, जलपर्णी हा विषय पर्यावरणाचा आहे.

अस जर असेलतर पर्यावरण विभाग हा रद्द करावा आमच्या सर्वाची विनंती आहे की तुम्ही हा जलपर्णीचा विषय तात्काळ मार्गी लावा तर त्याला बजेट दया नाहीतर पुढच्या वर्षी हा बजेटमध्ये विषय घेवू नका, मा.महापौर आपण स्वत: याकडे लक्ष दयाव एवढीच विनंती करतो, धन्यवाद.

मा.राहूल कलाटे - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. ऑनलाईन उपस्थित असलेले सर्व नगरसेवक नगरसेविका. गेल्या तीन चार तासापासून आपण बजेटवर चर्चा करतो. नितीनजी लांडगे यांनी बजेट वाचल ५५७८ कोटी आरंभीच्या शिल्लकेसह आणि पुढे २०२२ ला २.४३ कोटी शिल्लक राहीतील अशाप्रकारच बजेट नितीनजीन या सभागृहात सादर केल. विकासन सांगीतल की लोकशाही आहे तोपर्यंत सगळ आहे, लोकशाहीन सगळयांना मत मांडायच आहे, मला वाटत शेवटच्या वर्षीच भारतीय जनता पार्टीला लोकशाही आठवली कारण की मागचे तीन्ही बजेट जर पाहीलेतर एका सेकंदात मंजूर झालेले बजेट आहे. मा.महापौरामुळे निश्चितच आज चार वर्षात सर्वाना आपआपल मत मांडायची या सभागृहात संधी मिळाली. हे बजेट सादर करत असताना भारतीय जनता पार्टीच्याच नगरसेवकांनी त्यात संदीप असेल, पालांडेताई असतील आणि विशेष म्हणजे मोरेताई त्या सर्वात सिनीअर आहेत त्यांनीच या चार वर्षात शहरात काय झाल आणि काय चालल हे सांगीतल. प्रत्येकजण आपआपल्या प्रभागातून निवडून येतो निवडून आल्यानंतर त्याला इथ आल्यानंतर असं वाटत की माझे जे प्रभागामधले प्रश्न आहेत ते सुटावेत. सत्ताधा-यांना सुध्दा वाटत की आपण शहरासाठी काहीतरी कराव म्हणून ते करत असतात. कुणी सांगीतल की आम्ही सकाळी यायचो ते रात्रीच जायचो त्यानंतर त्यामुळे आमच डेडीकेशन होत त्यामुळ सगळा अभ्यास व्हायचा मला वाटत नितीनजी हे घेण्यासारख आहे. स्थायी मध्ये काम करत असताना प्रत्येकालाच त्या कसोटीमध्ये उतराव लागत. प्रत्येकजणाची भावना असते की आपआपल्या भागात फंड घेवून जायचे आणि त्या त्या भागातली काम करायची परंतु हे होत असताना माई, माझी विनंती असेल आपल्याला की स्थायीने पण काही उपसूचना दिल्यात आज सुध्दा याठिकाणी सदस्य उपसूचना देतील. नामदेवराव आपणही दुजाभाव करु नका ही काही कुणाच्या घरची काम नाहीत, शेवटच वर्षे आहे, प्रत्येकाला वाटत की माझ्या भागात काम व्हाव त्यासाठी तो आटापीटा करत असतो. संदीपनी सांगीतल मी आणल्या तशाच उपसूचना घ्या परंतु आपण सांगीतल की तुम्हाला ज्या ज्या उपसूचना दयायच्या आहेत त्या तुमच्या तुमच्या प्रभागातल्या दया. परंतु आमच्याच प्रभागात पैसे कमी पडत असताना परत आम्ही आमच्याच प्रभागातून पैसे काढून हेड ओपन करायचे

तीथपर्यंत ठिक आहे पण तरतूद कशी करणार. कुठतरी सत्ताधा-यांना पण एकत्र बसाव लागेल, बाकीचेही सदस्य आहेत त्यांना कशाप्रकारे फंडस मिळतील हे देखील पहाव लागेल. आज मी ज्या भागात आहे तो ड प्रभाग आहे. आपण जर प्रत्येक प्रभागाच बजेट पाहीलतर सर्वात कमी बजेट हे ड प्रभागाला दिलेल आहे, फक्त २५ कोटी रुपये. आता विकासभाऊनी सांगीतल की तुम्ही या च-होली भागात आणि पहा कशाप्रकारची डेव्हलपमेंट केलेली आहे. शहराच्या एका बाजुला प्रचंड मोठया प्रमाणात खर्च केला गेला आणि दुस-या बाजुला आमच्याकड आम्हांला निधीसाठी झगडाव लागल वेळप्रसंगी राज्यशासनाकड जाव लागल. आमच्या भागातले मागच्या पाच सात वर्षातले जर तुम्ही सगळे आकडे पाहीलेतर मग ते बिल्डींग परमीशनचे काढा, टॅक्सचे काढा, सगळे काढा सर्वात जास्त प्रमाणात महापालिकेला महसूल कुणी दिला असेलतर आमच्या भागाने दिला आहे. मग तो जुना असेल किंवा नवीन असेल परंतु त्या प्रमाणात आमच्याकडे काम झाले नाहीत. आम्हांला संघर्ष करुन एक एक काम मंजूर करुन घ्याव लागल का की ज्याप्रकारे आता सांगीतल की आमच्या भागात फक्त राष्ट्रवादी आहे म्हणून आम्हांला निधी मिळत नाहीतर हा आरोप आम्हीही करु शकतो परंतु फक्त आरोप करण्यापेक्षा याठिकाणी येवून संघर्ष करुन त्या भागात आम्ही देखील काही प्रमाणात काम करु शकलो. हे करत आसताना ड प्रभागातली दोन गाव ही स्मार्ट सिटीत जातात आणि त्या स्मार्ट सिटीच काय झाल तेच तेच तेच तेच काढत बसण्यापेक्षा सभागृहाला ते सगळ ओपन सिक्रेट आहे. परंतु त्या गावामध्ये हाजारो कोटीचा निधी आणि राहीलेल्या निलख, वाकड, ताथवडे, पुनावळे हया गावाना संघर्ष. हा देखील कुठेतरी विचार महापौरांनी आणि आयुक्तांनी करावा अशी मी याठिकाणी विनंती करतो. आमच्या भागात आता अजीतरावानी सांगीतल की त्यांच्या भागात एक मुलगा त्याला १६ कोटीच इंजेक्शन लागत तसाच एक युवान कामठे आमच्या पुनावळे भागात आहे तर माई माझी देखील विनंती आहे की अशाप्रकारे ज्यावेळेस आरोग्यासी निगडीत, लोकसहभागामधुन किती पैसे उभे करु शकतो. ते १५-२० कोटीचे इंजेक्शन आहेत असं असताना आपल्याला जर महापालिका स्तरावर अशा सर्वसामान्य कुटूंबातल्या मुलांना आपण मदत करु शकलोतर ही देखील आपल्या शहरातील आणि आपल्या भागातील नागरीकांना निश्चितच मदत होईल. शिक्षणमंडळावर बरेचसे सदस्य बोलले, आयुक्त साहेब तुम्ही एकदा सगळया शिक्षणमंडळाच्या शाळेत व्हिजीट करा तुम्ही जर या शिक्षणमंडळातल्या शाळेतील मुल जर पाहीलेतर निश्चितच मला असं वाटत की या भागातील गोरगरीब, कामगार, झोपडपट्टी, चाळवजा ठिकाणी राहणारे लोकांची मुल आहेत आणि खरच या मुलांना

आपल्याला शिक्षण दिल पाहीजे, ही पिढी घडवली पाहीजे हेच आपल्या शहराच पुढ भविष्य आहे. परंतु काय होत आज आपण पुढच्या वर्षीसाठी २२२ कोटीचा निधी ठेवला, मागच्या वर्षी किती होता त्यातला किती खर्च झाला हे तुम्हांला ३१ तारखेला कळेल की किती काम शिल्लक आहे. कारण की वर्षभर कोरोनाच होता म्हणजे कोरोनाचा हेड सोडला की मला वाटत नाही सगळया हेडवर अखर्चीत रक्कम शिल्लक असेल आणि ती अखर्चीत रक्कम जर आपण बसून त्यातली काही शिल्लक रक्कम जर सर्व नगरसेवकांना त्या त्या भागाच्या प्रमाणात असेल किंवा कामाच्या प्रमाणात असेल ती जर आपल्या माध्यमातून दिली गेलीतर निश्चित सर्व नगरसेवकांना आणि या सर्व शहरातल्या जनतेला त्याची मदत होइल. तुषार हिंगेनी सांगीतल की क्रिडांगण पीपीवरती करा, हार्षलनी सांगीतल की शाळा तुम्ही सिम्बायोसीस सारख्या संस्थेबरोबर टायअप करा. दिल्लीतल्या सर्व शाळा आपल्या शहरातले सत्ताधारी आणि आम्ही, आम्ही आमच्या खर्चाने गेलो त्यांच्या बरोबर नव्हतो. त्या शाळा पाहील्यानंतर महापालिका किती चांगल्या प्रकारे शाळा चालू शकते याच ते उदाहरण होत. आज तुम्ही आमच्या भागात आलाततर एका एका शाळेत दोन-दोन, तीन-तीन हजार मुल आहेत आणि शहरातील काही भागामध्ये महापालिकेच्या शाळेत विदयार्थी नाहीत तर हा विरोधाभास का. आपल काय झाल सर्वात जास्त भ्रष्टाचारी कुठला विभाग तर शिक्षणमंडळ असं आता हर्षल ढोरेनी पण सांगीतल, म्हणजे मी नाही सांगत हे याठिकाणी सर्वपक्षीय नगरसेवक हे बोलतात, का बोलतात आपणही कुठतरी खोलात जा कारण की आपण बजेट देत असताना एका बाजुला आपण प्रचंड मोठया प्रमाणात बजेट देतो आणि दुस-या बाजुला आपण अक्षरशः त्या नागरीकांना, लोकांना आणि त्यांच्या प्रतिनीधीना याठिकाणी संघर्ष करावा लागतो. बजेट पुस्तकजर पाहील असेलतर मी आकडे सांगणार नाही सगळयानी ते सांगीतलेच आहे एका बाजुला सर्व जमा आणि दुस-या बाजुला सर्व खर्च हे होत असताना करसंकलन ९५० आणि बांधकाम परवानगी ५२० कोटी जमा तुम्ही आज गृहीत धरलेली आहे. आज युनीटाईमकोड आला आहे आपल्याला माहीत नाही बांधकाम परवानगीच पुढे काय होणार ज्याप्रमाणे आज आपल्याला जीएसटी त्यांच्याकडन येत होती त्या प्रमाणे बांधकाम परवानगीचे अर्धे पैसे आपल्याला राज्यशासनाला दयायचेत. म्हणजे आज आपण ५२५ कोटी गृहीत धरुन सगळे पुढचे गणित मांडत असताना आपल्याला या गोष्टीचा कुठेतरी विचार करावा लागेल की आज पुढच्या येणा-या रक्कमेमध्ये आपल्याला काही रक्कम राज्यशासनाला दयायची आहे. ती देत असताना त्यांच्याकडन आपल्याला काय मिळेलतर विवीध योजना शासनाच्या पण आहेत त्या

देखील सिरीअस होवून आपण सर्वानी शासनाकडन मिळवून घेतल्या पाहीजेत. कारण की आज जसं अजीतभाऊनी सांगितल येणारी रक्कम ही शास्तीकर जाता मुळ रक्कमेतून वजा झाला हा फक्त निर्णय आणल्यानंतर आज याठिकाणी लोकांनी ब-याचअंशी कर भरला आणि आपल्याला दिसतेच करसंकलनची कशाप्रकारे जमा वाढली तस ही वाढत असताना त्याची मुदत ३१ मार्च पर्यंतच होती तर आपण देखील अपल्या माध्यमातून, याठिकाणी आम्ही देखील आहोत आपल्याला राज्यशासनाकडे पाठपुरावा करावा लागेल आणि त्याची मुदत आपल्याला वाढून घ्यावी लागेल. ती मुदत वाढवून घेतलीतर ज्या नागरीकांना आज टोटल भरता नाही आला ते पुढच्या काळात तो कर भरतील आणि कुठतरी आज करसंकलनच देखील उत्पन्न हे वाढेल किंवा लोक पैसे भरतील आणि लोकांनाही कुठतर ते व्याजातून दिलासा मिळेल. साहेब, आज आपण सामान्य शास्ती ही ७५ टक्के माफ करतो आम्ही तुम्हांला पत्रही दिल होत आणि सभागृहातले सर्व सदस्य सांगतील ती शास्ती शंभर टक्के आपण काही कालावधीसाठी माफ करावी. माई तो पण लोकांना ब-याप्रामणात दिलासा मिळतो. महापौर म्हणून आपण देखील प्रशासनाला सुचना कराव्यात. शासनाने शंभर टक्के माफ केलीतर आज ज्यावेळेस एखादा सर्वसामान्य नागरीक आपल्या बीलाची टॅक्सची पावती घेवून येतो त्यावेळेस त्याला ते पण दिसेल. मुळ करात देखील सामान्य शास्ती, विलंब आकार तो देखील जास्त आहे त्यात आता आपण ७५ टक्के सुट देतो, ती सुध्दा आपली ३१ तारखेला संपेल ती देखील आपण चालू ठेवावी आणि तसं गरजू लोकांना आपल्याला ते शंभर टक्के देता येईल याकड देखील आपण लक्ष दयाव. साहेब या महापालिकेत जुमला आहे तो जुमला कुठला आहेतर स्मार्ट सिटी, स्मार्टसिटीनंतर काय आता तुम्ही याच्यात हेडजर ओपन केले. माहीती तंत्रज्ञानला आपण ठेवलेत २ कोटी १५ लाख रुपये. संगणक देखभारल दुरुस्तीला आपण ठेवलेत १ कोटी ५५ लाख रु. संगणक खरेदी व सॉफ्टवेअर डेव्हलपमेंटला ठेवलेत तुम्ही ८ कोटी रु. डेटा ॲडमीनिस्ट्रेशनला ठेवलेत १ कोटी आणि सिटी ट्रान्समीशन ऑफीसला ठेवलेत ५ कोटी रु. आणि स्मार्ट सिटीला ठेवलेत १०० कोटी. हा एकंदर अभ्यास केलातर परत पोमण साहेब तुम्हांला म्हणतील की स्मार्ट सिटीचा शेवटपर्यंत मीच एमडी राहीलो पाहीजे. हे सगळ गोलगोल गोलगोल आहे ही आता तुम्हांला आकडेवारी दिसते हे हजार कोटी पर्यंत जातात. स्मार्ट सिटीन शहरात दोन हजार कोटी खर्च करुन चार वर्षात काय झालेल आहे हे आपण सगळे पाहतो आहोत. तुम्ही जे अजेन्डयामध्ये म्हणल होतना स्मार्ट सिटीत आम्ही हे करु स्मार्ट सिटीत ते करु मलातर वाटत स्मार्ट सिटीत फक्त खर्च झाला. एका बाजूला स्मार्ट सिटी

आणि एका बाजुला स्थापत्य हे होत असताना आज म्हणजे भविष्यात जर एक दोन टक्के लोक जर कॅन्सरनी गेलेना तर त्या स्मार्ट सिटीच्या धुळीने गेलेली असतील म्हणजे चार वर्षे झाले आम्ही धुळीत आहेत. कुठल एक काम मला दाखवा क जे आज पुर्ण झाल आहे. म्हणजे आता कुठेतरी शेवट शेवट तुम्ही धावपळ करणार आणि पुढे सांगणार कोरोनामुळे डिले झाल, याच्यामुळ डिले झाल पण हे सगळ करत असताना आपण स्मार्ट सिटीच्या कामावर स्वत: एक  व्हिजीट करा रस्त्याचे कामाचे हे शहराची किती वाट लागली बघा. आता सन्मननीयांनी सांगीतल की होर्डीग्जवर एवढ उत्पन्न झाल, त्याच्यातून एवढ उत्पन्न झाल.  साहेब, पुनावळेची घटना मी सांगतो तुम्ही स्वत: याच्यात लक्ष दया, पुनावळेच्या कॉर्नरला दर्शिले फॅमीलीच्या जागेत होर्डीग उभ राहील, भावा-बहीणीत भांडण झाले. भावाला वाटल बहीनीनी माझ्या परस्पर जागा दिली आणि त्या ठिकाणी होर्डीग उभ राहील त्याच्यावरुन त्यांच्या पोलीस केस झाल्या महापालिकेकडे एकमेकाचे अर्ज गेले ती जागा महापालिकेकडे हॅण्डओव्हर नव्हती त्या जागेच मालक ते होते आणि त्या जागेत महापालिकेनी होर्डीग उभा केला अशा असंख्य केसेस या शहरामध्ये आहेत. माझी जागा, माझ फुटपाथ अजुन हॅण्डओव्हर नाही केल आणि ते पण महापालिकेच होर्डीग. म्हणजे आपण उत्पन्न वाढवित असताना शहरातील नागरांना त्यापासून त्रास होणार नाही याची पण काळजी आपल्याला घ्यायची आहे. ती घेत असताना आपले चारदोन रुपये उत्पन्न वाढवण्यासाठी त्यांची भांडण आम्हांला इथ आकाश चिन्ह विभागात जावून ती भांडण मिटवावी लागली. यांनी होर्डीग्जचा अर्ज दिला म्हणून त्यांनी त्यांच्या घराचा अर्ज दिला. आमच होर्डीग काढा त्याचही काढा पण त्यानी होर्डीग दिलेला नव्हता. महापालिकेनी परस्पर त्याच्या जागेवर टेंडर काढून होर्डीग लावलेला होता. महापालिकेच्या मालमत्तेत तुम्ही होर्डीग्ज लावाना त्याच्याबद्दल कुणाचीच अडचण नाही. आमच्या इथ असंच झाल एका चौकामध्ये सिग्नल आणि सिग्नलच्या बाहेर जातो होर्डीग्ज, महापालिकेचे उत्पन्न वाढवत असताना आपल्याला नागरीकांचा देखील विचार करावा लागेल. त्यांच्या घरात भांडण होत असतीलतर ते दुर्दैव आहे. एका बाजुला आपण २२०० ते २३०० कोटीच टेंडर केलेल आहे. या बजेटमध्येच तुम्ही बघा गुंतवणुकीवरील व्याज व इतर  १९३ कोटी, दरवर्षी आपल्याला ठेवीवर २००-२०० कोटी घेतात असं असताना आपल्या शहरातल्या नागरीकांच्या मालमत्तेत अतीक्रमण करणं हे महापालिकेला शोभत नाही. महापालिका सारखी संस्था या शहरातल्या नागरीकांच विश्वस्त म्हणून काम करते त्या नागरीकांना सर्व सुविधा देतात त्यानीच अशाप्रकारे काम करायच. कुठतरी उत्पन्न वाढवित असताना या शहरातील नागरीकांना त्रास होणार नाही

याच्याकड देखील आपण लक्ष दया. आज माझ्या हातात एक जाहीरनामा आहे. हा जाहीरनामा पाच वर्षात भारतीय जनतापार्टी सत्तेत आल त्यादिवशी त्यांनी शहरातल्या नागरीकांसमोर मांडला होता. याच्यातले खुप मुद्दे आहेत पण त्यातल्या काही मुद्यांवर आपण चर्चा करु. शहराला सर्व ठिकाणी पुरेसा पाणीपुरवठा, टँकरमुक्त शहर करणार. म्हणजे पाच वर्षात तुम्हांला दिसत नाही, पाणी वाढवणार पवना धरणाचा ज्वलंत प्रश्न होता परंतु त्या प्रश्नावर देखील सिरीअसली कुणी पाहीलेल नाही. आता आंद्र आणि भामा-आसखेडमधुन पाणी मंजुर झाल. आपण पाणी रिसायकलींगला मागच्या जीबी मध्ये मंजूरी दिली. हे सगळ येत असताना चार वर्षेतर गेलेना आता पुढच्या एक वर्षात हे सर्व पुर्ण होणार का. मागील चार वर्षात आम्ही खुप स्वप्न पाहीली. मलातर खुप वेळा असं वाटायच की चला आपल्या भागातील सोसायटीवाले आपल्याला कुठेतरी अभिनंदन करतील की आमचे टँकर बंद झाले म्हणून. पुण्याला सोर्सेस भरपूर आहेत तेथे वेगवेगळया धरणातून पाणी येते पण आपण एवढया वर्षे पवनावर अवलंबून होतो आणि आता भामा-आसखेडच पाणी आपण घेतोय. माई, आपल्या भागात पण काय परिस्थिती आहे पाण्याची म्हणजे अक्षरशः वाकडपासून सांगवी पर्यंत गेलना तर एकच आपल्याकडे फिल्ट्रेशन प्लान्ट आहे तो सेक्टर २३ ला मी चार वर्षापासून सांगतो आणि आजही सांगतो की आजून एक वॉटर फिल्ट्रेशन प्लान्ट करा पुनावळेच्या भागात, आणि शहरातल्या दोन भागात चांगल्याप्रकारे पाणी येईल. आता एका बाजुला आपण हिंजवडी, मान आजुबाजूची सगळे गाव गव्हूंजे पर्यंत घ्यायच म्हणतो. एकतर आमच्या भागाला पाण्याची आज अडचण आहे आणि काही प्रमाणात ही अडचण कमी झाली. ती कशी कमी झालीतर लोकली जे डिस्ट्रीब्यूशन आहे त्याच्यात व्यवस्थीत नियोजन झाल, काही प्रमाणात तुमचे लिकेजेस कमी झाले म्हणून ते पाणी कमी झाल. परंतु पाण्याची जी अडचण चार वर्षापुर्वी होती ती आज तशीच आहे. त्याच्यावर कुठल्याही प्रकारे आपण मात करु शकलो नाही का नाही मग याच पण कुठतरी आत्मपरीक्षण सर्व सत्ताधा-यांनी केल पाहीजे आणि आपण सर्वानीच केल पाहीजे. शेवटी प्रत्येकाला त्याला सामोर जायच आहे, आज गृहनिर्माण सोसायटयाच चाळीस चाळीस, पन्नास पन्नास लाख वर्षाचे टँकरच्या पाण्यावर जातात. पण ज्याची एसटीपी चालू आहे, जे खुप चांगल्याप्रकारे काम करतात अशाठिकाणी काहीतरी सवलती या बजेटमध्ये दयायला पाहीजे होते, का नाही दिल्या आपण त्या. आता कुणीतरी सांगीतल त्यांचे सोलर आहेत, जे ग्रीन बिल्डींगचे सगळे नॉर्म्स फॉलो करतात, काही प्रमाणात आपण टॅक्समध्ये सवलत देतो त्यात किती सोसायटया येतात, कुठतरी पाणी बील असेल, कुठतरी टॅक्सच बील असेल या सगळया

गोष्टीमध्ये जर सवलत दिलीतर निश्चितच चांगल्याप्रकारच काम होईल त्या लोकांना मोटिव्हेशन मिळेल. मला वाटत त्यादिवशीच ढाकणे साहेब म्हणले की सर्व सोसायटयांना व्हिजीट करायची आहे आणि त्यांचे एसटीपी चालू आहेत का नाही ते पहायचे आहेत. रिसायकलींग पाण्याचा जर युज झालातर त्या सोसायटयांमध्ये जे गार्डन आहेत ते गार्डन उपयोगात येतील. मी मागे पण सीएसआरमधुन म्हणल होत की जेवढे नाले, आता शेंडगे ताईनी सांगीतल नदीचे नाले आणि नाल्याचे गटर झालेत. म्हणजे ज्या पध्दतीने ते नदीमधल पाणी अस्वच्छ आहे त्याच्यामुळे ही जलपर्णी येते, त्याच्यामुळेच बाकी सगळे आजार होतात. मुळानगरला कुणाला फोन केलाना तर त्याला संध्याकाळच घरातून बाहेर निघता येत नाही एवढया मोठया प्रमाणात त्याठिकाणी  ढास आहेत. हर्षलने सांगीतला २०१७ पासूनचा त्याचा सगळा प्रवास आता तेच ते सांगण चुकीच आहे परंतु आपण शहराच्या साडेपाच ते सहा हजार कोटीच्या बजेटवर बोलतो. हे बजेट खर्च होणार आहे त्याचा उपयोग सर्वसामान्य नागरीकांना झाला पाहीजे. आज सांगवी सारख्या परीसरातला किंवा आमच्या गावठाणातला माणूस जर तो जलपर्णीने परेशान असेल आणि तो घरातून बाहेर निघत नाही कातर डास आहेत ही अवस्था आहे साहेब, जुन्या सांगवीतजर गेले तर मी कालच दोन तीन मीत्राशी बोललो बाहेरच निघु शकत नाहीत दादा एवढे डास आहेत, अशाप्रकारे जर नागरीकांच्या भावना असतीलतर कुठतरी त्या जलपर्णीवर परमनन्ट सोल्युशन हे सुध्दा कुठे या बजेटमध्ये दिसत नाही. तरी मी चार वर्षापासून म्हणलो होतो की आपण प्रत्येक नाल्याला एसटीपी लावू शेवटी आज आम्ही अशा याच्यावर आलो की तो एसटीपी आम्ही सीएसआरमधुन घेतो, ऍटलीस्ट तोतरी प्रयोग करुन पाहू. आपले जेवढे ड्रेनेज आहेत आता त्या पध्दतीच्या एका ड्रेनेजमध्ये आपला पावसाळी नाला आहे पण त्याच्यामध्ये ड्रेनेज येते आपले लोक दोन महीन्यापासून त्या नाल्यामध्ये कुणी ड्रेनेज सोडले हे शोधतात. एका बाजुला त्या एसटीपीची एकदम वाईट अवस्था आहे. मी कितीतरी वेळा यांना सांगितल की वाकडगावठाणच्या जर तुम्ही नाल्यात आलेतर त्याठिकाणी ड्रेनेज किंवा तुमच पंपींग स्टेशन बंद होत आमच्या इथन पंपींग करुन आपण निलखला जाव लागल. अधिकारी तर काम करतात पण मला त्याच्यातल हेड कुठ दिसल नाही. मधल्या कुठतरी एका बॅचमध्ये कुठतरी एखादा एसटीपी आला पाहीजे. आपल्याकडे विविध कन्सलटंट काम करतात ते करत असताना त्यांनी तुम्हांला सुचवल पाहीजेना की आज या भागात कमी पडतो, या भागात आता लोढ संपलाय. याठिकाणी आपल्याला काहीतरी नवीन व्यवस्था करावी लागेल. ज्याप्रमाणे अजीतने सांगीतल, सेप्रेशन मोठयाप्रमाणात वाढणार आहे, व्हर्टीकल किती जायच

याच्यात काही नॉर्म्स आहेत ज्या पध्दतीने प्रत्येकजण जर व्हर्टीकल गेलातर जुन्या सोसायटयाजर रिडेव्हलपमेंट केल्या आणि त्या पध्दतीने जर डेव्हलपमेंट झालतर पुर्वी केलेल इन्फ्रस्ट्रक्चर सर्व आपल्याला बदलाव लागेल. एका बाजुला आपण सिमेंट रोड करतो आणि दुस-या बाजुला तुम्ही व्हर्टीकल केलतर तुमचे ड्रेनेज, पाणी या ज्या लाईन तुमच्या येतात त्यावरती तुम्ही किती सस्टेन करणार आहेत. मैला तुम्ही पंपींग करुन तो स्लोपने तुमच्या मैलाशुध्दीकरण केंद्रावर नेणार आहे साहेब, हे सर्व करत असताना त्याचा कुठही उल्लेख या बजेटवर दिसत नाही. एवढया प्रचंड मोठया प्रमाणात गार्डन आहे वर्षभर त्याचा वापर झाला नाही. साध आमच्या पुनावळेच एक उदाहरण आहे अमृत योजनेत आपण एक गार्डन केल, पुर्ण झाल आहे ते. ते होत असताना मागच्या आठवडयात इंगळे साहेब आणि मी व्हिजीटला गेलो, साहेब दिड कोटच त्याठिकाणी टेंडर काढल होतं वॉलकंपौंड करायच त्याठिकाणी गेल्यानंतर पाहील वीस लाख सुध्दा खर्च झालेले नाहीत आणि ती वॉलकंपौड अक्षरशः घाणेरडी केलेली आहे. म्हणजे कोरोना काळात जर त्याठिकाणी अधिकारी लक्ष द्यायला नाहीत, कुणी लक्ष द्यायला नाही त्याठिकाणी अशाप्रमाणात अधिका-यांनी वागाव कुठतरी त्यांनी पण या शहराचा जबाबदार नागरीक म्हणून वागल पाहीजे. सर्वजण बजेटवर बोललेत सर्वानीच आकडे सांगीतले आहेत मी त्यावर जाणार नाही पण हिंजवडी आयटीपार्क येथील सार्वजनीक वाहतूक व्यवस्था सक्षम करणार. हिंजवडी ते चाकण मेट्रो करणार. हे पण एक आश्वासन भारतीय जनता पार्टीच होत याच काय झाल. आमच्या भागात तुम्ही आज जरी आलातर पाच वर्षापासून तो ब्रीज मी फॉलोअप करतो, जगताप डेअरी ते हिंजवडी हैद्राबादच्या धरतीवर तो ब्रीज झाला पाहीजे. तस मी दहा वर्षापासून त्याच्या फॉलोअप मध्ये आहे. दोन तीन महीन्यापुर्वी मुख्यमंत्री साहेबांना देखील ते पत्र दिलेली आहेत. परंतु आता टाटाने पण ठरवलेल आहे की आम्ही जो ब्रीज केला त्याच फायनान्शिअल गणीत सर्व बीघडून जाईल तुम्ही त्याठिकाणी तो ब्रीज केलातर. मा.महापौर आपण भूजबळ चौका आलो आणि हायवेनी बालेवाडीवर गेलो आणि त्याठिकाणाहून ती मेट्रो पुण्यात गेली तीचा काय उपयोग आहे. तुम्ही जर टॅचमेंट पाहीलातर सौदागर, निलख, वाकड, राहटणीचा काही भाग, सांगवीचा काही भाग म्हणजे त्या भागातील नागरीकांना काही उपयोग होणार आहे का. त्यासाठी आम्ही त्या ब्रीजची संकल्पना मांडलेली आहे आता नवीन एक आपण बालेवाडीवरुन ब्रीज आणून जगताप डेअरीवर जॉईंट केला. त्या रोडची ट्रॅफिक पाहीलीतर आज फक्त आयटी बंद आहे म्हणून त्या ठिकाणी वर्षभरात काही नाही. नाहीतर हिंजवडीला दोन किलो मीटर आपल्याला पंधरा मिनीटात जायच किंवा अर्ध्या

तासात जायच तरी आपण पोहचत नव्हतो किंवा संध्याकाळी हिंजवडीतून निघालोतर वाकडला सुध्दा पोहचत नव्हतो आणि त्याठिकाणी सर्व आयटी ईंजिनीअर राहतात. आपण जर बालेवाडीचे जर फ्लॅटचे कॉस्टींग पाहीलेतर एकही दिड आणि दोन कोटीच्या खाली फ्लॅट नाही अस असताना मेट्रो तीकडन गेली आणि कुठला सौदागर, वाकडचा माणुस भूजबळ चौकात येणार आणि अर्ध्या किलो मीटर साठी त्या मेट्रोत बसणार. परंतु हे देखील आश्वासन पुर्ण करु शकलो नाहीत. आपण त्या भुजबळ चौकातन हयाच टेंडर काढल आम्ही शेतक-यांना कन्व्हेन्स करत करत त पुर्ण करत आलोय. हे टीडीआरचे रेटजर खाली आलेतर तुमचे दिडशे कोटीत भूसंपादनाचे होणार काय, काही नाही होणार. दुस-या बाजुला तुम्ही म्हणताय वाटाघाटी करायच्या नाहीत. पण तुम्ही जर प्रत्येक केस भूसंपादन करायला गेलेतर दोन दोन, चार चार वर्षे लागतील तुम्हांला एक एक रोड भूसंपादन करायला. अस असताना तुम्ही कसे काय काम करणार. त्या दिडशे कोटीत आम्ही स्टॅण्डींगला उपसूचना दिल्या, आता उपसूचना दिल्यानंतर लोकांच्याच कामाच्या दिल्या किंवा चालू कामाच्या दिल्या त्याला कुठ पैसे कमी पडतील अस असताना या दिडशे कोटीत भूसंपादन काहीच होणार नाही त्यासाठीच मी आपल्याला म्हणल की आपण आणि महापौर तुम्हांला सर्वांना ३१ तारखेला बसाव लागेल अधिका-यांना घेवून की अखर्चीत रक्कम किती आणि ती कुठ वळवायची. त्यासाठी काय विशेष प्रोव्हीजन करायच ते देखील कराव लागेल नाहीतर याचा काहीच उपयोग होणार नाही. त्यानंतर तुम्ही अनधिकृत बांधकामाचा प्रश्न सोडवणार हा तर प्रश्न ज्वलंतच आहे मला वाटत काल परवा सांगवीमध्ये फार मोठया प्रमाणावर कारवाई झाली. अजून एक आश्वासन या जाहीरनाम्यामध्ये आहे शहरात पोलीस मुख्यालय करणे, तुम्ही पोलीस मुख्यालय केल पण हे मुख्यालय करत असताना आता एक उपसूचना दिली, आमच्या भागामध्ये आज पोलीस चौकीची रिक्वायरमेंट आहे पोलीसांच देखील पत्र आल आहे की पुनावळ, ताथवडे या ठिकाणी चौकी पाहीजे. त्याठिकाणी आपण ब-याचशा जागा आयटूआरच्या माध्यमातून ताब्यात घेतल्यात त्याची एक उपसूचना आज आम्ही दिली की त्याठिकाणी एखाद पोलीस स्टेशन रहाव आणि एक उपआयुक्त लेव्हलच कार्यालय व्हाव. अशा गोष्टीना देखील आपण प्राधान्य दिलतर निश्चितच कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न आहे. आज आपणा सर्वांना त्या गोष्टी जाणवत नाही की जवळ जवळ एक वर्षे झाल तुम्ही जर हिंजवडी परिसरात गेलेतर त्याठिकाणी हॉटेल खाली आहेत, पीजी खाली आहे त्याठिकाणचा पेट्रोलपंपवाला म्हणतो की बीझनेस नाही, हॉटेलवाला म्हणतो की बिझनेस नाही. म्हणजे त्याठिकाणी आज तुम्हांला जे ट्रॅफिक दिसते ते दोन तीन टक्के सुध्दा नाही जो त्याचा

ॲक्च्यअल फ्लो आहे. पण एकदा जर आपण कोरोनातून बाहेर पडलोतर त्याठिकाणी त्या प्रमाणात फ्लो वाढणार आहे त्यावेळेस आपण काय करणार. ते करत असताना रस्त्यानी जर झाड तोडत असताना आज आम्ही हिंजवडीला अजूनही एक्सेस तयार केला वाकडकर वस्तीवरुन तोही सुरु झाला. एक जमदाडे वस्तीतून केला आणि एक भूमकर वस्तीतून केला मला वाटते त्याचही काम पुर्णत्वास येतय म्हणजे हे सगळ करत असताना आपल्याला हायवेच्या खाली येणारे दोनच सोर्स आहेत. एक भूजबळ चौक, एक भुमकर चौक, ताथवडे आणि पुनावळे. ताथवडेतून बाहेर यायच असेलतर त्याठिकाणी मोठी गाडी जात नाही आज तीथ आपण उभा राहीलोतर एक एक, दोन दोन तास जातात आपल्याला सांगाव लागत की महापालिकेचे वॉर्डन त्याठिकाणी पाठवा अस असताना त्या भागातल्या या समस्या आहेत मी गडकरी साहेबांना पण त्याच पत्र दिलं, उदया सकाळी साडे दहाला त्यांनी त्याची मिटींग पण लावली. हे होत असताना आयुक्त साहेब आपल्याला पण त्याठिकाणी फंडची निर्मीती करावी लागेल. आपला बारा मीटर आणि त्यांचा साडेसात मीटर रोड जर आपण डेव्हलप केलातर नवीन मुंबईपेक्षा सुरेख होईल. पण आयुक्त साहेब आपल्याला त्यांच्याशी बोलाव लागेल की त्यांचा साडेसात मीटर त्यांनी डेव्हलप करावा किंवा तो आपल्याकड दयावा कारण आपल्या भागाकडच कन्सलटंटकड आपल सगळ ड्रॉईंग तयार आहे परत भूसंपादनाचा प्रश्न येणार आहे. त्यावेळेस भूसंपादन नाही म्हणून त्या रोडच काम थांबवण्यात आलेल आहे. परंतु त्याबाबत एकही असा शेतकरी नाही की दोन आणि पाच गुंठयाची जागा आहे आणि तो त्याठिकाणी पैसे मागायला येइल. त्याठिकाणी कुठे कुठे प्लॉट आहेत. सत्तर ते ऐंशी टक्के लोक आजही तयार आहेत पण कुठेतरी आपल्याला पुढे याव लागेल. आज बीआरटीच्या माध्यमातून त्याची देखील एक उपसूचना आपण दिलेली आहे ती स्टॅण्डींगला पण दिली होती त्या गोष्टीकड आपल्याला प्रकर्षान पहाव लागेल. विकासरावांनी सांगीतल की आम्ही दिड हजार कोटीचे काम त्या भागात केली, तशी म्हणण्याची वेळ आमच्या भागावर पण आली पाहीजे कारण आमच्या भागातून कलेक्शन पाहीलतर मग तुम्ही करसंकलनच पहा, बिल्डींग परमीशनच पहा तर सिटीच्या तुलनेनी सर्वात जास्त आहे. परंतु तुम्हाआम्हांला विचार करताना संपुर्ण सिटी म्हणून विचार करावा लागणार आहे एक पर्टीक्युलर भाग म्हणून विचार करुन चालणार नाही. पाण्याच्या समस्या असतील, रस्त्याच्या समस्या असतीलतर या सगळया नव्याने समाविष्ट असलेल्या गावाना देखील आपल्याला सिरीअसली पहाव लागेल. हे बजेट जर पाहीलतर प्रशासनाच बजेट वाटत याच्यात नवीन आणि ॲट्रॅक्शन असं काहीच नाही.

मला वाटत संभाजी महाराज हे तुमच आमच सर्वांच दैवत आहे आणि या पुतळयाच काम आज पुर्ण होत आल आहे मला वाटत कुणीतरी सांगीतल की त्याच्याकडे लक्ष दया परंतु मला वाटत पंच्याहत्तर टक्के ते काम झालेल आहे त्यासाठी पैसे कमी पडणार नाहीत, त्यासाठी कोणी विरोध करणार नाही. महीला व बालकल्याण यासाठी सुध्दा चांगली तरतूद ठेवलेली आहे तसेच नागरवस्ती विभागालाही चांगली तरतूद आहे. मला वाटत मागच्यावर्षी ४१ कोटी होते आता ५७ कोटी केले आहेत आणि महीला व बालकल्याणला ४७ कोटी होते ते आता ५३ कोटी केलेत. मला वाटत सर्वात जास्त वेळ जर आता कोण बोलल असेलतर मंगलाताईच बोलल्यात आणि सर्व महीला बोलल्यात. माई आपण या दोन्ही विभागाकडे पाहताना त्यात आणखी काय नवनवीन करता येईल याच्याकड आपण लक्ष दयाव. या शहरात आशा देखील काही ज्येष्ठ नागरीक महीला आहेत त्यासाठी देखील बजेटमध्ये आपल्याला कशी तरतूद करता येईल ते पहाव. मला वाटत मध्ये सुप्रिम कोर्टाने देखील ऑर्डर दिलेली आहे आणि कैंद्रसरकारने देखील त्याच्यात लक्ष घातल होतं की जी मुल मुली आपल्या आई वडीलांना सांभाळत नाहीत किंवा ज्यांच्याकड खरच काही नाही आणि जे भाडयाच्या घरात राहतात अशा गरजुना जर आपल्याला मदत करता आलीतर त्यात देखील आपण लक्ष घालाव आणि तशी देखील बजेटमध्ये एक प्रोव्हीजन ठेवावी. कारण की घरातील जर महीला साक्षर आणि सक्षम असेलतर निश्चितच घरातील पुढची पिढी देखील चांगली घडेल तरी महीलांसाठी आपल्याला विवीध योजना कशा करता येतील हे पहाव. त्याच एक उदाहरण देईल आमच्या भागात पोलीस एक महीलांसाठी उपक्रम राबवतात. चांगल्या क्षेत्रात पुढे गेलेल्या महीलांना ते दरवर्षी बोलवतात. माई माझी देखील आपल्याला विनंती आहे की अशाप्रकारच एक मोठ कन्व्हेन्शन आपण दरवर्षी घेतल आणि भारत देशात नाहीतर जगात पण ज्या ज्या महीला उच्च लेव्हलला काम करतात आणि ज्यांचा आदर्श या समाजा समोर आहे अशा महीलाना जर आपण बोलवलतर मला वाटत आपण दरवर्षी मोठी भीमथडी आणि पवनाथडी यात्रा आपण घेतो त्या घेत असताना याच्यात जर अशा गोष्टींचा अंतर्भाव केलातर या जगातल्या आदर्श महीला आपल्या शहरात आणल्यातर निश्चितच त्यांना देखील मदत होईल आणि या महानगरपालिकेच्या शाळेत ज्या मुली शिकतात याच्याकडे आपल्याला लक्ष दयायला लागेल. मुलींना आर्थीक मदत कशी करता येईल याच्यासाठी सुध्दा आपण आपल्या बजेटमध्ये एक प्रोव्हीजन करुन पाहाव. कारण की हे शहराच फ्यूचर आहे हे जर सक्षम झाले त्यांना चांगल्या सुखसुविधा मिळाल्यातर निश्चित भविष्यात तुमची कायदा व सुव्यवस्था सुधारण्यास देखील मदत होइल. माल

वाटत की घोडेकर ताईनी झोपडपटयांचा एक विषय घेतला प्रत्येकाला वाटत आपल शहर हे झोपडपट्टीविरहीत व्हाव आणि झोपडपट्टीविरहीतच राहील त्या दृष्टिकोनातून काही प्रयत्न झाला पण ज्या पध्दतीने तो प्रयत्न व्हायला पाहीजे होता तो झाला नाही. जस आता परवा याठिकाणी गांधनीगरचा विषय आला, गांधीनगर झोपडपट्टीला कोणाचाच विरोध नव्हता. पंतप्रधान आवास योजनेची देखील तुम्हांला मदत घेता आली असती परंतु कुठेतरी शंकेला जागा कारण की आपली जी एक इमेज झाली मागच्या चार वर्षात की आम्हांला सर्वात जास्त इन्ट्रेस्ट आहे ठेके काढण्यात, आम्हांला सर्वात जास्त इन्ट्रेस्ट आहे ठरावीक लोकांना पैसे मिळवून देण्यात त्याच्यामुळ या शहरातले नागरीक असतील किंवा आम्ही सगळे असतील प्रत्येक जण चांगल्या गोष्टीकडे पाहताना पण शंकेनी पाहतो त्याच्यामुळ अशी शंका भविष्यात निर्माण होणार नाही असा जर आपण सर्वानी प्रयत्न केलातर निश्चितच झोपडपट्टी विरहीत शहर करण्यात देखील आपण सक्षम होवू परंतु हे सगळ करत असताना शासकीय कार्यालय या शहरात नवनवीन यतात, आमच्या वॉर्डात तर अशी परिस्थिती आहे की एकही महापालिकेची मालमत्ता नाही की जी आम्हांला पोस्टाला देता येईल, विवीध कार्यालयाला देता येईल. आज भूमी जिंदगीकड सर्वात जास्त स्वत:च्या मालकीची मिळकत आहे. जर आपण त्याच  नीट नियोजन केलतर अतीशय चांगल्याप्रकारे त्याच भाड महापालिकेला चालू होईल. परंतु वर्षानुवर्ष त्या तशाच पडलेल्या मालमत्ता आहेत त्याच्याकड लक्ष दयायला कुणाला वेळ नाही, कुणी पाहत नाही त्याच देखील या बजेटमध्ये कुठल्याही प्रकारच वेगळेपण जाणवत नाही. शहरात सार्वजनिक ठिकाणी स्वच्छतागृह उभारणे हे देखील एक आश्वासन या जाहीरनाम्यातल आहे. तुम्ही संध्याकाळी जर हिंजवडी रोडला उभे राहीलेतर किंवा बॉम्बे पुणे रोडला जरी थांबले की ज्या कामावरुन महीला येतात त्यांची घरी जायला जी लगबग होती ती पाहण्यासारखी असते. कुणीजर त्यांच्याशी हितगुज केल तर ते सांगतील अक्षरश: त्यांचे मेल येतात की काहीतरी करा या भागामध्ये एखाद स्वच्छतागृह उभा करा. अशाप्रकारे ठरावीक अंतरावर मग ते आमच्या भागात असतील किंवा इकड असतील. आम्ही दोन करण्यात सक्सेस झालो एक सीएसआर मधुन केल आणि एक बालेवाडीत आपल्या महापालिकेच्या माध्यमातून केलं. हे सर्व करत असताना आपण ठरावीक अंतरावर स्वच्छतागृह असावीत.  आज दिल्लीमध्ये जर आपण गेलोतर कोप-या कोप-यावर स्मार्ट सिटीतून ते उभा केलेत त्या पध्दतीने ते मेन्टेन करतात त्याच्यावर जाहीरातीही केल्या त्या जाहीरातीतून तीथल्या लोकल महापालिकेला उत्पन्न आहे अशा दृष्टिकोनातून जरी तुम्ही त्याच्याकडे पाहीलतरी तुमच भारतीय जनता पार्टीच एक आश्वासन जाहीरनाम्यात

दिलेल आहे ते देखील पुर्ण होईल. रस्त्याचे सुयोग्य नियोजन करुन महत्वाचे चौक सिंग्नल फ्रि करणार  असं देखील एक आश्वासन होतं. मग याचा अर्थ असातर होत नाही की प्रत्येक ठिकाणी सबवे करायचा किंवा फ्लाय ओव्हर करायचा.  मी काल एक प्रेझेन्टेशन पाहील दिल्लीमध्ये स्मार्ट सिटीच काम आहे ते त्यांनी त्या यंत्रणेतच सिग्नल लावला आणि ती यंत्रणा सिग्नल ऍटोमॅटीक मॉनीटर करते. रस्त्याला ट्रॅफिक किती आहे आणि त्या रस्त्यावर किती गाडया उरल्या आहेत त्याच्यावर तो सिग्नल ऍटोमॅटीक पाडतो. आता आपण काय करतो आपण तो सिग्नल सेट करतो. तो सिग्नल सेट करता एक चार सेकंदाचा पाहीजे, एक नव्वद सेकंदाचा पाहीजे परंतु ती यंत्रणा जर आपण पाहीलीतर त्या यंत्रणेत त्या गाडया निघाल्यातर त्या सिंग्नलला किती गाडया आल्यात त्या गाडयांप्रमाणे ती सिग्नल यंत्रणा काम करते अशा देखील गोष्टींचा आपण विचार करावा नाहीतर आता काय होत मी सांगवीतून निघालो डांगे चौकापर्यंत आलोतर बारा ब्रीज आहेत. पहीला ब्रीज सांगवी फाटयाचा, दुसरा रक्षक चौकात, तीसरा वाकड फाटयावर, चौथा साई चौकात, पाचा पार्थ स्ट्रींट, सहावा काळेवाडी फाटा, सातवा सोळा नंबर, आठवा थेरगाव, नंतर डांगे चौक तुम्ही त्यावेळेस फ्लायओवहर ब्रीज केला असताना पुर्ण त्यावेळेस तुम्ही पैसे वाचवले आणि ब्रीज केले म्हणजे काय होत आपण निघोलो मला अडचण आली वाटल की इथ ब्रीज केला पाहीजे की, ब्रीज. तुमचे कन्सलटंट काय करतात ज्यावेळेस ते बेसीक प्लॅन करत होते त्यावेळेस त्यांनी या गोष्टी का प्लॅन केल्या नाहीत. तसच इनव्हर्सीटीच त्यावेळेस २२० कोटीच काम होत ते ७० कोटीत होत म्हणून तो ब्रीज बांधला तो तुम्हांला दहा वर्षानी पाडावा लागला. महापालिकेची आर्थीक व्यवस्था एकदम चांगली आहे म्हणून कुठेतरी पाहताना त्या गोष्टीकड ठेके काढायचे त्यातन काही होईल असं न पाहता बेसीक प्लॅन पाहीजे की पुढ दहा, वीस, चाळीस वर्षे काहीही कराव लागणार नाही पाहीजे अशा नजरेतून आयुक्त साहेब आपण शहराकड पहाव आपण नवीन आहात त्यामुळ ब-याच लोकांनी सांगीतल की असं केल पाहीजे, तस केल पाहीजे पण माझी पण एक आपणाला विनंती आहे की निश्चितच हे शहर मिक्स आहे म्हणजे गाव आणि शहर आम्हांला जर विचारलतर आम्ही आजही गाव म्हणतो पण बाहेरुन माणुस आल्यानंतर तो म्हणतो अतीशय डेव्हलप शहर आहे. महापालिकेचा इतिहास पाहीलातर निश्चितच व्हिजनरी काम केल. आम्ही परवा दिवशी स्वाध्यायला वायसीएमला गेलो, नेहमीच जातो. ते तुम्ही त्या काळात जरी बांधलतरी आज त्याची कपॅसिटी बघा, त्या काळात रामकृष्ण मोरे सरांना ते व्हिजन होतं. त्यानंतर पवार साहेबांनी काम केल, दादांनी काम केलं. दादांनी ज्या पध्दतीने शहर यांच्या हातात

सोडल होत या शहराला फक्त शिस्त लावली असतीना, ट्रॅफिक सेन्स जरी लावला असताना तरी लोकांनी डोक्यावर घेतल असत सत्ताधा-यांना परंतु आम्ही बजेट फुगवण्यातच मग्न झालो. बजेटवर तीन वाजल्यापासून आपण सगळेच बोलतोय तरी नितीनजीने हे जे ५२३२.५७ कोटी इतकी रक्कम जमा होईल अस गृहीत धरुन ५५८८.७८ कोटी आरंभीच्या शिल्लकेसह असं एकूण ५५८६.३५ कोटी आणि वर्षभरानंतर त्याच्यामध्ये २.४३ कोटी शिल्लक राहतील अशाप्रकारच बजेट केल, त्याला माई निश्चितच मान्यता देतील पण माई याला मान्यता देत असताना या सभागृहात ज्यांनी पोटतीडकीने आपआपल्या भागातले काही प्रश्न सांगितले असतील काही उपसूचना असतील त्या नागरीकांच्याच आहेत याठिकाणी सर्वजण आलेले आहेत प्रत्येकाला वाटत आपआपल्या भागातील काम व्हावीत इलेक्शनच वर्ष आहे असं होत असताना कुठेही काटछाट न करता आपण सारासार सर्व गोष्टींचा विचार करुन या बजेटला मान्यता दयावी, मला वाटत आज फक्त चर्चा होईल आणि दोन तीन दिवसानंतर उपसूचना तपासल्यानंतर त्याला मान्यता होईल हे तपासत असताना आयुक्त साहेब आपणही गांभीर्याने या बजेटमध्ये लक्ष दयाव. हे आकडे सर्वानीच वाचलेले आहेत इकडे जमा, तीकडे खर्च मी त्याच्यात न जाता मी मा.महापौरांना विनंती करतो की आपण हे सर्व करत असताना सर्वांच्या सुचना लक्षात घ्याव्यात, धन्यवाद.

मा.बापू उर्फ शत्रुघ्न काटे - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. ऑनलाईन उपस्थित असलेले सर्व नगरसेवक नगरसेविका. आताच आपण ५५८८ कोटीच या वर्षाच बजेट आमचे अध्यक्ष आदरनीय नितीनजी लांडगे यांनी आपल्या सभागृहासमोर सादर केलेल आहे. मा.महापौर साहेब, खरतर प्रत्येक नगरसेवकांनी या प्रत्येक विषयावर चर्चा केलेली आहे. या सभागृहात २०१२ पासून ते २०२१ पर्यंत नदीसूधार प्रकल्प याच्यावर कुठलीही आतापर्यंत चर्चा झाली नाही. गेल्या आठवर्षे आपण नदीसुधार प्रकल्पावरती इन्व्हायरमेंटची परवानगी आणली असतीतर बजेटमध्ये आपण किमान दोनतीनशे कोट रुपये केले असते. आपल्या महानगरपालिकेचे २५ टक्के, राज्यसरकारचे २५ टक्के आणि केंद्रसरकारचे ५० टक्के हे करणे गरजेचे आहे. आतापर्यंत प्रत्येक नगरसेवक आपल्या भागामध्ये काम करत असताना बजेटवरती बोलतो आहे बजेटवर बोलत असताना आपल्या अडचणी सांगीतल्या म्हणजे नदीमध्ये हायसिंथ वाढलय, मच्छरांचा त्रास या सगळया पासून जर मुक्त व्हायच असेलना या शहरातल्या ज्या नदया आहेत इंद्रायणी आणि पवना याच्यावरती या सभागृहात चर्चा करत असताना खुप जण बोलले. आयुक्त साहेब आपण ब-याच ठिकाणी चांगल काम केलेल आहे, आपण स्टेट

गव्हर्मेंटमध्ये काम केल, अनेक विषयावरती चांगल काम केल पण माझ एक सांगण आहे आपण सर्वात प्रथम नदीसुधार प्रकल्प हातामध्ये घ्या, कारण या प्रकल्पाशिवाय शहरातल्या लौकीकात, चांगल्या सौंदर्यात भर पडणार नाही. इन्व्हायरमेंटची परवानगी, वारंवार याच्यामध्ये आपण त्रुटी सबमीट करुनही कुलकर्णी साहेब काय काम करतात हे आजपर्यंत आम्हांलाही माहीती नाही. आतापर्यंत या बजेटमध्ये दहा ते बारा कोटी रुपयाचे इंद्रायणी आणि पवना नदीसाठी काम चालल आहे. तरी याच्यावरती आपण प्रामुख्याने जास्त लक्ष  दयाव. दुसर म्हणजे आपण स्मार्ट सिटी म्हणतो पण स्मार्ट सिटी काहीतरी हस्यास्पद वाटत याच कारण काय, स्मार्ट सिटी चांगल्याप्रकारे आम्ही सत्ताधा-यांनी आणली. पिंपळेगुरव, पिंपळेसौदागर हा भाग आदिचाच आहे पण बाकीच्या प्रत्येक भागात आम्ही दयायचा प्रयत्न केला. याच्यामध्ये तुमच प्रशासन वारंवार आम्ही सांगून सुध्दा काही त्यांच्यामध्ये फरक पडत नाही. प्रशासनामुळे आमची नाचक्की झालेली आहे. आम्ही वारंवार सांगीतल की तुमचे कॉन्ट्रॅक्टर असतील, संबंधित डेप्युटी असतील, तुमचे जे.ई. असतील, तुमचे एक्झिक्युटीव्ह असतील, तुमचे सिटी ईंजिनीअर असतील हे लोक काय करतात. प्रत्येक वेळी आम्ही तुम्हांला तक्रारी सांगतो त्याच्यातन तुम्ही मला सांगीतल की आठ दिवसात मी तुमच्याकड निश्चित पाहतो साहेब, त्याच्यात काहीच फरक झालेला नाही. तरी साहेब, तुम्ही स्मार्ट सिटीत लक्ष घाला. काही नगरसेवक बोलले की स्मार्ट सिटीत ठिकठिकाणी रस्ते खोदून ठेवलेत, ड्रेनेज सिस्टीम नाही, वॉटर सिस्टीम नीट नाही. याला सर्वस्वी जबाबदार स्मार्ट कंपनी आहे आम्ही वारंवार त्यांना तक्रारी सांगतो. शहरातला डाटा इतका वाढवला त्याच्यामध्ये तुम्ही जर गुगलवरुन आपल शहर पाहीलना तर निळनिळ शहर दिसत निळ, कातर नुसता पत्राच आहे कुणीही उठत आणि कुठही पत्राशेड करतो मग याच्यातन स्मार्ट शहर करुन काहीच होणार नाही. म्हणजे स्मार्ट शहर फक्त आपल कागदावरती राहील, तुम्ही कुठलाही रोड घ्या म्हणजे तुम्ही वाकड रोड घ्या, तुम्ही नाशिक फाटा ते वाकड, हिंजवडीपर्यंत बघा सगळयात जास्त बकालपणा त्या रोडला आहे दुसरे कुठलेही शहरातले तुम्ही रोड घ्या. आपण दरवर्षी साडेपाच हजार कोटीच बजेट याच्यावरती खर्च करतो त्याच्यातले एक ते दिड कोटी कन्सलटंटवरती खर्च करतो. आपले कन्सलटंट प्रत्येक ठिकाणी म्हणजे स्टॅण्डींग कमिटीमध्ये सात ते आठ कन्सलटंटचेच विषय असतात. या कामासाठी कन्सलटंट घ्या, त्या कामासाठी कन्सलटंट घ्या. प्रत्येक नगरसेवकाला वाटत माझ्या पेव्हींगब्लॉकचा कलर वेगळा की पुढच्या नगरसेवकाला वाटत माझ्याकडे पेव्हींग ब्लॉकचा कलर वेगळा. सगळा पॅटर्न एक पाहीजे. तुमचे बारा मीटरचे रोड एक सारखे नाहीत, तुमचे आठरा

मीटरचे डीपी रोड एकसारखे नाहीत. एकाही रोडच प्लॅनिंग प्रत्येक प्रभागातून जाताना रोड चेंज होतो. शहरातला पॅटर्न एकसारखा पाहीजे. मला वाटलना मला असं असं पाहीजे की तुमचे डेप्युटी नगरसेवकांकडे येतात ते डिझाईन दाखवतात मग आम्ही म्हणणार हा चॉईस करा, पुढच्या प्रभागात गेल की पुढच्या प्रभागात प्लॅनिंग वेगळ. शहरामध्ये साहेब जेवढे चांगले रोड आपण केलेत ६१ मीटरचा आपला सुंदर रोड आहे नंतर वाकड बीआरटी रोड सुंदर आहे नंतर औंध-रावेत रस्ता पण सुंदर आहे पण त्याच्यावरती परत मेन्टेनन्स होत का नाही. ते तुटल फुटल, परत कुणी त्याच्याकड लक्ष देत नाही. मग ही सगळी जबाबदारी खाली प्रशासनाकड आहे. या ब-याच नगरसेवकांनी तक्रारी सांगीतलेल्या आहेत. अभिषेक बारणे, हर्षल बोलला सव्वादोन कोट रुपये शिक्षणमंडळावर ठेवलेत. तुम्ही मला सांगीतल होत दिल्ली पॅटर्न, साहेब दिल्ली पॅटर्न राबवायची काही गरज नाही. आपल्या महानगरपालिकेच्या १११ स्कूल आहेत, १११ स्कुलच इन्फ्रास्ट्रक्चर कॉस्ट आणि जागा २ हजार कोटीची आहे आपल्याकड आणि माझ्या माहीती प्रमाणे महानगरपालिकेतला कुठलाही कर्मचारी असो, अधिकारी असो, आम्ही लोक असु, तुम्ही कुणीही असु एकाचाही मुलगा किंवा मुलगी या शाळेत शिकायला जात नाही का कारण आजही जीवन शिक्षण विदया मंदीर आहे. दरवर्षी आपण बजेट मध्ये एवढया गोष्टी करतो त्यापेक्षा काही पाप बाजूला करुन आपण प्रायव्हेट स्कुलला म्हणजे सिम्बायोसीस येवू शकत, डी.वाय. पाटील येवू शकत याच्यातला २५ टक्के कोठा आपल्या स्थानिक मुलांसाठी ठेवलातर तो पॅटर्न तयार होवू शकतो असा पॅटर्न आपण राबवावा. अनेक गोष्टी बोलण्यासारख्या आहेत सात तास झालेले आहेत प्रत्येक बजेटवर बोलतो. बजेटमध्ये सगळयात जास्त माझी एक मागणी आहे साहेब, नदीसुधारवर सर्वात जास्त काम कराव अशी मी विनंती करतो, धन्यवाद.

मा.राहूल जाधव - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. ऑनलाईन उपस्थित असलेले सर्व नगरसेवक नगरसेविका. या बजेटच्या मिटींग संदर्भात मी सर्वांच मनापासून स्वागत करतो. स्थायी समितीचे सभापती नितीनजी लांडगे यांनी याठिकाणी आजच बजेट सादर केल या बजेटच्या विषयावर दोन वाजल्यापासून आता सव्वा आठपर्यंत सर्व सदस्यांनी चर्चा केलेली आहे. कुणी बजेटच स्वागत केल काहीनी आपल्या कल्पना मांडल्या आणि त्याच बरोबर काहीना आनंद झाला आणि काहीना दु:ख झाल. एक हिंदी चित्रपट येवून गेला “कभी खुशी कभी गम” प्रत्येकाचा काळ असतो. आता ब-याच जणांनी जुन्या गोष्टीना उजाळा दिलेला आहे त्यामुळ आयुक्त साहेब आणि मा.महापौर साहेब मला सुध्दा जुन्या गोष्टीना उजाळा दयावा लागेल कारण मी सुध्दा

समाविष्ठ गावातून निवडून आलेला २०१२ चा नगरसेवक आहे. २०१२ साली मी पहील्यांदा मनसे मधुन निवडून आलो त्यावेळी या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच पहील बजेट होत ३ हजार ३०० कोटीच आणि त्यावेळेला आम्हांला एकूण निधी यायचा १ कोटी ८० लाख, २ कोटी २० लाख असं टोटल बजेट असायच. त्यावेळी प्रत्येक जनरल बॉडीच्या मिटींगमध्ये आम्हांला असा संघर्ष करावा लागायचा वेळप्रसंगी आंदोलनही करायला लागायच. समजा एखाद मेन्टेनन्सच टेंडर सात कोटी आठ कोटीच निघाल की असा विचार पडायचा की या प्रभागामध्ये काम करु कुठे आणि एका ठिकाणी काम केल की दुस-या ऐरीयातील लोक नाराज व्हायची आणि त्यावेळेस ख-या अर्थान २०१७ ला ब-याच गोष्टीना आम्हांला सामोर जाव लागल. काही गोष्टीची तुम्हांला आठवण करुन दिलीना १९९७ साली आमची गावे समाविष्ठ झाली व २००२ साली पहीली निवडणूक झाली आणि आमच नशीब चांगल की आमच्या प्रभागातून मंगलाताई निवडून आल्या होत्या आणि मंगलाताई त्यावेळेस महापौर झाल्या आणि थोडीफार पिंपरी चिंचवड महानगरपलिका त्यावेळेला आम्हांला कळायला लागली. २००७ ला दुसरी निवडणूक झाली आणि २०१२ ची ती तीसरी निवडणूक होती. २०१२ नंतर एखादी दु:खद घटना घडलीना साहेब आणि त्या अन्त्यविधीला गेलोतर तीथ पञ्याच्या स्माशनभूमी होत्या थोड वार आल की त्या पञ्याचा आवाज यायचा. ज्या घरात दु:खद घटना घडली ती लोक सुध्दा रडता रडता त्या मयताकड न पाहता ती आमच्याकड पहायची कारण आम्ही कुठतरी विकास करण्यास कमी पडत आहे. तसेच दशक्रीया घाट की ज्या ठिकाणी स्नानगृह आवश्यक असतं, महीलांना सुध्दा उघडयावरती आंघोळ करायला लागलेली आहे त्याठिकाणी. आज प्रत्येकानी आपआपल मत व्यक्त केलं या सभागृहामध्ये आम्हांला प्रत्येकवेळेला अंदोलनच कराव लागलेल आहे, सभात्याग सुध्दा करावा लागलेला आहे. वेळप्रसंगी समाविष्ठ गावातले राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे नगरसेवक घेवून आम्हांला प्रवेशद्वारासमोर आंदोलन करावे लागलेले आहेत आणि असं अंदोलन नव्हे आम्ही सुध्दा ती कपडे घालून सामाविष्ठ गावाना विशेष पॅकेज दया अशा पध्दतीच आंदोलन सुरवातीला दत्ता काका साने आणि आम्ही त्याठिकाणी केलेल आहे. त्यावेळी राजीव जाधव आयुक्त असताना आम्हांला दोन दोन कोटी रु. वाढवून दिले होते. डीपीआर झाल्यानंतर २०१७ पर्यंत कोणताही डीपी रस्ता, कोणत्याही खेळाच मैदान, कोणतही गार्डन, कोणतही हॉस्पिटल काहीही आमच्या ताब्यात आलेल नव्हतं आणि कोणताही विकास त्याठिकाणी झालेला नव्हता, प्रत्येक गावामध्ये एक एक महापालीकेची शाळा झालेली होती ती एक एक शाळा सोडलीतर त्याठिकाणी कोणतही काम समाविष्ठ गावातल झालेल नव्हतं. आज आपण पाहीलतर

डीपी रस्ते ताब्यात घेवून त्याठिकाणी डीपी रस्ते एकदम त्याच काम प्रगतीपथावर आहे आणि त्याठिकाणचे काम पुर्णत्वाकडे चालू आहे. आता आम्हांला खेळाचे मैदान बघायला मिळतात, गार्डन बघायला मिळतं, स्मशानभूमी चांगली बघायला मिळते, दशक्रीया घाट चांगला बघायला मिळतो. आमच्या शेतामधुन जे नैसर्गीक नाले गेलेले आहेत त्या नाल्यांची काम वीस वर्षानी झाली वीस वर्षानी तोपर्यंत आमच्या सर्व शेतकऱ्यांची शेती त्याठिकाणी खराब झाली, दुषीत पाण्यामुळे. पिंपरी चिचवड शहर एक इन्डस्ट्रीअल शहर आहे, आमच्या भागामध्ये जे नैसर्गीक नाले आहेत त्यामध्ये रासायनमिश्रीत पाणी जावून इंद्रायणी नदी दुर्गंधीत झाली, आता कुठ त्याठिकाणी काम चालु झाल. भामा-आसखेडचा जो पाण्याचा प्रश्न होता तो आता पुर्णत्वाकडे आहे की ज्या पाण्यासाठी आम्हांला सुध्दा पिंपरी चिंचवड महानगरपालिका आशिया खंडातली सर्वात श्रीमंत महानगरपालिका असुन सुध्दा पाण्यासाठी वणवण भटकाव लागल एवढच नव्हेतर ग्रामपंचायत मध्ये असताना जस आम्ही विहीरीच पाणी प्यायचोना तसच पालीकेत आल्यानंतर सुध्दा आम्ही विहीरीचच पाणी पिलेलोत अशा अनेक गोष्टी आहेत, टॅक्स भरायचा काही चुकला नाही परंतु अशा घटनेला आम्हांला सामोर जाव लागलेंल आहे. आज देहू-आळंदी बीआरटी रोड असेल किंवा काळेवाडी देहू-आळंदी बीआरटी रोड असेल त आता पुर्णत्वाला आले अजून फुटपाथ सुध्दा बाकी आहेत. साहेब मी तुम्हांला अवर्जुन सांगेल की माजी महापौर नितीन अप्पा काळजे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे २०१२ सालचे पहीले नगरसेवक होते त्यांच्यावरही असाच अन्याय झालातर त्यावेळेस ते सुध्दा सभात्याग करुन या सभागृहातून बाहेर गेले होते. कुणाची काळवेळ काही बसून राहत नाही ज्यांना ज्यांना संघर्ष करावा लागला ते सत्तेवर बसले आणि त्यानंतर त्या त्या भागाचा विकास झाला. ब-याच गोष्टींचा आवर घालावा लागतो. २००७ पासून तळवडेच्या ५९ एक्कर जागेसाठी आदरनीय आमदार महेशदादा लांडगे यांची सुध्दा मागणी होती आणि त्या जागेचा प्रश्न आता मिटला की ज्या डिअर सफारी पार्कच स्वप्न माजी नगरसेवक शांताराम बापूच होतं, पंकजच सुध्दा आहे, आमदारांच सुध्दा आहे आणि आदरनीय आजीतदादांनी देखील खुप वेळा बोलून दाखवल आहे त्यानंतर आता भामा-आसखेडच पाणी तळवडेमध्ये आल आहे म्हणजे लाईन झालेली आहे त्यामुळे त्या सहा गावच्या पाण्याचा प्रश्न मिटेल आणि तो प्रश्न मिटल्यामुळे शहरावर असणारा पाण्याचा भार हा कमी होईल आणि त्यामुळे हा पाण्याचा प्रश्न सुटणार आहे. चिखलीमध्ये एक चांगल सुसज्ज अस संतपिठ होतय आणि त्यामध्ये चांगले अध्यात्म आणि सांप्रदायाचा वसा आणि वारसा जोपासण्यासाठी पुढची पिढी चांगली तयार व्हावी यासाठी चांगला अभ्यासक्रम त्याठिकाणी ठेवणार आहोत.

संतपिठाच्या माध्यमातून ख-या अर्थाने सांप्रदायाचा वसा आणि वारसा जोपासण्याच काम होणार आहे. नवीन शाळेची इमारत पुर्णत्वाकडे आहे आणि सर्वात मोठा विषय आदरनीय मोरे साहेबांच्या माध्यमातून त्यावेळेसची त्यांची दुरदृष्टी लक्षात घेता वायसीएम हॉस्पिटल सातशे बेडच झाल त्यानंतर आता साडेआठशे बेडच चिखलीमध्ये एक मोठ मल्टीस्पेशालीस्ट हॉस्पिटल होतय आणि त्यासाठी देखील जागा उपलब्ध झाली. स्मशानभूमी, दशक्रीया घाट आता चांगल्या प्रमाणात होत आहे. त्याचबरोबर चांगले डीपी रस्ते त्याठिकाणी विकसीत होत आहेत. गार्डन असेल, खेळाचे मैदान असेल, पाण्याच्या टाक्या असतील हे देखील चिखलीमध्ये होत आहे. मोशीमध्ये एक्झिब्यूशन सेंटर, क्रिकेटच स्टेडीअम, सफारी पार्क सर्वात मोठा पिंपरी चिंचवड शहराला भेडसावणारा प्रश्न म्हणजे कच-याचा प्रश्न होता तर त्याठिकाणी वेस्ट टू एनर्जी प्रकल्प व त्यामुळे या शहराच कच-यापासून शहरातील नागरीकांच आरोग्य हे देखील चांगल राहणार आहे आणि शहराचा नव्हेतर एक संपुर्ण महाराष्ट्राचा, भारताचा एक अभिमानाचा विषय म्हणून १४० फुट छ.संभाजी महाराजांचा पुतळा हा देखील मोशी-बो-हाडेवाडीमध्ये आमच्याच प्रभागामध्ये उभारतात हा एक शहराच्या नावलौकीकामध्ये भर टाकणारा विषय आहे. त्यामुळे हा एक विषय आताच्याच काळामध्ये होतो. त्याचबरोबर डुडूळगावाच्या तीथे डोंगर आहे आणि त्यामध्ये मोर आणि असे विवीध पक्षी आहेत की त्यांना त्या डोंगरावर पाणी मिळत नव्हतं तर ते पाणी आपण खालून वरपर्यंत नेल. आता त्याठिकाणी चांगले पक्षी, प्राणी आहेत. च-होलीमध्ये विवीध कामे झाली त्याच बरोबर संविधान भवन असेल, सिमेंट कॉंक्रीटचे रस्ते असतील, लाईट व्यवस्था असेल या अशा चांगल्या चांगल्या गोष्टी या अलीकडच्या काळामध्ये या चार वर्षामध्ये त्याठिकाणी झालेल्या आहेत. या शहरामध्ये महीलांच्या सुरक्षीततेसाठी नवीन पोलीस आयुक्तालय हे देखील झालेल आहे. नदीसुधार प्रकल्पाचा एक विषय याठिकाणी झालेला आहे. भोसरीमध्ये कुस्ती केंद्र, मेट्रोचा विषय हा देखील प्रगतीपथावर आहे. शहरामध्ये आता चांगले ग्रेडसेप्रेटर झाले आणि त्याच बरोबर पी.जी.इन्स्टिटयूअ, मेडीकल कॉलेज हे एक चांगल शहराच्या लौकीकात भर टाकणार होतय. या बरोबरच एक मोठा विषय असा आहे की प्रत्येक बजेटमध्ये जलपर्णी काढण्यासाठी काही रक्कमेची आपण तरतूद करत असतो परंतु जलपर्णी जागेवरच असते आणि ठेकेदार सुध्दा पावसाची वाट पाहत असतो, पावसामध्ये जलपर्णी वाहून जाते परंतु त्या ठेकेदाराची बीले ही आदा केली जातात त्यामुळे विषय मी तुमच्या समोर आणणार आहे. दोन ते तीन दिवसापुर्वी माझ्या बरोबर तो विषय झालेला आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातून वाहणा-या

पवना, इंद्रायणी आणि मुळा नदीपात्रातील हायसिंथ, जलपर्णी काढण्याच्या कामाकरीता ठेकेदार नियुक्त करणेबाबत. तर ते काम मिळाल होतं मे.साई प्रा.लि. आणि त्याचा ठेकेदार होता व त्याच ते काम होत २ कोटी ३४ लाख १४ हजार ३४ रु.च तर या ठेकेदाराला परवा मी डॉ.रॉय सरांकडून त्याचा नंबर घेतला आणि त्याला एक फोन केला फोन केल्यानंतर त्याची भाषा ही मी तुम्हांला व्हॉटसएॅपवर पाठवली आणि आता मी त्याची भाषा सभागृहाला ऐकवतो (ठेकेदारा बरोबर झालेल्या संभाषणाची क्लिप ऐकवली) आता विषय असा आहे की तो मला म्हणतो की आम्ही पीसीएमसीला उत्तर देऊ. मग जलपर्णीच टेंडर पास कुणी केल प्रशासनाने का स्थायी समितीने. स्थायी समितीमध्ये प्रशासनाचे अधिकारी असतात का आमचे नगरसेवक असतात, मंजुरतर आपणच करतोना. आमची लोक आम्हांला इथ कोणाच बोलणं खाण्यासाठी पाठवत नाहीत. आम्ही या शहराचे विश्वस्त आहोत, या सभागृहातील सदस्य आहोत शहरातल्या समस्या मांडण्यासाठीच आम्ही याठिकाणी आलोत. त्यामुळे आम्ही अस कुणाच काही ऐकूण घेणार नाहीत. मुंबई वरुन आला आणि इथ येवून बोलणार हे असल ऐकूण घेणार नाही. मा.महापौर साहेब आजच्या मिटींगमध्येच त्याला ब्लॅकलीस्ट करण्याचे आदेश आयुक्तांना दया आणि येथून पुढच कोणतही बील त्याला आदा करु नका. पहील्यांदा २८ लाखाच एक बील दिलय, ४९ लाखाच एक बील दिलय व २ कोटी २९ लाखाच त्याच टेंडर आहे. इथून पुढच त्याला कोणतही बील देवू नका. आज मी जनरलबॉडीला येण्याच्या अगोदरचे जलपर्णीचे फोटो फक्त इंद्रायणी नदीचे आहेत, मुळा नाही आणि पवना नाही, फक्त इंद्रायणीनदीचे फोटो तुम्हांला पाठवलेले आहेत आजचे त्याच्या कामाची मुदत फेब्रुवारीमध्येच संपलेली आहे अजूनही काम जागेवर आहे. तो म्हणतो नदीला पाणी नाहीतर त्या पाण्याचे फोटो सुध्दा मी तुम्हांला पाठवलेले आहेत. आज जर शहराच नाव कुठ खराब होत असेलना साहेब तर या तीन नदयावरती जलपर्णीमुळ नाव खराब होतय. एक दिवस मोशीला दशक्रीया होती आणि त्यांनी प्रवचन ठेवले होते आणि एवढे मच्छर त्या दशक्रीया घाटावर होतेना साहेब की महाराजांचा हात सुध्दा जागेवर राहत नव्हता आणि जे प्रवचनकार आहेतना त्यांचाही हात जागेवर राहत नव्हता सारखे कोणीना कोणी असा मच्छर मारायचा आणि ते मच्छर मारताना लोक आमच्याकडेच पाहत होती, म्हणजे अशा प्रत्येक गोष्टीला सामोर जाव लागतय. असे मुजोर ठेकेदाराची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेला गरज नाही. जे पैसे घेतात जे चांगल काम करतात अशा ठेकेदाराना काम दया. आपण या वर्कऑर्डरचे टेंडरच्या अटी नियम जरी पाहील्यातरी त्याठिकाणी नियम अटी व्यवस्थीत असुन सुध्दा त्या माणसाने एकदम चुकीचे काम

केलेले आहे त्यामुळे त्याला मा.महापौर साहेब आज आपण ब्लॅकलीस्ट करण्याचे आदेश आजच्या आज दयावेत. आमच्याकड माणस बघतात.

मा.महापौर – हे बजेट आहे, आमच्याकडे सुध्दा माणस बघतात, संध्याकाळी तर बाहेर निघता येत नाही.

मा.राहुल जाधव – मा.महापौर साहेब, या संदर्भात याठिकाणी अशा ठेकेदाराना आद्दल घडवलीच पाहीजे. भविष्यकाळामध्ये या गोष्टीमुळ नाव खराब होतं आणि या सभागृहात देखील या गोष्टीमुळ आपल्या अंगावर हे विरोधक येतात. हे विषय सरळ करण्यासाठी जो योग्य निर्णय आहे तो मा.महापौर आपण घेतला पाहीजे आणि या सभागृहामध्ये बोलत असताना या ज्या काही प्रशासनाच्या चुका आहेत, त्या अधिका-यांच्या चुका आहेत त्यांना देखील आदेश दिले पाहीजेत तरच जे काही आरोप आपल्यावर याठिकाणी होतात ते आरोप होणार नाहीत. एवढी सगळी डोळयानी दिसणारी काम असून सुध्दा एक ठरावीक बोटावर मोजण्या इतक्या कामामुळे आपल्यावर आरोप होतात त्यामुळे या सगळया गोष्टींची दखल घ्यावी. बजेट अतीशय चांगल आहे या बजेट मुळ पिंपरी चिंचवड शहराच नावलौकीक वाढणार आहे मी सर्वांच मनापासून स्वागत करुन याठिकाणी थांबतो, जयहिंद, जय महाराष्ट्र.

**मा.सिमा सावळे -** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त,सन्मा.सभागृह धन्यवाद मा.महापौर साहेब,येणार नव्हते, पण काय आहे हे शेवटचं बजेट आहे. सगळयांची भाषणं कोल्हापूर ते सातारा ऐकत होते. मा.महापौर साहेब,मला माहित नव्हतं की,आजची सभा आपण चालवणार आहात म्हणुन, असं वाटलं होतं की,आज आपण बजेट दाखल करुन घेणार आणि दोन दिवसानंतर चर्चा, आणि उपसूचना घेणार परंतु मला सगळयांचच ऐकायला आलं की,हे शेवटचं बजेट आहे,हे शेवटचं वर्ष आहे. आणि आपलंही हे शेवटचं वर्ष असेल, परत आपण या सभागृहात येणार की नाही येणार, यश मिळालं तर ती देवाची कृपा आहे. असो,मा.महापौर आजच्या या बजेटच्या प्रसंगी आमचे नवनिर्वाचित अध्यक्ष खरंतर खुप कमी बोलतात,लाजाळू आहेत, आणि त्यांनी चांगल्या प्रकारे बजेट मांडल त्याबद्दल त्यांचे मनापासून अभिनंदन. यावर्षीचं ५५०० कोटी रुपयाचे बजेट आहे. मला वाटतं ज्यावर्षी मी या सभागृहात आले त्यावेळेस ७०० ते ८०० कोटी रुपयांपासून ते बघता,बघता ५५०० कोटी रुपयांचे पिंपरी चिंचवड शहराचे हे बजेट तयार झालेले आहे.मी या शहराचे प्रतिनिधीत्व करते याचा मला अभिमान आहे. शहराची लोकसंख्या जशजशी वाढत गेली तसतशी या शहराचं बजेटही वाढत गेलं. त्याचप्रमाणे या शहरातील नागरीकांनी केलेल्या सहकार्यामुळे आपल्या या शहराचे वाढलेले बजेट आहे. एवढया

मोठया बजेटचं ज्यावेळेस आपण सादरीकरण करतो त्यावेळेस मला अभिमानाने मन भरुन येतं. या बजेटमध्ये अनेक गोष्टींचा अंतर्भाव केलेला आहे. चांगल्या,वाईट सगळया ठिकाणी टिका होत असतात. आणि विशेष म्हणजे एवढं मोठं बजेट असताना टिका ज्या आहेत या टिकांना आपण सामोरं कसं जातो,पॉझिटीव्ह कसं घेतो,सुधारणा काय करतो, याच्यावरती आपण आपलं मत मांडतो कारण आपण सत्ताधारी आहोत. टिका करतांना जर त्यांनी आपल्या हा,ला हा मिळवलं तर समजुन जायचं की,त्यांनी आपलं बजेट हे वाचलेलचं नाही. आणि बजेट वाचणं आणि त्यावर ख-या अर्थानं अभ्यास करणं आणि ते मांडणं आम्ही ज्यावेळेस विरोधी पक्षात असताना सत्ताधारी पक्षानी मांडलेलं बजेट हे किती निकामी आहे हे आम्ही पाच तास सांगायचं, आमची पण मेहनत लागायची. अगदी मंगलाताईच्या वॉर्डमध्ये झालेल्या मॉडेल वॉर्डवरती ठेवलेलं जे बजेट असायचं त्यावर आम्ही अचुकपणे पकडणार आणि सिटी इंजिनियरना याठिकाणी उभं राहून सांगाव लागलं की, हो,माझी प्रिटींग मिस्टेक आहे. आणि ते बजेट संपुर्ण शहराला वापरलं ही सुध्दा आमची कला होती. आणि मला त्याचा अभिमान आहे. निश्चितपणे तुम्हांला काही,काही गोष्टी सांगता आल्या पाहिजेत. आणि त्यासाठी तुम्हांला बजेटचं पानं चाळावी लागतात. कोणाच्या वॉर्डात किती खर्च केला आहे. मागच्या वर्षी किती खर्च केला आहे याचा अभ्यास करावा लागतो. आणि कमिशनर साहेब,तुम्ही आयएएस आहात अनेक पत्रकारांनी अभ्यास केलेला असतो. आमचं मात्र गोविंदा असतो. आम्ही येथे काही बी.ए.,बी.कॉम झालेले नाही. पण हे बजेट वाचायचं आणि प्रशासनाची चुक शोधायची आणि कळवायची. कोरोनामध्ये आम्ही डॉक्टरांच्या भूमिकेत जाण्याचा प्रयत्न केला. पाणीपुरवठयाच्या बाबतीत लोकांना पाणी मिळत नाही म्हणुन आम्हांला त्याठिकाणी इंजिनियर व्हावं लागलं. आयुक्त साहेब,तुम्हांला एकच भूमिका करायची असते पण आम्हांला अनेक भूमिका करायच्या असतात. आम्ही इथं कितीही बोललो तर आम्ही वॉर्डात गेल्यानंतर आम्हांला गप्पच बसावं लागतयं या सगळया भूमिका पार पाडत असताना आम्ही आमच्या शहराला न्याय देवु शकतो का, आणि नागरीकांना न्याय कसा देता येईल याकडे आमचं जास्त लक्ष असतं. आयुक्त साहेब,तुमच्याकडे प्रशासन आहे,तुमच्याकडे खुर्ची आहे, आणि तुम्ही काय करता ते तुमच्या खालचे अधिकारी तुमच्या पुढे जात नाहीत. आमचं तसं नसतं साहेब, आम्हांला कोणी तरी येऊन सांगतात, गटर कसं तुंबलयं,रस्ता कसा झाला नाही, ड्रेनेज भरुन वाहतयं आणि तिथं आम्हांला खाली मान घालुन ऐकावं लागतयं आणि म्हणुन नगरसेवक हे पोटतिडकीने या सभागृहात त्यांच म्हणणं मांडत असतात. मा.महापौर साहेब,अनेक लोकांनी भाषणं करीत

असताना अनेकांनी अनेक विषय मांडले. मा.महापौर साहेब,याठिकाणी बजेटचं पुस्तक चाळण्यात काही मजा नाही. कारण प्रशासन आकडे मांडतात आणि त्याच्यावर आपण खर्च किती केला याच्यावर तुमची शाबासकी असते. मागच्या चेअरमनचा काळ खरचं अत्यंत वाईट गेला. म्हणजे काही विषय त्यांच्या मागच्या स्टँडींगच्या वेळेस आम्ही जर का अनधिकृतपणे लक्ष घातलं नसतं तर  संतोष लोंढेचा कार्यकाळ फारच वाईट गेला. आणि म्हणुन आम्ही कमिशनर साहेबांना सांगत होतो की, कमिशनर साहेब,तुम्ही सगळया प्रभागांना बजेट वाढवून द्या. प्रभागवाईज जर तुम्ही बजेट पाहिलं तर त्या बजेटमध्ये ४४ कोटी रुपये,३० कोटी रुपये, २५ कोटी रुपये,२८ कोटी रुपये असं बजेट होतं. आज ६० कोटी रुपये आम्ही हार्डीकर साहेबांकडुन वाढवून घेतले होते. आणि भांडायला आम्हीच होतो. आम्ही त्यांना म्हणलं ज्या कामाला  तरतुद केलेली आहे तो खर्च का झाला नाही. आमच्या अध्यक्षांच म्हणणं हार्डीकर साहेबांनी ऐकलं आणि बजेट वाढवुन दिलं. आणि जे बजेट वाढवुन घेतल्यानंतरही मागच्या वर्षी जी कामे झाली नाहीत ती यावर्षी करावी लागणार आहेत कारण इलेक्शन जवळ आलेलं आहे. त्यामुळे मा.आयुक्त आणि अति.आयुक्त यांनी अत्यंत सतर्क रहाणं गरजेचं आहे. यावेळेस तुम्हांला जितक्या लवकर टेंडर काढावे लागतील तेवढया लवकर काढावे लागणार आहेत. कारण लोकांच्या गरजा या छोटया,छोटया असतात आणि ती कामं झाली पाहिजेत आणि त्यांना कामं दिसली पाहिजेत. त्यांना असं वाटतयं की,माझ्या वॉर्डात गटर तुंबत नाही ना, पाणी येतयं नां, याच्याकडे लोकांचे जास्त लक्ष असत. आणि निश्चितपणे हे काम करताना याच्यामध्ये ज्या काही चो-या होत होत्या नां त्याच्यामध्ये आम्ही ब-यापैकी वाचवण्याचा प्रयत्न केलेला आहे. महिला बालकल्याणचा विषय आहे. महिला बालकल्याणनं  पुर्वी  ३० कोटी,४० कोटी रुपयाचं जे काही बजेट होतं त्यावेळेस आम्ही सांगितलं आहे की, जे काही तुमचं दायित्व असेल ते  वगळता राहणा-या बजेटवरती तुम्ही तरतुद केली पाहिजे. आणि म्हणुन त्यावेळेस पासून  ४५ ते ५० कोटी रुपयांची तरतुद  महिला बालकल्याणला मिळायला लागले. साहेब,यामध्ये पहिल्याच पंचवार्षीकला २०१७-१८ ला मा.महापौर साहेब, आपण एक योजना आणली होती कमिशनर साहेब,तुम्ही सुध्दा ऐका, ती योजना आहे ती आमच्या शहराला हिंजवडी  लागुन आहे. आमच्या महिलांना ड्रायव्हींगचं ट्रेनिंग देवुन त्यांना लायसन्स  द्यायचं आणि आमचा असा मानस होता की,१०० महिलांना महानगरपालिकेच्या वतीने कॅब द्यायची ड्रायव्हींग त्यांनी स्वत: केलं पाहिजे. आणि त्या कॅब देताना त्याचं पॅकेज सबसिडी जी आहे  किती आहे ते महापालिकेनं त्यांना दिलं पाहिजे म्हणुन आपण याठिकाणी तो ड्रायव्हींगचा कोर्स चालू

केला.दुर्दैव असं की,चेअरमनपद हे एकच वर्षाचं असतं पण प्रशासन तर तिथं कायम असतं, ३/४ वर्ष आपण असता, त्यावेळच्या तत्कालीन आयुक्तांना माहिती होतं की, जोपर्यंत तुम्ही त्या महिलांना स्वत:च्या पायावर उभं राहण्यास मदत करत नाही मग त्यांनी सांगितलं की,त्या महिलांना आपण पॅकेज सबसिडी देवु त्यांच्या बँकेच्या कर्जाची हमी तुम्ही द्या आणि त्या महिलांना तुम्ही सांगा की,तुम्ही तुमच्या पायावर उभं रहायला पाहिजे. आणि त्यांनी स्वत: ड्रायव्हींग केलं पाहिजे. या शहरात सकाळी ६.००पासून ते रात्री ८.०० पर्यंत ड्रायव्हींग करायला अजिबात कुठलीही भिती नाही. इतकी सेफ सिटी या महाराष्ट्रातील आहे. आणि हिंजवडीमध्ये महापालिकेने पुढाकार घ्यावा. साहेब,आम्ही त्या कारच्या एजन्सींना पण बोलावलं होतं, कंपन्यांच्या अधिका-यांना बोलावलं होतं. अनेक कंपन्या पुढे आल्या होत्या त्यामध्ये ओला,ऊबर या कंपन्याचे एमडी या महापालिकेमध्ये आले होते आणि त्यांनी सांगितलं की,तुम्ही जर आम्हांला अशा कॅब उपलब्ध करुन दिल्या तर निश्चितपणे आम्ही तुमच्या महिलांना काम उपलब्ध करुन देवु. साहेब,आम्ही १०० कॅब म्हणत होतो तिथं ५०० ते ६०० कॅब लागणार होत्या. आणि आमच्या शहरातील ५०० ते ६०० महिला या स्वत:च्या पायावर उभ्या राहिल्या असत्या कमिशनर साहेब,अजुनही वेळ गेलेली नाही. ज्या महिलांनी आपल्याकडे प्रशिक्षण घेतलेलं आहे त्या महिलांना शोधुन त्यांना आपण त्यांच्या स्वत:च्या पायावर उभं करु शकतो. महिला बालकल्याणवरती प्रत्येक वेळा, काही झालं तरी महिला बालकल्याणचं बजेट कमी करा, आम्ही कशासाठी भांडतो तर आम्ही महिला आहोत आम्ही जनरल बजेटवरती भांडतो. आम्हांला असं वाटतं की,मगाशी आमच्या भगिनींनी सांगितलं की, अनेक महिला भगिनी कामांवरुन निघाल्यानंतर वॉशरुमला कुठं जायचं या विवंचनेत असतात.साहेब,ज्या,ज्याठिकाणी सार्वजनिक ठिकाणं आहेत अशा ठिकाणी शौचालये उभारण्याचं काम अनेक वर्षापासून लगातार सुरु केलेलं आहे. आणि त्यामध्ये आम्हांला ब-यापैकी यश सुध्दा आलेलं आहे. आणि पुणे महापालिकेने पीएमपीएमएलच्या बसेस भाडयाने घेवुन त्याठिकाणी फिरते शौचालय चालू केलेलं आहे. जेणेकरुन महिलां भगिनींची सोय होईल. साहेब,आम्ही गेली पाच वर्ष झालं त्या बजेटच्या मागे लागलेलो आहे. अजुनपर्यंत त्याच्यावरती काहीही हालचाल झालेली नाही. आणि म्हणुन ज्यावेळेस आपण जनरल बजेट करता त्यावेळेस आपण खरंतर मुलभूत सुविधा काय देता आल्या पाहिजेत आणि महिलांना स्वत:च्या पायावरती कसं उभं करता येईल याचा अंतर्भाव त्या बजेटमध्ये झाला पाहिजे. आपण अनेक वर्षापासून प्रशिक्षण देत आहोत. त्या प्रशिक्षणामध्ये नवीन,नवीन प्रोजेक्ट आले पाहिजेत जेणेकरुन ज्या सुशिक्षीत महिला

भगिनी आहेत त्यांना रोजगार मिळण्यास कुठलीही अडचण येणार नाही. याकडे आपण लक्ष दिलं पाहिजे. आणि ख-या अर्थानं महिला बालकल्याणचं बजेट सत्कारणी लावलं पाहिजे. मा.महापौर साहेब,टॅक्स आणि बांधकाम परवानगीच्या माध्यमातुन कमिशनर साहेब, २०१५-१६ साली टॅक्सचा विषय आला होता. आणि २०१४-१५ च्या वेळेस आम्ही आंबेडकर पुतळयाच्या ठिकाणी उपोषणाला बसलो होतो. आणि एकंदर थकबाकीदारांची यादी काढली टॅक्स किती वाढणार होता २ ते ३ टक्के वाढणार होता. आम्ही त्यावेळेस सांगितलं की, ज्यांच्याकडे टॅक्सची थकबाकी आहे ती जर वसुल केली तर आपल्याला कुठल्याही प्रकारे टॅक्सची वाढ करण्याची गरज पडणार नाही. त्यावेळेस राष्ट्रवादी काँग्रेसची सत्ता होती त्यावेळेस त्यांनी आमचं म्हणणं ऐकलं त्याबद्दल त्यांना धन्यवाद. आणि त्यांनी त्याच्यावर अंमलबजावणी केली कुठलाही टॅक्सची वाढ न करता.आणि थकबाकीदारांकडनं टॅक्स वसुल केला. त्यामुळे उत्पन्नाचे जे सोर्स आहेत ते आपण शोधले पाहिजेत. महापालिकेच्या ज्या मिळकती आहेत त्या आपल्याला सापडत नाहीत, मिळकती किती स्केअरफुट आहेत त्या पण सापडत नाहीत. मग आपण मिळकती भाडयाने कशा देणार,आपलं उत्पन्न कसं वाढवणार, म्हणुन आम्ही त्याठिकाणी त्याचं टॅक्सेशन करण्याच्या संदर्भात पहिल्यांदा हालचाल केली आणि आता ब-यापैकी मिळकती आपण टॅक्समध्ये करु शकलेलो आहे. याकडेही आपण लक्ष देणं फार गरजेचं आहे. बांधकाम परवानगीचा असा विषय आहे की,तुम्ही जितके पैसे त्यातनं जनरेट करु शकाल तेवढे जास्त पैसे आपल्याला जनरेट करता येऊ शकतात. आणि त्यावर आपल्याला खास करुन लक्ष द्यायचं आहे. परंतु आपण बांधकाम परवानगी विभागामध्ये जाऊन बघा हजारो कोटी रुपयाचे मालक असणारे बिल्डर त्यांना बसायला जागा नसते. त्यामुळे एक आख्खा मजला बांधकाम परवानगी विभागाला देणेत यावा अशी आम्ही अनेक वर्षापासून मागणी करतो आहोत. आणि मग जर त्याठिकाणी फाईल शोधायला गेले तर जो कोणी असतो तो उठतो आणि मला जागा देतो आणि तो बाहेर जाऊन थांबतो. तिथे सगळीकडे माणसेच माणसे उभी असतात आणि एक प्रकारे शेअरबाजार आहे का? मच्छी मार्केट म्हणणार नाही. या शहराला उत्पन्न देणारं एक वेगळं डिपार्टमेट आहे आणि साहेब,तुम्ही त्याठिकाणी गेला तर अनेक माणसं त्याठिकाणी उभी असतात. त्याठिकाणी जर आपण चांगल लक्ष दिलं आणि लोकांना चांगल्या सोयी सुविधा दिल्या तर चांगल काम होऊ शकतं. परंतु गेल्या काही दिवसापासुन नवीन बांधकाम परवानग्या देणं बंद आहे. त्याच्यासाठी सुध्दा आपण लवकरात लवकर शासनाकडे पाठपुरावा करावा. आणि यामुळे आपले उत्पन्न वाढण्यास नक्कीच मदत होणार आहे. मा.महापौर

साहेब,आपण महापौर निधी वाढवून घेतल्याबद्दल आपलं अभिनंदन करणेत येत आहे. पाच हजार रुपये देण्याची जी तरतुद आहे ती वाढवून घ्या,पाच हजार रुपयामध्ये काहीच येत नाही. त्यामुळे आपण जो पाच हजार रुपयांचा जो चेक देतो त्याच्या ऐवजी दहा हजार रुपये, १५ हजार रुपये किंवा आजाराचं स्वरुप पाहून जर का आपण मदत केली तर चांगल होईल आणि त्यामुळे लोकांना सुध्दा दिलासा दिल्यासारखे होईल. तसेच दिव्यांग कल्याणकारी योजना यामध्ये काम करताना खरंच त्याठिकाणी जाऊन आपण काम केलं तर आणि आपण स्वत: दिव्यांग असतो तर काय वेदना झाल्या असत्या हे बघुन जर आपण काम केलं असत तर अनेक वर्षाच्या कालावधीमध्ये चांगली सुधारणा कुठल्याही पक्षाचे नगरसेवक असले तरी करु शकले असते. परंतु ते करण्याचं भाग्य मला मिळालं . दिव्यांगाच्या हाताला काम मिळावं म्हणुन त्यांच्यासाठी ट्रेनिंग सेंटर जवळपास पुर्णत्वास आता याठिकाणी आलेलं आहे. त्याच बरोबर २ हजार रुपये दरमहा त्यांना पेन्शन आपण चालू केलेली आहे. वार्षीक २४ हजार रुपये त्यांना मिळतात. आजपर्यंत हे कोणालाही सुचलेलं नाही. परंतु आम्हाला जे सुचलं त्याच कारण मी तुम्हांला सांगते आपल्या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे सतिश इंगळे हे अधिकारी आहेत त्यांचा मुलगा गतीमंद आहे आणि त्याच्यावरती ते खुप मेहनत घेतात त्याला बोलताही नीट येत नाही. परंतु तो गाणं खुप सुरेख गातो आणि ते पाहिल्यानंतर असं वाटलं की, त्याच्या पॅरेन्टसला किती कुठल्या दिव्यातनं जावं लागतं आणि असं काही स्पेशल झाल्यानंतर पॅरेन्टसला जो आनंद असतो तो द्विगुणीत कसा करायचा हे सतीश इंगळेच्या बाबतीत मला वाटलं म्हणुन माझ्या डोक्यात कल्पना आली आणि चांगल काम करण्याची संधी मी सोडली नाही. आणि त्यांच्याकडेच दिव्यांग सेंटर बघण्याची जबाबदारी दिली होती. आणि नंतरच्या काळात ती जबाबदारी त्यांच्याकडनं काढुन घेतली आहे. परंतु त्यांनी रिक्वेस्ट केली होती की, मला ही जबाबदारी द्या आणि त्यांना दिव्यांग सेंटरच काम त्यांना दिलं तर निश्चितपणे ते चांगल्या प्रकारे चालवू शकतील. आणि आम्हांला चांगल काम करण्याची संधी आम्हांला मिळाली त्यामुळे आम्ही आमचं भाग्य समजतो. पाणीपुरवठयावरती आम्ही मागच्या वेळेस सगळेजण बोललो आहोत. भामा आसखेड असेल,आंद्र धरण असेल यासाठी आपण लवकरात लवकर प्रयत्न केले पाहिजेत. परंतु हे प्रयत्न करीत असताना मा.महापौर साहेब, आज आपण एक दिवसाआड पाणी देतो त्या पाण्यासाठी सुध्दा २४ बाय ७ ही योजना २०१६ साली आली होती. मा.डब्बु आसवाणी त्याठिकाणी चेअरमन होते. राज्यामध्ये भारतीय जनता पार्टीचं सरकार आलेलं होतं योजना आली म्हणुन त्यांनी त्याठिकाणी कुठलेही किंतुपरत्वे न करता त्या

योजनेला मान्यता दिली. आणि आज या शहरातील ७० टक्के भाग हा २४ बाय ७ साठी रेडी आहे. पण प्रॉब्लेम असा आहे की,आज आपण एक दिवसाआड पाणी देतोय. आपण एक दिवस आड पाणी का केलं तर आपल्याकडे २४ बाय ७ योजना येणार आहे. आणि मग २४ बाय ७ आल्यानंतर आपल्याला या गोष्टीची गरज लागणार नाही. परंतु सलग चार वर्ष लोकांनी आपलं म्हणणं ऐकलं परंतु लोक आता त्या मानसिकतेत नाहीत आणि म्हणुन ज्याठिकाणी टेल एरिया आहे त्या भागात अत्यंत दयनीय अवस्था आहे. आणि त्यांच्याकडे रात्री १.३० ते २.०० वाजता पाणी येतं त्यांच्याकडेही लक्ष देणं फार गरजेचे आहे. पाणीपुरवठयाच्या बाबतीत मी मगाशी आशाताईंच भाषण मी ऐकले होते सुदैवाने त्यांच्या भाषणाच्या वेळेस माझ्या फोनला दोनदा रिंग आली. आयुक्त साहेब, आपण स्मार्ट सिटीमध्ये मिटर बसवण्याचा जो प्रस्ताव होता मला वाटतं दोनदा मिटर बदलून झालेला आहे. आणि आता तिस-यांदा ही बदलण्याची वेळ आहे. म्हणजे आता जर आपण बदलायला गेलो तर लोक आम्हांला मारतीलच कारण पाणी पण देत नाही आणि नुसते मिटर बदलायला आम्ही वारंवार जातो. तर हे बदलण्याचं टेंडरला गेलेलं आहे त्यामुळे त्याच्यामध्ये कितीही काथ्याकुट केलं तर मला वाटत नाही त्यातुन फार काही निघेल. तरी मा.महापौर साहेब,आपण दिवसाला १०० टक्के पाणी कसं देता येईल याकडे आपण लक्ष दिलं पाहिजे. पीएमपीएमएलने एक नवीन टेंडर काढलेले आहे ही दरवर्षी ते ६००/६०० कोटी रुपयांची तुट काढतात. साहेब,पीएमपीएमएल ही कंपनी अस्तित्वात आल्यापासून कधीही फायद्यामध्ये नाही. आम्ही असे म्हणतो की,ही सेवा देणारी संस्था आहे त्यामुळे फायद्याचं आपण बघायचंच नाही. आणि याच पीएमपीएमएल ने ३५ कोटी रुपयाचे टेंडर जाहीर केलेलं आहे. पीएमपीएमएल पहिल्यांदा पैसे देणार आहे आणि मग आपण टप्याटप्याने वसुल करणार आहे. आणि ते सगळया बस स्टॉप समोर टप-या उभ्या करणार आहेत. म्हणजे एकीकडे टप-या हटाव म्हणुन आम्ही मागणी करतो आणि दुसरीकडे ते टप-या देणार आहेत. का, तर त्यांना त्यापासून उत्पन्न मिळणार आहे. परंतु मा.महापौर तुम्हांलाही माहिती आहे आणि आम्हांलाही माहिती आहे की,तिथला एकदा अध्यक्ष बनवला तिथे वसुलीसाठी कोणी आडवत नाही आणि याचा अनुभव आपण खुप घेतलेला आहे. त्यामुळे पीएमपीएमएलने अशा प्रकारचे कुठलेही धोरण राबवु नये. पहिल्यांदा ती कंपनी आहे. आणि कंपनीला सीआरटी आहे तो सीआरटी आपण बसवुच शकत नाही. या कंपनीचा आपण राजीनामा देवुन आपण त्या कंपनीतुन वेगळं होऊन आणि पुणे महापालिकेने त्यांच्या हिश्श्याची पीएमपीएमएल चालवली पाहिजे. ते न करता त्यांना नवीन,नवीन कल्पना सुचायला लागलेल्या आहेत. आणि आयुक्त

साहेब,या शहरामध्ये मी चेअरमन असताना माझा आणि मुंडे साहेबांच्या मध्ये पहिल्याच मिटींगमध्ये खटका उडाला होता. साहेब,पीएमपीएमएल बरोबर आपली ६०% आणि ४०% अशी आपली भागीदारी आहे. आपल्या शहरामध्ये महिलांसाठी बस नव्हती आणि त्या मुद्यावरुन खुप भांडण झाली आमची म्हणजे मी एकमेव असेन की, ज्यांची त्यांनी जाहीरपणे माफी मागितली होती. आम्ही जो काही निधी देतो त्यातील ४० टक्के तरी सुविधा आम्हांला त्यांनी दिली पाहिजे. ६०० मिनी बस घेतायत त्यापैकी २०० मिनी बस आमच्या शहरासाठी जोपर्यंत देणार नाही तोपर्यंत आम्ही संचलन तुट देणार नाही म्हणल्यानंतर तीन महिन्यानंतर २०० मिनी बसेस महिलांसाठी पहिल्यांदा या शहरात आणल्या आणि या शहरात बस चालू केली. भारतीय जनता पार्टीने बस चालू केली. आम्ही याठिकाणी वारंवार सांगतो की, या शहरात मेट्रो इथेच, पीएमपीएमएल इथेच, आणि येथून १०० ते २०० मीटरवरती गेलो तर त्याठिकाणी लोणावळा – पुणे लोकल पण इथेचं आयुक्त साहेब,हे औद्योगिक शहर आहे, याठिकाणी एमआयडीसी आहे,हिंजवडी आय.टी.पार्क इथेच, आयुक्त साहेब,आम्ही तुम्हांला वारंवार विनंती करतोय की, आयुक्त साहेब,तुम्ही फक्त बस फिरवा, तुम्ही जर आमच्या इंद्रायणीनगर भागामध्ये आलात ना बघा तर खरं आख्खा इंद्रायणीनगर एमआयडीसीने वेढलेला आहे. आणि त्याठिकाणी हजारो लोक पायी,पायी चालताना दिसतात. पण आम्ही त्यांना बससेवा पुरवु शकत नाही. आमच्या त्या भागात जर का मेट्रो सुरु झाली असती तर आम्हांला जास्त आनंद झाला असता. मेट्रोचा विषय निघाला म्हणुन सांगते, चेअरमन झाले,आणि महिन्याभरात मेट्रोचं काम चालू केलं. या कामाचं श्रेय या शहराचे तत्कालीन शहराध्यक्ष लक्ष्मणराव जगताप आणि आताचे अध्यक्ष महेशदादा लांडगे यांना जातं. यामध्ये तिळमात्र शंका नाही. डिसीजन कसा घ्यायचा आणि आम्ही डिसीजन घेतला त्यांना रस्ता खोदु देत नव्हते, साईड दाखवत नव्हते काहीच नव्हतं त्यांना आम्ही विचारलं तुम्हांला काय,काय पाहिजे ते सांगा, चेअरमन म्हणुन आमच्याकडे मिटींग घेतली . आमच्या स्टँडींगच्या मिटींगमध्ये त्यांनी सांगितलं आम्हांला डंपर पाहिजेत आणि या शहरातील त्यांना आम्ही ८०० ते १००० हजार डंपर लावुन दिलेले आहेत. आणि त्याच्यापेक्षा जास्त कामगार याच शहरातील त्यांना लावुन दिलेले आहेत.या शहरातील नागरीकांना उत्पन्न कसं मिळवुन देता येईल यासाठी आम्ही प्रयत्न केलेला आहे. आज मेट्रोचे जे काही काम दिसत आहे ते आमच्या भारतीय जनता पार्टीची सत्ता २०१७ ला या महापालिकेत आली त्या काळातील आहे. वर्षभरामध्ये काम झपाटयाने मार्गी लावलं आहे की, तुम्हांला लोकांचे डोळे दिपतील आणि आता त्याच्या पुढच काम निश्चितपणे टप्याटप्याने सुरुच

आहे. पुढची पण मेट्रो सुरु झाली तर या शहराला अभिमान वाटेल आणि हा या शहरासाठी मानाचा तुरा आहे. हिंजवडी पर्यंत मेट्रो गेली आहे आणि त्याच बरोबर नाशिक फाटा चाकण पर्यंत या भागामध्ये खरंच मेट्रोची गरज आहे. जेणेकरुन नाशिक हायवेचं ट्रॅफिक कमी होईल. नगररचना भूसंपादनासाठी पहिल्यांदा आम्ही डीपी डेव्हलपमेंटचा रेट ठेवला होता. तुम्हांला डेव्हलपमेंट करायला किती पैसे लागणार आहेत. दुर्दैव असं आहे की, आम्ही बदललो म्हणजे आज महापौर आहेत,त्या बदलल्या की, त्यांनी जे काही निर्णय घेतले आहेत त्या लगेच  बदलतात. आणि त्या डी.पी.चं तुम्ही हेडच काढून टाकलेलं आहे.  मगाशी राहुल कलाटे सांगत होते की, रस्त्यासाठी जागा ताब्यात घेतले पाहिजेत, कुठल्या,कुठल्या गावाचे रस्ते ताब्यात घ्या, त्याठिकाणी शेतकरी कसा येत नाही. म्हणुन आपण हे डी.पी.प्लॅन मधुन काढुन टाकलं. आमचा उद्देश काय आहे मगाशी विकास डोळस आणि राहुल दादांनी सांगितलं की, दिड हजार कोटी रुपयांचे रस्ते भोसरी मतदार संघात झाले आणि दोन हजार कोटी रुपयांची मान्यता आम्ही स्टँडींग चेअरमन असताना चिंचवड आणि भोसरी मतदार संघात  दिली. आम्ही डी.पी.घेऊन बसायचो आणि प्रशासन म्हणुन जे काम तुमचं होतं ते काम आम्ही केलं आहे. शेतक-यांनी २०/२० वर्ष  वाट पाहिली होती साहेब, आणि नवीन डीपीआर चं काम चालू केलेलं आहे. आणि अजुनही त्याठिकाणचे रस्ते आपण ताब्यात घेत नव्हतो आणि त्याठिकाणी अतिक्रमण वाढलेले होते.  डी.पी.मधील रस्ते व्हायला पाहिजेत त्याच्यावरती आपण आवर्जुन  लक्षं द्या. आणि त्याच्यावरती काम करण्यासारखं खुप आहे आणि  या शहराची जी काही डेव्हलपमेंट दिसत आहे ती दिलीप बंड साहेबांच्या काळातील आहे. आजही त्या कमिशनर साहेबांना आम्ही विसरत नाही.  त्यानंतर जी डेव्हलपमेंट झालेली आहे त्यावेळेस आशिष शर्मा असतील, आणि श्रावण हार्डीकर असतील या  व्यक्तींनी खुप काम केलं आहे. दुर्दैवाने असं आहे नां,की,ज्या ज्यावेळेस त्यांनी काम केलं त्यांना शाबासकी द्यायला पुढं कोणी आलं नाही. त्यांच्यावरती टिका करायला सर्वच पक्ष पुढे आले. या शहराचा चेहरामोहरा बदलण्याचं काम खुप केलं आहे. खास करुन  ग्रामीण भागाचा म्हणजे भोसरी आणि  चिंचवड कारण पिंपरी मध्ये तर इकडे दापोडी आणि इकडे निगडी एरियाच संपुन जातो. मंगलाताई रहातात पिंपरी मतदार संघात इथे एमआयडीसीचा एरिया आहे आणि इकडे जिथे संपतो भक्ती शक्ती जिथे चालू होतो तिथे प्राधिकरण त्यामुळे करण्यासारखं खुप जास्त  स्कोप नव्हता. परंतु चिंचवड आणि भोसरी मतदार संघातील ग्रामीण भाग  जो विकसित झाला  आहे तो २०१७ नंतरच झाला आहे. आणि त्याच  कारण असं आहे की, डी.पी.साठी स्वतंत्र  निधी ठेवला आणि

स्वतंत्र निधी ठेवल्यामुळे आम्ही विकास करु शकलो. अतिक्रमण आणि निर्मुलन खरंतर हे शहर टप-यांच शहर दिसतयं, सगळीकडे कुठेही जा,सगळीकडे शेड मारलेले दिसतात. आयुक्त साहेब, इंद्रायणीनगरला यापुर्वी ४० फुटाचा सुध्दा रस्ता नव्हता आता १५० फुटाचा रस्ता आहे. यशवंतनगर ते टेल्को रस्त्याहून जर तुम्ही स्पाईन रोडला आलात तर तिथं १५० फुटाचा रस्ता केला, गवळीमाथ्यावरुन जाणारा रस्ता १५० फुटाचा केला. इंद्रायणीनगरच्या आतमध्ये जर आपण गेलो तर सगळीकडे टप-या,टप-या मग आपलं अतिक्रमण विभाग काय काम करतं आम्ही जर फोन केला तर आपले अधिकारी त्या लोकांना नावासहीत सांगतात. आम्हांला फक्त फुटपाथ हा नागरीकांना चालण्यासाठी हवा आहे. लोकांनी त्यावरुन चालली पाहिजेत. इंद्रायणीनगर चौकात अनेक वेळा अपघात झालेले आहेत. काही लोक अपंग झालेले आहेत,काही लोकांनी जीव गमावलेले आहेत. आजही तुम्ही तिकडे गेले तर तिथं चालायला रस्ता नाही. १५० फुटाचा रस्ता करुन काय केलं आम्ही अतिक्रमणसाठी जशी तरतुद ठेवली आहे तसं काम सुध्दा झालं पाहिजे हे तुम्हांला सांगायचं आहे. स्वच्छ भारत मिशनसाठी आपण तरतुद केलेली आहे. मा.महापौर साहेब,आपलं शहर ब-यापैकी स्वच्छ दिसायला सुरुवात झाली होती. आणि आता खोदुन सगळया ठिकाणी ठेवलेलं आहे. ते स्वच्छ केलं की नाही हे कळूनच येत नाही. त्यामुळे त्याकडं तुम्हांला खुप बारकाईनं लक्ष द्याव लागणार आहे. प्रधानमंत्री आवास योजना ४९ कोटीची तरतुद ठेवलेली आहे. परत एकदा सांगते देशाचे पंतप्रधान नरेंद्रभाई मोदी त्यांनी सांगितलं की,२०२२ ला देशातील प्रत्येक परिवाराला घर मिळेल. आणि त्यांच्या विचाराला मानुन मी तीन ठिकाणी प्रकल्प चालू केला. आणि मला आनंद पण वाटतो की,त्या प्रकल्पाची सोडत पण निघाली. क्रेडीट घेत नाही, स्वत:च्या क्रेडीटसाठी नाही करत पण ते करत असताना आपण जे ४९ कोटी रुपये ठेवले आहेत त्यांच्या स्वपनाला सुरुंग लावणार आहात. कारण त्यात आपण कुठल्याही नवीन योजना घेतलेल्या नाहीत. कमिशनर साहेब,या शहरातील ४७ ते ४८ हजार लोकांनी अर्ज केले होते त्या लोकांनी आता जायचे कुठे? कारण तुम्ही नवीन योजना करत नाही. नवीन एकही योजना करीत नाही आणि मग हे ४९ कोटी रुपयाचे आपण काय करणार आहात. राहीलेल्या लोकांचे पैसे देणार आणि ही योजना गुंडाळणार. आणि म्हणुन प्रत्येक गरीबाला घर मिळालं पाहिजे. ते स्वप्न देशाचे पंतप्रधान येऊ दे, नाही तर अजुन कोणी येऊ दे त्यांनी ते स्वप्न पुर्ण करण्याचं त्यांनी काही कमी केलं आहे का, त्यांनी गोरगरीबांच स्वप्न पुर्ण केलं आहे. त्यामुळे हे स्वप्न कसं पुर्ण होईल यासाठी आपण मा.महापौर लक्षं दिलं पाहिजे. मा.पक्षनेते आपण सुध्दा याच्यावर गांर्भीयाने विचार

करा,अमृत योजनासाठी जी तरतुद केलेली आहे ती राहिलेल्या बिलासाठीच तरतुद केलेली आहे असं वाटतं. कारण आता जर आम्ही विचारलं अमृत योजनेचं काम किती बाकी आहे. तर सांगतात नाही,नाही सगळं झालं,सगळं झालं आणि कुठं केलं म्हणलं तर म्हणतात की,इकडं केलं,तिकडं केलं असं सांगणार उरकायचं कसं त्याच्या मागे लागलेले आहेत. हरकत नाही, पावसाळयाच्या पुढे होत त्यात आम्हालाही आनंद आहे. परंतु माई, याच्यानंतर आपण कुठलीही नवीन योजना केलेली नाही. त्यामुळे जुन्या ज्या योजना होत्या त्या योजनाच्या बिलासाठी पैसे ठेवले आहेत की काय अशी शंकेस वाव आहे. आणि म्हणुन त्यासाठी आपण स्वत: लक्ष द्यायला पाहिजे. मा.महापौर साहेब,मा.कमिशनर साहेब, या शहराला आपण स्मार्ट सिटी म्हणुन जो निधी ठेवलेला आहे. आणि या स्मार्ट सिटीमध्ये आपल्याला मी पत्र दिलेलं आहे. मला पण सिनियर नगरसेवक म्हणुन पत्रात जाहीर करणं योग्य,अयोग्य मला माहित नाही. मी आपल्याला एल अँण्ड टी च्या संदर्भात पाच ते सहा पत्रं दिलेली आहेत. याच्यावर तुम्ही २० तारखेला सुनावणी घेणार होता पण अजुन तुम्ही मला भेट देत नाही. दुसरं पत्र आहे त्याच्यामध्ये बजेटच्या पुस्तकामध्येच आहे. सिटी ट्रान्सफॉर्मेशन ऑफीस मा.महापौर साहेब,तुम्हांला आठवत असल की,तत्कालीन आयुक्त हार्डीकर साहेबांना सुध्दा विरोध केला होता की, हे जे ऑफिस आहे ते आपल्या प्रिमायसेस मध्ये पाहिजे. ते दुसरीकडे कुठेही असणार नाही. मा.मंगलाताईंनी हे ऑफिस याठिकाणी चालू केलं होतं. ते आपण खाली परत घेतलं आणि तिथं हे ऑफिस चालू केलं. मंगलाताईंनी केलं म्हणुन खाली केलं हे मला माहिती नाही. परंतु ते महिलांसाठी होतं आमचं ऑफिस होणार होतं आमच्या ऑफिससाठी लढाई होती आणि ते तिथुन काढलं आणि तुम्ही ट्रान्सफॉरमेशन ऑफिस तुम्ही चालु करणार होतो आणि त्याचं २६ जानेवारीला उदघाटन होणार होतं. याच्यावरती सायबर हल्ला झाला, पाच कोटी रुपयांच नुकसान झालं आहे अनेक लोकांनी ऑब्जेक्शन घेतलेलेआहेत. साहेब,या टिकेला आपण उत्तर द्यावं अशी अपेक्षा आहे. या स्मार्ट सिटीने आख्खं शहर खोदून ठेवलेलं आहे. आणि आख्या शहरात तुम्ही गेल्यानंतर इकडं खोदलयं,तिकडं खोदलयं, तिकडे भराव टाकलाय, आमची १०/१५ वर्षाची तपश्चर्या आज मातीमोल व्हायची वेळ आलेली आहे. आणि तुम्ही त्याला आळा घालायला तयार नाही. आणि हा खोदलेला रस्ता पुर्ण करण्याची जबाबदारी ही त्या कॉन्ट्रॅक्टरची होती. कॉन्ट्रॅक्टरनी सब कॉन्ट्रॅक्टर नेमलं. सब कॉन्ट्रॅक्टर आपल्याला स्मार्ट सिटी माहिती व्हायला पाहिजे होतं. त्यांचा जो करारनामा आहे तो स्मार्ट सिटीच्या बोर्डावरती ठेवायला तुमची पण मंजुरी लागते साहेब, तुम्हांला माहितच नसेल, आपण

कोण कॉन्ट्रॅक्टर नेमला एल अँण्ड टी यांच नांव मोठं दर्शन खोटं आणि त्यांनी सब कॉन्ट्रॅक्टर नेमून लोकल लोकांना दिलं. लोकल लोकांना देण्यास आमचा विरोधच नाही. पण त्यांना का द्यायचं होतं तर सगळयांना बोलवायचं होतं. आज साहेब,काय झालं माहिती आहे तुम्हांला, कमिशनर साहेब,हे जे होतं ना काम पुर्ववत करायचं एल अँण्ड टी नं खोदलं प्रभागातुन आपण टेंडर काढतो साहेब, भराव भरण्याच्या संदर्भातलं आणि आम्ही भरलयं पैसे तुम्ही स्मार्ट सिटीला पण दिले आणि आम्ही ठेकेदाराला पण दिले आहेत. आणि साहेब,तुम्हांला माझ्या पत्रावर जितक्या लवकर सुनावणी लावता येईल तितक्या लवकर ती सुनावणी मला हवी आहे तुमच्याकडनं मी तुम्हांला पुराव्यासह देणार आहे आठच्या आठ प्रभागामध्ये यासंदर्भामध्ये आपण त्याठिकाणी ज्या कॉन्ट्रॅक्टरनी खोदाई केली त्यांनी ते रस्ते पुर्ववत केले नाहीत आपण केलेले आहेत. आपण त्यांना पुर्ण पैसे दिलेले आहेत. मा.महापौर साहेब,या सायबर हल्ल्याच्या संदर्भात खरंतर आपली खुप बदनामी झालेली आहे. त्यांनी तुम्हांला कमिशनर साहेबाना सगळयांना सांगायला पाहिजे होतं. काय घडलयं, आणि टेक महिंद्राचं नांव जर ऐकलं तर आम्हांला पण वाटायला लागलं टेक महिंद्रा यांच देशामध्ये योगदान फार मोठं आहे. एल अँण्ड टी कंपनी,टाटा कंपनी या फार मोठया कंपन्या आहेत. यांनी देश घडवायला मदत केली आहे. आणि म्हणुन आम्ही यांच्या विरोधात बोलत नाही. आश्चर्य आहे साहेब, १२ टक्केचा स्टेस आहे टेक महिद्राचा २२० कोटी रुपयाचा आहे. नांव घ्यावं की नाही घ्यावं या मनस्थितीत आहोत. परंतु साहेब,तुम्ही बघा तरी खरं काय चाललयं तुमची इमेज किती चांगल्या प्रकारची आहे हे करण्याचा प्रयत्न कराल ना साहेब ही सगळी जबाबदारी तुमच्याच नावाने येणार आहे. आमच्या नाही कारण त्याचे सीएमडी तुम्ही आहात आम्ही नाही. तुमच्या अधिका-या बरोबा एक,एक मुद्यांवर भांडायला लागतं तरी तुम्ही त्याची दखल घेत नाही. आणि मग पुढं जाऊन असं वाटतं की, या झालेल्या भ्रष्टाचारामध्ये प्रशासनाचा हात आहे का? प्रशासन डोळेझाक का करतयं,सायबर हल्ला झाला पाच कोटी रुपयांच नुकसान झालं. साहेब, दिवसभर बातम्या लागल्या. सायबर हल्ला झाली की नाही याचा खुलासा होणं गरजेचं आहे. मा.कमिशनर साहेब,तुम्ही जर माझी सुनावणी नाही घेतली तर दुर्दैवाने मला आंदोलनाचा पवित्रा घ्यावा लागेल. मी तुम्हांला खुप वेळा विनंती केलेली आहे मला तुमच्यावर प्रेशरचा वापर करायचा नाही. तुम्ही चांगले आहात तुम्ही आमच्याकडे तीनच वर्षासाठी डेप्युटेशनवर आलेला आहात. आम्हांला असं वाटतयं की,तुम्ही या शहरातुन जाताना एक चांगला आदर्श घेवुन जायला पाहिजे. पण काय होतं साहेब,या सगळयाच्या मध्ये ज्या झालेल्या चुका आहेत त्या

तुमच्या डोक्यावरती देणार आणि म्हणणार जा,जा. कारण की, याठिकाणी इतकं चांगल करुन सुध्दा हार्डीकरांना या सगळया गोष्टींना सामोरं जावचं लागलं त्यातनं तुमचीही सुटका नाही साहेब. आणि म्हणुन कमिशनर साहेब,मला पुढच्या जी.बी.ला आंदोलन करायला लावु नये अशी अपेक्षा व्यक्त करते. मा.महापौर साहेब,खरंतर बजेट जितकं चांगल केलेलं आहे तितका खर्च आपण करावा.आणि कमिशनर साहेब, मा.अति.आयुक्त (१) यांना विनंती करेन की, आम्ही बजेटवरती जी काही तरतुद ठेवतो त्याची प्रोसेस आपण समजुन घ्या. आम्ही तुम्हांला चुकीचं सांगणार नाही. आमचं इलेक्शनचं हे वर्ष आहे त्यामुळे किती लवकर करता येईल त्याच्याकडे आपण लक्षं द्यावं आणि त्याठिकाणी लक्ष दिलं तर निश्चितपणे आमच्या वॉर्डातील कामांची जी टेंडर लवकर काढण्यास मदत होईल. म्हणुन आपण त्याकडे जास्ती जास्त लक्ष द्यावं आणि जाता,जाता शिक्षण मंडळाचा एक विषय आहे. त्यामध्ये खरंतर आम्ही स्वत:ला खुप शहाणे समजतो साहेब, पण आम्ही सुध्दा मुर्ख झालेलो आहोत आमच्याकडनं सुध्दा या गोष्टीच्या चुका घडलेल्या आहेत आम्ही काय ऐकतोय साहेब, शिक्षण मंडळामध्ये जो व्यक्ती ड्रेस पुरवतो त्याचा फक्त आम्ही करारनामा वाचायचा याठिकाणी अतिरिक्त आयुक्त तानाजी शिंदे होते ते गेल्यानंतर आपले अधिकारी सुध्दा अडकतील साहेब नंतर कागदपत्र बदलली गेलेली आहेत. मोघम आरोप करत नाही. माझ्याकडे त्याचा सज्जड पुरावा आहे. ठेकेदारांनी कागदपत्रं बदलली आहेत त्याच्या विरोधात महानगरपालिका कोर्टात गेली दुर्दैव असं आहे की,कोर्टात आपला वकील हजर रहात नाही. मी महानगरपालिकेच्या विरोधात कोर्टात गेले साहेब,मला दुसऱ्या,तिस-या हेरींगमध्ये जर का मला स्टे मिळतो तर अशा टेंडरला स्टे का मिळत नाही. शिक्षण मंडळ, शिक्षण समितीच्या बाबतीत माझ्या सारख्यांनी तुम्हांला सांगण्याची गरज नाही तुम्ही आयएएस ऑफिसर आहात. शिक्षण मंडळ स्वायत्त होतं शिक्षण कमिटी ही कलम ३० नुसार स्थापन झालेली आहे. त्याचे सगळे अधिकार हे स्टँडींगकडे आहेत. आणि आर्थीक अधिकार हे स्टँडींगकडे असताना शिक्षण मंडळ राज्य शासनाने बरखास्त करत असताना शिक्षण मंडळाने जे,जे टेंडर काढलेले आहेत जे करारनामे झालेले आहेत ते अँटोमॅटीकली रद्द होतात पण नाही केले साहेब,प्रशासनाने तुमच्या, प्रशासनाने पाठीशी घातले त्यांना आणि म्हणुन अशा कॉन्ट्रॅक्टवरती साहेब, जो आपल्याला ड्रेसेस पुरवतो त्याच्यावरती कडक कारवाई झाली पाहिजे. ४२० ची केस दाखल झाली पाहिजे, त्याच्यावरती एफआयआर दाखल झाला पाहिजे महानगरपालिकेने त्याला बेडया घातल्या पाहिजेत. जो कॉन्ट्रॅक्टर महानगरपालिकेची फसवणुक करतो. याठिकाणी स्टँडींग कमिटीचे चेअरमन बसलेले

आहेत त्यांना पण सांगेन. परवा झोनिपुचा विषय तुमच्याकडे आला होता. साहेब,मला फार,फार आश्चर्य वाटतयं आम्ही खादी ग्रामोद्योग आहे त्यांच्याकडे आम्ही गेलो होतो आम्ही जर एखादयाला धंदा चालू करण्याचा ट्रेड मागितला नां तो सुध्दा आम्हांला भेटू देत नाही. ते खादी ग्रामोद्योग करत नाही साहेब,हाच कॉन्ट्रॅक्टर करतो आपण शिक्षण मंडळात काय करतो साहेब,आपण जातो वाडया वस्त्यावरची विद्यार्थी पकडुन पकडुन आणतो आता आपली पटसंख्या काय आहे ते बघा आणि ड्रेसेसची किती खरेदी करतो. १८/१८ हजार ड्रेसेसची खरेदी एकदम खरेदी करतो. त्या विद्यार्थ्यांना आणतो,बसवतो त्यांना ड्रेस देतो परत ते विद्यार्थी शाळेत येत नाहीत. वह्या,पुस्तकं,बुटाचं,दप्तराचं तसंच आहे. पहिलं काय जी.बी.चालायची साहेब दप्तर जर पाहिले तर वरुन फाडलं तर त्याचे दोन तुकडे व्हायचे. स्वेटर आपण उन्हाळयात वाटप करायचे त्याच्या आधीच टिका व्हायची. इथे लोकांच्या प्रश्नासाठी आम्ही भांडलेलो आहोत. आज तिथं काय होतय वाईट वाटतयं हे सगळं बघताना त्याच्यावर आम्ही अंकुश ठेवु शकत नाही. साहेब,हे आमचे,तुमचे विषयच नाहीत. जे चुकीचं असेल त्याच्यावर तुम्ही कारवाई केलीच पाहिजे या मताशी मी आहे आणि तुम्ही सुध्दा आहात. मा.महापौर साहेब, डीबीटीचा विषय जी.बी.त आणला होता भारतीय जनता पार्टीच्या काळात डायरेक्ट विद्यार्थ्याच्या खात्यामध्ये पैसे द्या . २०१७ ला आम्ही आलो आणि नेमकं चेअरमन झालो आणि शाळा सुरु झाल्या डीबीटी काढायला वेळ नाही. बजेटला दिड/दोन महिने उशिर झाला. आणि म्हणुन अटी/शर्ती वरती त्यावेळेस ड्रेसेस पुरवण्याचं काम दिलं. जे त्यावेळेस सुरु केलं ते आजतागायत थांबलेलं नाही. आणि इतर लोक न्यायालयात गेले त्यांना वेगळा न्याय मिळाला आणि याला वेगळा न्याय मिळाला कारण हा अनेक नेत्यांना सांभाळतो. अनेक घारीचे शुक्राचार्य आहेत याच्या पाठीशी कमिशनर साहेब,याला पण तुम्हांला उघडं करावं लागेल . तुमच्या प्रशासनालाच तुम्हांला उघडं करता येणार आहे. हा ठेकेदार कोटयावधी रुपयांची फसवणुक करतो. मागच्या वर्षी तर कोरोना होता कोणाला ड्रेस देणार आहे. आता तुम्हांला डीबीटी काढायला संधी आहे. डीबीटी काढा,विद्यार्थी मोकळे करा या एका आरोपातून तुमची सुटका मा.महापौर साहेब,जे बजेट केलेलं आहे ते अत्यंत घाई घाईत केलेलं आहे. याच्यावरती ज्या उपसूचना येतील त्याआपण ग्राह्य करण्यात याव्यात. आणि भारतीय जनता पार्टीने केलेल्या कामांची जी जाहीरात करायला पाहिजे ती केलीच नाही. आणि जाहिरात न केल्यामुळे आज काय मनस्थिती आहे आपण काम केलं किंवा नाही केलं आज च-होली, डुडूळगांवात येऊन तरी बघा , किवळे,मामुर्डीत जाऊन तरी बघा डोळे दिपतील अशी डेव्हलपमेंट या दोन्ही ठिकाणी झालेली आहे. त्याचप्रमाणे मेट्रो च काम

बघा अजुन पाच वर्ष पुर्ण व्हायची आहेत आपले मेट्रो स्टेशन उभे राहिलेले आहेत. आंद्र,भामा आसखेडचं पाणी आलं तर आपलं पाण्याचा प्रश्न सुटणार आहे. प्रधानमंत्री आवास योजना या तीनही प्रकल्पांची सोडत काढलेली आहे. रावेतच्या प्रकल्पात जर आपण लक्ष घातलं तर तो सुध्दा प्रकल्प मार्गी लागणार आहे. मा.महापौर साहेब,प्रधानमंत्री आवास योजनेचं क्रेडीट आपलंच आहे नां, या महापालिकेचे ५०००/६००० कोटीचं बजेट हे काही छोटं नाही. चुका झालेल्या आहेत परंतु जे केलेलं आहे नां ते सुध्दा ठासुन सांगता आलं पाहिजे. कोण मोठं होतं याच्यापेक्षा आम्ही चांगल काय केलं हे तरी सांगा आणि हे सांगायला आपण कमी पडलो आणि त्यामुळे आपण केलेल्या चुकांची कबुली पण दिली पाहिजे आणि चांगलं केलं तर त्याच क्रेडीट पण घेता आलं पाहिजे. साहेब,याठिकाणी आम्ही अनेक चांगली कामे केलेली आहेत. आणि या महापालिकेचे उत्पन्न वाढीसाठी आम्ही पण सांगितलेलं आहे. महानगरपालिकेला पहिल्यांदा टेंडर काढुन बँकानी आमच्या दरमहा ठेवीवर किती टक्के व्याज देणार ही पहिल्यांदा संकल्पना राबविलेली आहे. त्याचं श्रेय राजेश लांडेना पण जातं. साहेब,एका वर्षात १०० कोटी रुपये आले होते. स्थापत्यच्या प्रत्येक कामाला कंन्टीन्युसी लागायची याच्यामध्ये ७५ ते १०० कोटी रुपये जायचे साहेब, स्टँडींग चेअरमन झाल्यानंतर कंन्टीन्युसी बाद, नाही बाबा, खुप वाद झाला ऐकलं नाही आणि ७५ ते १०० कोटी रुपये वाचवले म्हणजे हे एक उत्पन्नचं झालं तसेच वाढीव खर्चाला आजच्या कारकीर्दीत एक रुपया सुध्दा खर्च केला नाही. काही ठराविक वस्तु आहेत त्याच्यावरतीच फार बारकाईनं लक्ष द्यावं लागणार आहे. आणि खरोखर आयुक्त साहेब,एका,एका प्रभागामध्ये २०/२२ कोटी रुपये जातात. हा वाढीव खर्च कसा ज्यांचा आंतर्भाव टेंडर मध्ये नाही त्याला स्टॅंडींग मध्ये मंजुरी देवुन त्याचा वाढीव खर्च, अरे,टेंडर मध्ये असेल तर वाढीव खर्च कशाला पण टेंडरमध्येच नाही नां, वस्तुच त्याच्यामध्ये नाही मग वाढीव खर्च कशाला त्याच्याकडेही लक्षं देण्याची फार गरज आहे. आणि या सगळया वाढीव खर्चावर जर आपण अंकुश आणला आणि या सगळया डिपार्टमेंटमध्ये जर आपण चांगले अधिकारी नेमुन जर कामाला सुरुवात केली तरआपल्याला याच्यामध्ये चांगलं यश आपल्याला मिळणार आहे. आणि पुढील काळामध्ये प्रधानमंत्री आवास योजना,पाण्यावरती आणि रस्त्यावरती ही जी खोदाई चालू आहे आता पावसाळा सुरु व्हायला दोन महिने उरलेले आहेत. आता पावसाळा आहे का, हिवाळा आहे काहीच कळतंच नाही. सकाळी ऊन पडतं, दुपारी पाऊस पडतो. रस्ते खोदलेले आहेत पाऊस कधीही पडू शकतो आपण त्याच्याकडे लक्षं द्या आपण एमएनजीएल ला पैसे कमी केले आहेत ग्राहकांचे खोदाईचे पैसे कमी

केलेले नाहीत. आपण जीओ कडनं पैसे घेतो, स्मार्ट सिटीला खोदाईचे पैसे कमी केलेले आहेत. आपण त्यांना पैसे द्यायला कमी केलेले नाहीत. या सगळया गोष्टीवरती जर का आपण बारकाईने अभ्यास केला तर निश्चितपणे आपल्याला चांगल काम करता येईल. कमिशनर साहेब, स्मार्ट सिटीवरती आपल्याकडनं खुप अपेक्षा आहेत आणि निश्चितपणे आपण त्या पुर्ण कराल. मा.आयुक्त साहेब,काही चुकांसहीत, त्रुटीसहीत राहिलेल्या बजेटवरती मा.पक्षनेत्यांना विनंती करीन की, आपण त्यामध्ये उपसूचना घ्याव्यात आणि वॉर्डातलं बजेट वॉर्डातचं कसं राहील विरोधी पक्षाचं असु दे,सत्ताधारी पक्षाचं असु दे या सभागृहात येऊन बोलण्याचा अधिकार आहे. कारण ते निवडुन आलेले आहेत त्यामुळे त्यांना त्यांच बजेट राखण्याचा पुर्ण अधिकार आहे. आणि ते बजेट तसंच ठेवावं असं मी याठिकाणी सांगते.जयहिंद, जयमहाराष्ट्र.

**मा.राजु मिसाळ -** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त,सन्मा.सभागृह आज पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचं ३९ वे अंदाजपत्रक स्थायी समितीचे चेअरमन आणि आमचे सहकारी नितीन लांडगे यांनी सादर केल आहे. मा.महापौर साहेब, २ वाजल्यापासून आता जवळपास ९.३० वाजले आहेत.आमचे सर्व मंडळी म्हणायचे की, गेली चार वर्ष तुम्ही बजेटवरती बोलू दिलं नाही. माई,मी तुमचं मनापासून कौतुक करेन की, तुम्ही सर्वच पक्षांच्या सदस्यांना ज्यांना बोलायचं होतं त्यांना या चार वर्षामध्ये या बजेटवर तुमच्या माध्यमातुन त्यांना बोलण्याची संधी मिळाली. त्यामुळे आम्ही तुमचं मनापासून कौतुक करतो. मा.महापौर साहेब,आम्ही एखादी चांगली गोष्ट झाली तर त्याला आम्ही नक्कीच चांगल म्हणणारा हा आमचा पक्ष आहे. आम्ही त्याला मुळीच कधी डावलत नाही.आज सर्वात महत्वाचं म्हणजे बो-हाडेवाडी मध्ये छत्रपती संभाजी महाराजांचा १४० फुटाचा पुतळा उभा रहातोय. मगाशी माझे सहकारी बोलले की,आपल्या पिंपरी चिंचवड शहराच्या नावलौकिकामध्ये भर पडणारा असा एक छत्रपती संभाजी महाराजांचा पुतळा होत आहे.आम्ही याचं कौतुकच करु. यावर्षामध्ये संपुर्ण भारतामध्ये पुणे आणि पिंपरी चिंचवड मध्ये सर्वात जास्त कोविडचे पेशंट सापडलेले आहेत. पालकमंत्र्यांच्या दर आठवडयाच्या मिटींगमध्ये या कोविडच्या संदर्भामध्ये आढावा घेतात आणि त्या मिटींगला आपण सुध्दा उपस्थित असता. आज सुध्दा महत्वाची मिटींग झालेली आहे त्याच्यामध्ये जम्बो कोविड सेंटर असेल ससुन हॉस्पिटल असेल याच्यामध्ये असा निर्णय झाला आहे की, आणि प्रायव्हेट हॉस्पिटलमध्ये सुध्दा ५० टक्के खाटा या आरक्षित करणेत याव्यात अशा सूचना सर्व अधिका-यांना केलेल्या आहेत. तर आजच्या या अर्थसंकल्पामध्ये कोविडसाठी भरीव अशी तरतुद दिसत नाही. गेल्यावेळेस कोविडच्या याच्यामध्ये ३३ %

बजेट खर्ची करायचे असा शासनाचा आदेश आलेला होता. माई,या शहरासाठी १२०० कोटीची मान्यता सुध्दा मा.अजितदादांनीच दिली. या पिंपरी चिंचवड शहरावर दादांच मनापासून प्रेम आहे. हे त्यातुन दिसुन येत आहे. आणि आम्ही अजितदादांच्या अभिनंदनाचा ठराव मांडला होता. माजी पक्षनेत्यांनी तो वेगळया पध्दतीने घेतला आणि आज आमदारांच कौतुक झालं. जी गोष्ट चांगली घडली त्याचं अभिनंदन करण्यासाठी आम्ही आहोत नां, तुम्ही एखादी चांगली गोष्ट केल्यानंतर आम्ही पण ते मान्य करतो. परंतु तुम्ही आमचा अभिनंदनाचा ठराव सुध्दा तुम्ही स्विकारला नाही. हे का,सांगावसं वाटतं, एखादी गोष्ट चांगली घडली तर त्याला तुम्ही पण चांगल म्हणायला शिका कारण आताच ताईंनी पण सांगितलं आहे. त्यावेळेस स्टँडींगमध्ये काय निर्णय झाले त्याच आम्ही पण कौतुक केलं होतं. आम्ही पण स्टँडींगमध्ये होतो. तळवडेची ६० एकर जागा इतकी दिवस ती गायरान म्हणुन पडून होती आणि आज त्या जागेची किंमत किमान १०० ते १५० कोटी रुपयाची जागा पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री मा.अजितदादा यांच्या प्रयत्नातून आपल्या महापालिकेला फुकट मिळाली आहे. आपल्याला एक रुपया भरावा लागला नाही. त्याच साधं कौतुक केलं नाही. मा.महापौर साहेब,तुम्ही आमचा अभिनंदनाचा ठराव सुध्दा दाखल करुन घेतला नाही. हे असं व्हायला नको. खरंच जर राजकारण करायचं असत तर हे १२०० कोटी रुपये आले नसते तर या शहरातील कामं झाली असती का? पक्षनेते या १२०० कोटी रुपयेला मान्यता मिळाल्यामुळे तुम्ही या शहरातील सर्व कामे करु शकता. आज बजेटच्या संदर्भामध्ये बोलायचं आहे. मेट्रोचा ठराव पण आम्ही आणला आहे. पिंपरी पर्यंत असणारी मेट्रो ही निगडी पर्यंत व्हावी यासाठी पण आम्ही पत्र द्यायला गेलो होतो. या शहरतील लोकांना साकडे घालुन आंदोलन सुध्दा केलं. त्यावेळेस काय त्रुटी राहिलेल्या होत्या माहिती नाही पण पिंपरी पर्यंतच मेट्रो आली. मेट्रो पिंपरी पर्यंत आल्यानंतर पालकमंत्री अजितदादांनी निगडी पर्यंत मेट्रो करण्याचा ठराव पास करुन केंद्राकडे पाठविला परंतु आपण त्यासाठी किती तरतुद ठेवलेली आहे. फक्त ५० कोटी रुपयांची तरतुद ठेवलेली आहे. आपले जे कोणी अधिकारी या मेट्रोसाठी काम करतात त्यांची निगडी पर्यंत मेट्रो यावी अशी इच्छा नाही का? मंगलाताईंनी बजेटवर बरंच काही बोलल्या आहेत त्याच्यामधनं त्यांनी बरंच काही घेतलेलं आहे. आमच्या प्रभागात आम्ही दोन बीजेपी एक शिवसेना आणि एक राष्ट्रवादीचे जरी असलो तरी वॉर्डात राजकारण करताना आम्ही पक्षीय राजकारण कधीच केलेलं नाही. आज त्यांनी सुध्दा सांगितलं आहे की,बजेटच्या बाबतीत आम्ही समाधानी नाही. बजेटमध्ये आमच्या प्रभागाला तरतुद देताना जो दुजाभाव झालेला आहे. प्रत्येक

सदस्यांना पुढच्या इलेक्शनला सामोरे जायचं आहे. आज वॉर्डातील कामासाठी तरतुद नाही. मा.महापौर साहेब,आपल्याकडे एलबीटी विभाग आहे या विभागामध्ये गेल्या दिड वर्षामध्ये ५ टक्के सुध्दा रक्कम वसुल झालेली नाही. तिथं आपली किती लोक काम करतात जुन्या ज्या कंपन्या आहेत. त्यांना इतका त्रास आहे की,ते क्लिअर पण करत नाहीत आणि ती वसुली पण होत नाही. येत्या १० वर्षात ३४ टक्के तरी रक्कम वसुल होईल का ते बघा साहेब, कारण तिथं लोक फक्त बसुन आहेत. आयुक्त साहेब,तुम्ही प्रत्येक वार्डामध्ये जाऊन भेट देत आहात संपुर्ण शहराची माहिती घेत आहात तुमच्याकडनं आमची फार मोठी अपेक्षा आहे. आयुक्त साहेब,आपण ओरीसा मध्ये चांगल्या प्रकारे काम केलेलं आहे तुमच्या कामाची माहिती याठिकाणी प्रत्येकानी घेतलेली आहे. सर्वात महत्वाचं म्हणजे की,तुमचा कॉन्टॅक्ट महाराष्ट्रातील कोणाशीही नाही. हार्डीकर साहेबांच असं होतं की, एकदा तिकडे गेले की, त्यांच्यासारखं वागायचं आणि इकडे आले की इकडच्या सारखं वागायचं जेंव्हा हार्डीकर साहेब इथं आले तेंव्हा त्यांचे केस काळे,गुळगुळीत होते परंतु या सत्ताधा-यांनी त्यांना म्हातारा करुन टाकलं. त्यांच्यावर काय अन्याय, अत्याचार झालेला आहे हे आम्ही जवळून पाहिलेलं आहे. त्यांनी काय काय त्रास भोगला आहे हे आम्ही आमच्या डोळयांनी पाहिलेलं आहे. आयुक्त साहेब,सिमाताईंनी आताच विषय काढलेला आहे गुंतवणुकीचा गुंतवणुकीवर व्याज म्हणुन महापालिकेला १८५ कोटी रुपये मिळतात तीन हजार कोटी रुपयांची आपली गुंतवणुक आहे. त्यांनी सांगितलं की,कोणती बॅंक आपल्याला जास्त व्याज देणार आहे याच्यामध्ये आपण लक्षं द्यावं. तसेच पर्यावरण हा सर्वात महत्वाचा विषय आहे. याच्यामध्ये नैसर्गीक आपत्ती,नदीसुधार ज्यावेळेस आपण पवना नदी आणि इंद्रायणी नदी सुधार करणार होतो आणि मुळा,मुठा नदीसुधार ही पीएमसी करणार होती. त्यावेळी सत्ता कोणाची होती. नदी सुधारचा प्रोजेक्ट हा केंद्रातुन करायचा होता. यामध्ये काय प्रकार घडला तो माजी महापौरांनी संपुर्ण सभागृहामध्ये सांगितले आहे. माई,त्याच्यामध्ये अजुन एक कंपनी आहे. राजलक्ष्मी म्हणुन संस्था आहे. मला आयुक्त साहेब,तुम्हांला विनंती करायची आहे की, ब्लॅकलिस्ट होत असताना बाकीच्याही कंपन्यांना ब्लॅक लिस्ट करुन टाका. आयुक्त साहेब,तुमच्या बरोबर आमची मिटींग झाली होती सर्वात महत्वाचं म्हणजे जलपर्णी ही तुम्हांला मुळापासून उखडून काढायची आहे. तुमचं व्हीजन आम्ही ऐकलेलं आहे साहेब,तुम्ही जर ही जलपर्णी कायमस्वरुपी काढली तर हे पिंपरी चिंचवड शहर तुम्हांला आयुष्यभर विसरणार नाही. कारण त्या जलपर्णीच्या विषयावर कित्येक लोक बोलतात. आज टेंडरच्या पण काही गोष्टी सगळयांच्या समोर ओपन झालेल्या

आहेत.कोटयावधीचं टेंडर देवुन सुध्दा जर तो ठेकेदार सन्मा.सदस्यांना ज्या भाषेत बोलतो त्याच्यावर आपण गांर्भीयाने लक्षं दिलं पाहिजे.मा. महापौरांनी ज्याप्रमाणे आदेश दिलेले आहेत त्याप्रमाणे तुम्ही त्यांना तशा पध्दतीचे आदेश द्यावेत. कारण त्याचा त्रास हा या शहरातील नागरीकांना होणार आहे. नदीकाठी ज्या लोकांची वस्ती आहे त्या लोकांना या जलपर्णीचा जास्त त्रास होत आहे. तसेच पाणीपुरवठा मगाशी कोणीतरी म्हणलं की,२४ बाय ७ ही योजना दिलीप बंड होते त्यावेळेस प्रायोगिक तत्वावर यमुनानगर वॉर्डामध्ये हा प्रयोग बरेच दिवस चालू होता. त्यानंतर ही योजना बंद पडली. आपण ही योजना २४ बाय ७ म्हणुनच घेवुन आलेलो आहे परंतु त्याची पुर्णपणे अंमलबजावणी झालेली नाही. आयुक्त साहेब,आजच अजितदादाच्या समोर जी बैठक झालेली होती त्या बैठकीमध्ये आपण म्हणाला होता की, मामुर्डीची जी योजना होती मा.महापौर साहेब,आपण जर त्या बैठकीमध्ये असता तर हा विषय समोर समोर क्लिअर झाला असता पण तुम्ही त्या बैठकीला का आला नाहीत हे मला माहिती नाही. ते ३० एमएलडी पाणी जर आपल्याला आलं तर ज्याठिकाणी टेल आहे त्याठिकाणच्या लोकांना पाण्याचा बराच त्रास आहे. याच्यावर आपण लवकरात लवकर कार्यवाही करावी. मा.महापौरांच काही पत्र पाहिजे असेल तर ते ही घ्या,पालकमंत्र्यांनी सुध्दा तसे आदेश दिलेले आहेत. दोन्ही आयुक्त एकत्र बसुन त्यावर निर्णय घेणार आहेत. आणि माई,तुम्ही सुध्दा त्यावर फॉलोप घ्यावा. तसेच आरोग्य विभाग, आयुक्त साहेब, तुम्ही शहर फिरतायं मला पण माहिती होतं की,तुम्ही कधी तरी आमच्या प्रभागामध्ये व्हीजीट करणार आहात,साहेब मी हे गेली पाच दिवसापासून ऐकतोय की,तुम्ही येणार आहे म्हणुन ज्यादिवशी तुम्ही येणार आहे म्हणलं ना,त्यादिवशी रोड चकाचक त्याच्यावर तुम्ही मला उत्तर पण दिलं की, मी सगळया शहरामध्ये अचानक भेट देणार आहे. आयुक्त साहेब,तुम्ही आज कचरा बघा तुम्हांला कच-याचे ढिग पहायला मिळतील आणि हे फक्त प्राधिकरणामध्येच नाही तर संपुर्ण शहरामध्ये बघायला मिळतील. कचरा उचलण्याच्या ज्या दोन एजन्सीज आहेत त्यांना रात्रं दिवस कचरा उचलायला लावा. आणि हे टेंडर सुध्दा त्याच पध्दतीचं होतं पण हे का होत नाही याच्यावर आयुक्त साहेब,तुम्ही लक्ष घालणं फार गरजेचं आहे. स्वच्छतागृह- स्वच्छतागृहामध्ये मागणी केली गेली की, पुण्याच्या धर्तीवर जसं पीएमपीएमएल भाडयाने घेवुन फिरतं शौचालय करावं. स्मार्ट सिटी मध्ये या सर्व गोष्टी आहेत. फिरते शौचालय करण्याची मागणी ही सर्वांचीच आहे. आपल्या स्मार्ट सिटीच्या माध्यमातून हे शौचालये होण्याची गरज आहे. परंतु माई, हे कधी होणार हे माहिती नाही. पिंपरी चिंचवड शहरामधील सर्व महिला या गोष्टीकडे नजर

ठेवुन आहेत. कारण आपल्याकडे मिटींग झाली की,पेपरला बातम्या येतात असं होणार,तसं होणार पण होत तर काहीच नाही. साहेब,तुम्ही कचरा संकलन डेपोला गेला असाल तिथं जेवढया कच-याच्या गाडया आत मध्ये येतात त्या कच-यावर जी काही प्रोसेस करावयाची असते ती होत नाही. मी सुध्दा व्हीजीट केली होती. तिथं भंडारा डोंगराएवढा उंच कच-याचा डोंगर ही लोक त्याठिकाणी उभं करतात. त्याठिकाणी जेवढा कचरा येतोय जेवढया मशिनरी लावलेल्या आहेत त्याच्यामध्ये तेवढया कच-याचे प्रोसेस होत नाही. या कचरा संकलनासाठी आपण या बजेट मध्ये करोडो रुपयांची तरतुद करुन ठेवतो परंतु त्या पध्दतीने त्याचे प्रोसेस होत नाही. त्याठिकाणी कच-याचा स्लज त्या टँकला जाऊन जमा होतो. तेथुन त्याची प्रोसेसिंग केलेली आहे. तर ते आख्खं लिकेज आहे. त्याठिकाणचे आजुबाजुचे जे शेतकरी आहेत ते जो काही भाजीपाला पिकवतो तो खराब होतो. हा सगळा भाग दुषित झालेला आहे. त्याठिकाणचे शेतकरी सुध्दा त्रस्त आहेत. आपण त्याठिकाणी पुर्णपणे ट्रिटमेंटचे पैसे देतोय. कच-याची जी प्रोसेस होते त्याची तुम्ही स्वत: जाऊन पहाणी करा, त्या डोंगरातुन जिथं आपला कचरा निघाला आहे तेथुन पाईप लाईन करुन जवळ जवळ एक चारशे/पाचशे मीटर खाली उतारावर आणुन त्यांनी तो प्लँन्ट लावलेला आहे. आपण त्या ठेकेदाराला पैसे देत आहोत तर त्याच्याकडनं तुम्ही काम करुन घ्या नां. नुसतं त्या कामाचे बिलं निघतात. नागरवस्ती विभाग आहे या विभागासाठी फक्त ५ टक्के तरतुद केली जाते. आपल्याकडे अपंगासाठी गार्डन करण्याचा प्रस्ताव आपल्या समोर आहे. आपल्याकडे शहरातील दिव्यांगाची नोंद आहे. या दिव्यांना महापालिकेने सुविधा देणं बंधनकारक आहे. नाही तर ही लोक त्यांच्या खात्याकडे जाऊन ते आदेश घेवुन येत असतात. आपण इतरांना त्यांचे हातपाय सगळे चांगले असताना त्यांना आपण मदत करतोय मग त्या दिव्यांगाना मदत करणे बंधनकारक आहे. आयुक्त साहेब,दिव्यांगाच्या ज्या काही योजना राज्य शासनाकडे असतील त्या योजनांची अंमलबजावणी महापालिकेने करावी आणि त्यासाठी महापालिकेने आर्थीक तरतुद करावी. नदी सुधारयोजना – आयुक्त साहेब, पुर्वी नदीचं पात्र काय होतं आणि आताच्या नदीचं पात्र कसं आहे हे बघुन घ्या. त्या नदीमध्ये राडारोडा टाकुन त्याठिकाणी पत्राशेड मारलेले आहेत. औंधरावेत रस्ता येथून किवळे चौकापर्यंत याठिकाणी नागरीकांनी त्यांच्या खाजगी जागेमध्ये पत्र्याचे मोठ मोठे शेड टाकलेले आहेत. याच्यावर आपले काही निर्बंध आहेत का, इथे आपल्याकडे बिल्डर प्लॅन पास करुन घेऊन बांधकाम करतात त्याचा प्रॉपर्टी टॅक्स हा ५०/६० लाख रुपये भरतो. आणि इथे पत्रा शेड टाकुन लाखो रुपये कमावतात पण हे पत्राशेडचं काम सुरु असताना आपले

अधिकारी त्याठिकाणी जात नाहीत. ते काम पुर्ण झाल्यानंतर कोणी तक्रार केली तर आपला अधिकारी त्याठिकाणी जातो. आयुक्त साहेब,ज्या प्रभागात अनेक वर्षापासून अधिकारी आहेत ना त्यांची बदली करुन टाका. आपल्याकडे असे काही अधिकारी आहेत की,ते नगररचना विभाग आणि बिल्डींग परमीशन विभाग या दोनच विभागामध्ये काम करतात. २०/२० वर्ष झाली ही लोकं तिथेच आहेत. तेथुन ते हललेच नाहीत ते कोणाचा तरी प्रेशर आणत असतात. आयुक्त साहेब,या शहरातील नागरीकांनी तुम्हांला आयुष्यभर लक्षात ठेवण्यासाठी या शहरासाठी तुमच्या मनामध्ये ज्या संकल्पना आहेत त्या पुर्ण करा. काही अधिकारी या महापालिकेमध्ये संस्थानिक असल्यामुळे ब-याच दिवसापासून स्थिर आहेत. तसेच या शहरातील सर्वात मोठं म्हणजे यशवंतराव चव्हाण हॉस्पिटल या हॉस्पिटलमध्ये आपल्या शहरातीलच नाही तर आजुबाजुच्या ग्रामीण भागातुन सुध्दा लोक येऊन याठिकाणी उपचार घेत असतात. आयुक्त साहेब,आपण कोविडच्या संदर्भामध्ये आपण काम करताय, पण कोविडचे पेशंट वाढत आहेत. तिथं तुम्हांला स्वत: लक्ष घालणं गरजेचं आहे. कारण त्या वायसीएमएच मध्ये कधी,कधी जागा असुन सुध्दा मिळत नाही. वायसीएमएच मधील डॉक्टरामध्येच मतभेद आहेत त्यामुळे हे हॉस्पिटल चांगल्या पध्दतीने चालणार नाही. त्यासाठी याठिकाणी तुम्हांला लक्ष देणं गरजेचं आहे. आपल्या मुंबई-पुणे महामार्ग आहे. माई,तुम्ही स्टँडींग चेअरमन होऊन गेलेल्या आहात कुठल्या पक्षातुन होऊन गेल्या हा पार्ट वेगळा आहे. माई,तुम्ही ज्या पक्षात आहात तर तुम्ही पण एक चांगल काम करुन जावा म्हणजे आम्ही तुम्हांला पण विसरणार नाही. आपल्याकडे निगडी ते दापोडी पर्यंत मेट्रो येत आहे. तुम्ही बाहेरच्या देशात गेलं तर दर दहा वर्षांनी त्याठिकाणचे इलेव्हेशन चेंज झालेलं असतं तुम्ही दुबईला गेले तर त्याठिकाणी दर दहा वर्षानी मेन रस्त्याचे इलेव्हेशन चेंज झालेलं असतं. माझं असं म्हणणं आहे की,त्यांना टॅक्स मध्ये, एफएसआय मध्ये काही सवलती नियमात बसुन देता आल्या तर त्या देण्यात याव्यात. मा.महापौर साहेब,आपल्या रोड टच जेवढया काही प्रॉपटर्या आहेत त्यांना काही सवलती देता आल्या तर त्या देण्यात याव्यात. शिक्षण मंडळ – शिक्षण मंडळाच्या बाबतीत सगळा उलगडा झालेला आहे त्यामुळे मी जास्त बोलणार नाही. याठिकाणी संतोष पाटील हे अति.आयुक्त (१) होते ते फक्त एका दिवसासाठी रजेवर गेले चार्ज गेला अति.आयुक्त (२) कडे त्याच रात्री त्यांनी ते १४ कोटी रुपयांच पेमेंट काढले गेले आहे. आता पण आयुक्त साहेब,तसंच झालं आहे. ते म्हणतात कोर्टात आपल्याला स्टे आणता येत नाही ते आपल्याला पेपर दाखवतात. त्यामुळे त्यांना पेमेंट द्यावं लागतय नियमानुसार त्यांना

पेमेट द्यावं लागतयं साहेबांनी पण त्यांच्यावर उपाय काढलेला आहे. आयुक्त साहेबांनी सांगितले आहे की,मला फक्त थोडे दिवस द्या कोणते वकील लावायचे आहेत त्याच पोस्टमार्टम मी नक्की करेन आणि त्याच्यामध्ये तुम्हांला हे चेक झालेला दिसेल. माई,आपल्या शाळेचा दर्जा काय आहे आपल्या शाळेचा दर्जा टिकवुन ठेवायचा असेल तर याच्यामध्येआपल्याला कुठलेही पक्षीय राजकारण करायचे नाही. या शाळेत शिकणारी मुले ही आपल्या शहरातील आहेत. मगाशी ही गोष्ट विकासनी पण सांगितली आहे. या शाळेत शिकणारी विद्यार्थी हा भविष्यात एक चांगला अधिकारी घडेल अशी अपेक्षा आपण ठेवायची नाही का, मा.महापौर साहेब,आयुक्त साहेबांच्या ज्या संकल्पना आहेत त्या त्यांना पुर्ण करण्यासाठी त्यांना आपण सहकार्य करु, हार्डीकर साहेबांनी ३/४ वर्ष प्रयत्न करुन पाहिलेले आहेत. आपण त्यांचा अनुभव घेतलेला आहे. ते गेले आता आपण त्यांच्या नावाने ओरडतोय . ठिक आहे,आपल्याला यासाहेबांच्या नावाने ओरडायचे नाही त्यांना पण आपण एक चान्स देवु. आम्हांला अपेक्षा आहे की,ते चांगल्या पध्दतीने काम करतील. उदयान विभाग – आयुक्त साहेब,मी आताच घडलेली गोष्ट तुम्हांला सांगतो मी एका अधिका-याला सांगितलं की, माझ्या इथे गजानन महाराजांच मंदीर आहे आणि हे प्राधिकरणातील सर्वात जुनं मंदीर आहे. आणि तिथे एक हजार विद्यार्थ्यांना अभ्यासिका ही ट्रस्ट चालवते याशिवाय आपल्या गार्डनचं मेन्टनंन्स गेली चार वर्षापासून स्वत: करते. आपल्याकडनं एक रुपया सुध्दा घेत नाही. या उद्यानासाठी मी म्हणलं की, त्याच्या मेन्टनन्ससाठी तुम्ही हेड ओपन करा यासाठी मी गेली ८ महिने झाले त्यासाठी फॉलोप करतोय तर त्याची आता उपसूचना आलेली आहे. आम्ही सर्व नगरसेवक हे सुपरव्हिजनचं काम करतोय. आपल्या अधिका-यांना पळवण्यासाठी कधी,कधी वेगळया अँगलनी वापरावं लागतयं. आयुक्त साहेब,काही लोकांची नांव मी तुम्हांला नक्की देईन या अधिका-यांची मालमत्ता तुम्ही चेक करा, हे अधिकारी ज्यावेळेस रुजू झाले होते त्यावेळेस यांची मालमत्ता काय होती आणि आता मालमत्ता काय आहे. अग्निशामक दल- आपल्या शहराची लोकसंख्या जवळपास ३० लाखाच्या आसपास झालेली आहे. आमच्या प्राधिकरणात एक अग्निशामक स्टेशन आहे. ग्रामीण भागामध्ये सुध्दा अग्निशामक केंद्र असणे गरजेचे आहे. आयुक्त साहेब,आपण २७ मजल्यापर्यत बांधकाम परवानगी देणार आहे त्या मजल्यापर्यंत आपली गाडी पोहचली पाहिजे अशा पध्दतीच्या गाडया आपल्याला घेण्यासाठी याबजेटमध्ये तशी तरतुद करायला पाहिजे. ज्याठिकाणी अत्यावश्यक आहे त्याठिकाणी तुम्ही एक डिसीजन घ्या. नागरीकांसाठी ज्या गोष्टी तुम्ही कराल त्यासाठी आम्ही तुमच्या बरोबर आहोत. त्याच्यावरती आम्ही

राजकारण करणार नाही. अग्निशामक सेंटर मध्ये जो यंग स्टाफ भरला आहे ना त्यांचा एक चांगला अनुभव तुम्हांला सांगतो. माझ्या इथं रात्री दोन वाजता साडया क्लॉथ म्हणुन एक दुकान ब-याच वर्षापासून होतं तिथं आग लागली. मी तिथं जाईपर्यंत अग्निशामक दलाची गाडी तिथं आली होती. त्या दुकानाच्या बाजूलाच माझ्या मित्राचं घर होतं आणि तिथंच तो रहायला होता. आणि त्या घरात वरच्या बेडरुममध्ये माझ्या मित्राची आई होती कारण तिचं आख्खं आयुष्य त्या घरामध्ये गेल्यामुळे ती तिथेच होती. त्या घराला शॉर्टसर्कीटमुळे आग लागली आणि ती माऊली त्या दरवाज्यापर्यंत येऊ शकलेली नाही आणि ती जागीच एक्सपायर झाली तर हे काम आपल्या अग्निशामक दलाने कशा पध्दतीने केलं शेवटी ती बॉडी मीच उचलली त्या सिचवेशनमध्ये आपण डोळे सुध्दा उघडू शकत नाही. ती माऊली असती नां तर खुप बरं वाटलं असतं पण वेळ निघुन गेली होती. अग्निशामक दलाचे जे यंग कर्मचारी आहेत त्यांच अभिनंदन केलं तर ते चांगलं काम करतील आणि काही कर्मचारी कामांच्या ठिकाणी जाऊन पत्ते खेळणारी गँग आहे नां त्यांना कुठं तरी नवचैतन्य येईल यादृष्टीने आपण आयुक्त साहेब,त्यांना बोलवून त्यांच्या काय अडचणी वगैरे आहेत त्या सोडविण्यासाठी या बजेटमध्ये तरतुद करायची असेल तर ती करुन घ्यावी. पीएमपीएमएल – पीएमपीएमएल म्हणजे सासु सुनेचं जसं भांडण असतं तसं आहे. आपल्या शहरातील जेवढे पीएमपीएमएलचे कर्मचारी आहेत. ते आपल्या कर्मचा-यांचा दुजाभाव करतात. पीएमपीएमएल ही कंपनी झाली आपण आपल्या प्रॉपटर्या या त्यांच्या ताब्यात दिलेल्या आहेत. आपल्या शहरातील सर्व मोक्याच्या जागा स्वाधीन करुन बसलेलो आहे. वेतनवाढ,भरती, पुर्व पीसीएमटी व पीएमटी कर्मचा-यांमध्ये भेदभाव होतो. आमच्या कामगारांना तिथं सन्मानाने वागणुक दिली जात नाही. दरवेळेला आम्ही त्यांच्या अधिका-यांना इकडे बोलवायचं त्यांच्याकडनं ते मान्य करुन घ्यायच, त्यांना समजावयाच. आताची गोष्ट आहे, काही कर्मचा-यांचे ५/६ महिने रिटायरमेंटला आलेले आहेत. त्यांना प्रमोशन दिलं आणि त्यांना तो कर्मचारी या भागातला असेल तर त्याला हडपसरला बोलवतात. आता त्या कर्मचा-याचं वय काय,तो सकाळी ४.३० वाजता उठून कसा जाणार. आयुक्त साहेब,तुम्ही पीएमपीएमएलची मिटींग लावा त्याच्यामध्ये मा.महापौर आणि पक्षनेते यांना बोलवा आणि त्या मिटींगमध्ये आपल्या शहरातील जेवढे कर्मचारी होते त्यांच्यावर अन्याय होता कामा नये. मला वाटतं या मताशी तुम्ही सुध्दा सहमत असाल . पीएमपीएमएल ने त्यांच्या भागातील कर्मचारी हे त्यांनी तिकडे वापरावीत आणि आपल्या भागातील कर्मचारी हे आपल्याकडे वापरावीत. आपले काही नगरसेवक हे नवीन नवीन रुट चालू करण्याची

मागणी करत आहेत. आयुक्त साहेब,आपण भक्ती-शक्ती रोडपासून किवळे गावात जाणारा रस्ता लटकलेला आहे आपण त्यासंदर्भात बोललो आहे की, त्यासंदर्भातलं अवॉर्ड कधी होणार आहे. त्या रोडवर कंपन्याच्या गाडया लागलेल्या आहेत. त्या रोडचं पार्कीग करुन टाकलेलं आहे संध्याकाळी रात्री ११.०० ते ११.३० च्या दरम्यान त्याठिकाणी वॉशिंग सुरु होतं. त्या रोडवरुन चालायला नागरीक बीआरटी रोडला येतात. त्या गाडया वॉशिंग केल्यानंतर त्यांची सगळी घाण ही रोडवर आलेली असते. वॉशिंगसाठी तिकडे रावेतकडे आहे नां आम्हाला सांगितलं होतं की,आम्ही ते तिकडे शिफ्ट करु, त्यानंतर तुम्ही नवीन जागेचं मगाशी सांगितलं की, बस स्टॉपला टप-याचं काही तरी चाललयं साहेब,ही त्या त्या भागातील नगरसेवकांना कल्पना देवुन याच्यामध्ये जी काही तरतुद केली आहे ते मागणी करतायत ३० ते ३८ कोटीची रुपयांची मा.महापौर साहेब,तुम्हीही याच्यामध्ये लक्षं घालावं. आयुक्त साहेब, सर्वात महत्वाचं म्हणजे कर्मचा-यांची धन्वंतरी योजना,हे इंन्शुरन्स कसं आणलं,कोणी आणलं,कशा पध्दतीनं झालं हे हार्डीकर साहेबांना अक्षरशा वेगळया पध्दतीने लोकांची दिशाभूल केली. आपली कर्मचारी संघटना आहे. त्यांच्या मनासारखी त्यांना इंन्शुरन्स द्यायला काय अडचण होती का,आपल्याला, ते काय मागणी करतात पहिली जी धन्वंतरी योजना चालू होती तीच चालू राहू द्या. धन्वंतरी योजना ही १.९.२०१५ साली राष्ट्रवादीची सत्ता होती त्यावेळेस ही योजना लागू केलेली होती. सदर योजनेमध्ये कार्यरत कर्मचा-यांकडुन दरमहा रु.३००/- व सेवानिवृत्त कर्मचा-यांकडुन दरमहा रुपये १५०/- व मनपाचा दुप्पट हिस्सा उभारण्यात आला आहे. कार्यरत कर्मचारी ७५०० व सेवानिवृत्त ५००० कर्मचारी आहेत. आणि मनपाचा हिस्सा १० कोटी ८० लाख रुपये इतका निधी जमा होतो. २०१५ पासून आतापर्यंत ७६ कोटी रुपये इतका खर्च झालेलाआहे. आणि सदर योजनेसाठी दरवर्षी रुपये १५ कोटी रुपये या योजनावरती खर्च झालेला आहे. आणि या नवीन इंन्शुरन्स योजनेसाठी आपण २८ कोटी रुपयांची निविदा स्विकारली आहे. आणि २८ कोटी रुपये कुठं आणि १५ कोटी रुपये कुठं याच्यामध्ये किती फरक आहे. महापालिकेचा कुठलाही कर्मचारी असु दे त्यांच्या मनासारखं काम होऊ द्यां त्यांच्यावर अन्याय झाल्यामुळे हे कर्मचारी कोर्टात गेले. आणि त्यांनी स्टे आणला आणि त्याच्यावर आता परत ३१ तारखेला त्याच्यावर स्टे घेतला होता त्याच्यावर परत ते कोर्टात जाणार आहेत. पक्षनेते आपण त्या कामगारांची कशाला हाय घेताय या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे कर्मचारी तुम्हांला माफ करणार नाहीत. त्यांची तुम्हाला हाय लागेल. हे कर्मचारी रोज झगडत आहेत,रोज येऊन आम्हांला भेटतात आयुक्त साहेब,तुम्ही याचा विचार करावा. धन्वंतरी

योजनेमध्ये प्रत्येक कुटूंबाला २० लाख रुपया पर्यंतचं कव्हरेज मिळणार होतं. आणि या विमा योजनेमध्ये फक्त रुपये३ लाखा रुपयांपर्यंतच कव्हरेज मिळणारं आहे. माई,एवढा अन्याय आपण आपल्या कर्मचा-यावर का करायचा. त्यांच पण कुटूंब आहे. आज गौड मामा आहे त्यांच वय झालेलं आहे ते आता रिटायर होतील. गुन्हा दाखल करुन गेला ,कोणी गुन्हा दाखल केला गौड मामा आला आता त्याच्या नावाने गुन्हा दाखल केला आहे. प्रमुख म्हणुन त्यांनी गुन्हा दाखल करायला गेला. माई, आता त्यांच वय बघा, तीन लाख रुपयामध्ये उपचार कुठल्याही हॉस्पिलमध्ये होतं का, आयुक्त साहेब,तुम्हांला आताही सांगतो की, कोविड परत वाढणार आहे. हे प्रायव्हेट हॉस्पिटल हे अक्षरशा मानेवर सुरी फिरवुन नागरीकांकडनं बिलं घेतात. त्यांच्यावर पण आपण निर्बंध आणले पाहिजेत. कारण मी पाहिलेलं आहे माझ्या मित्रांचे वडील गेले त्यांनी त्यांच्याकडनं १२ लाख रुपये घेतले. माणुस गेल्यानंतर त्यांच्याकडन १२ लाख रुपये घेतले होते त्या हॉस्पिटलनी या शहरातील जे धनवान आणि मोठे नेते आहेत त्यांच्यावर वॉच ठेवतात त्यांनी तिथं माणसंच बसवुन ठेवलेली आहेत की,आयुक्त साहेब,ते ४.०० वाजत ते काका कोविडमुळे गेले. त्या काकाच्या मुलाला वडीलांनी पैसे कुठे ठेवले आहेत, कुठे नाही काही माहिती नव्हतं. त्यांनी प्रयत्न करुन पाहिला त्यांनी मला ७.०० वा.फोन केला मी ९.३० वा.गेलो तोपर्यंत त्यांचा स्टाफ निघुन गेला होता. ते म्हणले आपण सकाळी बघु सकाळी ११.०० वा.हॉस्पिटलमध्ये गेल्यानंतर तिथं मोठ मोठया हॉस्पिटल मध्ये सिस्टीम आहे. कोण चांगल आहे का, खुर्चीवर मस्तपैकी बसवलं जातं आणि तिथं त्यांची माणसं बसवली आहेत. आणि ते तुम्ही किती पैसे देवु शकता याची ते तुमची कॅपॅसिटी बघतात शेवटी त्यांनी त्यांच्या घरच्यांना फोन लावला,मला फोन आला मी त्यांना म्हणलं मी बॉडी घेवुन जाणार आहे. मी एक रुपया भरणार नाही. साहेब,त्या काकांच जे काही चेकअप केलं होतं नां त्याच बिल त्यांनी साडेपाच लाख रुपये लावलं होतं. सेव्हन स्टार हॉस्पिटल आहे. त्याच्या आतमध्ये गेलं की, तिथं त्यांचे बाऊंसरच आहेत. साहेब,या प्रायव्हेट हॉस्पिटलच्या डॉक्टरांचे नंबर घ्या आणि कुठल्याही नागरीकांना त्रास झाला तर या नंबरवर फोन आला पाहिजे. प्रायव्हेट हॉस्पिटलनी कोविड झाल्यानंतर त्यांनी कशा प्रकारे बिलाची आकारणी करायची हे आपल्या डॉक्टरांनी शासनाने जे दर दिलेले आहेत त्या दराप्रमाणे त्यांनी बिलांची आकारणी करणेत यावी असे फलक खाजगी हॉस्पिटलच्या दर्शनी भागावर लावण्यात यावे. हे खाजगी हॉस्पिटलवाले असे दिलेले फलक कुठं तरी कोप-यात नेऊन ठेवतात. आणि ते सर्वसामान्य माणसाला दिसत पण नाही. मा.महापौर साहेब, कोविडचा वाढता

प्रादुर्भाव विचारात घेवुन  यावर आपण लक्ष द्यावं. तसेच कामगारांच्या बाबतीतला जो विषय आहे त्याच्याबाबतीत पुन्हा  फेरविचार करावा. कोणाच्या डोक्यात ही सुपीक कल्पना आली आणि ती कल्पना कोणी अंमलात आणली यामध्ये मला जायचं नाही. महापालिकेच्या कर्मचा-यांना जो काही त्रास होत आहे. त्यासाठी कर्मचा-यासाठी असलेली धन्वंतरी योजना ही चालू राहू द्यावी. आणि ही योजना बंद केली तर सगळे कर्मचारी हे पोर्च मध्ये दिसतील. तरी माई,आपण या कर्मचा-याला न्याय देण्याचं काम करावं. स्मार्ट सिटी, या स्मार्ट सिटीच्या बाबतीत मी वारंवार बोलतोय, महापौर  साहेब,तुम्ही या स्मार्ट सिटीमध्ये मेंबर आहोत. या स्मार्ट सिटीमध्ये कशा पध्दतीने कामकाज चाललयं, हायजॅक काय झालं, हया सगळया खेळाची मला सगळी उत्तरं आलेली आहेत. या मध्ये आपल्या महापालिकेचं  आर्थीक नुकसान झालं की,नाही. मी स्मार्ट सिटीला जे पत्र दिलं होतं त्याचं उत्तर मला त्यांनी दिलेलं आहे ते उत्तर मी तुमच्याकडे घेवुन येणार आहे. या पिंपरी चिंचवड शहराचा संपुर्ण  डाटा त्या हिंजवडीमध्ये आहे. आणि तो जर डाटा तिकडे शिफ्ट झाला असता आपल्या अधिका-यांनी सांगितलं की,ते डाटा तिकडे बनवत होते तो डाटा तिकडे सेफ नाही. ते जर झालं नसत नां तर आपला आख्खां डाटाच स्क्रॅप झाला असता. त्या कंपनीने इन्शुरन्स कंपनीकडे ५ कोटी रुपयांची कम्प्लेन केली आहे. तुम्ही मला म्हणालात की,आपलं काही नुकसान झालेलं नाही मान्य आहे. पण तक्रार दाखल करण्यासाठी १२ दिवस कशासाठी लागतात. त्यांची नजरचुक असेल मान्य आहे नां, मग तुम्ही कम्पलेन का केली. माई, त्या विषयाच्या संदर्भामध्ये आपल्याला बसायचे आहे. याच्यामध्ये महापालिकेची खुप बदनामी झालेली आहे. बदनामी ही बाजुला ठेवु पण जर हे स्क्रॅप झालं असतं आणि हायजॅक झालं असतं तर त्याला जबाबदार कोण, स्मार्ट सिटी जबादार नाही, ही कम्पलेन स्मार्ट सिटीनेच करायला पाहिजे. स्मार्ट सिटीला आपण करोडो रुपये देवुन सुध्दा जर ही परिस्थिती असेल तर, तो डाटा सेफ नसेल, तर या महापालिकेचं भवितव्य काय?  मा.महापौर साहेब,तुम्ही पुन्हा एकदा या सर्वांना आदेश द्या की,या स्मार्ट सिटीचा जो काही प्रकार आपल्या समोर आलेला आहे. यासंदर्भात आपण यांच्या बरोबर मिटींग लावावी. तसेच सल्लागारांचा जो सुळसुळाट चालू आहे तो आपण थांबवावा. अर्बन डेव्हलपमेंट रोड केला आहे. माझ्या इथं पण सल्लागार आहे सेम रोड आहे. हा जर सेम रोड असेल तर एकाच सल्लागाराकडनं हा रोड करुन घ्या नां. या कामाला वेगळा सल्लागार,त्या कामाला वेगळा सल्लागार यांना आपण करोडो रुपये देत आहोत. या महापालिकेत ६५ सल्लागार आहेत. एवढे सल्लागार असतील तर आपले जे अधिकारी हे बाहेरच्या देशामध्ये  शिक्षणासाठी जातात, त्यांना शिक्षणासाठी बाहेर

पाठवतो मग आपल्या अधिका-यांना हे जमत नाही का, त्यांना एवढं ज्ञान नाही का, ठिक आहे, एकदम पारदर्शकता असली पाहिजे म्हणुन तुम्ही सल्लागार आणताय का, पारदर्शकता, मग आपला अधिकारी काय करतो. ६५ सल्लागार आहेत त्यांना आपण किती पैसे देतोय ते पहा. अर्बन डेव्हलपमेंट रोडमध्ये हार्डीकर साहेबांनी त्यावेळेस आम्हांला सांगितलं होतं की, जे अर्बन डेव्हलपमेंट रोड झालेले आहेत नां, किवळे रोड हा कम्पलीट झाला आहे त्याच्यावर आम्हांला सांगितलं की, या रोडवर आता अतिक्रमण होणार नाही. आणि त्याच्यावर आम्ही स्कॉड ठेवणार आहे. त्या स्कॉडचं काय झालं आमच्याकडे एवढे मोठमोठे फुटपाथ आहेत त्याच्यावर सगळी दुकाने थाटुन बसलेली आहेत. लोकांना चालण्यासाठी आपण हे फुटपाथ केलेले आहेत. संपुर्ण शहरामध्ये हीच परिस्थिती आहे. मी म्हणतो हा  फिरता स्कॉड आपण ठेवला पाहिजे. नाही, तर तिथं एखादी टपरी पडल्यानंतर ही टपरी काढणं फार अवघड होतं. साहेब,आमच्या इथं पिंपरी चिंचवड पॉलीटेक्नीकल  कॉलेज आहे त्या  कॉलेजच्या समोरच्या रोडवर सगळया गाडया असतात लोकांना जाता येत नाही. त्या   कॉलेजच्या प्रमुखांना तुम्ही बोलवून घ्या आणि त्यांना सांगा की, तुम्ही  कॉलेजच्या आतमध्ये पार्कींगसाठी जागा ठेवली पाहिजे. भटकी कुत्री, याबाबतीत मगाशी सदस्यांनी सांगितले आहे की, बेल्ट, बिल्ला झाला सगळया काही संकल्पना झाल्या आहेत. हे झालं त्या भटक्या कुत्र्यांच, मी म्हणेन की, जे पाळीव कुत्रे आहेत ते आपल्या डिव्हायडर आणुन आपल्या शहरामध्ये घाण करतात याबाबतीत माझी आपल्याला विनंती आहे की, त्यांचा आपण विचार केला पाहिजे की, मा.महापौर साहेब,आपण आयुक्तांना तसे आदेश द्या की, या डॉगसाठी वेगवेगळया शहरामध्ये कुठं तरी साईडला जागा आहे त्याठिकाणी असे स्पॉट तयार करा. आयुक्त साहेब,आपल्या शहरामधील  पाळीव प्राण्यांची नोंद ज्या लोकांनी आपल्याकडे केली आहे त्या लोकांना बोलवा त्यांना बॅग आणि हॅण्डग्लोज द्या . आणि त्यांना २/३ महिने दिल्यानंतर आता जी लोक रोडवर डॉग घेवुन फिरतात त्यांना सवय लागेल. नाही तर या लोकांना ५ हजार रुपयांचा दंड  करुन टाका म्हणजे हे लोकं शहाणे  होतील. माई, बराच वेळ झाला आहे. मंगलाताईंनी पण बराच वेळ सभा चालवली आहे. माई, तुम्ही पण बराच वेळ झाले बसलेला आहात, गेली चार वर्ष अंदाजपत्रकावर बोलू दिलं नाही यावेळेस मात्र त्यांनी बोलू दिलं त्यामुळे माई, या ओरीजनल आमच्या आहेत.  त्यामुळे माईला या शहराची तळमळ आणि जाण आहे. तुमच्या कारकीर्दीत या बजेटमध्ये जे,जे सुचविले आहे त्याची नोंद करुन आपण त्याप्रमाणे मा.आयुक्तांना आदेश देण्यात यावे आणि आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल तुमचे मनापासून आभार मानतो धन्यवाद.

मा.घुले नानी उर्फ हिराबाई - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. ऑनलाईन उपस्थित असलेले सर्व नगरसेवक नगरसेविका. आज जलपर्णी विषयी बोलले की मुळापासून ती काढून टाकायची, त्यासाठी मला आनंद झालेला आहे खरच ती मुळापासून काढून टाकावी कारण यामुळे दिघी-बोपखेल तुमच कायम ऋणी राहील. त्यामुळे इतके मच्छर झालेले आहेत व त्याचा भयंकर त्रास होतो. जेवणात सुध्दा मच्छर येतात, कुणाची मयत झालीतर माणस मयतीच सोडून मच्छरच मारत बसतात. तरी आपण जलपर्णी काढून टाकलीतर दिघी-बोपखेल तुमच कायमच ऋणी राहील एवढच बोलून थांबते, जयहिंद जय महाराष्ट्र.

मा.नामदेव ढाके - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. ऑनलाईन उपस्थित असलेले सर्व नगरसेवक नगरसेविका. जवळपास साडेआठ तास झालेले आहेत. स्थायी समितीचे चेअरमन नितीनजी लांडगे यांनी हे बजेट सादर केलेल आहे त्यावर संपुर्ण चर्चा झालेली आहे. मा.महापौर साहेब, गेल्या चार वर्षामध्ये २०१७ ला भारतीय जनता पार्टीची सत्ता या महापालिकेमध्ये आली. अनेक सदस्यांनी याठिकाणी आपल्या भागामध्ये बजेट कमी दिल, जास्त दिलं या संदर्भामध्ये याठिकाणी चर्चा केली, मी त्या आकडयांमध्ये नक्कीच जाणार नाही कारण गेल्या साडेआठ तासापासून प्रत्येक सदस्यांनी आपआपली भूमीका याठिकाणी मांडली आहे. मग ते विरोधामधले राष्ट्रवादीचे नगरसदस्य असतील, शिवसेनेच्या गटनेत्यांच्या माध्यमातून भूमीका मांडली, सत्ताधारी भारतीय जनता पक्षाच्या नगरसदस्यांनी याठिकाणी आपली भूमीका मांडली. परंतु सन्मा.महापौर साहेब मला याठिकाणी अभिमानाने सांगावस वाटत की या वर्षाच्या बजेटमध्ये आणि गेल्या चार वर्षामध्ये भारतीय जनता पार्टीची सत्ता आल्याच्यानंतर एवढया जलदगतीने या शहराचा सर्वांगीन विकास झालेला आहे हे मात्र राष्ट्रवादीने आणि विरोधकानी विसरता कामा नये आणि ती सुध्दा त्यांनी आपल्या भाषणामध्ये कबुली दिलेली आहे. वेगवेगळया विभागामध्ये काय तरतूद केली, आपण काय केल पाहीजे आपण याठिकाणी अधिक जलद गतीने टेंडर कशा पध्दतीने राबवले गेले पाहीजे आणि येणा-या २०२२ च्या निवडणूकीस आपल्याला सामोर जायच आहे त्यासाठी शहराच्या सर्वांगीण विकासासाठी याठिकाणी बजेट याठिकाणी मांडलेल आहे. मी भारतीय जनता पार्टीचा कार्यकर्ता आहे आणि अन्त्योदय हे आमच्या डीएनए मध्ये आहे, अन्त्योदय म्हणजे शहरातील शेवटच्या घटकापर्यंत ख-या अर्थाने विकास, आम्ही म्हणणार नाही सिमेंटचे रस्ते केले, विशेष योजना केल्या, अंडरपास केले, मोठे पुतळे उभे केले किंवा महीलांसाठी काय केले परंतु समाजामध्ये असणा-या सर्व घटकाना बरोबर घेवून जावून हे बजेट याठिकाणी केलेल

आहे. मी याठिकाणी अवर्जून सांगेल गेल्या चार वर्षामध्ये बजेटची खर्ची होणारी रक्कम आणि तुमच्या दहा वर्षामध्ये खर्ची होणारी बजेटची रक्कम याठिकाणी तुम्हांला मी खुल आवाहन करतो की सांगून दाखवा किती बजेट याठिकाणी होत होतं, तरतूद किती केली जात होती आणि किती कामांना आपण ही तरतूद वापरत होतो आणि आम्ही आल्याच्यानंतर याठिकाणी वेगवेगळया माध्यमातून ताईनी सांगीतल खर म्हणजे मंगलाताईनी, सिमाताईनी सविस्तररीत्या याठिकाणी सांगीतल की पहील्या वर्षामध्ये सिमाताई पहील्यांदा स्थायी समितीच्या सभापती झाल्या आणि मला असं वाटत पहील्या सभापतीनी त्यांच्या वर्षभरामध्ये काढलेले टेंडर, दुस-या सभापतीनी त्यांच्या वर्षभरामध्ये काढलेल टेंडर, तीस-या सभापतीनी काढलेले टेंडर आणि चौथ्या सभापतीनी काढलेले टेंडर आणि आता आमचे नितीन लांडगे यांच्या माध्यमातून पाचव्या वर्षामध्ये पुर्णत्वाला नेणारे प्रोजेक्ट या माध्यमातून याठिकाणी होणार आहेत. मी विरोधी पक्षाला अवर्जून याठिकाणी सांगेल शहरामध्ये विकासाच्या माध्यमातून विकास डोळस असतील, चिखली मधील माजी महापौर राहूलदादा जाधव यांनी याठिकाणी भूमीका मांडली आणि सिमाताईनी सांगीतल आम्ही शहराच्या चारही बाजूला गोल्डन चौकोन म्हणलतरी वावग ठरणार नाही, शहराच्या चारही बाजूला मग ते च-होली असेल, तळवडे असेल, सांगवी असेल, पुनावळे, रावेत असेल या चारही भागामध्ये डेव्हलपमेंट करण्याचा मनोदय याठिकाणी आमच्या दोन्ही आमदारांच्या माध्यमातून या शहराला एक वेगळ वळण देण्यासाठी आमचे आमदार लक्ष्मणभाऊ जगताप असतील, आमदार महेशदादा लांडगे असतील या दोन्ही आमदारांच्या माध्यमातून आम्ही सर्व पदाधिका-यांनी याठिकाणी सर्व घटकाना समाविष्ठ करुन याठिकाणी शहराचा सर्वांगीण विकास केलेला आहे. खर म्हणजे याठिकाणी राष्ट्रवादीच्या नगरसदस्यांच्या माध्यमातून भूमीका मांडली खर म्हणजे अजीतभाऊ याठिकाणी उपस्थित पाहीजे होते. शिवसेनेच्या गटनेते राहूलदादानी सांगीतल जाहीरनाम्याविषयी अरे, आम्हीतर जो जाहीरनामा केलेला आहे त्या जाहीरनाम्यामध्ये सत्तर टक्के पुर्णत्वाला येण्याची जनतेची जी काही अपेक्षा होती ती केलेली आहे. ताईनी सांगीतल आम्ही जाहीरातीमध्ये कमी पडलो आणि ते खरं आहे. परंतु सन्मा.महापौर साहेब, यासंदर्भामध्ये आपल्याला जाहीरात करायच काम नाही, जाहीरात कोण करतो जो काम करत नाही तो जाहीरात करतो. मला गर्वाने आणि अभिमानाने आमच्या नगरसदस्यांना सांगाव वाटेल की प्रत्येक गावामध्ये, प्रत्येक वॉर्डामध्ये, शहराच्या वेगवेगळया भागामध्येजर पब्लिसीटीच्या माध्यमातून याठिकाणी जनता स्विकारलेल आहे की ख-या अर्थाने भारतीय जनता पार्टी या पिंपरी चिंचवडमध्ये सत्तेत आल्याच्यानंतर

त्यांनी ख-या अर्थाने वेगवेगळया माध्यमातून याठिकाणी विकास केलेला आहे. खर म्हणजे महीला व बालकल्याणच्या माध्यमातून याठिकाणी सांगीतल गेल, महीला बालकल्याणच्या माध्यमातून बजेट किती होतं, चार वर्षापुर्वी बजेटची किती तरतूद वापरली जात होती आणि आता किती बजेट महीला बालकल्याणसाठी याठिकाणी ठेवलेल आहे. ५३ कोटी आपण येणा-या वर्षामध्ये ठेवल आहे. सन्मा.महापौर आपण परवाच दिवशी सांगीतल की ज्या महीला ड्रायव्हींग ट्रेनिंगच्या माध्यमातून नव्याने पीएमपीएमएलच्या गाडया आपण खरेदी करणार आहोत, इलेक्ट्रीकल बसेस त्याच्यावरती महीलांना जे ड्रायव्हींगच प्रशिक्षण दिल आहे त्या महीलांना त्याठिकाणी ड्रायव्हींग करण्याच्या माध्यमातून सुध्दा आपण या महीला बालकल्याणच्या माध्यमातून आपण तीथ याठिकाणी करणार आहोत. मला सांगायला आनंद वाटेल की ज्यावेळेला ड्रायव्हींगच्या कोर्सेसच्या माध्यमातून, ओला, ओबेरच्या माध्यमातून ताईनी सांगीतल पहील्या चेअरमन झाल्याच्यानंतर त्यांच्या माध्यमातून आज टाटा मोटर्समध्ये चौदा ते पंधरा महीला त्याठिकाणी बसवरती ड्रायव्हींग करतात. याठिकाणी कृती करुन त्याची अंमलबजावणी करण्याच काम महीला बालकल्याणच्या माध्यमातून केलेल आहे. खर म्हणज सक्षम करायच, सक्षम करायच परंतु ख-या अर्थाने महीलांना स्वतःच्या पायावरती रोजगार उपलब्ध करुन दयायचा ही भूमीका भारतीय जनता पार्टीनी याठिकाणी घेतलेली आहे. खर म्हणजे याठिकाणी आरोग्याच्या संदर्भामध्ये बोलल्या गेलं, याठिकाणी पाण्याच्या संदर्भामध्ये बोलल्या गेलं. राजाभाऊ आपणही सांगीतल की आंद्रा, आणि भामा-आसखेडच्या संदर्भात आमची सत्ता महाराष्ट्र राज्यामध्ये असताना आमचे तत्कालीन मुख्यमंत्री आणि जलसंपदा मंत्र्यांच्या माध्यमातून २०१८ ला ज्यावेळेला आम्ही मंजूरी घेतली. आंद्र धरणामधुन १०० एमएलडी पाणी अणि भामा-आसखेड मधुन २०० एमएलडी पाणी उचलण्याची आणि मागच्या महासभेमध्ये सुध्दा मी सांगीतल की खर म्हणजे हे काम पुर्णत्वाला नेण्यासाठी आमचे दोन्ही आमदार याठिकाणी प्रयत्नशील आहेत, आम्ही सर्व पदाधिकारी याठिकाणी प्रयत्नशील आहोत. ख-या अर्थान याठिकाणी वाढत नागरीकरण लक्षात घेता, लोकसंख्या लक्षात घेता आम्ही सत्तेत आल्याच्यानंतर त्यावेळेला आम्ही लक्षात घेतल की हा प्रॉब्लेम सॉल्व्ह जर करायचा असेलतर नवीन सोर्स उपलब्ध करायला पाहीजेत आणि नवीन सोर्स उपलब्ध करण्याच काम याठिकाणी आमच्या नेते मंडळीच्या माध्यमातून आणि त्यावेळचे आमचे सत्ताधारी असणारे मुख्यमंत्री आणि जलसंपदा मंत्र्यांच्या माध्यमातून याठिकाणी झालाय. मा.महापौर साहेब, मला याठिकाणी सांगायला आनंद होईल की ख-या अर्थान ऑक्टोबर, नोव्हेंबर

पर्यंत आपण आपल्या या पिंपरी चिंचवडची लोकसंख्या मोठया प्रमाणात वाढलेली असेलतरी त्यांना आपण दररोज पाणीपुरवठा आंद्र धरण्याच्या माध्यमातून देण्यासाठी याठिकाणी प्रयत्नशील आहोत आणि मला असं वाटत ते पुर्णत्वाला नेण्यासाठी त्याचा पाठपुरावा आपण करत आहोत. सन्मा.आयुक्तांना मी याठिकाणी विनंती करणार आहे की आपल्या माध्यमातून नोव्हेंबर महीन्यापर्यंत आपल्या अधिका-यांच्या माध्यमातून बैठका घेवून या कामाला जलदगतीन करण्यासाठी आणि नोव्हेंबर महीन्यापर्यंत सर्वांना दररोज पाणीपुरवठा करण्यासाठी सुध्दा नियोजन या बजेटच्या माध्यमातून याठिकाणी झालेल आहे. राजाभाऊ आपण विरोधी पक्षनेते आहेत आपण मान्य करायला पाहीजे की आपण सांगत होते, मंगलाताई सुध्दा सांगत होत्या पण या पाच वर्षामध्ये आमच्याकडून किती आपण अपेक्षा करणार आहेत. गेल्या दहा वर्षामध्ये ज्या काही गोष्टी होवू शकलेल्या नाहीत त्या या चार वर्षामध्ये केल्यात त्यातलच एक उदाहरण आहे पवनासारखी परिस्थिती आम्ही नक्की याठिकाणी करणार नाहीत. पवना जलवाहीनीच्या संदर्भामध्ये किती वर्षापासून पवना जलवाहीनी याठिकाणी आहे. आंद्र धरणाच्या पाण्यी २०१८ ला आम्ही मंजूरी घेतली, जलशुध्दीकरण केंद्राच्यासाठी जिल्हाधिका-यांकडून जागा घेतली, टेंडर काढल, पाईपलाईन टाकल्या, टाक्या बांधण्याच काम सुध्दा समांतर पध्दतीन याठिकाणी केल गेल आहे आणि म्हणून आम्ही यासंदर्भामध्ये लोकांना माहीती आहे की भारतीय जनता पार्टी हे ख-या अर्थान आमच पाणी नोव्हेंबर पर्यंत आम्हांला देणार आहे आणि म्हणून पुतनामावशीच प्रेम करणारे नक्कीच आम्ही नाहीत, राजाभाऊ कारण तुम्हांला कुणी आडवल नव्हत, तुम्हांला मान्य आहे की दहा वर्षामध्ये पिंपरी चिंचवडमध्ये राष्ट्रवादीची सत्ता होती आणि चांगल्या कामाच कौतूक तुम्हांला करावच लागणार आहे. कारण या सभागृहामध्ये चार वर्षे झाले आपण अपेक्षा व्यक्त केली हे झाल पाहीजे, ते झाल पाहीजे तुम्हांला कुणी आडवल होत दहा वर्षे आणि म्हणून या नोव्हेंबर महीन्यापर्यंत पाणीपुरवठा सुरळीत होईल आणि चांगल आंद्र धरणातून पाणी आपण आणू. मगाशी आपण मुद्दा उपस्थित केला रावेत बंधा-यावरुन वाघोली ग्रामीणला आपण जे काही ३० एमएलडीची जी स्किम आहे त्या ३० एमएलडीच पाणी आपल्या शहराला तातडीन आणण्यासाठी तुम्ही मगाशी मा.महापौरांना सांगीतल आणि त्यासाठी सुध्दा पत्रव्यवहार आपण त्याठिकाणी केलेला आहे. आपल्या जिल्यातील मा.पालकमंत्र्यांना सुध्दा आपण सातत्याने पाठपुरावा करावा जेणेकरुन ३० एमएलडी पाणी जे ग्रामीण भागाला वाघेलीला आपल जातं ते परत जर आपल्याला याठिकाणी मिळालतर मला अस वाटत ते ३० एमएलडी आणि आपण रावेत बंधा-यावरुन अजून

